# मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
यांच्या तात्विक सामाजिक शास्त्रे विद्याशाखेंतर्गत
ग्रंथालय व माहितीशास्त्रे विषयातील
विद्यावाचस्पती पदवीसाठी
सादर केलेला प्रबंध


संशोधक

**श्री. वैभव प्रफुल्ल पंडित.**

मार्गदर्शक

**डॉ. मधुकर शेवाळे.**


जून, २०१७.

## --::: संशोधकाचे प्रतिज्ञापत्र ::--

मी श्री. वैभव प्रफुल्ल पंडीत, कायम नोंदणी क्र. १६११३००७७१७ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."** या विषयावरील शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागांतर्गत विद्यावाचस्पती पदवी करीता सादर करीत आहे. हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भांची यथायोग्य नोंद केलेली आहे. सदर प्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठातील पदवी करीता अगर परीक्षेकरता सादर केलेला नाही.

(श्री. वैभव प्रफुल्ल पंडित)
संशोधक

ठिकाण : पुणे
दिनांक : /०६/२०१७.

## --::: मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र ::--

असे प्रमाणित करण्यात येते की श्री. वैभव प्रफुल्ल पंडित कायम नोंदणी क्र. १६११३००७७१७ यांचा संशोधनाचा विषय **"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."** हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या आराखड्याप्रमाणे पूर्ण करुन सादर केलेला आहे. विद्यापीठाकडून उपलब्ध असलेल्या सर्व माध्यमांचा या संशोधन प्रबंधासाठी उपयोग करुन घेतला आहे. माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवीकरीता किंवा परीक्षेकरीता वापरलेला नाही. सदर प्रकल्प विद्यावाचस्पती ग्रंथालय व माहितीशास्त्र या पदवीकरीता पात्र आहे.

**(डॉ. मधुकर शेवाळे)**
**मार्गदर्शक**

ठिकाण : पुणे

दिनांक :      /०६/२०१७.

# --:: ऋणनिर्देश ::--

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या तात्विक सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतंर्गत ग्रंथालय व माहितीशास्त्रे विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेला **"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."** हया प्रबंधाच्या निमित्ताने ग्रंथालयांचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केला आहे.

संशोधन विषय निश्चित झाल्यापासून ते लिहून पूर्ण करण्यापर्यंत मार्गदर्शक म्हणून भुमिका पार पाडणारे डॉ. मधुकर शेवाळे, ग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक यांचे सर्वप्रथम मन:पूर्वक आभार. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संशोधक सदर संशोधन पूर्ण करु शकला. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आणि वेळोवेळी केलेल्या सूचनांमुळे सदर संशोधनाला योग्य दिशा मिळाली आणि तो परिपूर्णत्वाच्या जवळ जाण्यास मदत झाली. त्यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळे संशोधक हे संशोधन कार्य पूर्ण करु शकला. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सदर संशोधनाचा भक्कम पाया घालून संशोधनाची इमारत बांधण्यास केलेल्या सहकार्यामुळे संशोधक त्यांचा ऋणी आहे.

त्याचप्रमाणे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथपाल व ग्रंथालयीन सर्व कर्मचारी यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाने व सहकार्यामुळेच संशोधक सदर संशोधन पूर्ण करु शकला.

तसेच सदर संशोधन करण्याची परवानगी दिलेल्या ठाणे व पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयातील प्राचार्य, वेळोवेळी विविध माहिती, आकडेवारी, इतर माहिती व प्रश्नावली भरुन देणारे ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचारी, शिक्षकवर्ग, विद्यार्थी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संशोधक त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्या सर्वांप्रती संशोधक कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

प्रत्येक माणसाच्या मनात एक संशोधक दडून बसलेला असतो. संधी मिळाली की तो काहीतरी करुन दाखवण्याचा प्रयत्न करत असतो. तसाच प्रयत्न सदर संशोधनासाठी निवडलेल्या विषयावरुन केलेला आहे.

सदर संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाला अनेकांनी सहकार्य केले व त्यांच्या सहकार्याचे फळ म्हणजेच सदर प्रबंध पूर्ण झाला. सदर प्रबंध पूर्ण करतांना संशोधकाला वेगळा आनंद अनुभवता आला.

या सर्वांबरोबरच संशोधनाच्या कार्याप्रसंगी श्री. श्रीनिवास आठल्ये, ग्रंथपाल, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, डोंबिवली, प्रा. रश्मी ढोबळे, देसाई महाविद्यालय, पुणे, सौ. एस आर करंदीकर महाविद्यालयातील सौ. ऋधीसिध्दी गायकवाड व प्रा. दिपक कडू यांचे आभार शब्दांत व्यक्त करणे फारच कठीण आहे. त्यांनी आपल्या दैनंदिन कामातून लागेल तेव्हा सहज मदत उपलब्ध करुन दिल्याबद्दल संशोधक त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सदर संशोधन कार्यासाठी माझी पत्नी सौ. योगिता व कुटूंबीय ह्यांनी सदैव माझ्या पाठीशी उभे राहून मला खंबीरपणे साथ दिली. सगळ्यांनीच केलेल्या सहकार्यामुळे सदर प्रबंध वेळेत पूर्ण करता आला व शेवटी सगळ्याच कामात या अभ्यासक्रमातील सर्व सहकारी ज्यांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या प्रबंध पूर्ण करण्यासाठी मदत केली त्यांचा मी ऋणी आहे.

**—— श्री. वैभव प्रफुल्ल पंडित, संशोधक.**

## –: अनुक्रमणिका :–


| प्रकरण क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | I. |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II. |
| | ऋणनिर्देश | III. |
| | तक्त्यांची सूची | V. |
| | आलेखांची सूची | IX. |
| | आकृत्यांची सूची | XII. |
| | संशोधन सारांश | XIII. |
| | | |
| **प्रकरण क्र. ०१** | **प्रस्तावना आणि संशोधन संकल्पना.** | **०१ ते २६** |
| **१.१** | प्रस्तावना | **०१** |
| **१.२** | संशोधन विषय | **०२** |
| **१.३** | संशोधनाचे महत्त्व | **०२** |
| **१.४** | संशोधन समस्या | **०४** |
| **१.५** | संशोधनाची उद्दिष्टे | **०५** |
| **१.६** | गृहितके | **०६** |
| **१.७** | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | **०६** |
| **१.७.१** | संशोधनाची व्याप्ती | **०७** |
| **१.७.२** | संशोधनाची व्याप्ती ठरविण्यासाठी लावलेले निकष | **१०** |
| **१.७.३** | संशोधनाची मर्यादा | **१०** |
| **१.८** | संशोधनाची नमुना निवड | **११** |
| **१.८.१** | माहिती संकलनासाठी महाविद्यालयांची निवड | **१३** |
| **१.९** | नमूना निवड व त्यास मिळालेला प्रतिसाद | **१३** |
| **१.१०** | संशोधन विधानाच्या कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण | **१४** |
| **१.११** | संशोधन पध्दती | **१७** |
| **१.११.१** | संशोधनाचा अर्थ | **१७** |
| **१.११.२** | संशोधनाची व्याख्या | **१७** |
| **१.११.३** | संशोधन पध्दतीच्या निवडीमागची कारणे | **१९** |
| **१.१२** | माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण | **२०** |
| **१.१२.१** | माहिती संकलन | **२१** |
| **१.१२.२** | माहिती विश्लेषण व सादरीकरण | **२२** |
| **१.१३** | सदर संशोधनाचे योगदान | **२३** |
| **१.१४** | सारांश | **२४** |

| प्रकरण क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण क्र. ०२** | **पूर्वाभ्यासाचे समालोचन** | **२७ ते ७०** |
| २.१ | प्रस्तावना | २७ |
| २.२ | विषयविवेचन | २८ |
| २.२.१. | संशोधनाची व्याख्या | २८ |
| २.२.२. | संशोधन पध्दत व इतर बाबी | २८ |
| २.२.३. | ठाणे व पालघर जिल्हा व तालुक्यांची माहिती | ३२ |
| २.२.४. | मुंबई विद्यापीठाची वाटचाल व त्याबाबतची माहिती | ३५ |
| २.२.५. | शैक्षणिक ग्रंथालयांचे वर्गीकरण, घटक, आढावा | ३६ |
| २.२.६. | महाविद्यालयीन ग्रंथालये व सेवा सुविधा | ४३ |
| २.२.७. | नॅक बाबत माहिती विवेचन | ४९ |
| २.२.८. | पी. एच डी शोध प्रबंध | ५३ |
| २.२.९. | एम. फील लघुशोध प्रबंध | ५९ |
| २.३. | सारांश | ६१ |
| | | |
| **प्रकरण क्र. ०३** | **संशोधन विषयाची सैध्दांतिक माहिती** | **७१ ते ११४** |
| ३.१ | प्रस्तावना | ७१ |
| ३.२ | महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त आढावा | ७१ |
| ३.२.१ | महाराष्ट्राची भौगोलिक माहिती | ७२ |
| ३.३ | ठाणे जिल्ह्याचा समग्र आढावा | ७३ |
| ३.४ | पालघर जिल्ह्याचा समग्र आढावा | ८८ |
| ३.५ | आदिवासी समाज | १०५ |
| ३.६ | मुंबई विद्यापीठाची स्थापना / इतिहास | १०६ |
| ३.७ | सारांश | १११ |
| | | |
| **प्रकरण क्र. ०४** | **महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा एक आढावा.** | **११५ ते १६२** |
| ४.१ | प्रस्तावना | ११५ |
| ४.२ | महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्वरुप / कार्य / महत्व : एक आढावा | ११५ |
| ४.३ | महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवा : एक प्रभावी साधन | ११८ |
| ४.४ | ग्रंथालयीन सेवा एक आढावा | १२० |
| ४.५ | महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सेवांचे मूल्यमापन | १४० |
| ४.६ | ग्रंथालयीन सेवा सुविधा आणि बदलते स्वरुप | १४२ |
| ४.७ | नॅक – मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन आणि ग्रंथालय प्रशासन | १४६ |
| ४.८ | महाविद्यालयीन नॅक – मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्यस्थिती | १४८ |
| ४.९ | विद्यापीठ अनुदान आयोग | १५३ |
| ४.९.१ | एन–लिस्ट कन्सोर्शिया | १५७ |

| प्रकरण क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.९.२ | एन–लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यासाठी ग्रंथालयाने पूर्ण करावयाच्या बाबी | १५८ |
| ४.९.३ | एन–लिस्ट चे सभासदत्व | १५८ |
| ४.१० | महाविद्यालयीन नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्य:स्थिती | १५९ |
| ४.११ | सारांश | १५९ |
| | | |
| **प्रकरण क्र. ०५** | **माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१६३ ते २७३** |
| ५.१ | माहिती संकलन : | १६३ |
| ५.२ | प्रश्नावली व त्यास मिळालेला प्रतिसाद | १६३ |
| ५.३ | विश्लेषण व सादरीकरण वाचक प्रश्नावली : **विद्यार्थ्यांसाठी** | १६४ |
| ५.४ | विश्लेषण व सादरीकरण वाचक प्रश्नावली : **प्राध्यापकांसाठी** | १८३ |
| ५.५ | विश्लेषण व सादरीकरण प्रश्नावली : **ग्रंथपालांसाठी** | २०६ |
| ५.६ | सारांश | २७३ |
| | | |
| **प्रकरण क्र. ०६** | **निष्कर्ष व शिफारशी** | **२७४ ते २९८** |
| ६.१ | प्रस्तावना | २७४ |
| ६.२ | **विश्लेषणाव्दारे काढलेले निष्कर्ष** | २७४ |
| ६.२.१ | संशोधनाचे निष्कर्ष **: विद्यार्थी वाचक :** | २७४ |
| ६.२.२ | संशोधनाचे निष्कर्ष **: प्राध्यापक वाचक :** | २७६ |
| ६.२.३ | संशोधनाचे निष्कर्ष **: ग्रंथपाल :** | २७९ |
| ६.३ | **शिफारशी** | २८४ |
| ६.३.१ | संशोधनाच्या शिफारशी **: विद्यार्थी वाचक :** | २८४ |
| ६.३.२ | संशोधनाच्या शिफारशी **: प्राध्यापक वाचक :** | २८६ |
| ६.३.३ | संशोधनाच्या शिफारशी **: ग्रंथपाल :** | २८७ |
| ६.४ | उद्दिष्टांची पुर्तता व गृहितकांची पडताळणी | २९५ |
| ६.५ | पुढील संशोधनासाठी दिशा | २९८ |
| ६.६ | समारोप | २९८ |
| | | |
| | **संदर्भसूची** | **२९९ ते ३१३** |
| अ. | मराठी संदर्भ ग्रंथ सूची : | ३०० |
| ब. | इंग्रजी संदर्भ ग्रंथ सूची : | ३०८ |
| क. | पी. एच डी. शोध प्रबंध सूची : | ३१० |
| ड. | एम. फील लघुशोध प्रबंध सूची : | ३११ |
| ई. | इंटनेट वेब साईटस सूची : | ३१२ |

| प्रकरण क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **परिशिष्टे** | |
| **अ.** | वाचक प्रश्नावली : **विद्यार्थ्यांसाठी** | |
| **ब.** | वाचक प्रश्नावली : **प्राध्यापकांसाठी** | |
| **क.** | प्रश्नावली : **ग्रंथपालांसाठी** | |
| **ड.** | ठाणे जिल्ह्याचा नकाशा. | |
| **ई.** | पालघर जिल्ह्याचा नकाशा. | |


===XOX===

## -: तक्त्यांची सूची :-


| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१. | ठाणे व पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयांची स्थापना वर्ष निहाय तक्ता. | ०७ |
| १.२ | नमुना निवड व त्यास मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १३ |
| १.३ | प्रश्नावलीचे वितरण व माहिती संकलन तक्ता | २२ |
| | | |
| ३.१ | ठाणे जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची भौगोलिक क्षेत्र दर्शविणारा तक्ता | ७९ |
| ३.२ | ठाणे जिल्ह्यातील तालुकानिहाय, स्थापना वर्षाप्रमाणे, नॅक मानांकन महाविद्यालयांचा तक्ता. | ८४ |
| ३.३ | पालघर जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची भौगोलिक क्षेत्र दर्शविणारा तक्ता | ९६ |
| ३.४ | पालघर जिल्ह्यातील तालुकानिहाय, स्थापना वर्षाप्रमाणे, नॅक मानांकन महाविद्यालयांचा तक्ता. | १०१ |
| ३.५ | अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता | १०४ |
| | | |
| ४.१ | ग्रंथालयीन सेवा सुविधा आणि बदलते स्वरुप दर्शविणारा तक्ता. | १४३ |
| ४.२ | महाविद्यालयीन नॅक मुल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्यस्थिती | १५९ |
| | | |
| | **वाचक प्रश्नावली : विद्यार्थ्यांसाठी माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१६३ ते १८२** |
| ५.१ | प्रश्नावली वाटप व त्यास मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा तक्ता | १६३ |
| ५.२ | स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा तक्ता | १६४ |
| ५.३ | विद्याशाखा निहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा तक्ता. | १६५ |
| ५.४ | वर्षनिहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा तक्ता. | १६६ |
| ५.५ | विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | १६६ |
| ५.६ | विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता. | १६७ |
| ५.७ | विद्यार्थी वाचक ग्रंथालयात किती वेळ असतात ते दर्शविणारा तक्ता. | १६८ |
| ५.८ | वाचनसाहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता. | १६९ |
| ५.९ | पुस्तक पेढी योजनेचा लाभ दर्शविणारा तक्ता. | १७० |
| ५.१० | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता. | १७२ |
| ५.११ | ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा तक्ता. | १७४ |
| ५.१२ | ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दर्शविणारा तक्ता. | १७५ |
| ५.१३ | विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी साधनांचा उपयोग दर्शविणारा तक्ता. | १७६ |
| ५.१४ | ग्रंथसंग्रहाबाबत समाधान दर्शविणारा तक्ता. | १७७ |

| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.१५ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल मत दर्शविणारा तक्ता. | १७८ |
| ५.१६ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.<br>(अत्यंत असमाधानकारक पर्यायांनुसार) | १७९ |
| ५.१७ | विद्यार्थी वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात उणीवा/दोष दर्शविणारा तक्ता. | १८१ |
| ५.१८ | विद्यार्थी वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात आवश्यक सुधारणा दर्शविणारा तक्ता. | १८२ |
| | | |
| | **वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी<br>माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१८३ ते २०५** |
| ५.१९ | स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा तक्ता | १८३ |
| ५.२० | विद्याशाखा निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा तक्ता | १८३ |
| ५.२१ | सेवाकाल निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा तक्ता | १८४ |
| ५.२२ | प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | १८५ |
| ५.२३ | प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता. | १८६ |
| ५.२४ | वाचनसाहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता. | १८७ |
| ५.२५ | ग्रंथ निवडीबाबत सहभाग दर्शविणारा तक्ता. | १८८ |
| ५.२६ | ग्रंथालय समितीतील कार्यानुभवाचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १८९ |
| ५.२७ | शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्ष बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १८९ |
| ५.२८ | प्राध्यापक वाचकांचा संशोधना बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १९० |
| ५.२९ | संशोधन कार्यात वाचन साहित्याच्या उपयुक्तते बाबतचा<br>प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १९१ |
| ५.३० | ग्रंथ संग्रहाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १९२ |
| ५.३१ | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.<br>(समाधानकारक, पर्यांयां नुसार) | १९३ |
| ५.३२ | ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा तक्ता. | १९५ |
| ५.३३ | पूरक वाचन करण्यासाठी दर्शविणारा तक्ता. | १९६ |
| ५.३४ | वाचन साहित्याच्या शिफारस प्रकारानुसार प्राप्त प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | १९७ |
| ५.३५ | प्राध्यापक वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांचा<br>उपयोग दर्शविणारा तक्ता. | १९८ |
| ५.३६ | ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा तक्ता. | २०१ |
| ५.३७ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता. | २०२ |
| ५.३८ | प्राध्यापक वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात उणीवा/दोष दर्शविणारा तक्ता. | २०४ |
| ५.३९ | प्राध्यापक वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात आवश्यक सुधारणा दर्शविणारा तक्ता. | २०४ |
| | | |
| | **प्रश्नावली : ग्रंथपालांसाठी<br>माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **२०६ ते २७३** |
| ५.४० | महाविद्यालय पूर्ण नाव, स्थापना वर्ष, नॅक मूल्यांकन श्रेणी माहिती दर्शविणारा<br>तालुकानिहाय तक्ता. | २०६ |

| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.४१ | ग्रंथपाल प्रश्नावलीस मिळालेला प्रतिसाद | २१० |
| ५.४२ | ग्रंथालयाची स्थापना वर्ष दर्शविणारा तक्ता. | २११ |
| ५.४३ | आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती दर्शविणारा तक्ता. | २१२ |
| ५.४४ | आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन सेवकांची संख्या दर्शविणारा तक्ता. | २१२ |
| ५.४५ | ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय दर्शविणारा तक्ता. | २१३ |
| ५.४६ | ग्रंथालयीन कर्मचारी वृंदासाठी प्रशिक्षणाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २१४ |
| ५.४७ | वर्गीकरण आवृत्ती दर्शविणारा तक्ता | २१५ |
| ५.४८ | ग्रंथालयाची तालिकाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २१६ |
| ५.४९ | ग्रंथालयाची तालिका प्रकाराबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २१७ |
| ५.५० | ग्रंथालय संगणकीकरणाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २१८ |
| ५.५१ | ग्रंथालयात वापण्यात येणाऱ्या आज्ञावलीबाबत (Software) प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २१९ |
| ५.५२ | ग्रंथालय स्वतंत्र इमारतीबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २१९ |
| ५.५३ | ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा तक्ता. | २२० |
| ५.५४ | ग्रंथालयाचे विभागवार क्षेत्रफळ दर्शविणारा तक्ता. | २२१ |
| ५.५५ | अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असण्याबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २२४ |
| ५.५६ | अभ्यासिका आसनव्यवस्था क्षमता दर्शविणारा तक्ता. | २२५ |
| ५.५७ | ग्रंथालय समिती सभासद संख्या दर्शविणारा तक्ता. | २२६ |
| ५.५८ | ग्रंथालय समितीच्या सभा संख्या दर्शविणारा तक्ता. | २२७ |
| ५.५९ | ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग दर्शविणारा तक्ता. | २२७ |
| ५.६० | ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा दर्शविणारा तक्ता. | २२८ |
| ५.६१ | ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदेचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २२९ |
| ५.६२ | ग्रंथालयात दररोज सरासरी वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण दर्शविणारा तक्ता. | २३१ |
| ५.६३ | ग्रंथालयात उपलब्ध असलेले फर्निचर संबंधी प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २३२ |
| ५.६४ | ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २३३ |
| ५.६५ | ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा तक्ता. | २३५ |
| ५.६६ | दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभागास प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २३७ |
| ५.६७ | ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा तक्ता. | २३८ |
| ५.६८ | ग्रंथालयात मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २३९ |
| ५.६९ | ग्रंथालयातील उपलब्ध मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा तक्ता. | २४० |
| ५.७० | ग्रंथालयात अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २४२ |
| ५.७१ | ग्रंथालयातील उपलब्ध अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा तक्ता. | २४२ |
| ५.७२ | आंतर ग्रंथालयीन सेवेला लाभ दर्शविणारा तक्ता. | २४४ |
| ५.७३ | आंतर ग्रंथालयीन सेवेचा तपशिल दर्शविणारा तक्ता. | २४४ |
| ५.७४ | ग्रंथालयामार्फत पुस्तक पेढी बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २४६ |

| तक्ता क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.७५ | पुस्तक पेढी योजनेतील लाभार्थी दर्शविणारा तक्ता. | २४६ |
| ५.७६ | Digital Information Resources बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २४७ |
| ५.७७ | Digital Information Resources चे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २४८ |
| ५.७८ | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता. (समाधानकारक पर्यायानुसार) | २४९ |
| ५.७९ | ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना अडचणी बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता. | २५१ |
| ५.८० | ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणींचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २५२ |
| ५.८१ | ग्रंथालयीन उपक्रम दर्शविणारा तक्ता. | २५३ |
| ५.८२ | ग्रंथालयीन कार्यक्रमांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.<br>(अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार) | २५४ |
| ५.८३ | ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा तक्ता. | २५६ |
| ५.८४ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.<br>(अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार) | २५७ |
| ५.८५ | ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २५९ |
| ५.८६ | विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता. | २६० |
| ५.८७ | मागील दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशिल दर्शविणारा तक्ता. | २६१ |
| ५.८८ | नियतकालिकांची भाषा निहाय संख्या दर्शविणारा तक्ता. | २६३ |
| ५.८९ | ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची एकूण संख़्या दर्शविणारा तक्ता. | २६४ |
| ५.९० | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशिल दर्शविणारा तक्ता. | २६५ |
| ५.९१ | नॅक मूल्यांकनातील बलस्थाने तसेच ग्रंथालयांची प्रतिमा दर्शविणारा तक्ता. | २६६ |
| ५.९२ | इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / सहाय्य दर्शविणारा तक्ता. | २६७ |
| ५.९३ | ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी उपाय–योजना दर्शविणारा तक्ता. | २६८ |
| ५.९४ | ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) दर्शविणारा तक्ता. | २६९ |
| ५.९५ | ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) पध्दत दर्शविणारा तक्ता. | २७० |
| ५.९६ | वाचन साहित्य रद्दबातल बाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता. | २७१ |
| ५.९७ | ग्रंथपालांच्या दृष्टीने ग्रंथालयीन विकासाबाबत भविष्यकालीन योजना दर्शविणारा तक्ता | २७२ |

# –: आलेखांची सूची :–


| आलेख क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **वाचक प्रश्नावली : विद्यार्थ्यांसाठी माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१६३ ते १८२** |
| ५.१ | स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा आलेख | १६५ |
| ५.२ | विद्याशाखा निहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा आलेख. | १६५ |
| ५.३ | वर्ष निहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा आलेख | १६६ |
| ५.४ | विद्यार्थी वाचकांचे भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा आलेख. | १६७ |
| ५.५ | विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा आलेख. | १६८ |
| ५.६ | विद्यार्थी वाचक ग्रंथालयात किती वेळ असतात ते दर्शविणारा आलेख. | १६९ |
| ५.७ | वाचनसाहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. | १७० |
| ५.८ | पुस्तक पेढी योजनेचा लाभ दर्शविणारा आलेख. | १७१ |
| ५.९ | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. | १७४ |
| ५.१० | ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा आलेख. | १७५ |
| ५.११ | ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दर्शविणारा आलेख | १७६ |
| ५.१२ | विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी साधनांचा उपयोग दर्शविणारा आलेख. | १७७ |
| ५.१३ | ग्रंथसंग्रहाबाबत समाधान दर्शविणारा आलेख. | १७८ |
| ५.१४ | ग्रंथालयातील भौतिक सुविधाबाबत मत दर्शविणारा आलेख. | १७९ |
| ५.१५ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख. (अत्यंत असमाधानकारक पर्यायांनूसार) | १८१ |
| | | |
| | **वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **१८३ ते २०५** |
| ५.१६ | स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा आलेख | १८३ |
| ५.१७ | विद्याशाखा निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा आलेख | १८४ |
| ५.१८ | सेवाकाल निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा आलेख | १८५ |
| ५.१९ | प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा आलेख | १८६ |
| ५.२० | प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा आलेख. | १८७ |
| ५.२१ | वाचनसाहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. | १८८ |
| ५.२२ | ग्रंथनिवडी बाबत सहभाग दर्शविणारा आलेख. | १८८ |
| ५.२३ | ग्रंथालय समितीतील कार्यानुभवाचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख | १८९ |
| ५.२४ | शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्षा बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख | १९० |
| ५.२५ | प्राध्यापक वाचकांचा संशोधना बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख | १९० |
| ५.२६ | संशोधन कार्यात वाचन साहित्याच्या उपयुक्तते बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | १९१ |
| ५.२७ | ग्रंथसंग्रहाबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख | १९२ |

| आलेख क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.२८ | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. | १९५ |
| ५.२९ | ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा आलेख. | १९६ |
| ५.३० | पूरक वाचन करण्यासाठी दर्शविणारा आलेख. | १९६ |
| ५.३१ | वाचन साहित्याच्या शिफारस प्रकारानुसार प्राप्त प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | १९७ |
| ५.३२ | प्राध्यापक वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांचा उपयोग दर्शविणारा आलेख. | २०० |
| ५.३३ | ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा आलेख. | २०१ |
| ५.३४ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख. | २०३ |
| | | |
| | **प्रश्नावली : ग्रंथपालांसाठी माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण** | **२०६ ते २७२** |
| ५.३५ | तालूकानिहाय नॅक मानांकीत महाविद्यालयांची संख्या दर्शविणारा आलेख | २०९ |
| ५.३६ | ग्रंथालयाची स्थापना वर्ष दर्शविणारा आलेख. | २११ |
| ५.३७ | आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती दर्शविणारा आलेख. | २१२ |
| ५.३८ | आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन सेवकांची संख्या दर्शविणारा आलेख | २१३ |
| ५.३९ | ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय दर्शविणारा आलेख. | २१४ |
| ५.४० | ग्रंथालयीन कर्मचारी वृंदासाठी प्रशिक्षणाचे स्वरुप दर्शविणारा आलेख | २१४ |
| ५.४१ | वर्गीकरण आवृत्ती दर्शविणारा आलेख | २१६ |
| ५.४२ | ग्रंथालयाची तालिका बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २१७ |
| ५.४३ | ग्रंथालयाची तालिका प्रकाराबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २१७ |
| ५.४४ | ग्रंथालय संगणकीकरणा बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख | २१८ |
| ५.४५ | ग्रंथालयात वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली (Software) बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २१९ |
| ५.४६ | ग्रंथालय स्वतंत्र इमारती बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख | २२० |
| ५.४७ | ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा आलेख. | २२१ |
| ५.४८ | ग्रंथालयाचे विभागवार क्षेत्रफळ दर्शविणारा आलेख. | २२२ |
| ५.४९ | अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असण्याबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २२५ |
| ५.५० | अभ्यासिका आसनव्यवस्था क्षमता दर्शविणारा आलेख. | २२५ |
| ५.५१ | ग्रंथालय समिती सभा दर्शविणारा आलेख. | २२६ |
| ५.५२ | ग्रंथालय समितीच्या सभा संख्या दर्शविणारा आलेख. | २२७ |
| ५.५३ | ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग दर्शविणारा आलेख. | २२८ |
| ५.५४ | ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा दर्शविणारा आलेख. | २२९ |
| ५.५५ | ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदेचे स्वरुप दर्शविणारा आलेख. | २३० |
| ५.५६ | ग्रंथालयात दररोज सरासरी वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाणदर्शविणारा आलेख. | २३१ |
| ५.५७ | ग्रंथालयात उपलब्ध असलेले फर्निचर प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २३२ |
| ५.५८ | ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर बाबत स्वरुप दर्शविणारा आलेख. | २३५ |

| आलेख क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५.५९ | ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा आलेख. | २३६ |
| ५.६० | दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभागास प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २३८ |
| ५.६१ | ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा आलेख. | २३९ |
| ५.६२ | ग्रंथालयात मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २३९ |
| ५.६३ | ग्रंथालयातील उपलब्ध मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा आलेख. | २४० |
| ५.६४ | ग्रंथालयात अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २४२ |
| ५.६५ | ग्रंथालयातील उपलब्ध अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा आलेख. | २४३ |
| ५.६६ | आंतर ग्रंथालयीन सेवेला लाभ दर्शविणारा आलेख. | २४४ |
| ५.६७ | आंतर ग्रंथालयीन सेवेचा तपशिल दर्शविणारा आलेख | २४५ |
| ५.६८ | ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २४६ |
| ५.६९ | पुस्तक पेढी योजनेतील लाभार्थी दर्शविणारा आलेख. | २४७ |
| ५.७० | Digital Information Resources बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २४७ |
| ५.७१ | Digital Information Resources चे स्वरुप दर्शविणारा आलेख. | २४८ |
| ५.७२ | ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. (समाधानकारक पर्यायानुसार) | २५१ |
| ५.७३ | ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणी बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख. | २५२ |
| ५.७४ | ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणींचे स्वरुप दर्शविणारा आलेख. | २५२ |
| ५.७५ | ग्रंथालयीन उपक्रम दर्शविणारा आलेख. | २५४ |
| ५.७६ | ग्रंथालयीन कार्यक्रमांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख. | २५५ |
| ५.७७ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल मत दर्शविणारा आलेख. | २५६ |
| ५.७८ | ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख. (अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार) | २५८ |
| ५.७९ | ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा आलेख. | २५९ |
| ५.८० | विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा आलेख. | २६० |
| ५.८१ | मागील दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशिल दर्शविणारा आलेख. | २६१ |
| ५.८२ | नियतकालिकांची भाषा निहाय संख्या दर्शविणारा आलेख | २६४ |
| ५.८३ | ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची एकूण संख़्या दर्शविणारा आलेख. | २६४ |
| ५.८४ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशिल दर्शविणारा आलेख. | २६५ |
| ५.८५ | नॅक मुल्यांकनातील बलस्थाने तसेच ग्रंथालयांची प्रतिमा दर्शविणारा आलेख. | २६७ |
| ५.८६ | इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / सहाय्य दर्शविणारा आलेख. | २६८ |
| ५.८७ | ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी उपाय–योजना दर्शविणारा आलेख. | २६९ |
| ५.८८ | ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) दर्शविणारा आलेख. | २७० |
| ५.८९ | ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) पध्दत दर्शविणारा आलेख. | २७१ |
| ५.९० | वाचन साहित्य रद्दबातल बाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख. | २७२ |

# –: आकृत्यांची सूची :–


| आकृत्यांचा क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.१ | भौगोलिक रचनेनुसार जिल्ह्याचे विभाग दर्शविणारी आकृती | ९० |
| ४.१ | महाविद्यालयीन ग्रंथालयाचे घटक दर्शविणारी आकृती | ११८ |
| ४.२ | ग्रंथालयाचे घटक दर्शविणारी आकृती | १२० |

# ---:: संशोधन सारांश ::---

**संशोधनाचे शीर्षक :**

**"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."**

**सूचना :**

**दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नविन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी ठाणे जिल्ह्यांत असलेल्या १५ तालुक्यांपैकी ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर ८ तालुके पालघर जिल्ह्यात येतात. ठाणे जिल्ह्यात येणारे ७ तालूके पूढीलप्रमाणे ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर, मूरबाड, तर पालघर जिल्ह्यात येणारे ८ तालूके पूढीलप्रमाणे पालघर, वाडा, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड असे आहेत. सदर संशोधनात संशोधकाने सद्यस्थितीत असलेल्या ठाणे-पालघर (जूना ठाणे) जिल्ह्यांबद्दल तसेच त्यामध्ये येणाऱ्या तालुक्यांच्या माहितीचे विवेचन केले आहे.**

## १.१ प्रस्तावना :-

ठाणे जिल्ह्याची स्थापना झाल्यानंतर शहरी भागात शिक्षण प्रसार झपाट्याने होऊ लागला त्यामुळे उर्वरीत ग्रामीण भागात तसेच बहुतांशी आडवळणी गैरसोयीच्या ठिकाणी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचविणे अतिशय खडतर होते. त्यामध्ये सुध्दा काही शिक्षण प्रसारीक मंडळीनी जिथे अज्ञान, अंधश्रध्दा व शिक्षणासह अन्य सुविधांचा अभाव आहे अशा दुष्काळी, दुर्गम, अविकसीत भागांसह आदिवासी भागांत शिक्षण प्रसार सुरु केलेल्या संस्थांनी पराकाष्टेच्या प्रयत्नाने महाविद्यालये सुरु केली.

शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या ठाणे जिल्ह्यात आव्हानात्मक ठिकाणी अनेक अडथळे, अडचणींवर मात करत शिक्षणांची ज्ञानगंगा खऱ्या अर्थाने घरोघरी पोहचविण्याचे काम हि महाविद्यालये उत्तम प्रकारे करत आहेत.

ठाणे जिल्ह्यांतील आदिवासी समाज म्हणजे परिस्थितीने पिछाडलेला, दारिद्र्याने गांजलेल्या व दारु, कर्जाच्या विळख्याने घुसमटलेला समाज. आदिवासींच दारुण नि करुण जिवन अतिशय खडतर तर आहेच शिवाय अजुनही काही प्रमाणातील वेठबिगारी व अज्ञान अंधारात चाचपडणाऱ्या या समाजाचे जिवन म्हणजे शोकांतिकाच. ह्या परीस्थितीत महाविद्यालये सुरु करुन त्यातील ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, ग्रंथालयीन सेवा सुविधा व अशा सेवासुविधा कि, ज्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना पूर्ण करणे खडतर आहे व याच संज्ञा, संकल्पनेत झालेला बदल व त्यातून वाचकांना सेवासुविधा देत असतांना आलेल्या अडचणी, महाविद्यालयाचे उद्देश व त्या उद्देशांच्या पूर्ततेसाठी करावा लागलेला संघर्ष तसेच या प्रकारच्या खडतर वाटचालीतून निर्माण झालेले साध्य याचा अभ्यास महत्वाचा आहे, कारण सरते शेवटी मिळणारे निष्कर्ष हे थोड्याफार प्रमाणात तशीच परीस्थिती असणाऱ्या इतर संस्थांमध्ये लागू पडण्याची शक्यता अधिक असते.

## **१.२. संशोधन विषय :–**

**"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."**

## **१.३ संशोधनाचे महत्त्व :–**

संशोधनासाठी संशोधकाने निवडलेल्या ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयातील ग्रंथालयांवर या स्वरुपाचे संशोधन झाले नसल्याने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे. प्रस्तुत संशोधनात मुंबई विद्यापीठा अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांवर भर दिला आहे. महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी म्हणजे उद्याचे भावी नागरीकांना घडविणारे ग्रंथालये सुसज्ज आहेत काय? त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा पुरविणारे ग्रंथपाल त्वरीत त्यांच्या गरजा पुर्ण करतात का? वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे त्यांच्या अभिरुचिंवर संस्कार करणे हे काम ग्रंथालये करु शकतात. नवसाक्षरांना वाचनाची सवय लागली नाही तर ते पुन्हा निरक्षर होतील यासाठी सर्वांनी एकत्र येवुन ग्रंथालयीन गुणवत्ता व दर्जा वाढविणे गरजेचे आहे. ग्रंथालयाच्या वाचकांनी ग्रंथालय साहित्याचा अधिकाधिक वापर करणे ही आजची गरज आहे. शिक्षणाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवावयाची

असेल तर ग्रंथालयाचा वापर वाढविणे व ग्रंथालय सेवा आणि साहित्य सहज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे अधिक गरजेचे आहे.

सदर संशोधनाच्या मदतीने ग्रंथालयाची माहिती मिळेल. वाचकांच्या ग्रंथालयाकडुन प्रत्यक्ष काय अपेक्षा आहेत. त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा मिळवितांना कोणकोणत्या अडी अडचणी येतात हे शोधुन ग्रंथालया मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा यांची संख्यात्मक व गुणात्मक बदल याविषयी माहिती मिळेल व त्याचा फायद सर्वांना होईल.

संशोधनासाठी निवडलेली महाविद्यालयीन ग्रंथालये ठाणे जिल्ह्यांतील आहेत व अशा महाविद्यालयातील ग्रंथालयांची संपूर्ण माहिती वाचकांना मिळावी म्हणून प्रस्तुत संशोधनाची गरज वाटली.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचा मुख्य उद्देश :–**

- महाविद्यालयातील विविध उपक्रम चालविण्यासाठी ग्रंथालयीन पुरक सेवा देणे.
- महाविद्यालयीन ग्रंथालय समृध्द व अद्ययावत ठेवणे.
- प्राचीन वाड्मयाचा संग्रह जितका आवश्यक आहे तितकेच आधुनिक ग्रंथ व नियतकालिके ग्रंथालयात ठेवणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयीन ग्रंथालयात अभ्यासक्रमिक पुस्तके व त्यास आवश्यक अशा पूरक ग्रंथाचा समावेश करुन विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढीस लावणे.

ग्रंथालयाकडे असणारी वाचकांची ओढ टिकवून ठेवणे व ग्रंथालयांना आधुनिक सेवा सुविधांचा साज चढवून त्यांना ग्रंथालयांकडे वळविणे हाच महत्वाचा भाग ग्रंथालयीन सेवा सुविधेचा आहे.

## १.४ संशोधन समस्या :–

सदर संशोधनासाठी पुढील संशोधन समस्येचा शोध घेण्याचे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहेत.

**१. ग्रंथालयीन लाभार्थींवर ग्रंथालयीन सेवा सुविधांचा परिणाम झाला आहे का?**

**२. भविष्यातील बदलांचा विचार करणे व त्यांचा अंतर्भाव करणे ग्रंथालयांना अपरीहार्य आहे का?**

**३. अपुरे आर्थिक स्त्रोत, उपभोक्त्यांच्या वाढत्या गरजा व अपेक्षा यांचा ग्रंथालयीन सेवा सुविधांवर काय परिणाम झाला आहे?**

**समस्या विधान :**

संशोधकाने संशोधनासाठी निश्चित केलेल्या समस्या नेमक्या शब्दात मांडणे आवश्यक असल्याने प्रस्तुत संशोधनाकरिता **''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** हे समस्याविधान निश्चित केले आहे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे :-

सदर संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

**१. संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.**

**२. सद्य:स्थितीतील ग्रंथालयीन सेवा-सुविधांची माहिती अभ्यासणे.**

**३. ग्रंथालयीन सेवा-सुविधा देतांना आलेल्या अडचणींची नोंद घेणे.**

**४. ग्रंथालयीन सेवा-सुविधांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.**

**५. महाविद्यालयीन लाभार्थींच्या ग्रंथालयीन सेवा-सुविधांबाबतची समाधानकारकता अभ्यासणे.**

**६. संशोधनावर आधारित निष्कर्षगाने शिफारशी देणे.**

## १.६ गृहितके :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी पुढील गृहितकृत्ये निर्धारीत करण्यात आली आहेत.

**१. संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचे कार्य समाधानकारक आहे.**

**२. ग्रंथालयीन सेवा-सुविधांमधील बदलांमुळे सेवा-सुविधा वृध्दिंगत होत आहेत.**

**३. दर्जेदार व प्रभावी सेवांमुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवा-सुविधांचा गुणात्मक व संख्यात्मक असा दोन्ही तऱ्हेने लाभ होत आहे.**

**४. बदललेल्या ग्रंथालयीन सेवांमुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.**

**५. ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकडे वेळोवेळी लक्ष पुरविले जाते.**

**६. ग्रंथालयीन बदलांमुळे वाचकांवर इष्ट परिणाम झाला आहे.**

## १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–

सदर संशोधनामध्ये मुंबई विद्यापीठा अंतर्गत संलग्न येणाऱ्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा समावेश आहे यात प्रामुख्याने कला, वाणिज्य, व विज्ञान अशा एकत्रित शाखा असलेली शिवाय अलग अलग शाखा असलेल्या महाविद्यालयांचा समावेश केला आहे.

### १.७.१. संशोधनाची व्याप्ती :–

१. सदर संशोधनासाठी ठाणे व पालघर जिल्ह्यांतील महाविद्यालयीन ग्रंथालयांची निवड करण्यात आली आहे.

२. सदर संशोधनासाठी महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग अभ्यासासाठी निवडला आहे तसेच ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा–सुविधा एवढाच मर्यादित आहे.

३. सदर संशोधनामध्ये सन २०१४ ते सन २०१६ या कालावधीतील नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांच्या माहितीचा अभ्यास केला आहे.

संशोधकाने संशोधन प्रकल्पासाठी मुंबई विद्यापीठा अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यांतील तक्ता क्र. १.१. मध्ये नाम निर्देशित महाविद्यालयांची निवड केलेली आहे.

### १.७.२. संशोधनाची व्याप्ती ठरविण्यासाठी लावलेले निकष :–

१. महाविद्यालयाचे किमान **प्रथम नॅक मूल्यांकन** झालेल्याच महाविद्यालयांचा विचार करण्यात आलेला आहे.

२. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नविन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांचे ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर

८ तालुके पालघर जिल्ह्यात वर्ग झालेत. सदर संशोधनामध्ये ठाणे–पालघर जिल्ह्यामध्ये येणाऱ्या महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे.

३. सदर संशोधनासाठी मुंबई विद्यापिठ अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा सुविधांचा चिकित्सक अभ्यासा बाबतच विचार करण्यात आलेला आहे.

**१.७.३. संशोधनाची मर्यादा :–**

१. ठाणे व पालघर जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचा विचार केला जाणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनात अती तांत्रिक बाबी टाळल्या जाणार आहेत कारण तो एक स्वतंत्र अभ्यासविषय आहे.

## १.८ संशोधनाची नमूना निवड :–

प्रस्तूत संशोधनामध्ये नमुना निवडीसाठी असंभाव्यता न्यादर्श पध्दतीच्या प्रकारांपैकी सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा समावेश केलेला आहे.

**ग्रंथपाल :– १००%**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रंथपाल न्यादर्शाचे प्रमाण १००% घेतलेले आहे. ग्रंथपालांसाठी स्वतंत्र प्रश्नावली भरुन घेण्यात आलेले असुन पूरक माहितीसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करण्यात आलेली आहे.

**विद्यार्थी वाचक :– ५०.**

प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी वाचकांचे न्यादर्शाचे प्रमाण एकूण जनसंख्येमधून सुमारे ५० एवढे घेतलेले आहे. वाचकांच्या सर्वेक्षणासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथालयात येणाऱ्या किमान ५० वाचकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आलेली आहे. हे प्रमाण महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या ५% किंवा सुमारे ५० ह्यापैकी कमीत कमी घेण्यात आलेले आहे.

**अध्यापक वर्ग :– २५.**

प्रस्तुत संशोधनामध्ये अध्यापक वाचकांचे न्यादर्शाचे प्रमाण हे सुमारे २५ एवढे घेतलेले आहे. त्यासाठी हजेरी पत्रकातील नियमित अध्यापक वर्गापैकी ५०% किंवा सुमारे २५ ह्यापैकी कमीत कमी घेण्यात आलेले आहे.

## १.९ नमुना निवड व त्यास मिळालेला प्रतिसाद :–

**तक्ता क्र. १.१**

**प्रश्नावली वाटप व त्यास मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| एकूण वाचक | | | प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप | | | एकूण नमुना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| ७८६९० | १३८० | ३९ | १९०० | ९५० | ३८ | **०२.४१ %** | **६८.८४ %** | **९७.४३ %** |
| **प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप** | | | **मिळालेला प्रतिसाद** | | | **एकूण प्रतिसाद शेकडा** | | |
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| १९०० | ९५० | ३९ | १६४८ | ७८१ | ३८ | **८६.७३ %** | **८२.२१ %** | **९७.४३ %** |

एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या ७८६९०, एकूण प्राध्यापक १३८० व एकूण ग्रंथपाल ३९ असून १९०० विद्यार्थी वाचकांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले होते. एकूण प्रवेशित विद्यार्थींच्या बाबतीत प्रश्नावली वाटण्याचे हे प्रमाण २.४१% असून या १९०० प्रश्नावल्यांपैकी १६४८ विद्यार्थी वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या आहेत. हा प्रतिसाद ८६.७३% आहे.

तर एकुण १३८० प्राध्यापक वाचकांपैकी ९५० प्रत्यक्ष प्राध्यापक वाचकांना प्रश्नावली वाटण्यात आल्या हे प्रमाण ६८.८४% असून या ९५० प्राध्यापक वाचकांनापैकी ७८१ प्राध्यापक वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या प्रश्नावलीचे हे प्रमाण ८२.२१% आहे.

तर ग्रंथपालांच्या प्रश्नावली बाबत एकूण ३९ पैकी ३८ ग्रंथपालांकडून प्रश्नावल्या भरुन मिळाल्या हे प्रमाण ९७.४३% आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी आवश्यक तेथे सरासरी या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

## १.१० संशोधन विधानाच्या कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण :–

**''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** सदर संशोधन विषय संशोधनासाठी निवडला आहे यातील प्रत्येक शब्दाच्या कार्यात्मक व्याख्या संशोधकाने पृष्ठ क्र. ११ ते १३ येथे स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

## १.११ संशोधन पध्दती :–

संशोधन पध्दत, समस्या व उद्दिष्टे यांच्या सांप्रत स्थिती बाबत सखोल अभ्यास करुन त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये केली जात

असल्याने व सदर **संशोधनात सत्यशोधन व सद्यपरिस्थितीचे विश्लेषण करावयाचे असल्यामुळे सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्द्तीचा अवलंब केला आहे.**

## १.१२ माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण :–

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर करण्यात आला आहे. संशोधकाने साचेबध्द पध्दतीच्या प्रश्नावलीचा अवलंब केला आहे.

### १.१२.१ माहिती संकलन :

सदर संशोधनाच्या माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे तंत्र अवलंबले आहे.

- संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेला लक्ष्य समुह हा ठाणे व पालघर जिल्ह्यांतील असून त्यातील महाविद्यालये भौगोलिक दृष्ट्या दूरवर पसरलेली आहेत.
- सद्य स्थितीत मुंबई विद्यापीठाशी संलग्न, ठाणे व पालघर जिल्ह्यांतील आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील तालुक्यातील महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे.
- माहितीच्या संकलनासाठी प्रश्नावलीचा वापर करुन माहीतीचे संकलन केले आहे.

- **तक्ता क्र. १.२.**
- **प्रश्नावलीचे वितरण व माहीती संकलन तक्ता**

| अ. क्र. | तालूके | संशोधनास पात्र ग्रंथालये / प्रतिसाद | एकूण प्रतिसाद | अ. क्र. | तालूके | संशोधनास पात्र ग्रंथालये / प्रतिसाद | एकूण प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ठाणे जिल्हा** | | | | **पालघर जिल्हा** | | |
| १. | ठाणे | ०८/०८ | १००% | १. | पालघर | ०१/०१ | १००% |
| २. | कल्याण | ०८/०८ | १००% | २. | वाडा | ०१/०१ | १००% |
| ३. | उल्हासनगर | ०३/०२ | ६७ % | ३. | वसई | ०६/०६ | १००% |
| ४. | अंबरनाथ | ०३/०३ | १००% | ४. | डहाणू | ०३/०३ | १००% |
| ५. | भिवंडी | ०१/०१ | १००% | ५. | तलासरी | ०१/०१ | १००% |
| ६. | शहापूर | ०१/०१ | १००% | ६. | जव्हार | ०१/०१ | १००% |
| ७. | मुरबाड | ०१/०१ | १००% | ७. | मोखाडा | ०१/०१ | १००% |
| | | | | ८. | विक्रमगड | ००/०० | १००% |
| | | | | | **एकूण** | **३९/३८** | **९७.४३ %** |

**१.१२.२ माहिती विश्लेषण व सादरीकरण :**

संशोधनात आवश्यक तेथे पाहणी तंत्र वापरले आहे. संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती प्रश्नावली व निरीक्षण या साधनाव्दारे संकलित केली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलीत केल्या आहेत. अशा भेटी मधून ग्रंथपालांशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलीत माहितीचे विश्लेषण करताना प्रश्नाच्या गाभ्यानुसार शीर्षकांचे निर्धारण केले आहे. या शीर्षकाखाली प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व सादरीकरण केले आहे.

माहितीचे विश्लेषण व सादरीकरणासाठी योग्य तेथे तक्ते, आलेख, आकृती तसेच संक्षिप्त रुपे यांचा वापर केला आहे.

## १.१३ सदर संशोधनाचे योगदान :-

ग्रंथालये आणि माहिती केंद्रे मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्यसंग्रह विकसित करतात. संकलित वाचनसाहित्याची योग्य पध्दतीने मांडणी व देखभाल करतात व ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाच्या मदतीने वाचकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवितात. वाचकांना त्यांच्या गरजांची पूर्तता होईल असे वाचनसाहित्य आणि ग्रंथालयीन सेवा पुरविणे, याच प्रमुख हेतूसाठी ग्रंथालये आणि माहिती केंद्रे कार्यरत असतात. त्याचबरोबर वाचकांच्या वाचनविषयक व माहितीविषयक सल्ला देण्याचे कार्यही ग्रंथालये आणि माहिती केंद्रे करतात. ग्रंथालये करत असलेल्या कार्यांमध्ये आणि देत असलेल्या सेवांमध्ये गुणवत्ता यावी, ग्रंथालयीन सेवा सुविधा अधिक परिणामकारक व्हाव्यात अशी ग्रंथालय आणि वाचकांची अपेक्षा असते. वाचकांना परिणामकारक सेवा द्याव्यात असे ग्रंथालय सेवकांनाही वाटत असते. ग्रंथालय सेवा सुविधा आणि उपक्रमांमध्ये परिणामकारकता आणण्यासाठी सदर संशोधन आवश्यक आहे.

संशोधनाची सामाजिक आणि ग्रंथालयीन उपयुक्तता :-

**सामाजिक उपयुक्तता :**

- संशोधनाची मांडणी, गुणवत्तेचा दृष्टीकोन विकसीत व दृढ होईल.
- संशोधनाच्या मदतीने ग्रंथालयाची ऐतिहासिक माहिती मिळेल.

- सदर संशोधनाचा लाभ ग्रंथपाल, प्राध्यापक, सेवकवर्ग व विद्यार्थ्यांना होईलच पण त्याचबरोबर  इतर महाविद्यालयीन ग्रंथपाल व सामाजिक अभ्यासक / संशोधक यांना ग्रंथालय समृध्द करण्याबाबत मार्गदर्शक ठरेल.

**ग्रंथालयीन उपयुक्तता :**

- ग्रंथालयीन सेवा सुविधा दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न करणे.
- ग्रंथालयीन दैनंदिन कारभारात अधिक संपन्न व गुणवत्ता दर्शविणे.
- वाचकांकडून प्रत्यक्ष अपेक्षा काय आहेत?
- ग्रंथालयीन सेवा सुविधा ग्रंथालया मार्फत देतांना व वाचकांना ती मिळवितांना कोणकोणत्या अडचणी येतात हे शोधून अपेक्षेप्रमाणे सेवा सुविधा देणे.

## १.१४ संशोधन प्रकरणांचा सारांश :–

सदर संशोधन हे एकूण **सहा प्रकरणात** विभागले असून ते पूढीलप्रमाणे.

**प्रकरण पहिले** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. ०१ ते २६ ह्यामध्ये विशद करण्यात आले आहे. सदर प्रकरणात सुरुवातीला प्रस्तावना दिली असून संशोधकाने सदर संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाकरीत समस्याविधान स्पष्ट करण्यात आले. संशोधनाची उद्दिष्ट्ये, महत्व, गरज, इ. व्यक्त करण्यात आली आहे. संशोधन विधानातील प्रत्येक संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण देवून संशोधनाची उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. संशोधनाच्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी अनुभवातून समोर आलेली गृहितके ही मांडली आहेत. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करुन लक्ष्य समूहाची निवड केली. संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती प्रश्नावली या माहिती संकलन साधनाव्दारे संकलित केली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयीन ग्रंथलयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलित केल्या आहेत. ग्रंथपालांशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. संशोधन करित असताना संशोधकाला ग्रंथालयातील विविध पैलूंव्दारे अभ्यास केला असता समस्यांची उकल झाली.

**प्रकरण दुसरे** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. २७ ते ७० ह्यामध्ये विशद करण्यात आले आहे. सदर संशोधन पूर्ण करत असताना संशोधन विषयाच्या संबंधीत पूर्वी ज्या ज्या संशोधकांनी संशोधन केलेले आहे त्या त्या संशोधन शोध प्रबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनाच्या संबंधीत विषयाचे प्रबंधांचाही पूर्वाभ्यास करण्यात आला असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेखाचे वाचन करुन पूर्वाभ्यासात संदर्भ दिले आहेत. संदर्भ देत असताना अमेरीकन सायकोलॉजिकल असोसिएशन (A.P.A.) स्टाईलचा वापर करण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. ७१ ते ११४ ह्यामध्ये विशद करण्यात आले आहे. सदर प्रकरणात संशोधकाने संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाच्या पूर्व इतिहासाचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामूख्याने महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त आढावा, ठाणे जिल्ह्याचा समग्र आढावा, पालघर जिल्ह्याचा समग्र आढावा, आदिवासी समाज, मुंबई विद्यापिठाची स्थापना / इतिहास इत्यादी बाबत उहापोह केला आहे.

**प्रकरण चौथे** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. ११५ ते १६२ ह्यामध्ये विशद करण्यात आले आहे. सदर प्रकरणात महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्वरुप / कार्य / महत्व : एक आढावा, महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवा एक प्रभावी साधन, ग्रंथालयीन सेवा एक आढावा, महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सेवांचे मूल्यमापन, ग्रंथालयीन सेवा सुविधा आणि बदलते स्वरुप, नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन आणि ग्रंथालय प्रशासन, महाविद्यालयीन नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्य:स्थितीबाबत उहापोह केला आहे.

**प्रकरण पाचवे** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. १६३ ते २७३ ह्यामध्ये विशद करण्यात आले असून सदर प्रकरणात संशोधन विषयासंदर्भातील माहिति प्रश्नावली या माहिती संकलन साधनाव्दारे संकलित केली आहे. माहिती संकलित करताना वाचक प्रश्नावली : विद्यार्थ्यांसाठी, वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी व प्रश्नावली ग्रंथपालांसाठी अशा तीन स्वतंत्र प्रश्नावली तयार करुन भरुन घेण्यात

आल्या. वाचकांच्या ग्रंथालयात भेटी बाबत, वाचना साहित्याबाबत, पुस्तकपेढीबाबत, ग्रंथालयीन सेवांबाबत (पारंपरिक, आधुनिक, संगणकीय सेवांबाबत) सेवा मिळवितांना येत असलेल्या अडचणी बाबत, वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांबाबत, भौतिक सुविधांबाबत इ. पैलूंवरील मते जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला असून त्याव्दारे प्राप्त झालेल्या माहीतीचे तक्त्यांच्या स्वरुपात मांडणी केली. तक्त्यांतील माहितीचे पृथःकरण करुन आलेखाव्दारे सादरीकरण करण्यात आले.

तसेच सदर प्रकरणात ग्रंथपालांसाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नावलीचे स्वरुप हे ग्रंथालयाबाबत समग्र माहिती जाणून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरली. सदर प्रश्नावलीत ग्रंथालय व ग्रंथालयीन कर्मचारी, त्यांसाठी प्रशिक्षणाची सोय, कामकाजाचे तास, ग्रंथालयाचे वर्गीकरण, तालीकीकरण, संगणकीकरण, ग्रंथालयाचे क्षेत्रफळ, ग्रंथालय समिती, ग्रंथसंपदा, ग्रंथालयीन साधनसामग्री, ग्रंथालयीन सेवा, ग्रंथालयीन उपक्रम, कार्यक्रम, भौतिक सुविधा, अनुदानाची आकडेवारी, विभागवार खर्च तपशील, ग्रंथालयीन मूल्यमापन, वाचनसाहित्य रद्दबातल इ. बाबत सविस्तर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तिन्ही प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबचा अभिप्राय जाणून घेऊन तक्त्याच्या स्वरुपातील माहितीचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्यात आले आहे. सदर प्रकरणातील तक्त्यांची सूची पृष्ठ क्र. VI, आलेखांची सूची पृष्ठ क्र. XII, व आकृत्यांची सूची पृष्ठ क्र. XV वर देण्यात आली आहे.

**प्रकरण सहावे** : सदर प्रकरण हे पृष्ठ क्र. २७४ ते २९८ ह्यामध्ये विशद करण्यात आले असून सदर संशोधनात संशोधकाने एकूण ५१ निष्कर्ष काढले असून ३३ शिफारशी दिलेल्या आहेत व त्यातून संशोधन उद्दिष्टे व गृहीतके यांची पडताळणी करुन घेण्यात आली असून संशोधन समस्येच्या संदर्भात मांडलेल्या उद्दिष्ट्यानुसार सदर संशोधन कार्य पूर्ण केले.

विश्लेषणाअंती काढलेले निष्कर्ष व शिफारशी विद्यार्थी, प्राध्यापक व ग्रंथपाल ह्या क्रमाने मांडली असून प्रकरण क्र. १ मध्ये जी संशोधनाची उद्दिष्टे ठरविली होती त्या आधारे सद्यस्थितीचे अवलोकन करुन उद्दिष्टनिहाय निरीक्षणे, निष्कर्ष व शिफारशी विशद करण्यात आली आहेत. प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधक उद्दिष्टनिहाय निरीक्षण, निष्कर्ष व शिफारस ह्यावरुन असे सिध्द होते की, संशोधकाने मांडलेल्या उद्दिष्टयांची पूर्तता व गृहितकांची पडताळणी झाली असून संशोधनातील निष्कर्षांचा, शिफारशिंचा आणि पुढील संशोधनाच्या दिशांचा सर्व महाविद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचारी, वाचकांबरोबर या क्षेत्रात संशोधन कार्य करु इच्छिणाऱ्या संशोधकांना, अभ्यासकांना उपयोग होणार आहे.

संशोधनासाठी वापरण्यात येणारे संदर्भ सूची, व परिशिष्टे संशोधकाने प्रबंधाच्या शेवटी पृष्ठ क्र. २९९ नंतर जोडले असून अशा प्रकारे संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

===XOX===

# प्रकरण पहिले.

# प्रस्तावना आणि संशोधन संकल्पना.

## १.१ प्रस्तावना :–

शैक्षणिक गुणवत्तेचा आग्रह आणि त्यासाठी सातत्याने होणारे प्रयत्न आणि पौर्वात्य देशांमध्ये अगदी प्राचीन काळापासून शैक्षणिक गुणवत्ता वृध्दिंगत व्हावी म्हणून सतत प्रयत्न होत आहेत.

कोणतेही संशोधन हे संशोधकाच्या जिज्ञासू वृत्तीतून जगासमोर येत असते. मनुष्याचे कुतूहल आणि त्याची ज्ञान पिपासूवृत्ती जी त्याच्या ठिकाणी उपजत असते. अशा परिस्थितीत मनुष्याला सतत भेडसावणाऱ्या समस्या अगर त्याची त्या समस्येवर उपाय शोधण्याची जिज्ञासा यामुळे तो त्या विशिष्ट परिस्थितीबाबत अभ्यासाला सुरुवात करतो.

ठाणे जिल्ह्याची स्थापना झाल्यानंतर शहरी भागात शिक्षण प्रसार झपाट्याने होऊ लागला त्यामुळे उर्वरीत ग्रामीण भागात तसेच बहुतांशी आडवळणी गैरसोयीच्या ठिकाणी शिक्षणाची ज्ञानगंगा पोहचविणे अतिशय खडतर होते. त्यामध्ये सुध्दा काही शिक्षण प्रसारक मंडळीनी जिथे अज्ञान, अंधश्रध्दा व शिक्षणासह अन्य सुविधांचा अभाव आहे अशा दुष्काळी, दुर्गम, अविकसीत भागांसह आदिवासी भागांत शिक्षण प्रसार सुरु केलेल्या संस्थांनी पराकाष्टेच्या प्रयत्नाने महाविद्यालये सुरु केली.

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या ठाणे जिल्ह्यात आव्हानात्मक ठिकाणी अनेक अडथळे, अडचणींवर मात करत शिक्षणाची ज्ञानगंगा खऱ्या अर्थाने घरोघरी पोहचविण्याचे काम ही महाविद्यालये उत्तम प्रकारे करत आहेत.

ठाणे जिल्ह्यांतील आदिवासी समाज म्हणजे परिस्थितीने पिछाडलेला, दारिद्र्याने गांजलेल्या व दारु, कर्जाच्या विळख्याने घुसमटलेला समाज. आदिवासींचं दारुण नि करुण जीवन अतिशय खडतर तर आहेच शिवाय अजुनही काही प्रमाणातील वेठबिगारी व अज्ञान अंधारात चाचपडणाऱ्या या समाजाचे जिवन म्हणजे शोकांतिकाच. ह्या परीस्थितीत महाविद्यालये सुरु करुन त्यातील ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, ग्रंथालयीन सेवा सुविधा व अशा सेवासुविधा कि, ज्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना पूर्ण करणे खडतर आहे व याच संज्ञा, संकल्पनेत झालेला बदल व त्यातून वाचकांना सेवासुविधा देत असतांना आलेल्या अडचणी,

महाविद्यालयाचे उद्देश व त्या उद्देशांच्या पूर्ततेसाठी करावा लागलेला संघर्ष तसेच या प्रकारच्या खडतर वाटचालीतून निर्माण झालेले साध्य याचा अभ्यास महत्वाचा आहे, कारण सरते शेवटी मिळणारे निष्कर्ष हे थोड्याफार प्रमाणात तशीच परीस्थिती असणाऱ्या इतर संस्थांमध्ये लागू पडण्याची शक्यता अधिक असते.

## १.२. संशोधन विषय :–

### "मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."

## १.३ संशोधनाचे महत्त्व :–

"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास." संशोधनासाठी संशोधकाने निवडलेल्या ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयातील ग्रंथालयांवर या स्वरुपाचे संशोधन झाले नसल्याने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

प्रस्तुत संशोधनात मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांवर भर दिला आहे. महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी म्हणजे उद्याचे भावी नागरिक ह्यांना घडविणारी ग्रंथालये सुसज्ञ आहेत काय? त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा पुरविणारे ग्रंथपाल त्वरीत त्यांच्या गरजा पुर्ण करतात का? वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे त्यांच्या अभिरुचींवर संस्कार करणे हे काम ग्रंथालये करु शकतात. नवसाक्षरांना वाचनाची सवय लागली नाही तर ते पुन्हा निरक्षर होतील यासाठी सर्वांनी एकत्र येऊन ग्रंथालयीन गुणवत्ता व दर्जा वाढविणे गरजेचे आहे. ग्रंथालयाच्या वाचकांनी ग्रंथालय साहित्याचा अधिकाधिक वापर करणे ही आजची गरज आहे. शिक्षणाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवावयाची असेल तर ग्रंथालयाचा वापर वाढविणे व ग्रंथालय सेवा आणि साहित्य सहज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे अधिक गरजेचे आहे.

सदर संशोधनाच्या मदतीने ग्रंथालयाची माहिती मिळेल. वाचकांच्या ग्रंथालयाकडून प्रत्यक्ष काय अपेक्षा आहेत. त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा मिळवितांना कोणकोणत्या

अडीअडचणी येतात हे शोधून ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा यांची संख्यात्मक व गुणात्मक बदल याविषयी माहिती मिळेल व त्याचा फायदा सर्वांना होईल.

संशोधनासाठी निवडलेली महाविद्यालयीन ग्रंथालये ठाणे जिल्ह्यांतील आहेत व अशा महाविद्यालयातील ग्रंथालयांची संपूर्ण माहिती वाचकांना मिळावी म्हणून प्रस्तुत संशोधनाची गरज वाटली.

आधुनिक काळात ज्ञानशाखांच्या विस्तारामुळे ग्रंथ हे गुरु झाले आहेत व हे ग्रंथ जतन करणारी ग्रंथालये ही आधुनिक गुरुकुले बनली आहेत. त्यामुळे ग्रंथालयांचे कार्यक्षेत्र बदलले. ग्रंथालये ही एक सेवाभावी संस्था आहे. वाचकांना ग्रंथालयीन सेवा देत असतांना वाचकांची अपेक्षा अशी असते की, आपल्याला ग्रंथालयातून मिळणाऱ्या सर्व सेवा ह्या अधिक दर्जेदार मिळाल्या पाहिजेत परंतु आधुनिक प्रकारच्या सेवा देण्यासाठी ग्रंथालयाला भरपूर प्रमाणात आर्थिक पाठबळाची गरज भासते. ह्या अडचणींवर मात करुन ग्रंथालयांनी वाचकांना अधिकाधिक प्रयत्न करुन वाचकांच्या गरजा भागविल्या पाहिजेत.

थोडक्यात, ग्रंथालय व माहिती केंद्रे प्रामुख्याने सेवा उद्योग म्हणून कार्य करतात. वाचनसाहित्य देवघेव सेवा, संदर्भसेवा, प्रचलित जागरुकता सेवा, निवडक माहिती प्रसारण सेवा, इत्यादी प्रकारच्या सेवा ग्रंथालये आपल्या वाचकांना देत असतात. तसेच वाचनकक्ष सुविधा, प्रतिलिपीची सुविधा, इंटरनेटची सुविधा ग्रंथालये आपल्या वाचकांसाठी उपलब्ध करतात. अशा प्रकारच्या सेवा सुविधा विकसित करण्यासाठी प्रथम संबंधित सेवेची गरज अभ्यासावी लागते. यासाठी उपभोक्ता अभ्यास उपयुक्त ठरतात. तसेच प्रस्तावित सेवेचे स्वरुप, कालावधी, किंमत इत्यादी अनुषंगाने चिकित्सक विचार करावा लागतो. यासाठी उपभोक्ता अभ्यास (User Studies), उपयोग अभ्यास (Use Study), मूल्य–परिणामकारकता अभ्यास (Cost effectiveness Study), मूल्य–नफा विश्लेषण अभ्यास (Cost Benefit Analysis) इत्यादी प्रकारचे संशोधन आवश्यक असते. ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा वाचकांना उपयोग होतो किंवा नाही याबाबत वाचकांकडून नियमितपणे प्रतिसाद घेणे उपयुक्त ठरते. अशा प्रतिसादानुसार मूळ सेवा–सुविधांमध्ये आवश्यक असे बदल करणे शक्य होते. प्रचलित सेवा–सुविधांबाबत वाचकांकडून प्रतिसाद मिळविणे आणि प्रतिसादानुसार त्यामध्ये बदल करणे

यासाठीही ग्रंथपालन क्षेत्रात संशोधन आवश्यक आहे. ग्रंथालयाने विकसित केलेल्या सेवांची माहिती वाचकांपर्यंत पोहचवून त्या सेवा त्यांनी वापराव्यात यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यासाठी ग्रंथालयांच्या सेवांबाबतही संशोधन होणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचा मुख्य उद्देश :–**

- महाविद्यालयातील विविध उपक्रम चालविण्यासाठी ग्रंथालयीन पूरक सेवा देणे.
- महाविद्यालयीन ग्रंथालय समृध्द व अद्ययावत ठेवणे.
- प्राचीन वाङ्मयाचा संग्रह जितका आवश्यक आहे तितकेच आधुनिक ग्रंथ व नियतकालिके ग्रंथालयात ठेवणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयीन ग्रंथालयात अभ्यासक्रमिक पुस्तके व त्यास आवश्यक अशा पूरक ग्रंथाचा समावेश करुन विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढीस लावणे.

ग्रंथालयाकडे असणारी वाचकांची ओढ टिकवून ठेवणे व ग्रंथालयांना आधुनिक सेवा सुविधांचा साज चढवून त्यांना ग्रंथालयांकडे वळविणे हाच महत्वाचा भाग ग्रंथालयीन सेवा सुविधेचा आहे.

## १.४ संशोधन समस्या :–

संशोधन समस्या शोधणे हे एक अत्यंत महत्वाचे कार्य आहे. कारण संपूर्ण संशोधनाची गुणवत्ता ही संशोधन समस्येच्या स्वरुपावर अवलंबून असते. अर्थपूर्ण असे संशोधन समस्या करण्यासाठी संशोधकास संशोधन विषयाचे आणि संशोधन पध्दतीचे ज्ञान असले पाहिजे. संशोधन समस्येच्या माध्यमातून संशोधक संशोधनाचा उद्देश आणि कार्यप्रणाली व्यक्त करत असतो.

प्रस्तावित संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती, गृहितके, समस्या विधान, पूर्वानुमान, विशेष संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या इत्यादी घटकांच्या मदतीने संशोधन समस्या सविस्तरपणे स्पष्ट करण्याच्या प्रकियेस समस्या म्हणतात. **(कुंभार, २०१३)**

समस्या विधान हे संशोधनाची समस्या व्यक्त करणारे औपचारिक विधान असते. समस्या विधानातून संशोधनाचा विषय अधिक स्पष्ट केला जातो. संशोधकास काय, कोणत्या

समस्येचे समाधान शोधावयाचे आहे हे समस्या विधानातून स्पष्ट होते. समस्या विधान हे ज्ञान बाबींकडून अज्ञात बाबींकडे घेऊन जाणारे तार्किक विधान असते.

सदर संशोधनासाठी पुढील संशोधन समस्येचा शोध घेण्याचे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहेत.

**१. ग्रंथालयीन लाभार्थींवर ग्रंथालयीन सेवा सुविधांचा परिणाम झाला आहे का?**

**२. भविष्यातील बदलांचा विचार करणे व त्यांचा अंतर्भाव करणे ग्रंथालयांना अपरिहार्य आहे का?**

**३. अपुरे आर्थिक स्त्रोत, उपभोक्त्यांच्या वाढत्या गरजा व अपेक्षा यांचा ग्रंथालयीन सेवा सुविधांवर काय परिणाम झाला आहे?**

**समस्या विधान :**

संशोधकाने संशोधनासाठी निश्चित केलेल्या समस्या नेमक्या शब्दात मांडणे आवश्यक असल्याने प्रस्तुत संशोधनाकरीता **''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** हे समस्याविधान निश्चित केले आहे.

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे :-

सदर संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

**१. संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.**

**२. सद्य:स्थितीतील ग्रंथालयीन सेवा-सुविधांची माहिती अभ्यासणे.**

**३. ग्रंथालयीन सेवा-सुविधा देतांना आलेल्या अडचणींची नोंद घेणे.**

**४. ग्रंथालयीन सेवा-सुविधांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.**

**५. महाविद्यालयीन लाभार्थींच्या ग्रंथालयीन सेवा-सुविधांबाबतची समाधानकारकता अभ्यासणे.**

**६. संशोधनावर आधारित निष्कर्षंगाने शिफारशी देणे.**

## १.६ गृहितके :-

संशोधन कर्त्याव्दारे संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण म्हणजे गृहितके होय. यालाच उपकल्पना देखील म्हटले जाते. एखाद्या समस्येच्या निवारणाचे कार्य संपन्न झाले की, निर्धारीत संभाव्य उत्तरे शाब्दिक स्वरुपात मांडण्याच्या कार्याकडे संशोधनकर्त्याने वळणे उपयुक्त ठरते ही संभाव्य उत्तरे किंवा पर्यायी तोडगा म्हणजेच गृहितके होय.

**''उपकल्पना म्हणजे ज्या आधारावर संशोधन कार्य करता येते असा कार्यवाहक विचार होय''– पी. व्ही. यंग (घाटोळे, २००३)**

गृहितकामुळे संशोधक आपले लक्ष आवश्यक तथ्यावर केंद्रीत करुन आपल्या संशोधनाची दिशा ठरवितो.

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी पुढील गृहीतकृत्ये निर्धारीत करण्यात आली आहेत.

**१. संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचे कार्य समाधानकारक आहे.**

**२. ग्रंथालयीन सेवा–सुविधांमधील बदलांमुळे सेवा–सुविधा वृध्दिंगत होत आहेत.**

**३. दर्जेदार व प्रभावी सेवांमुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा गुणात्मक व संख्यात्मक असा दोन्ही तऱ्हेने लाभ होत आहे.**

**४. बदललेल्या ग्रंथालयीन सेवांमुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.**

**५. ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकडे वेळोवेळी लक्ष पुरविले जाते.**

**६. ग्रंथालयीन बदलांमुळे वाचकांवर इष्ट परिणाम झाला आहे.**

## १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

संशोधन हे अमर्यादित असल्याने संशोधकाचे त्यावर नियंत्रण राहणे कठीण जाते तेव्हा काही व्याप्ती व मर्यादा असणे आवश्यक आहे.

सदर संशोधनामध्ये मुंबई विद्यापीठ अंतर्गत संलग्न येणाऱ्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा समावेश आहे यात प्रामुख्याने कला, वाणिज्य, व विज्ञान अशा एकत्रित विद्या शाखा असलेली शिवाय अलग अलग विद्या शाखा असलेल्या महाविद्यालयांचा समावेश केला आहे.

**१.७.१. संशोधनाची व्याप्ती :–**

१. सदर संशोधनासाठी ठाणे व पालघर जिल्ह्यांतील महाविद्यालयीन ग्रंथालयांची निवड करण्यात आली आहे.

२. सदर संशोधनासाठी महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग अभ्यासासाठी निवडला आहे तसेच ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा–सुविधा एवढाच मर्यादित आहे.

३. सदर संशोधनामध्ये सन २०१४ ते सन २०१६ या कालावधीतील नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांचा माहितीचा अभ्यास केला आहे.

संशोधकाने संशोधन प्रकल्पासाठी मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यांतील खालील नाम निर्देशित महाविद्यालयांची निवड केलेली आहे. संबंधित महाविद्यालयांची यादी खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. १.१.**

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील महाविद्यालयांची स्थापना वर्ष निहाय सूची**

| अ. क्र. | तालुका | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | स्थापना वर्ष | नॅक श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर | Principal, R. K. Talreja College of Arts, Science and Commerce<br>Opp. A-1, Sweets Shop, Shivaji Chowk, Ulhasnagar-3, Dist. Thane,<br>Pincode : 421003 | १९६१ | ब+ |
| २ | भिवंडी | Principal, Bhiwandi Nizampur Nagarpalika Arts, Science & Commerce College<br>Dhamankar Naka, Varaldevi Road, Vidyashram, Kamatghar, Tal. Bhiwandi, Dist. Thane<br>Pincode : 421305 | १९६६ | ब+ |
| ३ | ठाणे | Principal, B. N. Bandodkar College of Science<br>'Jnanadweep' Chendani, Thane (W)<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |
| ४ | ठाणे | Principal, Joshi Bedekar College of Arts & Commerce<br>Chendani Bunder Road, Creek Land, Near CIDCO Bus Stop, Thane (W),<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | पालघर | Principal, Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar (W) Tal. & Dist. Palghar, Pincode : 401404 | १९७० | ब |
| ६ | वसई | Principal, A. V. College of Arts, K. M. College of Commerce & E.S.A. College of Science. Navghar, Vasai Road (W), Dist. Palghar, Pincode : 401202 | १९७१ | ब+ |
| ७ | कल्याण | Principal, Birla College of Arts, Science & Commerce Birla College Road, Kalyan (W) Dist. Thane, Pincode: 421304 | १९७२ | अ |
| ८ | ठाणे | Principal, Motilal Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce Amalendu Roye Marg, Sector 9 A, Plot No. 53, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane, Pincode 400703 | १९७८ | ब++ |
| ९ | कल्याण | Principal, Dombivli Shikshan Prasarak Mandal's K. V. Pendharkar College of Arts, Science & Commerce. Plot No. SPL-4, Opp. MIDC Office, Dombivli (E) Tal. Kalyan Dist. Thane, Pincode : 421203 | १९७९ | ब |
| १० | ठाणे | Principal, Rayat Shikshan Sanstha's Karmveer Bhaurao Patil College, Sector - 15 A, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane, Pincode 400703 | १९७९ | अ |
| ११ | ठाणे | Principal, Dnyanasadhana College of Arts, Commerce & Science Off. Eastern Express Highway, Dnyanasadhana Marg, Near Eternity Mall, Dist. Thane Pincode : 400604 | १९८० | ब |
| १२ | डहाणू | Principal, Sau. Sitabai Ramkrushna Karandikar Senior College of Commerce & Late Mehernosh Boman Burjor Irani College of Arts & BSES Junior College of Science. At. Vadkun, Post. Dahanu Road, Dist. Palghar, Pincode : 401602 | १९८१ | ब+ |
| १३ | वाडा | Principal, Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's Arts, Commerce, & Science College. Wada, Dist. Palghar, Pincode : 421303 | १९८२ | ब |
| १४ | जव्हार, | Principal, Gokhale Education Society's Arts, Commerce & Science College Jawhar, Dist. Palghar, Pincode : 401603 | १९८३ | ब |
| १५ | शहापूर | Principal, Sonubhau Baswant College of Arts & Commerce, N. P. Vasa Marg, Savroli Road, Shahapur, Dist. Thane, Pincode : 421601 | १९८४ | ब |
| १६ | वसई | Principal, Gonsalo Garcia College of Arts & Commerce Behind Vasai Cricket Ground, Near Vasai S.T. Depo., Tal. Vasai, Dist. Palghar, Pincode : 401201. | १९८४ | ब+ |
| १७ | मोखाडा | Principal, Rayat Shikshan Sanstha's Arts, Science & Commerce College. Mokhada, Tal. Mokhada, Dist. Palghar, | १९८४ | ब |
| १८ | उल्हासनगर | Principal, P. D. Karkhanis College of Arts & Commerce Near Bhausaheb Paranjpe High School, Kansai Section, Ambarnath (E) Dist. Thane, Pincode : 421501 | १९८६ | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | डहाणू | Principal, P. L. Shroff College of Arts & Commerce<br>At Post Chinchani, Tal. Dahanu, Dist. Palghar,<br>Pincode : 401503 | १९८६ | ब |
| २० | कल्याण | Principal, Model College<br>P-32, Residential Area, M.I.D.C. Dombivli (E), Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode : 400703 | १९८९ | अ |
| २१ | भिवंडी | Principal, G. M. Momin Women's College,<br>Rais High School Campus, Thane Road, Bhiwandi, Dist. Thane, Pincode : 421302 | १९८९ | अ |
| २२ | मुरबाड | Principal, J.S.M's Arts, Commerce & Science College<br>At. Gandhi Camp, Shivle, Post Shivle, Tal. Murbad, Dist. Thane Pincode : 421401 | १९८९ | ब |
| २३ | ठाणे | Principal, N.K.T. College of Commerce and Arts<br>Near C.K.P. Hall, Behind Collector Office, Kharkar Ali, Thane (W), Dist. Thane,<br>Pincode : 400601 | १९९० | ब |
| २४ | बदलापूर | Principal, Bharat College of Commerce<br>Hendrepada, Kulgaon, Badlapur (W), Dist. Thane, Pincode : 421503 | १९९१ | ब+ |
| २५ | वसई | Principal, Shankar Narayan College of Arts & Commerce.<br>Navghar, Mahavidyalaya Marg, Bhayander (E), Dist. : Palghar, Pincode : 401105 | १९९४ | ब+ |
| २६ | उल्हासनगर | Principal, J. Watumull Sadhubella Girls College,<br>Near Govt. Dispensary, Ulhasnagar, Dist. Thane, Pincode: 421001 | १९९४ | क++ |
| २७ | डहाणू | Principal, N. B. Mehta (Valwada) Science College<br>Acharya Bhise Vidyanagar, Bordi, Tal. Dahanu, Dist. Palghar, Pincode : 401701 | १९९४ | ब |
| २८ | तलासरी, | Principal, Comrade Godavari Shamrao Parulekar College of Arts, Commerce & Science.<br>At & Post. : Talasari, Tal. Talasari, Dist. Palghar, Pincode : 401606 | १९९४ | ब |
| २९ | कल्याण | Principal, K. M. Agrawal College of Arts, Commerce & Science<br>Padgha Road, Gandhare, Kalyan (W), Dist. Thane, Pincode : 421301 | १९९४ | अ |
| ३० | बदलापूर | Principal, Adarsh College of Arts & Commerce,<br>At post – Kulgaon, Near Kulgaon, Badlapur Muncipal Council Office, Tal. Badlapur , Dist. Thane Pincode : 421503 | १९९५ | ब |
| ३१ | वसई | Principal, St. Joseph College of Arts & Commerce. Satpala,<br>Post : Agashi, Virar (W), Tal. Vasai, Dist. Palghar, Pincode : 401301 | १९९५ | ब |
| ३२ | कल्याण | Principal, Pragati College of Arts & Commerce,<br>Datta Nagar, Pragati College Road, Dombivli (E) Tal. Kalyan, Dist. Thane,<br>Pincode : 421201 | १९९७ | ब |
| ३३ | कल्याण | Principal, Rashtriya Shikshan Sanstha's Swami Vivekanand Night College of Arts & Commerce.<br>Chhatrapati Bhavan, Ayare Road, Dattanagar, Dombivli (E), Tal. Kalyan, Dist. Thane,<br>Pincode : 421201 | १९९८ | ब |
| ३४ | ठाणे | Principal, Karnataka Sangha's Manjunath College of Commerce<br>Kanchangaon, Khambalpada, Thakurli (E), Dist. Thane, Pincode : 421201 | १९९९ | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | वसई | Principal, Viva College of Arts, Commerce & Science<br>Viva College Road, Virar (W), Tal. Vasai, Dist. Palghar, Pin. 401303 | २००० | ब |
| ३६ | ठाणे | Principal, Smt. Janakibai Rama Salvi College of Arts, Commerce & Science<br>Manisha Nagar, Kalwa (W) Dist. Thane, Pincode : 400605 | २००३ | ब |
| ३७ | कल्याण | Principal, Laxman Devram Sonawane College<br>Opp. Fire Station, Near Durgadi Kille, Murbad Road, Kalyan (W), Dist. Thane, Pincode : 421302 | २००३ | ब |
| ३८ | कल्याण | Principal, Jeevandeep Shaikshnik Sanstha Poi's Arts, Commerce & Science College<br>At. Goveli, Post : Rayate, Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode 421301 | २००४ | क |

**स्त्रोत : http://archive.mu.ac. inttenroll2%20THANE-ASC%20PRINTED%20FILE.pdf**
Retrieved on December 16, 2016.

### १.७.२. संशोधनाची व्याप्ती ठरविण्यासाठी लावलेले निकष :–

१. महाविद्यालयाचे किमान **प्रथम नॅक मूल्यांकन** झालेल्याच महाविद्यालयांचा विचार करण्यात आलेला आहे.

२. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांचे ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर ८ तालुके पालघर जिल्ह्यात वर्ग झालेत. सदर संशोधनामध्ये ठाणे–पालघर जिल्ह्यामध्ये येणाऱ्या महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे.

३. सदर संशोधनासाठी मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा–सुविधांच्या चिकित्सक अभ्यासा बाबतच विचार करण्यात आलेला आहे.

### १.७.३. संशोधनाची मर्यादा :–

१. ठाणे व पालघर जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचा विचार केला जाणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनात अति तांत्रिक बाबी टाळल्या जाणार आहेत कारण तो एक स्वतंत्र अभ्यासविषय आहे.

## १.८ संशोधनाची नमुना निवड :–

### नमुना निवड :–

सामाजिक संशोधनामध्ये समस्येचे उत्तर शोधून संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जी माहिती गोळा करावी लागते ती व्यक्ती व संस्थांकडून मिळवावी लागते. सदर संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तीच्या किंवा संस्थांच्या समूहाला जनसंख्या म्हणतात. **(कर्णिक, २०००)**

जनसंख्येतील प्रतिनिधीक निवड केलेल्या लहान संचाला किंवा त्या गटाला त्या जनसंख्येचा न्यादर्श नमुना असे म्हणतात. **(संत, १९८८)**

समग्र आणि संपूर्ण अभ्यासक्षेत्रातून निवडलेला लहान भाग म्हणजे नमुना होय. नमुना त्यातील नावाप्रमाणे एक विस्तृत समूहाचा लघुप्रतिनिधिक आहे. **(गुड अणि हॅट्,१९८१)**

लक्ष्यसमूह किंवा जनसंख्या (Population) आकाराने मोठी असल्यास त्या समूहाचा योग्य असा नमुना निवडावा लागतो. नमुना परिणामिक पध्दतीने निवडल्यास तो प्रातिनिधिक होऊन जो निष्कर्ष त्या नमुन्यासंदर्भात काढला जातो तो संपूर्ण समूहाच्या बाबतीत लागू पडतो असे समजण्यात येते. ''समग्र लोकसंख़्येच्या आकाराच्या नमुन्याचा आकार काय असावा, याबाबत बऱ्याचदा संशोधनकर्त्यांच्या मनात संभ्रम असतो. लोकसंख्येतील प्रत्येक एककास नमुन्यात मिळणारी संधी समान राहील अशा प्रकारे एककांची निवड केली जाणे आवश्यक असते. या ठिकाणी संशोधक संभाव्यता नमुना निवडीच्या तत्त्वाचाच अवलंब करीत असतो. संभाव्यता तत्त्वाप्रमाणेच केलेली नमुना निवड हीच प्रातिनिधिक नमुना निवड योजनेची आखणी शक्य बनविते. म्हणूनच विशिष्ट आकाराच्या लोकसंख्येसाठी नमुना प्रातिनिधिक ठरावा यासाठी नमुन्याचा आकार काय असावा ह्या प्रश्नात संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा अवलंब गृहीतच धरण्यात आला आहे. म्हणजेच संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा अबलंब झाला नसल्यास नमुन्याचा आकार कितीही ठेवला तरी तो समग्रसाठी वा लोकसंख़्येसाठी प्रतिनिधिक असेल की नाही हा प्रश्न गणिती पध्दतीने सोडविता येत नाही. नमुन्याचा आकार किती मोठा असावा या प्रश्नाचे उत्तर आपण संशोधनात कोणती पातळी पाहतो, याच्याच अनुषंगाने देता येईल. अचूकतेची कोणती पातळी आपणास हवी हे ठरवून घेतले की नमुना किती मोठा असावा याचे निर्धारण करता येते.'' **(भांडारकर, १९९९)**

नमुन्याचा आकार ठरविताना जनसंख्या, प्रतिसादकाची उपलब्धता, संशोधकास उपलब्ध असणारा वेळ व पैसा यांचा विचार करणे ही आवश्यक ठरते. जनसंख्या निश्चित झाली की, त्यातून न्यादर्श नमुना निवडणे सोपे होते. जनसंख्येतील सर्व घटकांकडून माहिती संकलित करणे शक्य नसते. त्यामुळे न्यादर्शावर संशोधन केल्यामुळे वेळ, श्रम व पैसा यांची बचत होते व संशोधन जलद गतीने होते.

प्रस्तूत संशोधनामध्ये नमुना निवडीसाठी न्यादर्श नमुनाच्या **संभाव्य नमुना निवड पध्दतीचा** अवलंब करण्यात आलेला आहे. अभ्यासकांच्या निर्णयानुसार न्यादर्श नमुन्यातील घटकांची निवड करणे हे या पध्दतीचे वैशिष्ट्य आहे. अभ्यासकांच्या योग्य निर्णयाच्या आधारावर केलेली निवड अधिक प्रतिनिधिक व सोयीस्कर असते या विचारसारणीवर संभाव्यता न्यादर्श पध्दती आधारलेली आहे.

सदर संशोधनामध्ये संभाव्यता न्यादर्श पध्दतीच्या प्रकारांपैकी सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा समावेश केलेला आहे.

**न्यादर्शाचा आकार :-**

- न्यादर्शाच्या आकारामध्ये ग्रंथपाल, महाविद्यालयातील विद्यार्थी व अध्यापक वर्ग यांचा समावेश केला आहे.
- प्रश्नावली भरुन घेण्याचे प्रमाण हे एकूण वाचकांच्या ५% किंवा सुमारे ५० ह्यापैकी कमीत कमी महाविद्यालयातील विद्यार्थी घेण्यात आलेले असून, हजेरी पत्रकातील ५०% किंवा सुमारे २५ ह्यापैकी कमीत कमी नियमित अध्यापक वर्ग हे प्रमाणात निश्चित केली आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये न्यादर्शाचा आकार एकूण जनसंख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे घेतला आहे.

**ग्रंथपाल :- १००%**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रंथपाल न्यादर्शाचे प्रमाण १००% घेतलेले आहे.

ग्रंथपालांसाठी स्वतंत्र प्रश्नावली भरुन घेण्यात आलेले असुन पूरक माहितीसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करण्यात आलेली आहे.

**विद्यार्थी वाचक :- ५०.**

प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थी वाचकांचे न्यादर्शाचे प्रमाण एकूण जनसंख्येमधून ५० एवढे घेतलेले आहे. वाचकांच्या सर्वेक्षणासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील किमान ५० वाचकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आलेली आहे. हे प्रमाण महाविद्यालयाच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या ५% किंवा सुमारे ५० ह्यापैकी कमीत कमी घेण्यात आलेले आहे.

**अध्यापक वर्ग :- २५.**

प्रस्तुत संशोधनामध्ये अध्यापक वाचकांचे न्यादर्शाचे प्रमाण हे २५ एवढे घेतलेले आहे. त्यासाठी हजेरी पत्रकातील नियमित अध्यापक वर्गापैकी ५०% किंवा सुमारे २५ ह्यापैकी कमीत कमी घेण्यात आलेले आहे.

## १.८.१ माहिती संकलनासाठी महाविद्यालयांची निवड :-

ठाणे जिल्ह्यांत (ठाणे व पालघर) मुंबई विद्यापीठ संलग्न एकूण ९५ महाविद्यालये आहेत. सदर संशोधनामध्ये मुंबई विद्यापीठ संलग्न येणाऱ्या महाविद्यालांचा समावेश आहे यात प्रामुख्याने कला, वाणिज्य, व विज्ञान अशा एकत्रित पदवी विद्या शाखा असलेली शिवाय अलग अलग पदवी विद्या शाखा असलेल्या महाविद्यालयांचा समावेश केला आहे. सदर संशोधनामध्ये सन २०१४ ते सन २०१६ या कालावधीतील नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांचा माहितीचा अभ्यास केला असल्याने एकूण ३९ महाविद्यालये सर्वेक्षणासाठी पात्र ठरली आहेत.

## १.९ नमुना निवड व त्यास मिळालेला प्रतिसाद :-

एकूण ९५ महाविद्यालयांपैकी ३९ महाविद्यालये पात्र ठरली. एकूण महाविद्यालयांच्या बाबतीत हे प्रमाण ४१.५०% असून त्यामध्ये नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांचा माहितीचा अभ्यास केला असता एकूण ३९ पैकी ३८ महाविद्यालयांनी प्रश्नावली भरुन दिल्या असल्याने त्यांचे हे प्रमाण ९७.४३% आहे.

**तक्ता क्र. १.२.**

**नमुना निवड व त्यास मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| एकूण वाचक | | | प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप | | | एकूण नमुना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| ७८६९० | १३८० | ३९ | १९०० | ९५० | ३८ | **०२.४१ %** | **६८.८४ %** | **९७.४३ %** |

| प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप | | | मिळालेला प्रतिसाद | | | एकूण प्रतिसाद शेकडा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| १९०० | ९५० | ३९ | १६४८ | ७८१ | ३८ | **८६.७३ %** | **८२.२१ %** | **९७.४३ %** |

एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या ७८६९०, एकूण प्राध्यापक १३८० व एकूण ग्रंथपाल ३९ असून १९०० विद्यार्थी वाचकांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले होते. एकूण प्रवेशित विद्यार्थींच्या बाबतीत प्रश्नावली वाटण्याचे हे प्रमाण २.४१% असून या १९०० प्रश्नावल्यांपैकी १६४८ विद्यार्थी वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या आहेत. हा प्रतिसाद ८६.७३% आहे.

तर एकूण १३८० प्राध्यापक वाचकांपैकी ९५० प्रत्यक्ष प्राध्यापक वाचकांना प्रश्नावली वाटण्यात आल्या हे प्रमाण ६८.८४% असून या ९५० प्राध्यापक वाचकांनापैकी ७८१ प्राध्यापक वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या प्रश्नावलीचे हे प्रमाण ८२.२१% आहे.

तर ग्रंथपालांच्या प्रश्नावली बाबत एकूण ३९ पैकी ३८ ग्रंथपालांकडून प्रश्नावल्या भरुन मिळाल्या हे प्रमाण ९७.४३% आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी आवश्यक तेथे सरासरी या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

## १.१० संशोधन विधानाच्या कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण :–

**''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** सदर संशोधन विषय संशोधनासाठी निवडला आहे यातील प्रत्येक शब्दाच्या कार्यात्मक व्याख्या देणे संशोधकाला येथे गरजेचे वाटते. विधानातील प्रत्येक शब्दाच्या कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**मुंबई विद्यापीठ :–**

भारतातील सर्वात जुन्यापैकी एक अग्रेसर विद्यापीठ सन १८५७ च्या कायद्यानुसार मुंबई, कलकत्ता व मद्रास ही तीन विद्यापीठे स्थापन करण्यात आली. भारत सरकारने सर जॉन कॉलव्हिल यांच्या अध्यक्षतेखाली या विद्यापीठासाठी एक समिती नेमली होती. दि. १२ डिसेंबर १८५६ च्या भारत सरकारच्या ठरावान्वये या समितीच्या शिफारशी स्विकारल्या गेल्या व या विद्यापीठांची विधेयके मध्यवर्ती कायदे मंडळाने मंजूर केली. दि. १८ जुलै १८५७ रोजी मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. **(भट, १९९३)**

**ठाणे जिल्हा :–**

महाराष्ट्र शासनाने सन १९७४ साली राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कार्यप्रणालीत एकसूत्रता आणण्यासाठी कायदा केला. यामुळे मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात वाढ झाली. मुंबई आणि उपनगरे यांखेरीज ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हे आणि केंद्रशासित प्रदेशातील गोवा हि सर्व महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्न झाली.

महाराष्ट्राच्या कोकणपट्टीतील सर्वात उत्तरेकडील जिल्हा, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेला गुजरात राज्य व दादरा नगरहवेली हा केंद्रशासित प्रदेश, पूर्वेला सह्याद्रीपलीकडे नाशिक, अहमदनगर व पुणे आणि दक्षिणेला कुलाबा व बृहन्मुंबई हे जिल्हे अशा सर्व भौगोलिक क्षेत्राने वेढलेला सदर जिल्हा आहे. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर ८ तालुके पालघर जिल्ह्यात येतात. **ठाणे** जिल्ह्यात येणारे ७ तालुके पुढीलप्रमाणे ठाणे कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर, मुरबाड, तर **पालघर** जिल्ह्यात येणारे ८ तालुके पुढीलप्रमाणे पालघर, वाडा, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड असे आहेत. **(जाधव, २०१५)**

**महाविद्यालयीन ग्रंथालये :–**

शैक्षणिक ग्रंथालयांचा हा एक प्रकार होय. वाचकांच्या गरजेनुसार ग्रंथालयांचे प्रकार आस्तित्वात आले. या प्रकारच्या ग्रंथालयातील वाचक हा तरुण वर्ग असतो. त्यांच्यासाठी संदर्भग्रंथ, नियतकालिके, क्रमिक पुस्तके, संगणक, दृकश्राव्य साधने इत्यादी गोष्टींचा संग्रह इतर ललित व ललितेतर वाचन साहित्य संग्रह असतो. या प्रकारच्या ग्रंथालयांना सुसज्ज इमारतीचा लाभ मिळतो या ग्रंथालयाच्या वापर वाचकांना कसा करावा हे अंशतः माहित असते. त्यामुळे ग्रंथालयाची ओळख प्रारंभीच करुन देणे आवश्यक ठरते.

**ग्रंथालयीन सेवा–सुविधा :–**

ग्रंथालय ही माहिती सेवा देणारी संस्था आहे. ग्रंथालयाच्या प्रकारानुसार ग्रंथालयांचे वाचक बदलतात, प्रत्येक प्रकारच्या वाचकाच्या गरजा भिन्न असतात. वाचकांना समाधानकारक माहिती सेवा देता याव्यात यासाठी ग्रंथालयातील ग्रंथपालास तसेच ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास आपले वाचक आणि त्यांच्या माहितीविषयक गरजा माहित असणे आवश्यक आहे.

ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांच्या माहितीविषयक गरजांची पुर्तता करणे म्हणजेच ग्रंथालयीन सेवा होय. **(कुलकर्णी, २०११)**

ग्रंथालय म्हणजे अशी वास्तू की ज्या ठिकाणी वाचनसाहित्य संग्रह यामध्ये ग्रंथ व ग्रंथेत्तर साहित्य आणि दृकश्राव्य साधने व वाचकांच्या जास्तीत जास्त उपयोगासाठी तंत्रशुध्द पध्दतीने मांडलेली अथवा ठेवलेली असतात. **(वीर, २००६)**

म्हणजे ग्रंथ आणि इतर सर्व प्रकारचे वाचनसाहित्य ज्या वास्तूत जतन करुन वाचकांना सहजपणे उपलब्ध करुन दिले जातात त्या ठिकाणास ग्रंथालय असे म्हटले जाते. **(गणपुले, २००४)**

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. समाजाच्या हितासाठी तिचे संवर्धन करणे आवश्यक आहे. ज्या प्रमाणात वाचकांच्या गरजा वाढत अथवा बदलत जातात, निरनिराळे शोध लागतात आणि साधने उपलब्ध होतात त्या प्रमाणात ग्रंथपालनाच्या कक्षा वाढत जातात. ज्या साधनांच्या द्वारे ज्ञानाचा संग्रह व प्रसार केला जातो त्यांमध्ये होणाऱ्या सुधारणांचा व वाढीचा ग्रंथपालनावर फार मोठ्या प्रमाणात परिणाम होत असून ग्रंथालयीन सेवा सुविधांच्या आवाक्यात वृध्दी होत आहे.

**चिकित्सक अभ्यास :–**

वर्णनात्मक संशोधनात कोणत्याही घटनेच्या, समाजाच्या, सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्यःस्थितीचा सर्वंकष अभ्यास करुन प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते. यात त्यांची सांप्रत स्थिती काय आहे? याचा सखोल अभ्यास करुन त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करणे म्हणजेच सत्य परिस्थितीचा शोध घेणे व परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सूचना करणे. थोडक्यात गोळा केलेली माहिती फक्त सादर केली म्हणजे ते संशोधन ठरत नाही. त्या माहितीचे विश्लेषण, सादरीकरण आणि शेवटी तर्कशुध्द चिकित्सा करुन त्यापासून योग्य निष्कर्ष काढला म्हणजे ते अर्थपूर्ण संशोधन झाले असे म्हणता येईल.

## १.११ संशोधन पध्दती :–

एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळवणे म्हणजे संशोधन होय. त्यासाठी चिकित्सक व शास्त्रशुध्द पध्दतीने केलेला अट्टाहास हा आपणास त्याच्या तळापर्यंत नेऊन सोडतो. त्यामुळेच त्या बाबतीतील संपूर्ण ज्ञान मिळविण्यास संशोधकास व समाजास मदत होते.

### १.११.१ संशोधनाचा अर्थ :

संशोधनाला इंग्रजी भाषेत Research म्हटले जाते. हा इंग्रजी प्रतिशब्द योग्यच आहे. Research म्हणजे पुन: पुन्हा शोध घेणे.

**''अभ्यासपूर्ण चौकशी किंवा निरीक्षण म्हणजे संशोधन. विशेषत: १) सत्याचा शोध घेण्यासाठी किंवा २) सत्याचा योग्य तो अर्थ लावण्यासाठी (म्हणजे अर्थनिर्वचनासाठी) किंवा ३) नवीन तथ्थे (माहिती) विचारात घेऊन, प्रस्थापित तत्वे आणि सिध्दांतांमध्ये बदल करण्यासाठी; सुधारणा करण्यासाठी किंवा ४) प्रचलित तत्वांचे वा सिध्दांतांचे उपयोजन करण्यासाठी केलेली पध्दतशीर चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन होय. '' वेबस्टरच्या शब्दकोशानुसार (कुंभार, २०१३)**

संशोधनाचे चार प्रमुख हेतू हे या व्याख्येमधून स्पष्ट होतात.

संशोधन हे मानवी विकासासाठी सतत प्रयत्नशील असते आणि संशोधन हा विकासाचा मुख्य आधार आहे. वेगवेगळ्या तज्ञांनी केलेल्या संशोधनाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

### १.११.२ संशोधनाची व्याख्या :

अनेक तज्ञांनी संशोधनासंबंधी विविध व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :–

संशोधनाचा अर्थ लक्षात घ्यायचा असेल तर पु. ल भांडारकर असे म्हणतात की, **''संशोधन हा शास्त्रीय अवलंब करुन बुध्दीनिष्ठ आणि व्यवहारीक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न आहे.'' (भांडारकर, १९८७)**

**'' संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध.''** अशी संशोधनाची व्याख्या **चार्ल्स बुश आणि हार्टर स्टफन** यांनी त्यांच्या Research methods in librarionship : techniques and interpretation या पुस्तकात केली आहे. (Bush and Harter, 1980)

संशोधन म्हणजे **''अभ्यासाच्या किंवा काळजीपूर्वक तपासाच्या अथवा सखोल चौकशीच्या साह्याने वस्तुस्थिती किंवा तथ्य शोधून काढण्याच्या शास्त्रीय स्वरुपाचा पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय.'' (सातारकर, २००१)** यांच्या म्हणण्यानुसार

बोधनकर यांनी त्यांच्या पुस्तकात संशोधन म्हणजे **''कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे अथवा तथ्ये यांचे पुन:परिक्षण परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास'' (बोधनकर, १९९७)**

**''जिज्ञासूवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरुन चिकित्सा करुन अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्यनिर्णय करण्याची जी प्रक्रिया, तिला संशोधन म्हणता येईल'' (कऱ्हाडे, १९९७)**

**''संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञानाचा शोध.''एम. एच. गोपाल यांच्या मते (Gopal, 1970)**

**''सामाजिक संशोधन एक शास्त्रीय योजना असून तिचा उद्देश तार्किक आणि क्रमबध्द पध्दतीव्दारा नवीन तथ्यांचा शोध घेणे किंवा जुन्या तथ्यांचे पुन:परिक्षण आणि त्यांच्यात आढळून येणारे अनुक्रम, अंर्त:संबंधी कार्यकारण भाव आणि त्यांना संचलित करणाऱ्या नैसर्गिक नियमांचे विश्लेषण करणे हा आहे. पॉलीन व्ही. यंग यांच्या मते (आगलावे, २०००)**

वरील व्याख्यांचा आढावा घेतला तर असे म्हणता येईल की, संशोधन ही सत्यशोधनाची प्रक्रिया आहे. संशोधनाव्दारे समस्या, यंत्रणा, पध्दती यांचे व्यवस्थित आकलन होते; व या आकलनाव्दारे संशोधन समस्या दूर करण्यासाठी शाश्वत उपाय शोधणे शक्य होते. ग्रंथपालनाचे कार्य पूर्ण कार्यक्षमतेने आणि परिणामकारक पध्दतीने करण्यासाठी संशोधन अत्यावश्यक आहे. संशोधन हे इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणे ग्रंथपालन व्यवसायाचीही यशस्विता मोजण्याचे एक महत्वाचे परिमाण आहे. संशोधन ही एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत निश्चित पायऱ्या आहेत. शास्त्रीय पध्दती ही तर्कशुद्ध विचार करण्याची पध्दत आहे आणि म्हणूनच ती सर्वच संशोधन पध्दतींचा पाया आहे. संशोधन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ग्रंथपालनाच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन आवश्यक आहे.

थोड्क्यात, संशोधन सुव्यवस्थित असते. समस्येचे समाधान होणे त्याचप्रमाणे त्यामागील कारणे शोधणे हा संशोधनाचा प्रथम हेतू असतो. संशोधन ज्ञानाच्या कक्षा रुंदावून वर्तमान ज्ञानात भर पडते. संशोधनाचा मूळ हेतू ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे हा असला तरी त्याचबरोबर महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे सदर ज्ञानाचा उपयोग मानवाच्या विकासासाठी करणे होय.

**प्रस्तुत संशोधन हे सत्य संशोधनाशी संबंधित असून ह्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.**

वर्णनात्मक संशोधन हे सत्यशोधनाशी संबंधित आहे. या पध्दतीच्या उपयोजनेव्दारे संशोधक एखादी सामाजिक घटना, कार्य उपक्रम किंवा योजना यांची सांप्रत स्थिती काय आहे याचा सखोल अभ्यास करुन त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा करतो. या प्रकारच्या संशोधनात सत्य परिस्थितीचा शोध घेणे हे उद्दिष्ट असते. सत्य परिस्थितीचा चिकित्सकपणे शोध घेतल्यावर आणि योजनेतील गुणदोषांची चर्चा केल्यावर संशोधक परिस्थिती सुधारण्यासाठी मार्गदर्शक सूचना करु शकतो.

अशा प्रकारे या संशोधनाव्दारे संशोधकास, योजनाकार, व्यवस्थापक आणि राजकीय संस्था यांना योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होते. अशा तऱ्हेच्या अभ्यासाला संशोधन म्हणण्याचे कारण त्यामध्ये खालील गुणांचे अस्तित्व जाणवते.

**१. वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती.** **२. गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण.**

**३. चिकित्सा** **४. चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभूमी.**

या ठिकाणी लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी की, गोळा केलेली माहिती फक्त सादर केली म्हणजे संशोधन ठरत नाही. ती माहिती चिकित्सापूर्ण सादर झाली पाहिजे म्हणजे अर्थपूर्ण संशोधन झाले असे म्हणता येईल. वर्णनात्मक संशोधन पध्द्ती जरी सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणात वापरली जात असली तरी विज्ञानाच्या क्षेत्रातसुध्दा ती सतत वापरली जाते.

**१.११.३ संशोधन पध्दतीच्या निवडीमागील कारणे :-**

संशोधन पध्दत, समस्या व उद्दिष्टे यांच्या सांप्रत स्थिती बाबत सखोल अभ्यास करुन त्यातील गुणदोषांची वस्तुनिष्ठपणे चिकित्सा वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये केली जात

असल्याने व सदर **संशोधनात सत्यशोधन व सद्य:परिस्थितीचे विश्लेषण करावयाचे असल्यामुळे सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन पध्द्तीचा अवलंब केला आहे.**

## १.१२ माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण :-

वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. या साधनाच्या सहाय्याने एखादा गट, संस्था किंवा सेवा यांच्या सद्य स्थितीचा विश्लेषणात्मक आणि चिकित्सक अभ्यास करता येतो. संशोधनात सत्य किंवा तथ्य शोधून काढून अचूक निष्कर्ष काढता येतात.

सामाजिक संशोधनातून तथ्ये गोळा करण्याची ही एक महत्वपूर्ण पध्दत आहे. यामुळे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील, विशिष्ट गटांची त्यांच्या समस्यानुसार सर्वांगीण माहिती मिळविता येते. ही माहिती संशोधकाला चालना देते याव्दारे संशोधक काही निष्कर्ष काढतो व त्या समस्यांवर उपाय सुचवितो.

प्रश्नावली या साधनाची व्याख्या खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

**'' सर्वसामान्यपणे प्रश्नावली ही प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचे असे एक तंत्र आहे की ज्यात कागदावरील प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वत: भरत असतो.''  (कोण्णूर आणि कोण्णूर, २००८) रा. ना. घाटोळे** यांनी त्यांच्या ग्रंथात **विल्सन गी** यांची व्याख्या सांगितली आहे ती पुढीलप्रमाणे. **''विस्तृत क्षेत्रात मोठ्या संख्येने पसरलेल्या अथवा एखाद्या निवडलेल्या छोट्या क्षेत्रात पसरलेल्या लोकांकडून मर्यादित प्रमाणात तथ्य संकलन करण्याची सरळ पध्दत म्हणजे प्रश्नावली होय.'' (घाटोळे, २००३)**

सामाजिक संशोधनात निवडलेल्या अभ्यासविषयक संदर्भात आवश्यक माहिती अभ्यास घटकांच्या प्रतिनिधी कडून त्यांच्यावर आपला कोणताही प्रभाव न पाडता मिळण्याचे एक महत्वाचे तंत्र म्हणून प्रश्नावलीचा विचार केला जातो.

थोडक्यात माहिती गोळा करण्याचे अत्यंत प्रभावी व महत्वाचे साधन म्हणजे प्रश्नावली. ज्यावेळी पाहणीसाठी निवडलेला लक्ष्य समुह भौगोलिक दृष्ट्या दुरवर पसरलेला असतो तेव्हा प्रश्नावलीव्दारे माहिती जमा केली जाते.

संशोधकाने साचेबध्द पध्दतीने प्रश्नावली केली असून प्रश्नावलीचे स्वरुप रचनात्मक असल्याने त्यास पर्याय दिले आहेत त्यामुळे पर्याय निवडणे व आकलन करणे सोपे जाईल व महितीचे संकलन योग्य पध्दतीने होईल.

संशोधनास उपयुक्त असा मौखिक तसेच लिखित साहित्याचा वापर संशोधक या संशोधन कार्यात केला असून पाहणी तंत्र स्विकारणार आहे. माहिती संकलन करण्यासाठी प्रश्नावली व निरीक्षण या साधनांचा उपयोग केला आहे.

**''दृढ स्वरुपात निरीक्षणाचा अर्थ, कान व वाणी यांच्या तुलनेने डोळ्यांचा अधिक उपयोग करणे हा होय.'' सी. ए. मोझर यांच्या मते.... (मुळे आणि उमाढे, १८८७)**

**''असे अध्ययन की, ज्यात डोळ्यांच्या हेतुपूर्वक उपयोग करुन सामुहिक वर्तन, गुंतागुंतीच्या सामाजिक संस्था तसेच संर्पुणत: वेगवेगळ्या एककांची छानननी किंवा पडताळा करता येतो त्याला निरिक्षण असे म्हणतात.'' पॉलीन यंग यांच्या मते.... (कऱ्हाडे, १९९७)**

**''पध्दतशीरपणे पाहणे आणि पध्दतशीर पाहण्याबरोबर पाहिलेल्या घटकांची चिकित्सा करणे म्हणजे निरीक्षण होय.''– पि. व्ही. यंग म्हणतात (कऱ्हाडे, १९९७)**

संशोधनास उपयुक्त असा मौखिक तसेच लिखीत साहित्याचा वापर संशोधकाने सदर संशोधन कार्यात केला आहे. तसेच विषयाशी संबंधीत पूर्ण साहित्याचा आढावा, विषयाशी संबंधीत संदर्भ साहित्य आणि प्रचलित माहितीसाठी इंटरनेटचा आधार घेतला आहे.

**१.१२.१ माहिती संकलन :**

**(रिसवडकर, २000)** यांनी माहिती संकलनाबाबत ''माहिती संकलन ही संशोधनाच्या एकूण आयोजनातील एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे असे म्हटले असून ती प्रक्रिया अनुमानाच्या अनुषंगाने आणि विषयानुरुप आवश्यक असलेली माहिती संशोधन पध्दतीशी संबंधित तंत्रानुसार गोळा केली जाते. ही गोळा केलेली माहिती विश्लेषणानंतर सुसंघटितरित्या संक्षिप्त स्वरुपात मांडली जाते. माहितीच्या अशा तऱ्हेच्या सादरीकरणाने ती अर्थपुर्ण होते आणि अर्थपुर्ण माहितीची चिकित्सा करता येते'' असे सांगितले आहे.

सदर संशोधनाच्या माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे तंत्र अवलंबले आहे.

- संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेला लक्ष्य समुह हा ठाणे व पालघर जिल्ह्यांतील असून त्यातील महाविद्यालये भौगोलिक दृष्ट्या दूरवर पसरलेली आहेत.
- सद्य:स्थितीत मुंबई विद्यापीठाशी संलग्न, ठाणे व पालघर जिल्ह्यांतील आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील तालुक्यातील महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे.
- माहितीच्या संकलनासाठी प्रश्नावलीचा वापर करुन माहितीचे संकलन केले आहे.

**तक्ता क्र. १.३.**
**प्रश्नावलीचे वितरण व माहिती संकलन तक्ता**

| अ. क्र. | तालूके | संशोधनास पात्र ग्रंथालये/ प्रतिसाद | एकूण प्रतिसाद | अ. क्र. | तालूके | संशोधनास पात्र ग्रंथालये/ प्रतिसाद | एकूण प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ठाणे जिल्हा** | | | | **पालघर जिल्हा** | | |
| १. | ठाणे | ०८/०८ | १००% | १. | पालघर | ०१/०१ | १००% |
| २. | कल्याण | ०८/०८ | १००% | २. | वाडा | ०१/०१ | १००% |
| ३. | उल्हासनगर | ०३/०२ | ६७.% | ३. | वसई | ०६/०६ | १००% |
| ४. | अंबरनाथ | ०३/०३ | १००% | ४. | डहाणू | ०३/०३ | १००% |
| ५. | भिवंडी | ०१/०१ | १००% | ५. | तलासरी | ०१/०१ | १००% |
| ६. | शहापूर | ०१/०१ | १००% | ६. | जव्हार | ०१/०१ | १००% |
| ७. | मुरबाड | ०१/०१ | १००% | ७. | मोखाडा | ०१/०१ | १००% |
| | | | | ८. | विक्रमगड | ००/०० | १००% |
| | | | | | **एकूण** | **३९/३८** | **९७.४३%** |

### १.१२.२ माहिती विश्लेषण व सादरीकरण :

संशोधनात आवश्यक तेथे पाहणी तंत्र वापरले आहे. संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती प्रश्नावली व निरीक्षण या साधनाव्दारे संकलित केली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलीत केल्या आहेत. अशा भेटी मधून ग्रंथपालांशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परीपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित माहितीचे विश्लेषण करताना प्रश्नाच्या गाभ्यानुसार शीर्षकांचे निर्धारण केले आहे. या शीर्षकाखाली प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व सादरीकरण केले आहे.

माहितीचे विश्लेषण व सादरीकरणासाठी योग्य तेथे तक्ते, आलेख, आकृती तसेच संक्षिप्त रुपे यांचा वापर केला आहे.

## १.१३ सदर संशोधनाचे योगदान :-

ग्रंथालये आणि माहिती केंद्रे मुद्रित तसेच इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्यसंग्रह विकसित करतात. संकलित वाचनसाहित्याची योग्य पध्दतीने मांडणी व देखभाल करतात व ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रहाच्या मदतीने वाचकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवितात. वाचकांना त्यांच्या गरजांची पुर्तता होईल असे वाचनसाहित्य आणि ग्रंथालयीन सेवा पुरविणे, याच प्रमुख हेतूसाठी ग्रंथालये आणि माहिती केंद्रे कार्यरत असतात. त्याचबरोबर वाचकांच्या वाचनविषयक व माहितीविषयक सल्ला देण्याचे कार्यही ग्रंथालये आणि माहिती केंद्रे करतात. ग्रंथालये करत असलेल्या कार्यांमध्ये आणि देत असलेल्या सेवांमध्ये गुणवत्ता यावी, ग्रंथालयीन सेवा सुविधा अधिक परिणामकारक व्हाव्यात अशी ग्रंथालय आणि वाचकांची अपेक्षा असते. वाचकांना परिणामकारक सेवा द्याव्यात असे ग्रंथालय सेवकांनाही वाटत असते. ग्रंथालय सेवा सुविधा आणि उपक्रमांमध्ये परिणामकारकता आणण्यासाठी सदर संशोधन आवश्यक आहे.

संशोधनाची सामाजिक आणि ग्रंथालयीन उपयुक्तता :-

**सामाजिक उपयुकत्ता :**

- संशोधनाची मांडणी, गुणवत्तेचा दृष्टीकोन विकसीत व दृढ होईल.
- संशोधनाच्या मदतीने ग्रंथालयाची ऐतिहासिक माहिती मिळेल.
- सदर संशोधनाचा लाभ ग्रंथपाल, प्राध्यापक, सेवकवर्ग व विद्यार्थ्यांना होईलच पण त्याचबरोबर इतर महाविद्यालयीन ग्रंथपाल व सामाजिक अभ्यासक / संशोधक यांना ग्रंथालय समृध्द करण्याबाबत मार्गदर्शक ठरेल.

**ग्रंथालयीन उपयुक्तता :**

- ग्रंथालयीन सेवा-सुविधा दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न करणे.
- ग्रंथालयीन दैनंदिन कारभारात अधिक संपन्न व गुणवत्ता दर्शविणे.
- वाचकांकडून प्रत्यक्ष अपेक्षा काय आहेत?

- ग्रंथालयीन सेवा सुविधा ग्रंथालयामार्फत देतांना व वाचकांना ती मिळवितांना कोणकोणत्या अडचणी येतात हे शोधून अपेक्षेप्रमाणे सेवा सुविधा देणे.

## १.१४ सारांश :–

सदर प्रकरणात सुरुवातीला प्रस्तावना दिली असून संशोधकाने सदर संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाकरीत समस्याविधान स्पष्ट करण्यात आले. संशोधनाची उद्दिष्ट्ये, महत्व, गरज, इ. व्यक्त करण्यात आली आहे. संशोधन विधानातील प्रत्येक संज्ञाच्या कार्यात्मक व्याख्या व स्पष्टीकरण देऊन संशोधनाची उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. संशोधनाच्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी अनुभवातून समोर आलेली गृहितके ही मांडली आहेत. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करुन लक्ष्य समूहाची निवड केली. संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती प्रश्नावली या माहिती संकलन साधनाव्दारे संकलित केली आहे. नमूना निवड व त्यास मिळालेला प्रतिसादासाठी संशोधकाने संशोधनासाठी निवडलेल्या महाविद्यालयीन ग्रंथलयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलित केल्या आहेत. ग्रंथपालांशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे. संशोधन करीत असताना संशोधकाला ग्रंथालयातील विविध पैलूंव्दारे अभ्यास केला असता समस्यांची उकल झाली. संशोधनाव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढून शिफारशी करण्यात आल्या आहेत.

===XOX===

# संदर्भ सूची


१. आगलावे, प्रदिप. (२०००). संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृष्ठ क्र. ४७.

२. कर्णिक, प्रदिप (२०००). संशोधन स्वरुप व लेखन पध्दती. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.

३. कऱ्हाडे, स. दा. (१९९७). संशोधन सिध्दांत आणि पध्दती. मुंबई : लोकवाङ्मय गृह.

४. कुलकर्णी, मिलिंद. (२०११,एप्रिल ४). ग्रंथालयातल्या कपाटात गुदमरलेल्या पुस्तकांना मिळेल चिमुटभर प्रकाश, थोडा वारा आणि वाचकांचा स्पर्श. दैनिक लोकमत, सोलापूर आवृती, पृष्ठ क्र. १४.

५. कुंभार, राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन : पध्दती आणि तंत्रे. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, पृष्ठ क्र. ४१.

६. कोण्णूर, एम. बी. व कोण्णूर, सूजाता. (२००८). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र कोश. पुणे : डायमंड पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ९५, ९६, २०१, २७१, ३१४, ३१५.

७. गणपुले, श. रा. (२००४). ग्रंथालयीन साधन सामग्री व सेवा यांचे व्यवस्थापन. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, पृष्ठ. क्र. १०.

८. घाटोळे, रा. ना. (२००३). समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन, पृष्ठ क्र. ५, ६, १२, १३, १४५.

९. जाधव, तुकाराम. (२०१५). महाराष्ट्र वार्षीकी २०१५. पूणे : द युनिक ॲकॅडमी.

१०. बोधनकर, सुधीर. (१९९७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपूर : श्री साई प्रकाशन, पृष्ठ क्र. ६–७.

११. भट, सुधा. (१९९३). मुंबई विद्यापीठाची वाटचाल (१८८५–१९९२). मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

१२. भांडारकर, पु. ल. (१९८७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पृष्ठ क्र. ४, २३.

१३. मुळे, रा. श. व उमाढे, वि. तु.(१८८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. मुंबई : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, पृष्ठ क्र. ९८.

१४. रिसवडकर, म. रा. (२०००). माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृष्ठ क्र. १, ३–५, ७, १७, ३८.

१५. वीर, डी. के. (२००६). ग्रंथालय संघटन. औरंगाबाद : मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ. पृष्ठ क्र. २.

१६. सातारकर, सु. प्र. (२००१). ग्रंथालय व्यवस्थापन. औरंगाबाद : मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ.

१७. संत, दु. का.(१९८८). संशोधन पध्दती प्रक्रिया व अंतरंग. पुणे : विद्यार्थी गृह प्रकाशन.

१८. Bush, Charles. & Harter, Stephen. (1980). Research methods in librarionship : techniques and interpretation. New York : Academic Press.

१९. Gopal, M. H. (1970). An interoduction to research procedure in social science. Bombay : Asia Pub. Houses. pp 53.

२०. Good, William J. and Hatt, Paal K. (1981) Methods in Social Research. New Delhi : McGraw-Hill International Book Company. pp 186.

२१. Kothari C. R. (2008). Research methodology, methods & tecnologies. Delhi : New Age International Publication.

===XOX ===

# प्रकरण दुसरे

# पूर्वाभ्यासाचे समालोचन

## २.१ प्रस्तावना :

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यानंतर त्या विषयासंबंधी कशाचे वाचन करायचे हा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण या संबंधीचे वाचन साहित्य कोठे मिळेल यासंबंधीची कल्पना शक्यतो संशोधकाला असते. नव्या विषयावर संशोधन करण्यापूर्वी अभ्यासकाच्या कल्पना अतिशय संदिग्ध व अस्पष्ट असतात. पूर्वी झालेल्या कार्याचा शोध घेण्याकरिता दिर्घ प्रयत्नांची गरज असते. त्यामुळे संशोधनाचे कार्य पध्दतशीर व सफल होण्यास मदत होते. संशोधन करीत असताना संबंधीत विषयासंदर्भात पूर्णत: संशोधन व्हावे त्याच विषयाशी संबंधित इतर किती व कशा प्रकारे संशोधन झाले आहे हे समजण्यासाठी पूर्वी झालेल्या कार्याचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

कोणतेही संशोधन हे पूर्वीच्या अभ्यासावर तयार होते. त्यासाठी अभ्यासाचा पाया बनवावा लागतो. हा पाया संशोधकाच्या संशोधनासाठी योग्य अस्तित्वात असलेली माहिती, कृती व कल्पना नेमून देतो तसेच संशोधकाला संशोधनासाठी वाचन, अभ्यास व कल्पना करण्यासाठी महत्वाचे ठरते त्यामुळे अभ्यासाच्या समस्येबाबत संशोधकाला अंतर्यामी सूचना व योग्य मार्ग मिळतो. समस्येचे निराकरण करण्याकरीता योग्य पुरावा म्हणून आधारसामग्री जितकी बिनचूक व समर्पक असेल तितकेच संशोनाचे निष्कर्ष विश्वसनीय होण्याचा जास्तीत जास्त संभव असतो.

प्रकरण एक मध्ये संशोधनाची उद्दिष्ट्ये, व्याप्ती व मर्यादा, प्राथमिक अनुमान, संशोधन पध्दती, व्याख्या, माहिती संकलनाची तंत्रे, पध्दती, यांचा परिचयात्मक आढावा घेण्यात आला असून प्रस्तुत प्रकरणात संबंधीत वाचनसाहित्याचा आढावा व **“मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.”** या प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरेल अशा वाचनसाहित्याचा आढावा तसेच विषयक प्रकल्पांचा पूर्वअभ्यासाचा आढावा यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधन प्रक्रियेच्या वेळी प्रकरणांचे लिखाण करत असताना विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहातील प्रसिध्द झालेल्या ग्रंथांचा उपयोग संशोधनासाठी झाला तसेच विविध प्रकारच्या नियतकालिकांतून प्रसिध्द झालेले लेख, इंटरनेटवरील लेख, संशोधनपर लेख, शासकीय प्रकाशने, गौरवग्रंथ, ग्रंथालयांचे वार्षिक अहवाल, शोध निबंध, प्रकल्प, नियतकालीके, सीडीज, ई–मेल, वेबसाईट इत्यादी वाचनसाहित्याचा अभ्यास सदर संशोधनासाठी संशोधकाने केला असून या शिवाय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ : नाशिक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ : पुणे, मुंबई विद्यापीठ: मुंबई या विद्यापीठांत तसेच या विषयावर विविध संकेत स्थळांवर सादर केलेल्या संबंधीत विषयावरील प्रबंधांचा अभ्यास केला आहे. खालील वाचनसाहित्याच्या विचारातूनच सदर संशोधनाचा जन्म संशोधकाच्या मनात झाला.

## २.२ विषयविवेचन :

### २.२.१. संशोधनाची व्याख्या :

संशोधनाच्या व्याख्येसाठी **(Gopal, 1970)** पृ. १६, **(Busha and Harter,1980)** पृ. १५, **(बोधनकर, १९९७)** पृ. ६–७, **(कऱ्हाडे, १९९७)** पृ. २७, **(आगलावे, २०००)** पृ. ११, **(कुंभार, २०१३)** पृ. ८. इ. ग्रंथांचा उपयोग झाला.

### २.२.२. संशोधन पध्दत व इतर बाबी :

(Busha and Harter,1980), यांच्या Research methods in librarianship techniques and interpretation या ग्रंथात संशोधनाची मूलतत्वे, ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील संशोधन, संशोधनाच्या पध्दती, संशोधनातील माहिती, संकलनाची साधने, आशय विश्लेषण इत्यादी बाबीचे मार्गदर्शन केले आहे. सदर ग्रंथ ग्रंथालय व माहितीशास्त्रातील विविध घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास करण्यास संशोधकाला उपयोगी पडला. **(आगलावे, २०००)** यांचा संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे हया संदर्भीत ग्रंथात संशोधन पध्दती, अहवाल, लेखन तसेच सहसंबंधी व्याख्या व सहसंबंध कसा प्रस्थापित होतो तसेच संख्याशास्त्रीय माहिती, नमुना निवड, प्रश्नावलीचा अर्थ, प्रश्नावली पध्दतीचे महत्व व उपयोगिता तसेच

प्रश्नावली साधनांची निवड, याविषयी सविस्तर माहिती मिळाली. वरील ग्रंथातील माहितीचा वापर संशोधकाला वेळोवेळी झाला.

**(कऱ्हाडे, १९९७)** यांच्या संशोधन सिध्दांत आणि पध्दती या ग्रंथात संशोधनाची शास्त्रीय पध्दती, प्रकार, साहित्य, संशोधनाची पूर्वतयारी, साधने, तंत्रे इत्यादींची माहिती मिळाली. संशोधनाची व्याप्ती ठरविण्यास सदर ग्रंथाचा उपयोग झाला. तर **(कुंभार, २०१३)** ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन : पध्दती आणि तंत्रे ह्या ग्रंथात संशोधन पध्दतीबाबत सविस्तर, विविधांगी माहिती देणारे अनेक ग्रंथ इंग्रजी भाषेत उपलब्ध आहेत आणि त्यांमध्ये सातत्याने भर पडत आहेत. संशोधन पध्दतीवरील इंग्रजी भाषेतील ग्रंथांची दिवसेंदिवस वाढत जाणारी संख्या हे संशोधन या ज्ञानशाखेच्या विकासाचे निर्देशन आहे. इंग्रजी भाषेतील ग्रंथांची संख्या ही वेगाने वाढत असली तरी संशोधन पध्दतीवरील मराठी भाषेतील ग्रंथांची संख्या खूप कमी आहे. सदर ग्रंथाच्या माध्यमातून लेखकांनी ही पोकळी भरुन काढण्याचा एक प्रयत्न आहे. सदर ग्रंथामध्ये महत्वाच्या सर्व पध्दती आणि तंत्राची सखोल माहिती दिली आहे. आवश्यक तेथे उदाहरणे आणि नमुनेही दिले आहेत. ग्रंथपालनातील उदाहरणे देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न लेखक़ाने केलेला असल्याने सांख्यिकीय विश्लेषणासाठी उपयुक्त तंत्रांचे सोदाहरण स्पष्टीकरण दिले आहे. तक्ते, आकृत्यांच्या मदतीने आशय सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर ग्रंथाचा फायदा संशोधकाला संशोधन कार्यात झाला. **(पवार, २००२)** ग्रंथालय व माहिती शास्त्र सदर ग्रंथात संशोधन पध्दती, तथ्य आणि सिध्दांत, संकल्पना, संशोधन आराखडा, प्रश्नावली, मुलाखत याबाबत माहिती मिळाली.

**(संत, १९८८)** संशोधन : पध्दती, प्रक्रिया, व अंतरंग सदर ग्रंथात विविध क्षेत्रात करावयाचे संशोधन कसे करावे व त्यासाठी कोणकोणत्या पध्दतीचा वापर करावा या बद्दल माहिती मिळाली. तसेच संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या वर्णनात्मक पध्दतीचे महत्व व पध्दतीविषयीची धोरणे या विषयी माहिती मिळते. वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये माहिती गोळा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रश्नावली आणि मुलाखत या साधनाबद्दल माहिती दिली आहे.

संशोधन प्रक्रिया कशी चालते? संशोधन प्रक्रियेचे अंतरंग काय आहेत? संशोधनाचे महत्व व काही सूचना या ग्रंथात देण्यात आलेल्या आहेत. तसेच संशोधनाचे प्रकार व पध्दती समाजावून घेण्यास संशोधकाला याचा फायदा झाला.

**(निकोसे, २००७)** ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधन पध्दती. या संदर्भीत ग्रंथात ग्रंथालयशास्त्र संशोधनविषयी परिपूर्ण माहिती उपलब्ध असून संशोधनाचा आराखडा, विषय निवड, संशोधन पध्दती, संशोधन संदर्भ साहित्य त्यांचे प्रकार व अहवाल लेखनाविषयी परिपूर्ण माहिती दिली आहे. पृ. क्र. २१ ते ३८ साहित्याचा आढावा कसा घ्यावा या संदर्भात माहिती उपलब्ध होते तर पृ. क्र. ५८ ते ६८ संशोधन आराखड्यासंबंधी माहिती उपलब्ध होते. संशोधनात संशोधकाला वेळोवेळी सदर ग्रंथ उपयुक्त ठरला. **(Kothari, 1989)** Research methodology : methods and techniques सदर ग्रंथामध्ये संशोधन, त्याची व्याख्या, प्रकार तसेच संशोधन समस्या, संशोधनात आराखडा इत्यादी बाबत माहिती दिली असून नमुना म्हणजे काय? नमुना निवडीचे निकष, नमुना निवडीचे वैशिष्ट्ये, नमुना निवडीचे प्रकार इत्यादी बाबतची विस्तृत माहिती दिली असल्यामुळे संशोधनाच्या दृष्टीकोनातून अभ्यासकाला विविध घडामोडींचे ज्ञान प्राप्त झाले.

**(भांडारकर, १९८७)** सामाजिक संशोधन पध्दती सदर संदर्भ ग्रंथात सामाजिक संशोधनासंदर्भात माहिती दिलेली आहे. ग्रंथालय शास्त्रातील हे संशोधन सामाजिक स्वरुपात मोडणारे असल्यामुळे सदर ग्रंथात सामाजिक संशोधन क्षेत्रात रुढ असलेल्या तंत्र–पध्दतीचा परिचय शक्य तितक्या सोप्या भाषेत करुन देण्याचा प्रयत्न या ग्रंथाव्दारे करण्यात आलेला आहे. सुटसुटीत, अर्थवाहक, मूद्देसूद व सुस्पष्ट आणि सामान्यांनाही समजतील अशा पारिभाषिक संज्ञांचा समावेश ही या ग्रंथाची सर्वात महत्वाची सोय आहे. तसेच ग्रंथालयशास्त्रातील संशोधन हे सामाजिक स्वरुपात मोडणारे असल्यामुळे सदर ग्रंथ परिकल्पना मांडण्यासाठी, प्रश्नावली व मापनिक तयार करण्यासाठी एक संदर्भ म्हणून उपयुक्त ठरले. **(भितांडे आणि जोगळेकर १९९४)** शैक्षणिक संशोधन पध्दती सदर ग्रंथ संशोधनासाठी उपयुक्त असून यात विविध प्रकणातील माहिती ही संशोधनाच्या आवश्यकतेनुसार दिली आहे. (**मुळे आणि उमाढे, १८८७)** शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे सदर ग्रंथांत मराठी संशोधन

करणारे अभ्यासक यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना शैक्षणिक संशोधनाची मुलभूत तत्वे, पध्दती आणि साधने यांचा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा उपयोग संशोधकाला संशोधन कार्यात झाला.

**(घाटोळे, २००३)** समाजशास्त्रीय संशोधन – तत्त्वे व पध्दती सदर ग्रंथात संशोधन प्रकल्प तयार करतांना संशोधकाला कोणत्या अडचणी येतात व संशोधन कार्यात वापरण्यात येणारी प्रश्नावली कशा प्रकारे असावी शिवाय त्या प्रश्नांचे स्वरुप कसे असावे इ. बाबत सुलभरित्या मार्गदर्शन देण्यात आले असल्याने संशोधनास प्रश्नावली बनविण्यासाठी सदर ग्रंथाची मदत झाली.

माहिती गोळा करण्याचे अत्यंत प्रभावी व महत्वाचे साधन म्हणजे प्रश्नावली. ज्यावेळी पाहणीसाठी निवडलेला लक्ष समुह भौगोलिक दृष्ट्या दूरवर पसरलेला असतो तेव्हा प्रश्नावलीव्दारे माहिती जमा केली जाते.

संशोधकाने वरील संदर्भीत ग्रंथाचा वापर करुन साचेबध्द पध्दतीने प्रश्नावली केली असून प्रश्नावलीचे स्वरुप रचनात्मक असल्याने त्यास पर्याय दिले आहेत त्यामुळे पर्याय निवडणे व आकलन करणे सोपे जाईल व महितीचे संकलन योग्य पध्दतीने होईल असा विश्वास संशोधकाला वाटतो.

या ठिकाणी लक्षात ठेवण्याची गोष्ट अशी की प्रश्नावलीच्या माध्यमातून गोळा केलेली माहिती फक्त सादर केली म्हणजे संशोधन ठरत नाही. ती माहिती चिकित्सापूर्ण सादर झाली पाहिजे त्यासाठी संशोधनात सांख्यिकीचे महत्व आहे. सांख्यिकीचे महत्व अधिक जाणून घेण्यासाठी संशोधकास पुढील वाचनसाहित्याचा उपयोग झाला.

**(देशपांडे आणि भोयर, २००७)** ग्रंथालय व्यवस्थापनात सांख्यिकीचे महत्व. पृष्ठ क्र. १६ ते २२ वरील प्रस्तूत लेखामध्ये सांख्यिकीचे महत्व स्पष्ट करण्यात आले असून ग्रंथालयासाठी उपयुक्त असे नमुना, तक्ते, ग्रंथालय सांख्यिकीची प्रक्रिया, ग्रंथालयीन सेवेसंबंधी आकडेवारी इत्यादी विषयीची माहितीचे विवेचन दिलेले आहे.

**(कुंभोजकर, १९८९)** संशोधन पध्दती व संख्याशास्त्र ह्यांनी त्यांच्या ग्रंथात ग्रंथपालाला आवश्यक असणारी सांख्यिकीबाबत ज्ञान, गरज व ग्रंथाच्या माध्यमातून उपलब्ध

ज्ञानाचे वर्गीकरण, संख्यात्मक बांधणी तसेच इतर आवश्यक विषयाची, पध्दतीविषयी माहिती दिलेली आहे. प्रश्नावली, मूलाखत, निरीक्षण याचा संशोधनासाठी उपयोग कसा केला जातो याची सविस्तर माहिती उपलब्ध करुन घेऊन त्याचा वापर कसा करावा याची सविस्तर माहिती करुन घेण्यासाठी संशोधकाला सदर ग्रंथाचा उपयोग झाला.

**(Cole and Bigelow, 1956)** A manual of thesis — writing सदर ग्रंथामध्ये पृ. क्र. ५, ९, २९–३५ वर संशोधन अहवाल कसा लिहावा या संदर्भात माहिती दिली आहे. संशोधन अहवाल लिहित असताना संदर्भ सूची, तळटीपा, तसेच अहवाल लिहिताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय योजना या संदर्भात माहिती व नियमावली या ग्रंथात दिली आहे.

प्रबंधाची लेखन पध्दती बाबतची माहिती **(मालशे, १९७५)** शोधनिबंधाची लेखनपध्दती या ग्रंथात ग्रंथालयीन वा अन्य साधनांच्या आधारे संशोधनपर निबंध कसे तयार करावे, तळटिपा कशा द्याव्यात याची तोंडओळख पध्दतशीरपणे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याचा उपयोग संशोधकास झाला. तसेच शुद्धलेखनाबाबतचे नियम व व्याकरणासंबंधी अधिक मार्गदर्शनासाठी **(वाळिंबे, २००२)** मराठी शुध्दलेखन प्रदीप ह्यांच्या संदर्भीत ग्रंथात मराठी शुध्दलेखनाचे नियम दिले आहेत. अहवाल तयार होत असताना व्याकरणाच्या चुका शोधून दुरुस्त करण्यासाठी संशोधकाला वरील ग्रंथाचा उपयोग झाला आहे. तसेच संशोधन अहवाल तयार करत असताना प्रामुख्याने संदर्भसूची, तळटिपा तसेच अहवाल लिहीताना येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना या संदर्भात माहिती व देण्यात आलेल्या नियमावलीचा उपयोग संशोधकास वेळोवेळी झाला.

**(ढवळे, २००२)** स्टुडंटस मॉडर्न डिक्शनरी संशोधकाच्या विषयावरील बरेचसे साहित्य इंग्रजी भाषेत उपलब्ध झाले त्यामुळे त्या शब्दांचा मराठी अर्थ तसेच भाषांतर व्यवस्थित होण्यासाठी संशोधकाला शब्दकोश उपयुक्त ठरला.

### २.२.३. ठाणे व पालघर जिल्हा आणि तालुक्यांची माहिती :

ठाणे जिल्ह्यांबाबत अधिक माहिती संपादित करीत असतांना **(दळवी, २०१०)** असे घडले ठाणे ह्यांनी त्यांच्या ग्रंथात प्रत्येक ठाणेकराला आपल्या परिसराची व्याप्ती कशी वाढत

गेली याविषयी निश्चितच कुतूहल असणार, नेमके हेच सूत्र धरुन, ठाणे व त्याच्या परिसराच्या विविध पैलूवर व प्राचीन काळापासून ते आधुनिक काळातील घडामोडींवर जवळपास चाळीस लेखांचे हे संकलन सामान्य वाचक, विद्यार्थी व संशोधक या सर्वांनाच उपयुक्त ठरेल असे जतन केले आहे.

असं म्हणतात की, केवळ वाचता येणे महत्वाचे नसून ते वाचावयाची इच्छा होणे महत्वाचे आहे. बखरी, गॅझेटियर्स, प्रवास वर्णने, अन्य पुराभिलेख ही इतिहासाची सर्व साधने फक्त विद्यार्थी व संशोधकांच्या परिचयाची म्हणूनच ऐतिहासिक संदर्भांचा आब राखून पण त्यांच्या जंजाळातून सामान्य वाचकाला दूर ठेवत त्याच्या इतिहासाची ओळख करुन देणारे हे लेख सदर ग्रंथामुळे वाचनीय झाले आहेत. सदर लेखांचा उपयोग संशोधकास ठाणे जिल्ह्यांबाबतचा आढावा घेताना झाला.

**(शेजवळ, २०१२)** श्री स्थानक ठाणे सदर ग्रंथात ठाणे शहराला व जिल्ह्याला फार मोठा ऐतिहासिक, राजकिय व सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. ठाण्यासंबंधातील ठोस पुरावे शिलाहार काळात, म्हणजे इ.स. ०९ च्या शतकापासून मिळू लागतात. कपर्दी या शिलाहारांच्या पहिल्या राजाने ठाण्याला प्रकाशनात आणले व बहुधा पहिल्या प्रथम ठाणे राजधानीचे शहर झाले. कपर्दीनंतर शिलाहार वंशाचे अनेक राजे झाले व त्यांनी आपल्या शिलालेखात ठाण्याचा ''राजधानीचे शहर'' म्हणून उल्लेख केला आहे.

शिलाहारांच्या काळापासून आजपर्यंत ठाण्याला अखंड असा इतिहास आहे. या इतिहासाचा मागोवा सुप्रसिध्द छायाचित्रकार व इतिहास संशोधक श्री. हरीभाऊ शेजवळ यांनी आपल्या ग्रंथात घेतला आहे. सदर ग्रंथांचे वैशिष्ट्य म्हणजे सुमारे २००० वर्षाचा ठाण्याचा इतिहास व सांस्कृतिक जडणघडण शेजवळांनी छायाचित्रे व लेख यांच्या माध्यमातून साकारले आहे त्याचा वापर संशोधकास झाला.

**(जोशी, १९७२)** मराठी विश्वकोश खंड–६. सदर ज्ञानकोशात सर्व ज्ञानशाखांची माहिती दिलेली आहे. सदर कोशात महत्वाच्या घटनांची नोंद ऐतिहासिक दृष्टीने घेतलेली असून नोंदींची रचना अनुवर्णक्रमानुसार केलेली आहे. तसेच प्रत्येक पृष्ठावर वरच्या बाजूस

लक्षवेधी शब्द दिलेले आहेत. अद्ययावत ज्ञानशाखांची माहिती देणारा प्रादेशिक भाषेतील ज्ञानकोश म्हणून महत्व असून प्रत्येक महत्वाच्या नोंदीच्या शेवटी संदर्भ सूची दिलेली आहे.

सदर विश्वकोशात पृष्ठ क्रमांक ९३७ वर संशोधकाने निवडलेल्या जिल्ह्याची माहिती मिळविली तसेच विश्वसनीय माहिती संकलन करण्यास मदत मिळाली.

**(शर्मा, २००५)** इंटेलेक्चुअल्स संदर्भ महाराष्ट्र : राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन सदर संदर्भ ग्रंथात संशोधकाने निवडलेल्या ठाणे जिल्हातील डहाणू, पालघर, तलासरी, तालुक्याची परिपूर्ण माहिती मिळाली. तसेच ठाणे जिल्ह्यातील अक्षांश व रेखांश तसेच आवश्यक ती सांख्यिकी मिळाली.

**(दांडेकर, १९६१)** पालघर तालुका चित्रमय दर्शन १८१८ – १९६० सदर गैरवग्रंथात कै. बाबासाहेब दांडेकर यांनी आरंभिलेले 'पालघर तालुक्याचे चित्रमय दर्शन सन १८१८ ते १९६० महात्मा गांधी सेवा संघ पालघर या संस्थेने त्यांच्या पश्चात आस्थापूर्वक पूर्ण केले. सन १८१८ ते सन १९६० या कालखंडात तालुक्याने जो इतिहास रचला त्याचे चित्रमय दर्शन घडविण्याचा हा एक अभिनय प्रयोग आहे. दुर्दैवाने हे चित्रमय दर्शन पूर्ण होण्यापूर्वीच श्री बाबासाहेबांना देवाज्ञा झाली. सदर ग्रंथामागे एवढा जिव्हाळा व कल्पकता आहे की, ते पूर्ण करण्याचे कार्य पालघर गांधी सेवा संघाने आपल्या खांद्यावर घेतले.

पालघर तालुक्यातील शेकडो स्त्री पुरुषांच्या सहाय्याने व सहकार्याने जी अनेक विध लोकोपयोगी कार्ये सदर कालखंडात यशस्वी रितीने पार पाडली त्यांचा एक धावता चित्रपट तयार करण्याचा हा एक प्रयत्न होता.

सदर ग्रंथ पालघर मधील लोकशाहीच्या प्रगतीचा एक जयस्तंभ आहे. त्याचा उपयोग संशोधकाला पालघर जिल्ह्याचा आढावा घेताना झाला.

**(दास्ताने, २०११)** यांनी त्यांच्या ग्रंथात मराठीतल्या अपूर्व आणि अत्यंत लोकप्रिय अशा या वार्षिकेत अत्यंत माहितीपूर्वक सादरीकरण केले असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मजकूरात सर्वत्र नवी माहिती व आकडेवारी दिली आहे. अद्ययावत सांख्यिकी माहिती असलेले अनेक नवीन तक्ते या आवृत्तीत समाविष्ट आहेत. 'महाराष्ट्रासंबंधी सर्व काही' असे देणारा हा ग्रंथ म्हणून समजला जातो. पृष्ठ क्र. २४० पासून राज्यातील सर्व जिल्ह्यांची महत्वाची

सांख्यिकी 'जिल्हावार आढावा' ह्यामध्ये देण्यात आली आहे. लोकसंख्येची सांख्यिकी पृष्ठ क्र. २४७ वर देण्यात आली आहे. **(पाटील व हांडे, २०१३)** यांच्या ग्रंथामध्ये प्रदेश संकल्पना ह्या प्रकरणात प्रदेश म्हणजे काय? याचे अगदी साधे सरळ विवेचन केले असून एखाद्या विस्तीर्ण क्षेत्राचा लहानसा भागाचे सहज विश्लेषण केल्याचे आढळते. लोकसंख्या, महाराष्ट्रातील नद्या, ऋतु, खनिजे, पिके इत्यादीबाबतची माहिती मिळते. तर **(जाधव, २०१५)** यांच्या ग्रंथाबाबत वर्षभरातील चालू घडामोडींचा महासंदर्भ म्हणून सदर ग्रंथाची ओळख आहे. दरवर्षी महाराष्ट्र पातळीवर घडलेल्या विषयांवर भाष्य करणारे तज्ञांचे विश्लेषणात्मक लेख समाविष्ट करुन महाराष्ट्राचे समकालीन चित्र सदर ग्रंथाच्या माध्यमातून मांडण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे.

### २.२.४ मुंबई विद्यापीठाची वाटचाल व त्याबाबतची माहिती :

मुंबई विद्यापीठाची वाटचाल व त्याबाबतची माहिती ह्यासाठी **(हांडे, २०१३)** वर्षवृत्त मुंबई विद्यापीठ २०१२–१३ हा ग्रंथ मुंबई प्रकाशन विभाग, मुंबई विद्यापीठ मार्फत प्रसिध्द होणाऱ्या या वर्षवृत्तामध्ये विद्यापीठाच्या भूगोल विभागाने आरेखीत केलेले विविध नकाशे, नकाशातील स्थान दर्शन तसेच महाविद्यालयाचे निश्चित भौगोलिक स्थान याबाबतची माहिती संशोधकाला गोळा करण्यासाठी फायदेशीर ठरली नमुना निवड करताना प्रश्नावली निवड करताना व अहवाल लेखनात परिशिष्ट म्हणून वरील माहितीचा उपयोग झाला. **(भट, १९९३)** यांच्या मुंबई विद्यापीठाची वाटचाल (१८८५–१९९२) या ग्रंथाच्या माध्यमातून संशोधकाला मुंबई विद्यापीठाची वाटचाल, इतिहास, ग्रंथालयाची आंतर्गत रचना, व ग्रंथालयामधील विविध विभागांच्या बाबतची अधिक माहिती प्राप्त झाली.

मुंबई विद्यापीठाची फोर्ट येथील ग्रंथालय इमारत ही ऐतिहासिक वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमुना, राष्ट्रीय स्मारक इ, असून कलिना येथील ग्रंथालयाची इमारत ग्रंथालयशास्त्रातील अत्याधुनिक कल्पनांना अनुसरुन बांधलेली आहे. अशा अनेक विषयांची इत्थंभूत माहिती सदर ग्रंथातून मिळाली.

**(धाकस, १९९३)** ऐक मुंबई तुझी कहाणी सदर ग्रंथात मुंबई शहराची परिपूर्ण माहिती दिलेली आहे. मुंबई शहर व त्यामधील शैक्षणिक संस्था, मुंबई विद्यापीठ, निर्मिती व मुंबई शहराच्या जडणघडणीत मुंबई विद्यापीठाचा समावेश इत्यादी बाबतची माहिती दिलेली आहे. या ग्रंथाचा उपयोग मुंबई विद्यापीठाचा अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांच्या इतिहासा बाबतची माहिती दिलेली असून सदर ग्रंथाचा उपयोग मुंबई विद्यापीठाची पार्श्वभूमी लिहिण्यासाठी झाली.

### २.२.५ शैक्षणिक ग्रंथालयांचे वर्गीकरण, घटक, आढावा :

''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.'' ह्या संशोधन विषयावर संशोधनात्मक कार्य करण्यापूर्वी संशोधकाने प्रथम शैक्षणिक ग्रंथालये व्याख्या व घटक ह्याबाबत माहिती मिळविली. (**कुंभार, २०००)** यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालय या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांच्या पूरक वाचनसाहित्यात शैक्षणिक ग्रंथालयाची व्याख्या पुढील प्रमाणे देण्यात आलेली आहे. **शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा पुरविणाऱ्या ग्रंथालयास शैक्षणिक ग्रंथालय म्हणतात.** शैक्षणिक ग्रंथालये शिक्षण संस्थांना त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करतात. तसेच शैक्षणिक ग्रंथालयाचे घटक ह्यामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा देण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय व विद्यापीठीय ग्रंथालय म्हणजे विद्यापीठातील विद्यार्थी, अध्यापक आणि संशोधक यांना आवश्यक ते वाचनसाहित्य पुरविण्यासाठी व योग्य त्या संदर्भ व माहितीसेवा देण्यासाठी विद्यापीठाने चालविलेले ग्रंथालय म्हणजे विद्यापीठीय ग्रंथालय ह्याबाबत संशोधकास माहिती मिळते.

ग्रंथालय ही संकल्पना, ग्रंथांचा उपयोग, ग्रंथालयाची व्याख्या त्याचा अर्थ तसेच ग्रंथालयामध्ये समाविष्ट होणाया विविध साधनांचा उल्लेख या बाबतच्या माहितीसाठी **(जोशी, १९७८)** भारतीय सांस्कृतीकोश खंड – ३ या संस्कृतीकोशाची अधिक मदत झाली. शिवाय **(कोण्णूर, कोरपूर, आणि माणगांवकर, २००८)** डायमंड ग्रंथालय माहितीशास्त्र कोशाच्या

माध्यमातून ग्रंथालयशास्त्राच्या पारंपारिक घटक, विषयांशी, वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भ सेवा, माहितीशास्त्र, ग्रंथालय व्यवस्थापनाशी निगडित लेखांची माहिती मिळाली. त्याचबरोबर माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा आणि व्यवस्थापनातील नवीन संकल्पनांचा ग्रंथालयशास्त्रावर जो परिणाम झालेला आहे तो लक्षात घेऊन त्यावरील लेखही समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यांचा उपयोग संशोधकास संशोधनाच्या वेगवेगळ्या ठिकाणी झाला.

**(पवार, १९८४)** सर्वांसाठी ग्रंथालये सदर गौरव ग्रंथातील प्रकरण क्र. १७ शैक्षणिक ग्रंथालये या घटकात द. वा. शेवडे यांनी शैक्षणिक ग्रंथालयांचे महत्व, त्यांचे कार्य, काही शतकापर्यत ग्रंथालये व कालमानाप्रमाणे बदलेले शैक्षणिक ग्रंथालये ह्याबाबत विवेचन केलेले आढळून येते यात प्रामुख्याने वाचकांच्या विविध गरजा, ग्रंथालयांचे कार्य, ज्ञानसाधनांचा पुरवठा, ग्रंथालयांची जबाबदारी, ग्रंथालयांचे घटक ह्याबाबत माहिती मिळते.

शैक्षणिक ग्रंथालयामध्ये शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांचा समावेश होतो. यांपैकी सदर संशोधनात महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांबाबत संशोधक अभ्यास करणार असून अधिक माहितीसाठी खालील वाचनसाहित्याचा परामर्श संशोधकाने घेतला आहे.

**(Oshea, M. V. 1991)** World Book Encyclopedia. (Vol.-12). सदर ज्ञानकोषामध्ये महाविद्यालयातील ग्रंथालयाचे महत्व विषद केलेले आहे. ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या साहित्याबाबत विवेचन केलेले आहे. तसेच ग्रंथालयातील ग्रंथ, संग्रह वाचक वर्ग याबद्दलची माहिती दिलेली आहे. ग्रंथालयाकडे बघण्याचा दृष्टकोन व्यापक असला पाहिजे याबाबतचे विश्लेषण केलेले दिसून येते.

**(चव्हाण, २००७)** महाविद्यालयीन ग्रंथालयाची वाचन संस्कृती विषयक भूमिका. पृष्ठ क्र. १२ वरील प्रस्तुत लेखामध्ये लेखकाने वाचन म्हणजे, महाविद्यालयीन ग्रंथालयाची वाचन संस्कृती विषयक भूमिका इत्यादी बाबीसंबंधी चर्चा केली आहे. लेखकाच्या मते महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्य वैविध्यपूर्ण असते. वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी जो वाचत नाही त्याला वाचायला लावणे जो वाचतो त्याला अधिक वाचण्याची प्रेरणा देणे ह्याबाबत महाविद्यालयीन ग्रंथालयांनी काही प्रयत्न करणे आवश्यक आहे. ग्रंथालय हा शिक्षणाचा केंद्रबिंदू

आहे. शिक्षण घेत असताना वाचन हे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथपालांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**(पोतदार, २००८)** शैक्षणिक प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका. पृ. क्र. २ वरील सदर लेखामध्ये लेखकाने शैक्षणिक प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका विशद केली असून त्यामध्ये शैक्षणिक ग्रंथालयांची उद्दिष्ट्ये, शिक्षणाची संकल्पना, ग्रंथालयांचे कार्य उपभोक्ता प्रशिक्षण वाचक साक्षरता अभियान इत्यादी विषयी चर्चा केली आहे.

**(Mohanrao, 2004)** User Education Programme as implemented in the IIAM Library : A Profile. ILA Bulletin, Page No. 29. प्रस्तुत लेखामध्ये लेखकाने ग्रंथालयात असणारे वाचनसाहित्य वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी उपभोक्ता प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावी राबविण्याबाबत माहिती दिली आहे.

ग्रंथालय ही वाचकांना गरजा पूर्ण करणारी महत्वाची सेवाभावी संस्था आहे. ग्रंथालयाच्या विकासासाठी ग्रंथालयाने वेळोवेळी नवनवीन प्रयोग करुन वाचकांना ग्रंथालयाकडे येण्यास भाग पाडणे व वाचकांना आवश्यक त्या सेवा दर्जेदार देणे याबाबतचा उहापोह केलेला आहे.

**(आढाव, २००१)** महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समन्वय. पृष्ठ क्र. ४२ ते ४४. या लेखात शैक्षणिक ग्रंथालयांचे प्रकार सांगितले असून महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या उद्दिष्टांची पूर्तत: व वाचकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी कोणकोणते घटक सेवासुविधा महत्वाचे आहेत ते सांगितले आहेत.

**(जाधव, २००७)** माहिती साक्षरतेचे विविध पैलू पृष्ठ क्र. १६ ते १८ वर प्रस्तुत लेखामध्ये लेखकाने माहिती साक्षरता विषयी संकल्पना स्पष्ट केलेली असून माहिती साक्षरतेची व्याख्या, ग्रंथालयात माहिती साक्षरतेचे आयोजन, माहिती साक्षरता उपक्रमाचे फायदे व माहिती साक्षरतेचे विविध पैलू स्पष्ट केले आहेत.

**(जोशी, २००७)** डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड – ३ सदर ज्ञानकोशात संशोधकाला ग्रंथालयातील वाचनसाहित्याची मांडणी ग्रंथालयीन कर्मचारी वृंदांचे आपापसातील कामाचे योगदान, ग्रंथालयीन व्यवस्थापन व प्रभावी सेवा सुविधा कशी द्यावी इ. विषया संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी उपयुक्त ठरला.

**(जोशी, २००२)** यांनी त्यांच्या ग्रंथालयातील संदर्भसेवा या ग्रंथात ग्रंथालयाचे प्रकार सांगितले असून महाविद्यालयीन ग्रंथालयांचे स्वरुप सांगितलेले आहे. सदर ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयाचे प्रकार आणि महाविद्यालयीन ग्रंथालयाबद्दलची माहिती लिहिण्यासाठी झाली तसेच ग्रंथालयात दिली जाणारी संदर्भ सेवा, संदर्भ सेवकांची आवश्यकता, संदर्भ सेवेची व्याख्या, प्रकार, संदर्भ ग्रंथपालाचे गुण, संदर्भ ग्रंथ, संदर्भ सेवा संकल्पनेचा विस्तार इत्यादी स्वरुपातील संदर्भ सेवेची प्राथमिक परंतु अत्यंत आवश्यक अशी माहिती मिळाली. **(जोशी व जोशी, १९८०)** ग्रंथालयीन संदर्भसेवा. ह्यांनी संदर्भसेवा ह्या विषयास अनुसरुन हा ग्रंथ प्रसिध्द केला असून सदर ग्रंथात संदर्भ सेवा आवश्यकता, ग्रंथालयाचे पाच सिध्दांत आणि संदर्भसेवा, नियतकालिक विभाग इ. विषयावरचे विवेचन दिले आहे. **(देशमूख, १९७२)** ग्रंथालय माहितीसेवा भाग–१ या ग्रंथात ग्रंथालयातील माहितीसेवा या संबंधी माहिती प्राप्त झाली. ग्रंथालय व माहितीसेवा एकमेकांस कसे पुरक आहेत या संदर्भात माहिती प्राप्त झाली.

**(Khan, Chakrabarti, & Banerjee, 2004)** Reforming reference : guidelines for librarian. 138 pp. सदर ग्रंथात रतनकुमार खान, भुवनेश्वर चक्रमुर्ती व स्वप्ना बॅनजी या तीन अनुभवी लेखकांनी संदर्भ ग्रंथपाल व ग्रंथपालांनाही उपयुक्त ठरेल असे माहितीच्या युगातील बदलते संदर्भ सेवांचे विवेचन करणारा उपयुक्त असा ग्रंथ लिहला आहे. एकूण १३८ पृष्ठांच्या या पुस्तकात अनुक्रमाणिका, ११ प्रकरणे, संदर्भसूची, विषयसूचीही दिलेली आहे.

आजच्या बदलत्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात, ईलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरामुळे ग्रंथालयीन सेवांची परीभाषा बदलत चालली आहे. पारंपारीक सेवांचे स्वरुप बदलणे गरजेचे झाले आहे. नवीन तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, माहितीचे आंतरराष्ट्रीय स्त्रोत ह्यांची जमवाजमाव करुन ती वाचकांपर्यंत पोहचवताना बऱ्याच अडचणींना ग्रंथालयांना सामोरे जावे लागते. संदर्भसेवांचे पूर्वीचे स्वरुप कालबाह्य ठरत आहे. संगणकीय जाळे, वेब, माहितीचा पुरवठा, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर व त्यासाठी लागणारी साधनसामग्री, प्रभावी दळणवळण, देवाण घेवाण यांची जरुरी वाढत आहे. ह्यांबाबत उहापोह या ग्रंथात आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवांची माहिती लिहीण्यासाठी सदर ग्रंथ उपयोगी पडाला.

**(साळूंके, २००८)** महाविद्यालयीन ग्रंथालयात राबविली जाणारे उपक्रम. पृष्ठ क्र. ०५ ते ०७ वरील सदर नियतकालीकात महाविद्यालयीन ग्रंथालयात जे विविध उपक्रम राबविले जातात त्या संदर्भात माहिती दिलेली आहे. या उपक्रमामध्ये ग्रंथपालाचा उद्बोधन तास, तालिका हाताळणे, पुस्तकांची मागणी, सेवा सुविधा, ग्रंथमांडणी, वाचनकक्ष इ. विषयी माहिती दिलेली आहे.

**(सावे, २००१)** ग्रंथालयीन परिवर्तनाचा मागोवा. पृष्ठ. क्र. ३७ ते ४३. सदर लेखात ग्रंथालयीन परिवर्तनाचा मागोवा या लेखातून सदर लेखकाने ग्रंथालयाचे व्यवस्थापन व सर्वांचे प्रदान यात संगणकाचा उपयोग वाढत असताना संगणकपूर्व व संगणकाधारीत अशा दोन्ही सेवांच्या बलस्थानांचे आणि मर्यादांचे ही विचार करायला हवे त्याचप्रमाणे संगणकाला विरोध करण्यास जसा काहीच अर्थ नाही तसेच संगणकामुळे सर्व प्रश्न सुटतील असा समज करुन घेणेही चूक आहे असे मत मांडले आहे.

**(नरगुंदे, २००५)** ह्यांनी प्रलेखन आणि माहितीशास्त्र (तत्वे, तत्रे, पध्दती आणि प्रणाली) ह्या ग्रंथात ग्रंथपालन व्यवसायातील आधुनिक व विकसित तंत्र पध्दती आणि प्रणालींचा परिचय मराठी भाषेच्या माध्यमातून अभ्यास करणाऱ्यांच्या उपयोगासाठी प्रस्तुत ग्रंथाचे प्रयोजन केले आहे. सदर ग्रंथामध्ये प्रलेखन व माहितीशास्त्र या विषयाचा अंतर्भाव आहे त्यामुळे ग्रंथपालन व्यवसायातील आधुनिक व विकसीत तंत्रे, पध्दती आणि प्रणालींचा परिचय वाचकांना होतो.

नव्या व सुधारीत तंत्रांची या क्षेत्रात सतत भर पडत असते आणि सतत बदलही होत असतात या सर्वांचा विचार करणे अवघड असल्याने सर्वसमावेशक व पूर्ण निर्दोष अशी ग्रंथनिर्मिती लेखिकेने केलेली दर्शनास येते. सदर ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयीन संगणकीय सेवांची माहिती लिहितांना झाला.

**(शुक्ला, २००६)** महाविद्यालयीन ग्रंथालय विकासासाठी अर्थसाधनांची निर्मिती ज्ञानगंगोत्री मधील पृष्ठ क्र. ९१ वरील प्रस्तुत लेखामध्ये लेखकाने अल्प अनुदाने, अनुदान कपात यासारख्या समस्या आणि वाढलेला खर्चाचा बोजा यातून महाविद्यालयीन ग्रंथालये

आपल्या सेवा सुविधा तसेच वाचनसाहित्य संग्रह विकास इत्यादी कशा प्रकारे देतात व देत असतांना वित्तीय समस्येला कसे तोंड देतात याविषयी माहिती दिलेली आहे.

महाविदयालयांनी अनुदानावर अवलंबून न राहता स्वत: उत्पनाची साधने निर्माण करणे ही काळाची गरज ठरली आहे. व त्यासाठी आपल्या सेवा सुविधा अधिक दर्जेदार करुन काही उत्पनाची निर्मिती करणे आवश्यक आहे. त्याबाबतचे विवेचन केले आहे.

(Wilson, 1977) Evaluation & scientific management of library & information centers (ed. Lankester, F. W. Cleverdon, C. W.) 27-40pp. सदर ग्रंथामधून मूल्यमापनाच्या गुणात्मक व संख्यात्मक या दोन पध्दती विषयींची माहिती समजावून दिली आहे.

विल्सन यांच्या मते मूल्यमापनामध्ये इतर बाजू जाणून घ्याव्या लागतात. ग्रंथालयाच्या मूल्यमापनामध्ये ग्रंथालय वापर करणाऱ्यांची गरज महत्वाची असते. कारण ग्रंथालयाचा वापर योग्य होतो किंवा नाही हे वापरकर्त्यावर अवलंबून असते.

१. गुणात्मक मूल्यमापन :–

गुणात्मक मूल्यमापनामध्ये ग्रंथालयाचा दर्जा, ग्रंथालय वाचकांना किती उपयुक्त आहे, वाचकांच्या गरजा किती प्रमाणात भागविल्या जातात. याबाबत विचार करण्यात येतो.

२. संख्यात्मक मूल्यमापन :–

संख्यात्मक मूल्यमापन पध्दतीमध्ये वाचकांच्या संख्येच्या प्रमाणात पुरेसे वाचनसाहित्य आहे काय? कोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य वाचक वापरतात, वाचनसाहित्याची संख्या, वाचनसाहित्य वापर करणाऱ्यांची संख्या, ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सोयी सुविधा इ. बाबींचा विचार करण्यात येतो. सदर ग्रंथाव्दारे ग्रंथालयीन सेवा सुविधांच्या बाबत अभ्यास करण्यास सदर ग्रंथ उपयोगी पडला.

**(महाजन, २०१३)** विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांचे व्यवस्थापन. सदर ग्रंथात प्रकरण क्र. २ पृष्ठ क्र. १० ते १४ ह्यामध्ये शैक्षणिक ग्रंथालय ही विद्यार्थी, अध्यापक,

संशोधन आणि प्रशासनाला आधार देणारी संस्था आहे. तसेच प्रकरण क्र. ६ पृष्ठ क्र. ३९ ते ४३ शैक्षणिक ग्रंथालयतील ग्रंथालय सेवांचा विकास ह्या मध्ये सेवांच्या बाबत चिंतन केलेले आहे.

**(सुतार, २०११)** ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. सदर ग्रंथाच्या माध्यमातून आजच्या ज्ञान, विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदलाचे वारे वाहू लागले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील ग्रंथालये आणि माहितीशास्त्र विभागही याला अपवाद नाहीत. शैक्षणिक क्षेत्रातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाचे महत्व इतर सर्व विषयांना पूरक असल्याने तसेच ग्रंथालय व माहिती केंद्रांचे कार्यक्षम व्यवस्थापन पाहणाऱ्या ग्रंथपालांचे ज्ञान, कौशल्ये आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे प्रकर्षाने विचारात घ्यावे लागतात.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयाच्या पायाभूत तत्वज्ञानावर आधारीत तसेच विषयाशी संबंधित प्रचलित माहिती व त्यावरील अचूक आणि विस्तृत स्वरुपातील भाष्य याबाबत प्रस्तुत ग्रंथात अद्ययावत माहिती पुरवू शकेल. सदर ग्रंथात अनेकविध अंगांनी विषयाचा परामर्श घेतल्यामुळे प्रस्तुत ग्रंथ अतिशय अभ्यासपूर्ण झाला आहे.

ग्रंथालयीन समितीची व्याख्या वैशिष्ट्ये, उद्देश, ग्रंथालय रचना इत्यादी विषयी माहिती बाबतची माहिती (**आगावणे, २००८)** ग्रंथालय समिती. ग्रंथपरीवार, पृष्ठ क्र. १६ ते १९. ह्या लेखामध्ये आढळते.

प्रस्तुत लेखामध्ये लेखकाने ग्रंथालय समितीची व्याख्या, वाचनसाहित्याची निवड, उपार्जन संघटन, मुल्यमापन वाचनसाहित्य रद्दबातल धोरण, सेवासुविधा इ. बाबतची ढोबळ धोरणे ठरविण्याचे कार्य ग्रंथालय समिती करते तसेच ग्रंथालयात उपलब्ध सेवांच्या अनुषंगाने वाचनसाहित्याची खरेदी व त्यासाठी करावा लागणारा खर्च हि समिती निश्चित करते. वाचन साहित्याचा विकास, सद्यस्थितीतील सेवा सुविधा अधिक प्रभावी करण्यासाठी ग्रंथालय समितीची भूमिका इत्यादी बाबतींचा उहापोह केलेला आहे.

**(देशपांडे व चांदेकर, २००८)** महाविद्यालयीन ग्रंथालयात ग्रंथसाहित्याचा विकास. पृष्ठ क्र. ०९ ते १० प्रस्तुत लेखामध्ये लेखकांनी ग्रंथालयाचे ग्रंथोपार्जन व वाचन साहित्य विकास धोरण स्पष्ट केले आहे. वर्षाच्या सुरुवातीला ग्रंथालय समितीची बैठक घेऊन त्या ग्रंथालयातील वाचन व इतर साहित्याच्या वर्षभरातील खरेदीबाबत निश्चित धोरण ठरवावे.

ग्रंथालयाच्या गरजेनुसार तरतुद केलेल्या रकमेची विभागवार वाटप त्याच बैठकीत करावे. सदर विभागावर तरतुदीप्रमाणे ग्रंथपाल व विभागप्रमुख संबंधित प्राध्यापक वर्षभर ग्रंथ निवडून खरेदी करतील व वाचकांना त्याबाबत वेळोवेळी माहिती देऊन संदर्भग्रंथाबद्दल अधिक जागृत करण्यास मदत होईल असे लेखकाला वाटते.

### २.२.६ महाविद्यालयीन ग्रंथालये, व सेवा–सुविधा :

**(Kent, Allen & Others, 1971)** Encyclopadia of Library & Information Science. (Vol. -05, pp. 226-281), सदर विश्वकोशाच्या खंड क्र. ५ मधून संशोधकाने महाविद्यालयीन ग्रंथालय कसे असावे. त्यामध्ये कोणकोणते वाचन साहित्य असावे याविषयीची व महाविद्यालय ग्रंथालया विषयीची माहिती याचा वापर संशोधनासाठी करण्यात आला आहे.

महाविद्यालय ग्रंथालयामधील वाचनसाहित्य संग्रह कसा विकसीत करावा याबाबतची माहिती घेतली असून संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वाचनसाहित्याचा संग्रह कसा करावा व कसा असावा तसेच हे करत असताना ग्रंथालयीन सेवा अधिक दर्जेदार कशा प्रकारे करता येतील याची माहिती जाणून घेतली आहे. शिवाय महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये वाचकांची गरज पाहता वाचनसाहित्याची निवड करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे याबाबतची माहिती जाणून घेण्यास मदत झाली.

ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयातील लेख, ग्रंथालयशास्त्रांचा इतिहास, ग्रंथालयशास्त्राचा विकास, सर्व देशातील ग्रंथालये, ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, ग्रंथालयातील साधने, उपकरणे, ग्रंथालयशास्त्रातील प्रसिध्द व्यक्तीमत्वे, ग्रंथालयांचे विविध प्रकार, ग्रंथालयीन कार्ये इ. गोष्टींवर यामध्ये अभ्यासपूर्ण लेख आहेत. तसेच ही प्रकाशन संस्था संदर्भ ग्रंथ प्रकाशनाच्या बाबतीत नावाजलेली आहे. शास्त्र व तंत्रज्ञान यातील अद्ययावत माहिती देण्याचा व अद्ययावत माहितीपूर्ण लेख देण्याचा प्रयत्न सदर ज्ञानकोशात केलेला आहे.

महाविद्यालय ग्रंथालयाचे महत्तव व कार्य विशद करण्यासाठी **(लोहकरे, २००५)** महाविद्यालय ग्रंथालयाचे महत्तव व कार्य पृष्ठ क्र. ५७ ते ६०. वरील लेख उपयोगी पडला. महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी वेगवेगळे शैक्षणिक आयोग व समित्या ह्या वेळोवेळी नेमण्यात

आल्या त्याबाबतचे विवेचन **(नखणे, २००६)** भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या ह्या ग्रंथात अधिक स्पष्टपणे दिलेल्या आढळतात. महाविद्यालयीन ग्रंथालयांची कार्ये व उद्देश जाणून घेण्यासाठी महाविद्यालयीन वाचकांमध्ये वाचनाची गरज व महत्तव रुजविण्यासाठी सदर ग्रंथाचा उपयोग झाला. **(वानकर, २००५)** यांचा वाचनसंस्कृती या पृष्ठ क्र. १० ते १२ वरील लेखामध्ये लेखकाने वाचनाची गरज व महत्व विशद केलेले आहे. त्यांच्या मते जनसामान्यांच्या जीवनात ग्रंथालयामुळे एक वेगळाच आनंद निर्माण होतो. वाचन हा एक आनंददायी अनुभव आहे. ग्रंथालयांनी आपल्या वाचकांना दर्जेदार सेवा देऊन आकर्षित करणे तसेच वाचकांतील बुध्दीचातुर्य व संशोधन वृत्तीची निर्मिती करुन अधिक संदर्भ ग्रंथांचा वापर करण्याची सवय लावणे ह्याबाबत विवेचन केलेले आहे.

**(सातारकर, २००२)** विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालये : परस्परसंबंध. ज्ञानगंगोत्री मधील पृष्ठ क्र. ३० ते ३६ वरील सदर लेखात महाविद्यालयीन ग्रंथालयांचे स्वरुप, विद्यापीठ ग्रंथालयांचे स्वरुप, विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालये यातील परस्परसंबंध सांगितला आहे. सदर लेखाचा उपयोग संशोधकाला महाविद्यालयीन ग्रंथालयांचे स्वरुप लिहिण्यासाठी झाला.

**(नरगुंदे, २००५)** ग्रंथालय आणि सामाजिक विकास या ग्रंथात पृ. क्र. १ ते ५, व पृ. क्र. १११ ते ११८ वर एखाद्या विषयाच्या खोलात जायचे तर मुळापासून सुरुवात करावी लागते. संशोधनाचा विषय हा कार्यताण व कार्यसमाधान असला तरी त्याचा संबंध समाजाशी आहे. ग्रंथालयातील घडामोडींचा सामाजिक विकासावर कसा परिणाम होत असतो तसेच ग्रंथालयात काम करीत असताना, ग्रंथालयात येणाऱ्या अडचणी यांचे विवेचन या ग्रंथात केले आहे. तसेच अनेक सामाजिक संकल्पना, ग्रंथालयाची भुमिका ग्रंथालयीन सेवा व सुविधा इत्यादी समजून घेताना तसेच  प्रस्तावना लिहिताना संशोधकाला सदर ग्रंथ फार उपयुक्त ठरला.

**(गालफाडे, २००५)** महाविद्यालयीन व विद्यापिठीय ग्रंथालये संशोधनाची केंद्रे. पृष्ठ क्र. ४८ ते ५१. प्रस्तूत लेखामध्ये लेखकाने महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांची संशोधनातील भूमिका मांडली आहे. महाविद्यालयीन ग्रंथालयाचा वाचक असलेल्या विद्यार्थी वर्गाला कोणते  ग्रंथालयीन साहित्य व सेवा द्याव्यात याबाबत विवेचन केलेले आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये साहित्य संग्रह कसा असावा तसेच पूरक वाचन साहित्य साधनाचा ग्रंथालयात समावेश असावा ह्याबाबतची माहिती संशोधकास सदर लेखाव्दारे मिळाली.

**(कर्णिक, २००५)** ग्रंथ, ग्रंथालय ग्रंथसंस्कृती, यासंबंधी लेखकांने पूर्वप्रसिध्द केलेल्या लेखांचा हा लेखसंग्रह असून सदर ग्रंथात ग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ, ग्रंथालय व ग्रंथसंस्कृती ह्यावर लेखांची मालिका आढळते. संदर्भ सेवा ही ग्रंथालयाची महत्वाची सेवा असून त्यासंबंधीचे विवेचन आढळते तसेच एखाद्या प्रकल्पाची निर्मिती करायची झाली तर त्याचा आराखडा तयार करावा लागतो तरच ते कार्य तडीस जाऊ शकते ह्याबाबतची माहिती प्राप्त होते.

**(बुवा. २००७)** ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह सदर संदर्भीत पुस्तकात वाचकांच्या वाढत्या गरजा, कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज इ. बार्बी संदर्भात मार्गदर्शन केले आहे. यामुळे प्रशिक्षण व कार्यसमाधान या विषयी विचार करताना संशोधकाला सदर ग्रंथ महत्वाचा वाटला.

**(Esperanza, 2008)** Public and academic libraries Jaipur, 144pp. सदर ग्रंथामधील Standardization in College Libraries या लेखामध्ये लेखकाने महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या प्रमाणीकरणाची (Standard) भूमिका, गरज व हेतू विशद केलेला आहे. तसेच ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, ग्रंथालयाचे स्थान, वाचनसाहित्य संग्रह या विषयी माहिती दिलेली आहे. सदर ग्रंथाच्या माध्यमातून ग्रंथालयीन सेवांबाबत माहितीचा उहापोह करतांना संशोधकाला मदत मिळाली.

**(Gorman, 2003)** Enduring library : technology, tradition and the quest for balance. 157pp. मायकेल गॉर्मन यांनी लिहिलेल्या सदर ग्रंथात योग्य ती माहिती गोळा करणे, तिचे मूल्यमापन करणे व ती योग्य त्या स्वरुपात वाचकांना पुरविणे व त्यांच्या गरजा भागविणे हे ग्रंथपालांचे प्रमुख कर्तव्य आहे आणि ह्या प्रयत्नांत 'आधुनिक तंत्रज्ञान' हे एक मौल्यवान साधन आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कितीही वाढला तरी ग्रंथालयाची मूलभूत उद्दिष्टे बदलू शकली नाही. हा एका वेगळ्या दिशेने विचार करावयास लावणारी संकल्पना आहे.

ग्रंथालय सेवांची परंपरा आणि सतत बदलणारे तंत्रज्ञान याबाबत गॉर्मन यांनी खालील घटकांचें विवेचन केल्याचे आढळते.

- लघु व दिर्घ मुदतीच्या उद्देशांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा समावेश करणे.
- उपलब्ध असलेल्या उच्च दर्जाच्या वाचनसाहित्याकडे वाचकांना आकर्षित करण्यासाठी देण्यात येणाऱ्या संदर्भ सेवांचा पुनर्विचार करणे.
- वाचन साहित्य वाचकांना सहज उपलब्ध होण्यासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने तालिकीकरणात सुधारणा करणे.
- साक्षरतेचा प्रसार करण्याच्या ग्रंथालयाच्या भुमिकेला पाठिंबा देणे.
- मन:शांती, ऐक्य व स्थिरता प्राप्त करण्यासाठी तांत्रिक ताण दूर करणे.
- ग्रंथालयाची परंपरा व विकसित तंत्रज्ञान यांमध्ये समतोल राखून ग्रंथपालांसमोर येणाऱ्या अडचणी व नवीन आव्हाने स्विकारणे.

**(Gupta, 1998)** Library and Information services in university and college libraries in India. PP No. 67-70. प्रस्तुत ग्रंथामध्ये लेखकाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन ग्रंथालयाचा दर्जा कशा स्वरुपाचा असावा याविषयी माहिती दिलेली आहे तसेच सदर ग्रंथालयांचे व्यवस्थापन कशा पध्दतीने केले जावे याविषयी चर्चा केली आहे व ग्रंथालयांच्या माध्यमातून ज्या विविध सेवा दिल्या जातात याबाबत उहापोह केला आहे. ग्रंथालयीन सेवांचे विवेचन लिहिण्यास सदर ग्रंथ उपयोगी पडला.

**(कुंभार, २०१३)** यांनी त्यांच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन : पध्दती आणि तंत्रे ह्या ग्रंथात ग्रंथालय व माहिती केंद्रे प्रामुख्याने सेवा उद्योग म्हणून कार्य करतात. वाचनसाहित्य देवघेव सेवा, संदर्भसेवा, प्रचलित जागरुकता सेवा, निवडक माहिती प्रसारण सेवा, इत्यादी प्रकारच्या सेवा ग्रंथालये आपल्या वाचकांना देत असतात. तसेच वाचनकक्ष सुविधा, प्रतिलिपीची सुविधा, इंटरनेटची सुविधा ग्रंथालये आपल्या वाचकांसाठी उपलब्ध करतात. अशा प्रकारच्या सेवा सुविधा विकसीत करण्यासाठी प्रथम संबंधीत सेवेची गरज अभ्यासावी लागते. सदर ग्रंथाचा उपयोग ग्रंथालयीन सेवा बाबत विवेचन करण्यास उपयोगी पडला.

**(John, 2004)** Managing preservation for libraries & archives : current practice & future developements. 194pp. कोणत्याही क्षेत्रात जेव्हा उपयुक्त वस्तू घेतल्या जातात तेव्हा त्या नुसत्या घेतल्या, वापरल्या किंवा ठेऊन दिल्या असे करुन चालत नाही. त्या त्या वस्तूंची, यंत्रांची किंवा उपकरणांची योग्य निगा राखणे, त्यांचे जतन करणे, त्यांची व्यवस्थित पद्धतीने देखभाल करणे जरुरीचे ठरते. अशाच पद्धतीने वाचनसाहित्यांची निगा राखणे हे ग्रंथापालांचे काम आहे. ज्ञानाचा साठा पुढील पिढीस उपलब्ध करुन देणे व त्यासाठी तो सुस्थितीत जतन करणे ही एक मोठी कला व एक शास्त्र आहे. ह्या बाबत जॉन फिदर यांनी मार्गदर्शन केले आहे.

**(Kumar, Mishra, & Kulshrestha, 2010)** Using Blogs for Extending Library Services. p16-17. प्रस्तुत लेखामधे लेखकांनी web Blogs च्या साह्याने वाचकांना विस्तारीत ग्रंथालय सेवा देण्याबाबतचे विवेचन केलेले आहे. सदर संशोधन लेखामध्ये निरनिराळ्या web Blogs चे प्रकार उदा. personal blogs, corporate blogs, question blogging, ranking & popularity blogs, blogs for libraries व त्यांचा वापर ह्याबाबत मार्गदर्शन केले आहे. तसेच २१व्या शतकातील ग्रंथपालांनी सदर तंत्रज्ञान आत्मसात करुन वेगवेगळ्या प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा देऊन वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करणे ह्याबाबतचा उहापोह केलेला आहे.

**(कुंटूरकर, १९८४)** महाविद्यालयीन ग्रंथालयांचे प्रश्न आणि उपाय. पृष्ठ क्र. १७ ते १९. वरील या लेखामध्ये महाविद्यालयातील ग्रंथलयीन कार्यामध्ये उद्भवणाऱ्या समस्या, ग्रंथालयामधील वाचनसाहित्य निवड व त्यातील अडचणी, ग्रंथालय समिती व त्यात निर्माण होणारे प्रश्न, वाचक सेवा सुविधा व त्या देत असतांना येणाऱ्या अडचणी यांची त्रोटक माहिती व त्यावर सुचविलेले उपाय याबाबत माहिती मिळाली.

**(वाळिंबे, १९७५)** महाराष्ट्रातील ग्रंथालयांच्या समस्या. पृष्ठ क्र. ३७ वरील सदर लेखात ग्रंथालयाविषयी व पर्यायाने ग्रंथपालांना उद्भवणाऱ्या समस्या उदा. ग्रंथांची संख्या अपूरी असणे, वाचकांना हवे असलेले ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध नसणे, ग्रंथालयीन सेवा सुविधा दर्जेदार नसणे, योग्य इमारत नसणे, ग्रंथालयाबाबत विशाल दृष्टीकोनाचे विस्मरण असणे इत्यादींचा उहापोह सदर लेखात केला आहे.

**(ब्रवेकर, १९७८)** शैक्षणिक समस्यांचा इतिहास प्रस्तुत ग्रंथात शैक्षणिक ध्येय, शिक्षणाचे तत्वज्ञान, शैक्षणिक मानसशास्त्र अध्यापन पध्दती, अभ्यासक्रम प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक याबाबत स्वतंत्र प्रकरणे दिलेली आहेत.

शिक्षकांचे व्यवसायिक शिक्षण या प्रकरणामध्ये प्राचीन व मध्ययुगीन काळातील शिक्षकांचे स्थान व भूमिका, महाविद्यालयाचे व विद्यापीठातील शिक्षक प्रशिक्षण व शिक्षणाची सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा याबाबतचे मौलिक विवेचन केले आहे. **(शाह, १९८१)** महाराष्ट्रातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रश्न. सदर ग्रंथात महाराष्ट्रातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत सर्वेक्षण करुन सविस्तर चर्चा केली आहे.

**(पिंपळखरे, जोशी, भावे, १९७९)** टिळक शिक्षण महाविद्यालय (ग्रंथालय – वास्तू – स्मरणिका) ह्यातील ग्रंथ आपला गुरु ह्या लेखाच्या पृष्ठ : ५१ वर सदर गौरवग्रंथात ग्रंथांना आपण गुरु इतकेच महत्व देतो. परंतु आपल्या शिक्षण पध्दतीत ग्रंथांना महत्वाचे स्थान आहे काय? महाविद्यालयाची ग्रंथालये कितपत समृध्द आहेत? विद्यार्थी त्याचा किती प्रमाणात उपयोग करतात? विद्यार्थांना ग्रंथालयाचा उपयोग करण्यासाठी कितपत प्रोत्साहन दिले जाते? ग्रंथालयांची गुणवत्ता काय? ग्रंथालया मार्फत कोणत्या सेवा सुविधा पुरविल्या जातात? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात या प्रश्नांबाबत चे प्रकट चिंतन करण्याचा प्रयत्न सदर स्मरणिकेत केला आहे. ग्रंथालयांची सद्यस्थिती चे विवेचन करण्यास सदर ग्रंथ उपयोगी पडला.

**(पडोळे, १९५१)** मराठी ग्रंथालयाचा इतिहास सदर ग्रंथात पृष्ठ क्र. १२७ ते १३३ ह्यात महाविद्यालयीन ग्रंथालयांचे आजचे स्वरुप, एका विद्यार्थीनीचे निराशाजनक चित्र गोष्टीरुपात मांडले आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथालय मांडणीचा व व्यवस्थेचा विचित्र नमुना, महाविद्यालयीन ग्रंथालयाचे दर्शन, पुस्तकांचे विशिष्ट हक्कदार व अनास्था इत्यादी बाबत तसेच ग्रंथालयाचे जुनाट स्वरुप आणि नवीन स्वरुप कसे असेल याबाबत विवेचन करण्यात आले आहे.

**(Akhter, 2008)** सदर शोधनिबंधात लेखकाने लाहोर येथील पंजाब विद्यापिठातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागामधील सन २००५ ते २००६ ह्या कालावधीतील एम.

फिल. पदवी पूर्ण केलेल्या एकूण १८ जणांच्या जनसमूहाकडून ग्रंथालयीन सेवा आणि वाचक समाधानाबाबत आढावा घेतला आहे. सदर शोधनिबंधातील सर्वेक्षणात लेखकाने माहितीचे संकलन करण्यासाठी प्रत्यक्ष मूलाखत हे साधन वापरले आहे. सदर जनसमूहाच्या अभ्यासाअंती असे लक्षात येते की, वाचक ग्रंथालयीन सेवां बाबत समाधानी नाहीत. नव नवीन वाचनसाहित्य व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या काही व्यावसायिक नियतकालीकांची संख्या वाढविण्याबाबत मत मिळाले. ग्रंथालयातील वाचनसाहित्याबद्दल बहुसंख्य वाचक समाधानी नाहीत. OPAC चा वापर फक्त कर्मचाऱ्यांसाठी असून वापरकर्ता ते वापरु शकत नाहीत. ग्रंथालयीन सेवांमधील देवघेव सेवा व्यतिरिक्त अन्य सेवा समाधानी नाहीत.

### २.२.७ नॅक बाबत माहिती विवेचन :

**(गवळी, २००४)** उच्चशिक्षणातील गुणवत्ता नियंत्रणासाठी नॅक मूल्यमापन. भारतीय शिक्षण, पृ. क्र. ४२ ते ४८ वरील लेखात लेखकाच्या मते भारतातील उच्चशिक्षणातील गुणवत्ता नियंत्रण ह्या भागावर विस्तृत चर्चा केली असून त्यासाठी नॅक च्या मूल्यांकन पध्द्तीचा योग्य विचार व वापर केल्यास प्रत्यक्ष उच्चशिक्षणातील गुणवत्तेचा विकास करणे शक्य आहे.

**(देशपांडे, २००४)** नॅक गुणवत्ता श्रेणी प्राप्त संस्था आणि अनुसंधावन कार्यक्रम, पृष्ठ क्र. १२८ ते १३२. प्रस्तुत लेखात जागतिक बाजारपेठ या अनुषंगाने उच्च शिक्षण गुणवत्ता व व्यवस्थापन यामध्ये निर्माण झालेली आव्हाने व त्यावरील उपाय योजना यासंदर्भात चर्चा करण्यात आली असून त्या आव्हानांवर उपाययोजना यावर अधिक भर या लेखात देण्यात आला आहे.

**(पोळ, २००४)** ग्रामीण भागातील महाविद्यालयांची जटिल समस्या : नॅक योजना पृष्ठ क्र. ८ ते १० वरील सदर लेखात ग्रामीण भागातील महाविद्यालयांची जटिल समस्या : नॅक च्या दृष्टीकोनातून दिले असून काही प्रश्न शहरी महाविद्यालयांना येत नाहीत परंतु ग्रामीण भागातील महाविद्यालयांच्या दृष्टीने ठोस निर्णय घेण्यास मदत ठरतील. संशोधकाला सदर ग्रंथाच्या माध्यमातून ग्रामीण महाविद्यालयातील उपभोग घेणाऱ्या घटकाला आवश्यक बाबी मांडण्यास उपयोगी ठरले.

**(प्रभुखानोलकर, २००४)** राष्ट्रीय मूल्यमापन आणि अधिस्विकृती परिषद, पृष्ठ क्र. ३६ ते ५३ वरील प्रस्तुत लेखाच्या लेखिका यांनी सदर लेखात राष्ट्रीय मूल्यमापन आणि अधिस्विकृती परिषद (NAAC) विषयी गुणवत्ता आणि गुणोत्कर्ष याविषयी चर्चा केली असून विशेषत: नॅकच्या विश्वासार्हतेविषयी विविध तज्ञांचे संदर्भ वापरुन चर्चा केली असून नॅक संस्थेविषयी जास्तीत जास्त माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

**(भावसार, २००४)** NAAC : A Self Improvement. पृष्ठ क्र. १८२ ते १८८ वरील नॅक मूल्यांकन करतांना महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या मूल्यमापनाचे असणारे महत्व प्रस्तुत लेखात विस्तृतपणे मांडण्यात आले असून उच्चशिक्षणात आत्मपरिक्षण हाच सर्वोत्कृष्ट घटक असून त्यावर वेळोवेळी लक्ष देऊन दर्जात्मक कार्यांचे प्रभावी नियोजन केल्यास प्राथमिक घटकापासून शेवटपर्यंतच्या घटकापर्यंत जात असतांना उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल.

**(देशपांडे, २००५)** ह्यांनी नॅक पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयांचे प्रशासन प्रस्तूत ग्रंथात लेखकांनी प्रकरण क्र. ५ महाविद्यालयांची साधनसामग्री आणि तिचे व्यवस्थापन यामध्ये असे नमूद केले आहे की, नॅक मुल्यांकनाला सामोरे जाण्यासाठी महाविद्यालयामध्ये ग्रंथालय व वाचनकक्ष सुसज्ज असणे आवश्यक आहे. ग्रंथालयांनी आपल्या वाचकांना विविध आधुनिक सेवा देणे आवश्यक आहे. ज्या ग्रंथालयातील वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर वाचक करत असतील, ज्या ग्रंथालयातील ग्रंथपाल व इतर सेवक आणि ग्रंथालयाचा वाचक यांच्यात पूरेसा संवाद असेल, वाचकांच्या गरजा व ग्रंथालयातील उपलब्ध साहित्य यांचा योग्य मेळ जेथे असेल ती ग्रंथालयीन सेवा उत्तम म्हणता येईल.

**(ब्रिजमोहन, २००३)** नॅकला सामोरे जाताना. या ग्रंथात नॅकला प्रथम सामोरे जाताना (जुन्या पध्दतीने) कोणकोणती काळजी घेतली पाहिजे या संबंधी विशेष चर्चा करण्यात आलेली असून स्वयंमूल्यमापन अहवाल तयार करण्याच्या पध्दती तसेच नॅकची परिपूर्ण माहिती असल्यामूळे संशोधकाला जुन्या पध्दतीने नॅक मूल्यांकन पध्दतीपासून सध्या नवीन सूरू असलेल्या (दि. ०१.०४.२००७ पासून) मूल्यांकन पध्दतीचा आढावा घेण्यासाठी तसेच जुनी पध्दत व नवीन पध्दत यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी मार्गदर्शक ठरले.

**(कुरुप, २००१)** नॅशनल ॲसेसमेंट ॲक्रेडिएशन कौन्सिलची (NAAC) मूल्यमापन कसोटी, पृ. क्र. ५ ते १२ वर प्रस्तुत लेखात नॅक ची मूल्यांकनाची सात परिमाणे यांविषयी विस्तृतपणे चर्चा करण्यात आली आहे. तसेच दर्जानिश्चिती करण्याच्या अनुषंगाने माहिती पुरविण्यात आली आहे. नॅकच्या सात परिमाणांविषयी प्रस्तुत लेखांतून अधिक विस्ताराने माहिती प्राप्त झाली.

(Aswath, 1999) Quality circles in a university library enhancement in Navalani, (ed. K. & Trikha) Library and information services. सदर ग्रंथामधून नॅक मूल्यमापनास आवश्यक असणाऱ्या कसोटींचे विस्तृत वर्णन केल्यामुळे कठीण व किचकट असलेल्या नॅक मूल्यमापनातील अडथळे कशा प्रकारे पार करावेत ह्या बाबत विस्तृत चर्चा करण्यात आलेली असून नॅक पुनर्मूल्याकनास सामोरे जाताना संपूर्ण महाविद्यालयाच्या एकूण मिळणाऱ्या गुणांमध्ये ग्रंथालयाचे स्थान व ग्रंथालयाकडे विशेष लक्ष पुरविण्यासंबंधी आवश्यक तेवढी चर्चा केलेली असून दरवर्षी देण्यात येणाऱ्या पुढील अहवाला संबंधी अधिक चर्चा आढळते.

१. गुणवत्तावाढीचा अहवाल (PAAR),२. अंतर्गत गुणावत्ता हमी विभाग (IQAC) ३. पुढच्या मुल्यांकनासाठीचा अहवाल (RAR) सदर अहवाल तयार करण्यासंबंधी अधिक मार्गदर्शन केलेले आहे.

**(Kurup, 2002)** Quality education : naac prespective : a manual for assessment and accredttion of college. नॅक मुल्यांकनास सामोरे जाताना ग्रंथालयाकडे असलेल्या बलस्थानांचे प्रथम प्रत्येक ग्रंथालयाने आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे. सदर ग्रंथामध्ये महाविद्यालयातून गुणवत्ता विकासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन व त्याची गरज ह्या बाबत विस्तृत चर्चा केलेली आहे. संपूर्ण गुणवत्तेचा विचार करताना लहानात लहान घटकांपासून शेवटच्या प्रक्रियेपर्यंत संपूर्ण घटकांवर चर्चा करण्यात आली असून वाचकांचे समाधान व ग्रंथालयीन सेवा सुविधा अधिक दर्जेदार करण्यासाठी ग्रंथालया मार्फत पुरविण्यात येणारे लक्ष ह्या संबंधी माहिती मिळते.

**(Pathan, 2005)** Quality Improvement programme in Higher Education through NAAC : A success story of Maharashtra. pp. 43-115. प्रस्तुत ग्रंथात

महाराष्ट्रातील नॅक मुल्यांकनात भरघोस यश संपादन केलेल्या महाविद्यालयांची गाथा चर्चा करण्यात आली असून पृष्ठ क्र. ४ वर देण्यात आलेल्या सांख्यिकीनुसार संपूर्ण भारतात १९३२ महाविद्यालयांचे मुल्यांकन झालेले असून त्यात सूमारे ८३५ महाविद्यालये ही एकट्या महाराष्ट्र राज्यातील आहेत.

सदर ग्रंथात महाविद्यालयाचे अंतर्गत मूल्यमापन करत असतांना नॅकच्या निकषांची अंमलबजावणी कशा प्रकारे करणे अत्यंत गरजेचे आहे या बाबत विस्तृत चर्चा करण्यात आली असून निवडक महाविद्यालयांचा Self Study Report कसा बनविला असून त्यावर महाविद्यालयांनी कसे लक्ष देऊन प्रगती साधावी ह्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. आपल्या बलस्थानांचे SWOT च्या माध्यमातून आत्मपरिक्षण कसे करावे ह्याबाबत उदाहरण देऊन स्पष्ट करण्याचा प्रयत्न लेखक एस. एन. पठाण ह्यांनी केला आहे.

एकंदरीत संशोधनास आवश्यक ती माहिती  सदर ग्रंथाच्या माध्यमातून उपलब्ध झाली. विशेष म्हणजे Self Study Report हा मूल्यांकनाचा आधारस्तंभ असल्याने तो परिपूर्ण करण्यासाठीचे विस्तृत विवेचन पृष्ठ क्र. ६९ ते ८८ वरील Glimpses of NAAC Documents  ह्या प्रकरणात दिलेले आहे.

NAAC : Best Practices in Library and information Service : A case Presentation.Retrieved from http:// naacindia.org/ publications/ best% 20practices% 20library% 20science.doc

NAAC : Guidelines on Quality indicators in Library and Information Servies : Affiliated / Constituent Colleges. Retrieved from http:// naacindia.org/ circulars/ Guidelines-Colleges-Library.doc

NAAC : New Methodology of Assessment & Accreditation (Effective from 1st April 20014) Retrieved from http:// naacindia.org/ publications/ methodology 20070.pdf

सदर प्रकाशने ही नॅक संस्थेमार्फत naacindia.org या संकेत स्थळावर माहितीसाठी प्रकाशित केलेली असून त्यामध्ये नवीन पध्दतीने मूल्यांकनासंबंधी विस्तृत माहिती देण्यात आली आहे.

**(कदम, २००४)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे उच्च शैक्षणिक ग्रंथालयाच्या विकासातील योगदान. पृष्ठ क्र. १६. या लेखामध्ये लेखिकेने उच्च शिक्षणात व ग्रंथालयाच्या विकासात यु.जी.सी. चे कार्य स्पष्ट केले आहे. त्यामध्ये ग्रंथालयाच्या विकाससंदर्भात दिल्या जाणाऱ्या अनुदानाची सविस्तर माहिती दिली आहे. यु.जी.सी. कडून शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रत्येक योजनेतंर्गत पुढील घटकांकरीता अनुदान दिले जाते. बुक बँक, अभ्यासकेंद्रे, प्रादेशिक ग्रंथालय केंद्र, COSIP आणि COHSSP ग्रंथालाय इमारत, संगणक, वार्षीक अनुदान, उजळणी वर्ग इत्यादी.

**(विर, २००४)** ग्रंथालयाच्या विकासात यु.जी.सी. ची भूमिका : प्रश्नोत्तरे. पृष्ठ क्र. १८ ते २० वरील सदर लेखामध्ये लेखकाने महाविद्यालयीन विकासासाठी यु.जी.सी. ची अनुदान योजना याविषयी माहिती दिलेली आहे. तसेच ग्रंथालय विकासामध्ये यु.जी.सी. ची भूमिका स्पष्ट केली आहे. यु.जी.सी. ग्रंथालयांना विकासासाठी वेगवेगळ्या योजनामार्फत अनुदान देत असते. त्यामध्ये बुक बँक, अभ्यासकेंद्रे, प्रादेशिक ग्रंथालय केंद्रे, राष्ट्रीय माहिती केंद्र, विभाग अभ्यासकेंद्र, वार्षिकोत्सव अनुदान इ. योजनांचा समावेश होत असून महाविद्यालयीन ग्रंथालयांनी सदर योजनेचा लाभ घेतल्यास आपल्या सेवा सुविधा दर्जेदार करण्यास लाभदायी ठरु शकतील.

**२.२.८ पी. एच डी शोध प्रबंध :**

१. **(गोहाड, २०१५)** पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचा सर्वांगिण अभ्यासात संशोधिकेने पुढील उद्दीष्टे निर्धारीत केली होती.

   १. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे. (ग्रंथालयातील ग्रंथ व ग्रंथेतर वाचन साहित्य संग्रह विकास, भौतिक सेवा, सुविधा, आर्थिक व्यवस्थापन, कर्मचारी व्यवस्थापन, एकंदर व्यवस्थापन प्रक्रिया)

   २. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालय आधुनिक सोयीसुविधाचा अभ्यास करणे. (संगणकीकरण, इंटरनेट, डिजीटायझेशन, आधुनिक साहित्य इ.)

   ३. वाचकांच्या दृष्टीने शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांची उपयुक्तता अभ्यासणे.

   ४. शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या भविष्यकालीन योजनांचा अभ्यास करणे.

सदर संशोधनासाठी संशोधकाने पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व सोलापूर विद्यापीठांतर्गत येणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालय तसेच अभिमत विद्यापीठांतर्गत सर्व ७० शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयाचा अभ्यास केला आहे. सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला गेला आहे.

२. **(मोरे, २०१२)** पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील व्यवस्थापन, अनुदान आणि सेवांच्या अभ्यासाच्या माध्यमातून संशोधनासाठी संशोधिकेने पुढील उद्दीष्टे निर्धारीत केली होती.

१) पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

२) पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

३) पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांच्या ग्रंथालयांना मिळणाऱ्या अनुदानाचा आढावा घेणे.

४) पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवांचे विश्लेषण करणे.

५) पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयांचे समाज विकासातील योगदान तपासणे.

सदर संशोधनासाठी संशोधीकेने पुणे विभागातील कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा व सोलापूर या पाच जिल्ह्यांच्या समावेश केलेला असून या पाच जिल्ह्यांत १) जिल्हा अ वर्ग २) तालूका अ वर्ग ३) इतर अ वर्ग स्तरावरीअ ९७ अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालये असून पैकी ८३ सार्वजनिक ग्रंथालयाचा संशोधिकेने अभ्यास केला आहे.

सन २००७ ते २०१० या तीन वर्षांच्या कालावधीतील माहितीचा अभ्यास केला असून ग्रंथपालांसाठी बनविण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती गोळा केलेली असून संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

३. **(मंडले, २०१५)** महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यासात संशोधकाने पुढील उद्दीष्टे निर्धारीत केली होती.

१. आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

२. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांतील समस्यांचा शोध घेणे.

३. आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो का याचा शोध घेणे.

४. ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह, वाचक आणि सेवा यांचा अभ्यास करणे.

५. आयुर्वेद महाविद्यालयातील बी. ए. एम. एस. अभ्यासक्रम उपलब्ध असलेल्या आयुर्वेद ग्रंथालयाचा अभ्यास करणे.

महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यांपैकी एकूण ६३ पैकी ५१ आयुर्वेद महाविद्यालयांतील ग्रंथालयांचे संशोधकाने अभ्यास केलेला असून एप्रिल २००१ ते २०११ अशी १० वर्षातील कालावधीमधील माहिती संकलित केलेली आहे. ग्रंथपालांच्या मिळालेल्या प्रश्नावलीच्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत.

४. (**Shrivastava, 2012)** सदर संशोधनात कोटा क्षेत्रातील १० अभियांत्रिक महाविद्यालयात ग्रंथालयीन सेवांच्या मूल्यमापनाचा संशोधकाने अभ्यास केलेला असून संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. अभियांत्रिकी महाविद्यालयीन ग्रंथालयातील प्रशासकीय बाबी, ग्रंथ निवड, ग्रंथ खरेदी, तांत्रिक संस्कार, देवघेव, भौतिक सुविधा, कर्मचारी व्यवस्थापन इ. बाबींचा अभ्यास करणे.

२. ग्रंथालयामध्ये उपलब्ध साहित्य, विविध स्त्रोत, यांची पडताळणी करणे.

३. इंटरनेटच्या मदतीने इलेक्ट्रॉनिक संसाधनांची उपलब्धता व संदर्भ ग्रंथांची गुणवत्ता आणि ग्रंथालयीन सेवा यांची कार्यक्षमता अभ्यासणे.

४. ग्रंथालये वाचकांची गरज कशा प्रकारे भागवितात ह्याबाबत अभ्यास करणे.

५. ग्रंथालया मार्फत दर्जेदार सेवा देतांना येत असलेल्या अडचणींचा, मर्यादेचा अभ्यास करणे.

६. ग्रंथालयीन सेवा देत असतांना माहिती तंत्रज्ञानाच्या अधिकाधीक वापराबाबतची शक्यता अभ्यासणे.

सदर संशोधनाअंती ग्रंथालयात ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची संख्या कमी जाणवत असल्याने त्यांची आवश्यकते नुसार त्वरीत नियुक्ती करुन ग्रंथालयीन सेवा दर्जेदार देणे आवश्यक आहे. वाचन साहित्याचा विकास व ग्रंथालयीन दैनंदिन कामात संगणकाचा वापर करणे

आवश्यक आहे. ग्रंथालयांनी वाचकांची गरज लक्षात घेऊन ग्रंथ निवड व ग्रंथ खरेदी करणे आवश्यक आहे.

५. **(Singh, 2011)** माहिती तंत्रज्ञानाच्या आविष्काराने माहितीची निर्मिती, देवाणघेवाण इ. काही क्षणातच होत असते. नवनवीन तंत्राच्या साहाय्याने माहितीची जतन साठवणूक व माहितीचे प्रसारण करणे क्रमप्राप्त ठरत आहे. सदर संशोधनात संशोधकाने पंजाब राज्यातील विद्यापीठीय ग्रंथालयांमार्फत वाचकांना माहितीचे स्त्रोत व सेवा ह्या बाबत अभ्यास केला असून सदर संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली होती.

1. Conservation of knowledge amassed from times immemorial .
2. Dissemination of knowledge through teaching learning, publication and extant ion programs.
3. Extention of the bounds of knowledge through research work by teachers and other researchers.
4. Helping the faculty and students to achieve highest academic honour and lifetime good reading.
5. Adopting new technologies.
6. Establishing information centers and render reader's advisory service
7. Acquiring process of resources and make them available to the readers / users.

६. **(Singh, 2010)** यांच्या संशोधनात संशोधकाने पंजाब राज्यातील १९ पदवी व पदव्युत्तर शिक्षण महाविद्यालयांचा समावेश केला असून त्यामध्ये ३ शासकीय, १५ शासकीय मान्यता मिळालेले व १ विद्यापिठीय पदवी व पदव्युत्तर शिक्षण महाविद्यालय आहेत. सदर संशोधनात संशोधकानी पुढील उद्दिष्टे समोर ठेवली होती.

१. ग्रंथालयामध्ये वाचकांचे येण्याचे प्रमाण व ग्रंथालयातील कोणकोणत्या सेवा व साधनसामग्री यांच्या वापरासंबंधी माहिती जाणून घेणे.

२. वाचक कोणत्या कारणासाठी ग्रंथालयाचा वापर करतात हे जाणून घेणे.

३. ग्रंथालयांनी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला असल्यास त्या वापरासंबंधी वाचकांत झालेला परिणाम अभ्यासणे.

४. वाचक ग्रंथालयाबाबत समाधानी आहे किंवा नाही ते पाहणे.

५. ग्रंथालय वापरत असतांना वाचक कोणत्या अडचणींना सामोरे जातात ते अभ्यासणे.

६. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांकडून ग्रंथालयाचा वापर वाढ्वण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात व ते करत असतांना त्यांना आलेल्या अडचणी अभ्यासणे.

७. ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी शिफारशी देणे.

सदर संशोधनात ग्रंथालयीन कर्मचारी,विद्यार्थी व प्राध्यापक वाचक यांच्या प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे. सदर संशोधनात संशोधकाने ग्रंथालयीन कामकाज व प्रशासनावर नाराजी दर्शविली आहे तसेच काही ग्रंथालयांच्या बाबतीत ग्रंथालयीन साधनसामग्री व कर्मचारी यांची संख्या कमी जाणवते. ग्रंथालयीन समितीची ग्रंथनिवड व ग्रंथ रद्द बादल बाबतची भुमिका चांगली असून ग्रंथालय विकासात हस्तक्षेप नसल्याचे दर्शविले आहे.

७. **(Sudge, 2012)** संरक्षण (Defence) प्रशिक्षण आणि शिक्षण संस्था मधील ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा आणि स्त्रोत याबाबतचे विवेचन संशोधकाने ह्याठिकाणी केले आहे. सदर संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारीत करण्यात आली होती.

1. To take stock of the Libraries and their activities in the area of defence training and education.
2. To Examine the procedures adopted for collection development, technical processing and organization of the resorces.
3. To Find out the useful services provided by the Libraries.
4. To Analise the Impact of ICT and Internet in the Users Community.
5. To workout the steps for the Systematic ICT interduction in the Libraries and Providing some essential need based Services.
6. To evolve a model plan of action to modernize the Library System so as to adopt all viable ICT in its organization, Transmission and distribution covering the changing formats of Information in the emerging ecenario.

संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला असून संपूर्ण भारतातील एकूण २० संरक्षण प्रशिक्षण संस्थेत प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे. सदर संशोधनाच्या माध्यमातून संशोधकाने खालील ग्रंथालयीन सेवांची माहिती घेतली. Alert Services, Atrical Indexing, Bibliography, Book Exhibition, Current Content Services, Internet

Resoruces Awarness, Reviews preparation, Translation Services, etc. etc.

८. **(Surve, 2012)** प्रस्तूत संशोधनात संशोधिकेने संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला असून संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवली होती.

१. पुणे विद्यापीठ आंतर्गत येणाऱ्या शिक्षणशास्त्र पदवी महाविद्यालयातील ग्रंथालयांचा अभ्यास करणे.

२. शिक्षण शास्त्र पदवी महाविद्यालयातील ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह विकास अभ्यासणे.

३. ग्रंथालयातून देण्यात येणाऱ्या सोयी व सेवा अभ्यासणे.

४. वाचकांच्या गरजांचा अभ्यास करणे.

५.संगणकीकरणाबाबतची सद्य:स्थिती अभ्यासणे.

६. संशोधनाच्या अनुषंगाने शिफारशी देणे.

शिक्षणशास्त्र पदवी महाविद्यालये सद्य:स्थितीत अनेक आव्हानांना सामोरे जात आहेत. माहिती व माहितीतंत्रज्ञानाच्या काळात वाचकांच्या गरजा तात्काळ पूर्ण करणे व त्याच बरोबर प्रभावी ग्रंथालयीन सेवा देणे ह्याबाबतचे विवेचन केलेले आहे.

९. (**Nasir, 2011**) सदर संशोधनात संशोधकाने उत्तर प्रदेशातील तंत्रशिक्षण महाविद्यालयीन ग्रंथालयामधील ई–जर्नल भागिदारी आणि वाचक सेवांचा अभ्यास केला असून सदर संशोधनाचा मुख्य उद्देश हा तंत्रशिक्षण महाविद्यालयातील ग्रंथालये ही अंकिय स्वरुपाच्या दिशेने जात असतांना त्यांचा मागोवा घेणे व त्यामार्फत देत असणाऱ्या वाचक सेवांचा अभ्यास करणे हा असून सदर संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवण्यात आली होती.

1. To highlight the present position of technical college libraries.
2. To give an account of consortium hired by the technical college libraries of Western Uttar Pradesh.
3. Adequacy of the library resources.
4. The satisfaction of user.
5. Application of e-journal in the betterment of users.
6. Modern techniques of e-journals (consortia) applied.

**२.२.९ एम. फील लघुशोध प्रबंध :**

१. **(औटे, २००९)** सन २००९ रोजी य. च. म. मुक्त विद्यापीठास सादर केलेल्या प्रकल्पात खालील उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली होती.

१) ग्रंथालयाच्या सद्यःस्थितीचा आढावा घेणे.

२) महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनाची माहिती घेणे.

३) माहिती तंत्रज्ञानाच्या ग्रंथालयाचा कार्यप्रणालीवर झालेला परिणाम शोधणे.

४) माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनाचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम शोधणे.

५) माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनामध्ये ग्रंथालयाच्या अडीअडचणींचा शोध घेणे.

सदर संशोधनाची व्याप्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील महाविद्यालयीन ग्रंथालयांचा अभ्यास केला असून फक्त B++ पासून A++ पर्यंत (८० ते १०० गुण मिळालेल्याच) दर्जा प्राप्त ग्रंथालयांची माहिती घेण्यात आली असून संशोधकाने एकूण १२ निष्कर्ष व ५ शिफारशीं च्या साहाय्याने निश्चित केलेले उद्दिष्ट्यांपर्यंत पोहचला आहे.

२. **(तिडके, २००६)** सदर लघुशोध प्रबंधात संशोधिकेने गडचिरोली जिल्ह्यांतील एकूण २० स्वयंसेवी संस्थांच्या ग्रंथालयाचा अभ्यास केला असून सेवांच्या बाबतीत संदर्भसेवा, माहितीसेवा, वर्तमानपत्रे कात्रण सेवा, संगणक सेवा, ग्रंथसूची सेवा इतर सेवांपुरताच विचार केला आहे.

३. **(दिनकर, २००७)** सदर संशोधनात ठाणे जिल्ह्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचा ग्रंथालयासंदर्भातील योगदानाचा अभ्यास केला असून त्यासाठी संशोधकाने पुढील उद्दिष्ट्ये नक्की केली आहेत.

१) विनाअनुदानित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचा ग्रंथालयासंदर्भातील आर्थिक, शैक्षणिक, भौतिक योगदानाचा शोध घेणे.

२) विनाअनुदानित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचा ग्रंथालयासंदर्भातील प्रशासकीय व भविष्यकालीन नियोजनाबाबतीतील योगदानाचा शोध घेणे.

३) विनाअनुदानित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाच्या योगदानासंदर्भात शिफारशी सुचविणे.

सदर संशोधनाची व्याप्ती ही ठाणे जिल्ह्यातील निवडक विनाअनुदानित महाविद्यालयांच्या ग्रंथालयांपूर्तीच होती. तसेच संशोधकाने सदर संशोधनात ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह आणि वाचक अभ्यास यांचा अभ्यास केलेला नाही. संशोधकाने एकूण ३५ ग्रंथपालांकडून प्रश्नावली भरुन घेतली असून त्याआधारे संशोधकाने एकूण १६ निष्कर्ष व १६ शिफारशी दिल्या आहेत.

४. **(पसारकर, २००९)** धर्मराज वीर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आलेल्या सदर लघुशोध प्रबंधात संशोधिकेने पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवली होती.

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि त्याच्या नेतृत्वाखालील महाविद्यालय यांच्यातील आंतर संबंधाचा अभ्यास करणे.

२) विद्यापीठीय ग्रंथालयाने महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या सुधारणेसाठी घेतलेल्या अभिनव उपक्रमाचा अभ्यास करणे.

३) विद्यापीठीय ग्रंथालयाने घेतलेल्या अभिनव उपक्रमानंतर महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये काय परिवर्तन घडून आले याचा अभ्यास करणे.

४) विद्यापीठीय ग्रंथालय व महाविद्यालय आंतर संबंध वृध्दींगत करण्यासाठी उपाययोजना करणे.

सदर संशोधनाच्या व्याप्तीत संशोधिकेने संशोधनासाठी नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर शहराची थोडक्यात ओळख करुन देऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची माहिती देऊन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या माहितीचे विवेचन केले आहे.

सदर संशोधनासाठी ०१ विद्यापीठ ग्रंथपाल व १७ महाविद्यालयीन ग्रंथपाल यांच्या प्राप्त प्रश्नावली व्दारे संशोधिकेने १६ निष्कर्ष हे विद्यापीठीय ग्रंथपालांच्या प्रश्नावलीवरुन काढले असून २१ निष्कर्ष हे महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रश्नावलीवरुन काढले आहेत.

५. **(बरडे, २००८)** सदर संशोधनात रा. तु. म. नागपूर विद्यापीठाशी संलग्न ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयांचे टिकात्मक अध्ययन केले असून एकूण २१ महाविद्यालयांचा अभ्यास केला आहे. ह्यामध्ये सदर महाविद्यालयांमार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या सेवा,

मूलभूत सोयी व साधनसामग्री यांच्या प्राप्त माहितीच्या आधारे अध्ययन करण्यात आले आहे.

६. **(मांद्रेकर, २००६)** मुंबई विभागातील AICTE प्रमाणित महाविद्यालयात वापरल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन आज्ञावली : एक अभ्यास Submitted to YCMOU.

ग्रंथालयीन आज्ञावलीचे महत्व तसेच ग्रंथालयांकडून होणारा वापर जाणून घेण्यासाठी संशोधिकेने सदर विषय निवडला असून प्रस्तुत संशोधनाची मुंबईतील AICTE शी प्रमाणित असलेल्या एकूण ३१ पैकी १४ महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती पण १४ पैकी १२ महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला आहे. निवडलेली महाविद्यालये ही पश्चिम मुंबई म्हणजे चर्चगेट ते दहिसर ह्या परिसरातील आहेत व संशोधनाचा कालावधी डिसेंबर २००८ पर्यंतचा आहे.

७. **(Sabale, 2009)** सदर प्रबंध हा पुणे शहरातील वैद्यकीय महाविद्यालयात देण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सेवा व अडचणी ह्या बाबत असून सदर संशोधनात एकूण ०६ वैद्यकीय महाविद्यालयांचा अभ्यास संशोधकाने केला असून फक्त ग्रंथपालांच्या प्रश्नावली मार्फत माहिती गोळा करुन विवेचन केलेले आहे. ह्यासाठी संशोधकानी एकूण ७४ प्रश्नांची विचारणा करुन ठरविलेले उद्दीष्ट साध्य केले आहे.

## २.३ सारांश :

सदर संशोधन पूर्ण करत असताना संशोधन विषयाच्या संबंधीत पूर्वी ज्या ज्या संशोधकांनी संशोधन केलेले आहे त्या त्या संशोधन शोध प्रबंधांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनाच्या संबंधित विषयाचे प्रबंधांचाही पूर्वाभ्यास करण्यात आला असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संदर्भग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेखाचे वाचन करुन पूर्वाभ्यासात संदर्भ दिले आहेत. संदर्भ देत असताना अमेरीकन सायकोलॉजिकल असोसिएशन (A.P.A.) स्टाईलचा वापर करण्यात आला आहे.

=== XOX ===

# १. संदर्भ सूची


१. आगलावे, प्रदीप. (२०००). संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन, पृष्ठ क्र. ११.

२. आगावणे, राजेश. (२००८). ग्रंथालय समिती. ग्रंथपरीवार, मे–जुन, पृष्ठ क्र. १६–१९.

३. आढाव, उध्दव. (२००१). महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समन्वय. मैत्रीच्या पलीकडे, जुलै, पृष्ठ क्र. ४२ ते ४४.

४. कर्णिक, प्रदीप. (२००५). ग्रंथ ग्रंथालय ग्रंथसंस्कृती. मुंबई: नवचैतन्य प्रकाशन.

५. कदम, रुपाली. (२००४). विद्यापीठ अनुदान आयोगाचे उच्च शैक्षणिक ग्रंथालयाच्या विकासातील योगदान. ज्ञानगंगोत्री, मार्च–मे, पृष्ठ क्र. १६.

६. कऱ्हाडे, स. दा. (१९९७). संशोधन सिध्दांत आणि पध्दती. मुंबई : लोकवाङ्मय गृह, पृष्ठ क्र. २७.

७. कुरुप, एम आर., (२००१). नॅशनल ॲसेसमेंट ॲक्रिडिटेशन कौन्सिलची (NAAC) मूल्यमापन कसोटी (शब्दांकन) करमरकर प्रकाश गणेश, ज्ञानगंगोत्री, वर्ष २ रे, अंक २रा, सप्टें.– नोंव्हें. पृष्ठ क्र. ५–१२.

८. कोण्णूर, एम. बी., कोरपूर, सुजाता आणि माणगांवकर, उषःप्रभा (२००८). डायमंड ग्रंथालय माहितीशात्र कोश. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

९. कुंटूरकर, वि. ना. (१९८४). महाविद्यालयीन ग्रंथालयांचे प्रश्न आणि उपाय. ग्रंथपरीवार, नोव्हें.–डिसें., पृष्ठ क्र. १७ ते १९.

१०. कुंभार, राजेंद्र. (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृष्ठ क्र. २.

११. कुंभार, राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन : पध्दती आणि तंत्रे. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन, पृष्ठ क्र. ८.

१२. कुंभोजकर, ग. दि. (१९८९). संशोधन पध्दती व संख्याशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

१३. गवळी, नारायण. (२००४). उच्चशिक्षणातील गुणवत्ता नियंत्रणासाठी नॅक मूल्यमापन. भारतीय शिक्षण, ऑक्टो. पृष्ठ क्र. ४२–४८.

१४. गालफाडे, दिपक रामराव. (२००५). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये संशोधनाची केंद्रे. शिक्षण आणि समाज, वर्ष २९ (०१), ऑक्टो.–डिसेंबर, पृष्ठ क्र. ४८–५१.

१५. घाटोळे, रा. ना. (२००३). समाजशास्त्रीय संशोधन – तत्त्वे व पध्दती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

१६. चव्हाण, सुभाष. (२००७, मे–जून). महाविद्यालयीन ग्रंथालयाची वाचन संस्कृती विषयक भूमिका. ग्रंथपरीवार, पृष्ठ क्र. १२.

१७. जाधव, एम. एस. (२००७). माहिती साक्षरतेचे विविध पैलू. गंथपरीवार, नोव्हेंबर – डिसेंबर, पृष्ठ क्र. १६ ते १८.

१८. जाधव, तुकाराम. (२०१५). महाराष्ट्र वार्षिकी २०१५. पुणे : द युनिक ॲकॅडमी.

१९. जोशी, अनंत. (२००२). ग्रंथालयातील संदर्भसेवा. पूणे : कॉन्टिनेटल प्रकाशन.

२०. जोशी, अनंत व जोशी, वसंत. (१९८०). ग्रंथालयीन संदर्भसेवा. पूणे : कॉन्टिनेटल प्रकाशन.

२१. जोशी, बी. (२००७). डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड – ३. पुणे : डायमंड प्रकाशन.

२२. जोशी, महादेवशास्त्री. (१९७८). भारतीय सांस्कृतीकोश खंड – ३. पुणे : भारतीय संस्कृतीकोश मंडळ.

२३. जोशी, लक्ष्मणशास्त्री. (१९७२). मराठी विश्वकोश खंड–६. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पृष्ठ क्र. ९३७.

२४. ढवळे, के. (२००२). स्टुडंटस मॉडर्न डिक्शनरी. मुंबई : ढवळे प्रकाशन.

२५. दळवी, दाऊद. (२०१०). असे घडले ठाणे. नवी मुंबई : श्री कृपा प्रकाशन, पृष्ठ क्र.२५०.

२६. दास्ताने, संतोष. (२०११). महाराष्ट्र २०११. पुणे : दास्ताने आणि कं, पृष्ठ क्र.२४०–२४७.

२७. देशपांडे, एच. व्ही. (२००५). नॅक पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयांचे प्रशासन. सातारा : सुखदा सौरभ प्रकाशन.

२८. देशपांडे, दत्तात्रय., आणि भोईर, अनिल. (२००७, जानेवारी–फेब्रुवारी). ग्रंथालय व्यवस्थापनात सांख्यिकीचे महत्व. ग्रंथपरीवार, पृष्ठ क्र. १६ ते २२.

२९. देशपांडे, दत्तात्रय., व चांदेकर, उज्वला. (२००८). महाविद्यालयीन ग्रंथालयात ग्रंथसाहित्याचा विकास. माहितीयुग, एप्रिल, पृष्ठ क्र. ०९–१०.

३०. देशपांडे, व. सी. (२००४) नॅक गुणवत्ता श्रेणी प्राप्त संस्था आणि अनुसंधावन कार्यक्रम. शिक्षणसमीक्षा, वर्ष–३८, अंक–०४, ऑक्टो.–नोव्हें., पृष्ठ क्र. १२८–१३२.

३१. देशमूख, पी. आर. (१९७२). ग्रंथालय माहितीसेवा भाग–१. अमरावती : मंगेश प्रकाशन.

३२. दांडेकर, विष्णू वामन. (संपा) (१९६१). पालघर तालुका चित्रमय दर्शन १८१८ – १९६०. पालघर : भाईलाल पटेल, अध्यक्ष, महात्मा गांधी सेवा संघ पालघर.

३३. धाकस, पूरुषोत्तम. (अनु.) (१९९३). ऐक मुंबई तुझी कहाणी. ठाणे : प्रियंका प्रकाशन.

३४. नखणे, मिनल. (२००६).भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या. पुणे : नित्यनुतन प्रकाशन. पृ. ष्ठ. २०२ ते २२८.

३५. नरगुंदे, रेवती. (२००५). प्रलेखन आणि माहितीशास्त्र (तत्वे, तत्रे, पध्दती आणि प्रणाली). पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

३६. नरगुंदे, रेवती. (२००५). ग्रंथालय आणि सामाजिक विकास. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र. १–५, १११–११८.

३७. निकोसे, एस.(२००७). ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधन पध्दती. नागपूर : प्रज्ञा प्रकाशन, पृष्ठ क्र. २१–३८, ५८–६८.

३८. पडोळे, ल. वा. (संपा.)(१९५१). मराठी ग्रंथालयाचा इतिहास. नागपूर : पूजा प्रकाशन. पृष्ठ क्र. १२७–१३३.

३९. पवार, एस. पी. (२००२). ग्रंथालय व माहिती शास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

४०. पवार, गणपतराव. (१९८४). सर्वांसाठी ग्रंथालये, गौरव ग्रंथ, पुणे : बापू विठ्ठल गामला विश्वस्त व अध्यक्ष, सिध्दार्थ मोफत वाचनालय व ग्रंथालय.

४१. पाटील, राहुल. व हांडे, कपील. (२०१३). अत्यावश्यक इतिहास व भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह). पुणे : द युनिक ॲकॅडमी.

४२. पिंपळखरे, मो. ह., जोशी, न. म व भावे, श. द.(१९७९). टिळक शिक्षण महाविद्यालय (ग्रंथालय – वास्तू – स्मरणिका), ग्रंथ आपली गूरु. पुणे : टिळक शिक्षण महाविद्यालय.

४३. पोतदार, पा. मा. (२००८, मे–जून). शैक्षणिक प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका. ग्रंथपरीवार, पृष्ठ क्र. २.

४४. पोळ, दिनेश. (२००४). ग्रामीण भागातील महाविद्यालयांची जटिल समस्या : नॅक. योजना वर्ष–३०, अंक–०२, सप्टें., पृष्ठ क्र. ८–१०.

४५. प्रभुखानोलकर, राखी. (२००४). राष्टीय मूल्यमापन आणि अधिस्विकृती परिषद, ज्ञानगंगोत्री, अंक – ०४, मार्च–एप्रिल–मे, पृष्ठ क्र. ३६–५३.

४६. बुवा. जी. (२००७). ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह. सावंतवाडी : श्री साई प्रकाशन.

४७. बोधनकर, सुधीर आणि अलोनी विविक. (१९९९). सामाजिक संशोधन पध्दती. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्र. ६–७.

४८. ब्रवेकर, जॉन. एस. (१९७८). शैक्षणिक समस्यांचा इतिहास. पुणे : श्री विद्या प्रकाशन.

४९. ब्रिजमोहन, दायमा. (२००३). नॅकला सामोरे जाताना. लातूर : विद्याभारती प्रकाशन.

५०. भट, सुधा. (१९९३). मुंबई विद्यापीठाची वाटचाल (१८८५–१९९२). मुंबई : पॉप्युलर प्रकाशन

५१. भावसार, रामदास. (२००४). NAAC : A Self Improvement. शिक्षणसमीक्षा, अंक–०५, डिसें.०३ ते जाने.०४, पृष्ठ क्र. १८२–१८८.

५२. भितांडे, द. ना., आणि जोगळेकर, गो. के. (१९९४) शैक्षणिक संशोधन पध्दती. पुणे : नुतन प्रकाशन.

५३. भांडारकर, पु. ल. (१९८७). सामाजिक संशोधन पध्दती. (३री आवृती). नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

५४. महाजन, शांताराम गजानन. (२०१३). विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांचे व्यवस्थापन. पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र. १०–१४, ३९–४३.

५५. मालशे, स. गं. (१९७५). शोधनिबंधाची लेखनपध्दती. नागपूर : सूविचार प्रकाशन मंडळ.

५६. मुळे, रा. श., आणि उमाढे, वि. तु. (१८८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. मुंबई : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

५७. लोहकरे, रोहिदास सदाशिव. (२००५). महाविद्यालय ग्रंथालयाचे महत्व व कार्य. शिक्षण आणि समाज, जानेवारी, पृष्ठ क्र. ५७–६०.

५८. वानकर, एम. एम. (२००५). वाचनसंस्कृती. ग्रंथपरिवार, जानेवारी, पृष्ठ क्र. १०–१२.

५९. वाळिंबे, मो. (२००२). मराठी शुध्दलेखन प्रदीप. पुणे : नितीन प्रकाशन.

६०. वाळिंबे, मो. रा. (१९७५). महाराष्ट्रातील ग्रंथालयांच्या समस्या. सहित्य सहकार, जानेवारी, पृष्ठ क्र. ३७.

६१. विर, धर्मराज. (२००४). ग्रंथालयाच्या विकासात यु.जी.सी. ची भूमिका : प्रश्नोत्तरे. ग्रंथपरीवार, जुलै– ऑगस्ट, पृष्ठ क्र. १८ ते २०.

६२. शर्मा, के. के. (२००५). इंटेलेक्चुअल्स संदर्भ महाराष्ट्र : राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन. भोपाळ : इंटेलेक्चुअल बुक व्युरो.

६३. शाह, अ. भि. (१९८१). महाराष्ट्रातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रश्न करंदीकर, सुमन(संपा.). पुणे : विद्यार्थी सहाय्यक समिती.

६४. शुक्ला, भरतकुमार र. (२००६). महाविद्यालयीन ग्रंथालय विकासाठी अर्थसाधनांची निर्मीती. ज्ञानगंगोत्री, मार्च–मे, पृष्ठ क्र. ९१.

६५. शेजवळ, हरीभाऊ. (२०१२). श्री स्थानक ठाणे. मुंबई : नवता बुक वर्ल्ड.

६६. सातारकर, सु. प्र. (२००२). विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालये : परस्परसंबंध. ज्ञानगंगोत्री, सप्टें.–नोव्हेंबर, पृष्ठ क्र. ३०–३६.

६७. सावे, वसंत. (२००१). ग्रंथालयीन परिवर्तनाचा मागोवा. ज्ञानगंगोत्री, डिसें.–फेब्रु., पृष्ठ. क्र. ३७ ते ४३.

६८. साळूंके, एम. एस. (२००८). महाविद्यालयीन ग्रंथालयात राबविले जाणारे उपक्रम. ग्रंथपरिवार, सप्टेंबर–ऑक्टोबर, पृष्ठ क्र. ०५ ते ०७.

६९. सुतार, धनंजय भगवान.(२०११). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. वाराणशी : ए. बी. एस. पब्लिकेशन.

७०. संत, दु. का. (१९८८). संशोधन : पध्दती, प्रक्रिया, व अंतरंग. पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

७१. हांडे, राजपाल. (२०१३). वर्षवृत्त मुंबई विद्यापीठ २०१२–१३. मुंबई : मुंबई प्रकाशन विभाग मुंबई विद्यापीठ.

७२. Akhter, M. (2008). Library services and user satisfaction : Department of LIS, Punjab University, Lahore. Library Promotion Bureau,39 (2), June 2008, pp 25-34.

७३. Aswath, Lalitha. (1999). Quality circles in a university library enhancement in Navalani, (ed. K. & Trikha) Library and information services. Jaipur : Rawat Publications.

७४. Bush, Charles H. & Harter, Stephen H. (1980). Research methods in librarianship techniques and interpretation. New York : Academic, pp 15.

७५. Cole, A., & Bigelow, K. (1956). A manual of thesis — writing. London : John wiley and Son's, pp 5-9, 29-35.

७६. Esperanza M. (2008). Public and Academic Libries Jaipur. Jaipur : Bintwell Publication, Page No 144.

७७. Gopal, M. H. (1970). An introduction to research procedure in social sciesnes. Bombay : Asia publication house, pp 16.

७८. Gorman, Michael. (2003). Enduring library : technology, tradition and the quest for balance. Chicago : American Library Association, 157pp. ISBN : 0-8389-0846-2 £

७९. Gupta, O. P. (1998). Library and Information Services in University and College Libraries in India. New Delhi : Reliance Publications House, pp. 67-70.

८०. John, Feather. ed. (2004). Managing preservation for libraries & archives : current practice & future developements. Oxan (U.K.): Ashgate, PP 194, (ISBN - 0754607054)

८१. Kent, Allen & Others, (1971). Encyclopadia of Library & Information Science. (Vol. -05, pp. 226-281), New Your : Marcel Dekker.

८२. Khan, Ratankumar., Chakrabarti, Bhubaneshwar., & Banerjee Swapna (2004). Reforming reference : guidelines for librarian. New Delhi : Mittal Publications, pp. 138

८३. Kothari, C. R. (1989). Research methodology : methods and techniques, New Dehil : Wiley Eastern Ltd.

८४. Kumar, H., & Mishra B., & Kulshrestha S.B. (2010). Using Blogs for Extending Library Services. University News, Vol.48, (12), pp. 16-17.

८५. Kurup, M. R., (2002). Quality education : naac prespective : a manual for assessment and accredttion of college. Mumbai : Kelkar Education Trust

८६. Mohanrao, K. Rama. (2004). User Education Programme as implemented in the IIAM Library : A Profile. ILA Bulletin, Jan.-Mar. pp 29.

८७. Oshea, M. V. (1991). World Book Encyclopedia. (Vol.-12). USA : World Book

८८. Pathan, S. N. (2005). Quality Improvement programme in Higher Education through NAAC : A success story of Maharashtra. Bhopal : Intellectual Book, pp. 43-115.

८९. Wilson, T. D. (1977). Evaluation & scientific management of library & information centers (ed. Lankester, F. W. Cleverdon, C. W.) London: Noorrdhoff, pp 27-40.

## २. पी. एच डी शोध प्रबंध :-


९०. गोहाड, जयश्री संजय. (२०१५). पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचा सर्वांगीण अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

९१. मोरे, वैशाली. (२०१२). पुणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील व्यवस्थापन, अनुदान आणि सेवांचा अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

९२. मंडले, सुनिल राजाराम. (२०१५). महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

९३. Shrivastava, Deepak Kumar. (2012). Evaluation of library services of engineering colleges in kota region (Doctoral dissertation). Submitted to Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

९४. Singh, Kirti. (2011). An Evaluative Study of Information Sources and Services in University Libraries of Punjab (Doctoral dissertation). Submitted To Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

९५. Singh, Nirmal. (2010). A study of the use of libraries of colleges of education in punjab (Doctoral dissertation). Submitted to Punjabi University, Patiala. Retrived from Shodhahgangotri.

९६. Sudge, Suresh. (2012). Modernization of Libraries attached to the defence training adn education Institutes in India with reference to Services adn sources (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

९७. Surve, Swati Sanjay. (2012). A critical study of education college libraries affiliated to university of pune (Doctoral dissertation). Submitted to the Shri jhabarmal tibrewala university. Retrived from Shodhahgangotri.

९८. Nasir, Mohammad. (2011). An evaluation study of E-journals consortia and user`s services in technical college libraries of Western Uttar Pradesh (Doctoral dissertation). Submitted To Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

## ३. एम. फील लघुशोध प्रबंध :–

९९. औटे, गोवर्धन प्रल्हादराव. (२००९). डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित नॅक मानांकित महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचे उपयोजन. Submitted to YCMOU.

१००. तिडके, वर्षा अनिल. (२००६). गडचिरीली जिल्ह्यांतील स्वयंसेवी संस्थांच्या ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास. Submitted to YCMOU.

१०१. दिनकर, अतुलकुमार अण्णा. (२००७). ठाणे जिल्ह्यातील विनाअनुदानीत महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचा ग्रंथालयासंदर्भातील योगदानाचा अभ्यास. Submitted to YCMOU.

१०२. पसारकर, अपर्णा श्रीकांत. (२००९). विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथालय आंतरसंबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ. Submitted to YCMOU.

१०३. बरडे, विरेंद्रकुमार लक्ष्मणराव. (२००८). रा. तु. म. नागपूर विद्यापीठाशी संलग्न ग्रंथालय व माहितीशास्त्रे महाविद्यालयांचे टिकात्मक अध्ययन. Submitted to YCMOU.

१०४. मांद्रेकर, सिध्दी अरुण. (2006). मुंबई विभागातील AICTE प्रमाणित महाविद्यालयात वापरल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन आज्ञावली : एक अभ्यास Submitted to YCMOU.

१०५. Sabale, Ashok Rambhav. (2009). The Study of Library Services and Problem of Pune City Medical Colleges. Submitted to YCMOU.

=== XOX ===

# प्रकरण तिसरे

# संशोधन विषयाची सैध्दांतिक माहिती

## ३.१ प्रस्तावना :

संशोधकाने ठाणे जिल्हा हा संशोधनासाठी निवडला असल्यामुळे ठाणे जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक माहिती पाहणे गरजेचे आहे. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नवीन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर ८ तालुके पालघर जिल्ह्यात येतात. **ठाणे** जिल्ह्यात येणारे ७ तालुके पुढीलप्रमाणे ठाणे कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर, मुरबाड, तर **पालघर** जिल्ह्यात येणारे ८ तालुके पुढीलप्रमाणे पालघर, वाडा, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, विक्रमगड असे आहेत. सदर प्रकरणामध्ये संशोधकाने सद्य:स्थितीत असलेल्या ठाणे–पालघर जिल्ह्याबद्दल तसेच त्यामध्ये येणाऱ्या तालुक्यांच्या माहितीचे सादरीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२ महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त आढावा :

देशाचा पश्चिम व मध्य भाग व्यापलेल्या महाराष्ट्र राज्यास अरबी समुद्राचा ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेकडील सह्याद्री पर्वताच्या रांगा राज्याचा प्राकृतिक कणा असून उत्तरेस असलेल्या सातपुडा पर्वताच्या रांगा व पूर्वेस असलेल्या भामरागड – गडचिरोली – गायखुरी या डोंगररांगा राज्याच्या नैसर्गिक सीमा आहेत. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस आंध्रप्रदेश, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत.

राज्यात उष्ण कटिबंधीय मोसमी हवामान आहे. पश्चिम समुद्र तटावरुन येणाऱ्या पावसाळी ढगांमुळे सह्याद्रीच्या डोंगर रांगांवर ४०० सें.मी. पेक्षा जास्त पाऊस पडतो. समुद्र किनारपट्टीवरील कोकणात मुसळधार पाऊस पडत असून सोलापूर व अहमदनगर हे सर्वाधिक कोरडे जिल्हे आहेत. पूर्वेस विदर्भ व मराठवाड्याकडे सरकताना पावसाचे प्रमाण काहीसे वाढते.

लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३.०८ लक्ष चौ. किमी आहे. राज्याची लोकसंख्या सुमारे ११.२४ कोटी

(जणगणना २०११) असून ती देशातील एकूण लोकसंख्येच्या ०९.३० टक्के आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले असून ४५.२० टक्के म्हणजे ५.१ कोटी लोकसंख्या नागरी भागात राहते.

राज्यात ३६ जिल्हे असून प्रशासकीय सुविधेसाठी ते कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या सहा महसूली विभागात विभागले आहेत. जिल्हा स्तरावरील नियोजनासाठी राज्यात प्रभावी यंत्रणा कार्यरत आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तसेच देशाची आर्थिक राजधानी असून जवळजवळ सर्वच प्रमुख निगम व वित्तीय संस्थांची मुख्यालये या शहरात आहेत. देशातील प्रमुख वायदे व भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्रे मुंबईत आहेत.

राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्तव दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार देशाच्या ७४.०४ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.९१ टक्के आहे. राज्यात अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या उत्कृष्ट संस्था आहेत.

महाराष्ट्र हे केवळ भौगोलिक सीमांनी रेखांकित केलेले राज्य नसून येथील जनतेने संघटितरित्या परिश्रमपूर्वक घडविलेले राज्य आहे. या राज्याची वैशिष्ट्यपूर्ण मराठी संस्कृती विकसित होण्यास नैसगिक तसेच सांस्कृतिक विविधता सहाय्यभूत झाली आहे. स्वत:ची अध्यात्मिक बैठक असलेले हे राज्य **'संतांची भूमी'** म्हणून ओळखले जाते. राज्याने देशाच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात लक्षणीय भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र हे या सर्व वैशिष्ट्यांमुळे सर्वोतम राज्य बनले आहे. **(अर्थ व सांख्यिकी, २०१४)**

### ३.२.१ महाराष्ट्राची भौगोलिक माहिती :

१. महाराष्ट्र राज्याची स्थापना : दि. १ मे १९६०.

२. महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार : १५°४४′ ते २२°६०′, उत्तर अक्षांश

३. महाराष्ट्राचा रेखांश विस्तार : ७२°३६′ ते ८०°५४′, पूर्व रेखांश

४. महाराष्ट्राची पूर्व पश्चिमी लांबी: ८०० कि.मी.

५. महाराष्ट्राची दक्षिणोत्तर रुंदी : ७२० कि.मी.

६. महाराष्ट्राची समूद्रकिनारपट्टी : ७२० कि.मी.

७. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ : ३,०७,७१३ चौ. कि. मी.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा क्रमांक : तिसरा (राजस्थान व मध्यप्रदेश राज्यानंतर तिसरा) तर महाराष्ट्राने भारताचा व्यापलेला एकूण ०९.३६% प्रदेश आहे. **(कणेर, २०१५)**

## ३.३ ठाणे जिल्ह्याचा समग्र आढावा :

### ठाणे जिल्ह्याचा संक्षिप्त इतिहास :

ठाणे शहराला प्राचीन उज्वल परंपरा आहे. सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहास ही या शहराला लाभला आहे. ठाणे जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. इ.स. ५ व ६ व्या शतकात मौर्य राजे राज्य करीत असता चालुक्य व राष्ट्रकुल राज्याचे हे राजे मांडलिक होते. या वंशाच्या राजांच्या कारकिर्दीत बिंब राजांनी स्वारी केली. आपले नांव इतिहासात अजरामवर व्हावे म्हणून बिंब राजांनी या प्रदेशाला बिंबस्थान हे नांव दिले. तो प्रदेश म्हणजे आज भिवंडी या नावाने ओळखला जातो. या राजाचा लष्करीतळ ज्या ठिकाणी असायचा ते ठिकाण स्थानक या नावाने ओळखले जाऊ लागले. आजचे ठाणे म्हणजेच त्यावेळचे स्थानक होय. शिवशाहीच्या काळात कल्याण, भिवंडी, मुरबाड वगैरे पूर्वभाग मराठ्यांकडे होता.

भारत देशात पहिली आगगाडी (रेल्वे) ही दि. १६ एप्रिल १८५३ साली मुंबई ते ठाणे (बोरीबंदर – ठाणे) मध्ये धावली आणि शहराचा चेहरामोहरा बदलायला सुरुवात झाली. अनेक स्थित्यंतरे घडत एक गाव ते आधुनिक शहर असा लौकीक ठाण्याला मिळाला.

सन २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्हा हा लोकसंख्येने देशामध्ये पहिल्या क्रमांकाचा महाजिल्हा आहे. सागरी, डोंगरी व नागरी अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना ठाणे जिल्ह्याला लाभली आहे. ठाणे जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. ६ महानगरपालिका, २ नगरपालिका, सिडको, एमआयडीसी आदी नियोजन प्राधिकरणे असलेला ठाणे हा राज्यातला एकमेव जिल्हा आहे. सर्वाधिक महसूल देणारा जिल्हा म्हणून ठाणे जिल्हा ओळखला जातो. सर्वाधिक धरणं असल्यामुळे **'पाणी पिकवणारा जिल्हा'** अशी ठाणे जिल्ह्याची ओळख आहे. **'शहापूर'** तालुका हा तर **'धरणांचा तालुका'** म्हणून ओळखला

जातो. केंद्र शासन अंगीकृत दारु गोळा व शस्त्र निर्मिती करणारा कारखाना अंबरनाथ या तालुक्यात आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी हे शहर हातमाग व यंत्रावर कपडे विणण्यासाठी प्रसिध्द आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने ठाणे जिल्ह्यात ०८ औद्योगिक वसाहती विकसीत केल्या आहेत. तीन राष्ट्रीय महामार्ग व तीन लोहमार्ग ठाणे जिल्ह्यातून जातात. **'तलावांचे शहर'** अशी ठाणे शहराची ओळख आहे. हाजीमलंगगड, गोरखगड, माहुली इ. ऐतिहासिक किल्ले ठाणे जिल्ह्यात आहेत. **(जिल्हाधिकारी, २०१५)**

**भौगोलिक स्थान :-**

ठाणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान पाहिल्यास हा जिल्हा १८°.४२' दक्षिण ते २०°.२०' उत्तर आणि ७२°.४५' पूर्व आणि ७३°.४८' पश्चिम या टप्यात येते. सन २०११ च्या जनगणनेनूसार सदर जिल्ह्यात ७ तालूके असून ८२१ खेडी असून ३१ शहरांचा समावेश आहे. जिल्ह्यात सरासरी २५७६ मिलीमीटर म्हणजे १०१.४ इंच इतका पाऊस पडतो.

संपूर्ण ठाणे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र ४२४१ चौ. कि. मी. मध्ये विखुरलेले असून जिल्ह्यातील वनक्षेत्र १२७४ चौ. कि. मी. इतके असून ते जिल्हा क्षेत्राच्या ३०.०४% इतके आहे.

महाराष्ट्र राज्यातील काही जिल्ह्यापैकी ठाणे हा एक कोकण विभागातील उत्तरेकडचा जिल्हा असून पूर्वेकडे असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगा व पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या किनारपट्टीच्या दरम्यान पसरला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ८०,७०,०३२ आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,२४१ चौ. कि.मी. असून ते राज्याच्या १.३७ टक्के आहे. जिल्ह्यातील ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, व भिवंडी या तालुक्याचे क्षेत्र औद्योगिकदृष्ट्या विकसित असून मुंबई शहराच्या आधुनिक संस्कृतीच्या प्रभावाखाली आहे. तर उर्वरीत शहापूर, आणि मुरबाड या तालुक्यांचा प्रदेश डोंगराळ असून ग्रामीण भाग आदिवासी वस्तीने व्यापलेला आहे. जिल्ह्याचा मध्य व पश्चिम भाग सखल व सपाट असून जमीन तांबूस व काळसर आहे. **(शर्मा, २००५)**

जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असला तरी वाढते औद्योगिकरण, शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजना व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामुळे रोजगार संधी उपलब्ध झाली आहे.

**क्षेत्रफळ :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,२४१ चौ. कि.मी. असून राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ०१.३७ टक्के आहे. क्षेत्रफळाचा विचार केला तर राज्यात जिल्ह्याचा १६वा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील ७ तालुक्यांपैकी शहापूर तालुक्याचे क्षेत्रफळ सर्वात जास्त असून ते १६२९ चौ. कि.मी. (१७.०४ टक्के) तर सर्वात लहान उल्हासनगर तालुका १३ चौ. कि.मी. (०.१४ टक्के) क्षेत्रफळाचा आहे. जिल्ह्यातील ठाणे व उल्हासनगर हे दोन तालुके पुर्णपणे शहरी आहेत. या दोन तालुक्यासह कल्याण, भिवंडी, अंबरनाथ व वसई हे तालुके तुलनात्मकदृष्ट्या विकसीत आहेत.

**प्रशासकीय विभाग :**

राज्यातील सहा प्रदेशिक विभागापैकी कोकण प्रादेशिक विभागात ठाणे जिल्ह्याचा समावेश आहे. प्रशासकीय नियंत्रण व दैनंदिन कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यातील ७ तालुके असून प्रशासकीय कामे सुलभ होण्याच्या दृष्टीने सद्य:स्थितीत एकूण तीन महसूल उपविभाग कार्यरत आहेत. ते पुढीलप्रमाणे ठाणे उपविभागांतर्गत ठाणे, कल्याण, व मुरबाड तहसिल, भिवंडी अंतर्गत भिवंडी व शहापूर तहसिल, आणि उल्हासनगर अंतर्गत उल्हासनगर व अंबरनाथ असे आहेत.

जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय ठाणे येथे असून जिल्ह्यातील कामकाजाच्या सोयीसाठी जव्हार येथे अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय कार्यरत आहे. ठाणे शहर मुंबई–आग्रा राष्ट्रीय महामार्गावर असून मध्य रेल्वेचे एक मोठे स्थानक आहे व ते मुंबई पासून ३४ कि.मी. अंतरावर आहे.

**जिल्ह्याच्या सीमा :**

महाराष्ट्र राज्यात ठाणे हा जिल्हा वायव्य दिशेला आहे. जिल्ह्याचा आकार त्रिकोणी स्वरुपाचा असून पूर्वेला सह्याद्री पर्वतरांगेला लागून पुणे व अहमदनगर हे दोन जिल्हे आहेत,

उत्तर पूर्वेला नाशिक जिल्हा तर पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेला जगप्रसिध्द व भारताचे आर्थिक राजधानी समजले जाणारे मुंबई शहर व रायगड जिल्हा आणि उत्तरेला पालघर जिल्हा अशा जिल्ह्याच्या चतु:सिमा आहेत. **(महाराष्ट्र, २००७)**

**भुपृष्ठ रचना :**

जमिनीच्या प्रकारानुसार भुपृष्ठाची प्रामुख्याने खालील विभागणी दिसून येते.

अ) काळी व वाळू मिश्रित जमीन ही ठाणे तालुक्यात आढळून येते. ही जमीन सुपीक असून ती मुख्यत: भाताचे पीक, भाजीपाला व फळबाग यांच्या लागवडीस योग्य आहे. नद्यांच्या काठावर व मुखाशी गाळाचे संचयन झाल्यामुळे गाळाची मृदा निर्माण झाली आहे. वाळू मिश्रित लोम प्रकारच्या या मृदेमध्ये सेंद्रिय द्रव्ये व ह्युमस यांचे प्रमाण जास्त असून पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते. ही मृदा सुपीक असून भातशेतीस विशेष उपयोगी आहे. या मृदेत नारळी पोफळीच्या बागा असून अनेक प्रकारच्या पालेभाज्यांचे उत्पादन घेतले जाते.

ब) तांबडी जमीन ही मुख्यत: पूर्वेकडच्या उतरणीवरील तालुक्यातील काही भागात आढळून येते. ही जमीन सुपिकतेच्या दृष्टिने कमी दर्जाची असल्याने नागली आणि वरी या सारख्या पिकांच्या लागवडीस उपयुक्त आहे.

क) तपकिरी लालसर जमीन ही बहुतेक किनारपट्टीच्या व सह्याद्री घाटमाथ्याच्या उतरणीच्या दऱ्या खोऱ्यातील पट्ट्यात आढळून येते. मुख्यत: भिवंडी, कल्याण व शहापूर तालुक्यातील अशी जमीन असून ती भात लागवडीस उपयुक्त आहे.

**नद्या :**

ठाणे जिल्ह्यात वैतरणा आणि उल्हास या दोन महत्वाच्या नद्या वाहतात. वैतरणा नदीचा उगम उत्तर पूर्वेलगतच्या नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक पायथ्यापासून होऊन नवहार खाडीजवळ समुद्राला मिळते. देहेरजा, सुर्या, पिंजळ, तानसा या उपनद्या शहापूर व वसई तालुक्यात वाहतात व वैतरणेला मिळतात. उल्हास नदी भोरमध्ये उगम पाऊन रायगड

जिल्ह्यामध्ये वाहून पुढे ठाणे जिल्हयातून वाहत जाऊन वसईच्या खाडीमध्ये समुद्राला मिळते. बार्वी, भातसा, काळू या तिच्या उपनद्या आहेत.

**हवामान :**

ठाणे जिल्ह्यात समुद्राजवळच्या भागात आर्द्र तर लांबच्या भागात कोरडे असे दोन प्रकारचे हवामान आढळते. जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात हवेत गारठा असतो. साधारणतः हवामान उष्ण व दमट असते. वार्षिक तापमान २३° ते ३१° से. इतके आढळते. समुद्रकाठच्या प्रदेशामध्ये पावसाळा जास्त असतो. पूर्वेकडे पाऊस कमी होत जातो. सरासरी २५० से.मी. इतका पाऊस जिल्ह्यामध्ये पडतो.

**पर्जन्यमान :**

महाराष्ट्रात तापमान, आर्द्रता व पर्जन्य याबाबतीत स्थल परत्वे बदल आढळतो. महाराष्ट्रातील तापमान, पर्जन्य व सापेक्ष आर्द्रता इ. घटकांचा विचार केल्यास महाराष्ट्राचे डॉ. त्रिवार्था यांच्या वर्गीकरण सूचीनूसार प्रामुख्याने खालील प्रमाणे तीन हवामान विभाग करता येतात.

१) उष्ण कटिबंधीय जास्त पर्जन्य हवामान विभाग

२) उष्ण कटिबंधीय अर्धशुक हवामानाचा प्रदेश

३) उष्ण कटिबंधीय दमट व कोरड्या हवामानाचा विभाग किंवा मान्सून हवामान प्रदेश

वरील वर्गीकरण सूचीनूसार ठाणे जिल्ह्याचा समावेश हा कोकणपट्टीतील जास्त पर्जन्य प्रदेशामध्ये होतो. जिल्ह्यात नैऋत्य मान्सून वाऱ्यापासून मुख्यतः पाऊस पडतो. सर्वसाधारणपणे जून ते सप्टेंबर हे पावसाळी महिने आहेत. सन २०११ मध्ये जिल्ह्यात सरासरी पाऊस २३२९ मि.मी. पडला.

**खनिज संपत्ती :**

जिल्ह्यात प्रमुख खनिजांचे उत्पादन होत नाही अथवा खाणीही नाहीत. दगडाच्या खाणी प्रामुख्याने ठाणे, भिवंडी व कल्याण शहरा नजीकच्या परिसरात आढळून येतात.

समुद्रातून रेती (वाळू) काढण्याचा व्यवसाय जिल्ह्यातील घोडबंदर, मुंब्रा, कल्याण, ठाणे या परिसरात चालतो.

**लोकसंख्या :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्या ८०,७०,०३२ इतकी असून त्यामध्ये पुरुष : ४३,१९,२९९ तर महिला : ३७,५०,७३३ आहेत. लोकसंख्येच्या बाबतीत ठाणे जिल्हा हा राज्यातील प्रथम क्रमांकावर असून राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ०९.८४ टक्के लोकसंख्या असलेला मोठा जिल्हा आहे. ७६.९९ टक्के नागरी लोकसंख्या असलेला ठाणे जिल्हा राज्यात मुंबई नंतर सर्वाधिक नागरीकरण झालेला आहे.

ठाणे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचीत जमाती प्रवर्गाची लोकसंख्या ६,४३,१११ असून त्यामध्ये पुरुष : ३,३२,७८० आणि महिला : ३,१०,३३१ आहेत तर अनुसूचीत जाती प्रवर्गाच्या लोकसंख्येमध्ये पुरुष : २,१६,९७४ आणि महिला : २,०७,४६९ आहेत.

ठाणे जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण व भिवंडी असे ०३ लोकसभेचे मतदार संघ (खासदार) आणि १८ विधानसभेचे मतदार संघ (आमदार) एवढे लोकप्रतिनिधी आहेत.

**दशवार्षिक वाढ :**

सन २००१ ते सन २०११ या दशकात जिल्ह्याच्या लोकसंख्येत ३५.९४ टक्के वाढ झाली असून ही वाढ राज्याच्या १५.९९ टक्के वाढीपेक्षा अधिक आहे.

**घनता :**

महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रापैकी ०३.११ टक्के क्षेत्र व्यापलेल्या ठाणे जिल्ह्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ०९.८४ टक्के व्यक्ती राहतात. हेच प्रमाण सन २००१ च्या जनगणनेनुसार ०८.४० टक्के इतके होते. ठाणे जिल्ह्याची लोकसंख्येची घनता प्रती चौ. कि.मी. ला ११५७ इतकी असून राज्याचे हेच प्रमाण केवळ ३६५ इतके आहे. सबंध राज्यातील लोकसंख्येच्या घनतेचा विचार करता मुंबई शहरानंतर ठाणे जिल्ह्याचा क्रमांक

लागतो. सदर जिल्ह्यात नागरीकरणाची पातळी ७६.९९% आहे. जिल्ह्यात ४.१८ टक्के अनुसूचित जाती तर १४.७५ टक्के अनुसूचित जमाती आहेत.

**साक्षरता :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ८६.१८ टक्के इतके असून राज्याचे हेच प्रमाण ८२.९१ टक्के इतके आहे. पुरुष व स्त्रिया यांचे जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ९०.९० टक्के व ८०.७८ टक्के इतके आहे. ठाणे जिल्हा साक्षरतेच्या बाबतीत राज्याच्या तुलनेत ९ व्या क्रमांकावर असून पुरुष स्त्री साक्षरता वर्गवारी केल्यास पुरुषांबाबत १३ व्या क्रमांकावर तर स्त्रियांबाबत ८ व्या क्रमांकावर आहे.

**स्त्री व पुरुष प्रमाण :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ८८० इतके असून सदर प्रमाण सन २००१ च्या जनगणनेनुसार ८५८ इतके होते. राज्याचे हेच प्रमाण ९२५ इतके आहे.

**वनसंपत्ती**

ठाणे जिल्ह्यातून पालघर जिल्हा वेगळा झाल्याने ठाणे जिल्हा शहरी भागात मोडतो. ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात जंगले आहेत. या जंगलात साग, शिसव, खैर, पळस, पांगारा, वड, आंबा, चिंच, माड, ऐन, हिरडा इत्यादी वनस्पती आढळतात. तसेच येथील जंगलामधून बांबू, गवत, इमारती लाकूड, डिंक, शिकेकाई, टेंभूर्णीची पाने, गवत, मेण, मध इत्यादींचे उत्पन्न मिळते.

**वाहतूक व्यवस्था**

ठाणे जिल्ह्यातून तीन राष्ट्रीय महामार्ग जातात.

१) मुंबई – आग्रा राष्ट्रीय महामार्ग (NH3) : या महामार्गावर ठाणे, भिवंडी, शहापूर ही प्रमूख ठिकाणे आहेत.

२) मुंबई–बंगळूर राष्ट्रीय महामार्ग (NH4) : हा मार्ग मुंबईहून सुरु होतो. या रस्त्यावर ठाणे खाडीवर मोठा पूल बांधला आहे. हा मार्ग वाशीवरुन रायगड जिल्ह्यातील पनवेलमार्गे बंगळूरला जातो.

३) मुंबई – अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग (NH8): या मार्गावर जिल्ह्यातील घोडबंदर, इत्यादी ठिकाणे आहेत.

तसेच ठाणे जिल्ह्यातून तीन लोहमार्ग जातात.

१) मुंबई – चेन्नई लोहमार्ग : जिल्ह्यात मध्य रेल्वेचे जाळे पसरलेले असून मध्य रेल्वे मुंबईहून निघून जिल्ह्यातील ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या रेल्वे स्थानकांवरुन पुणेमार्गे चेन्नईकडे जातो.

२) मुंबई – कोलकत्ता लोहमार्ग : या लोहमार्गावर ठाणे, कल्याण, शहाड, टिटवाळा, आसनगाव, खर्डी व कसारा ही रेल्वे स्थानके आहेत.

३) वसई – दिवा लोहमार्ग : मुंबई–दिवा जंक्शन मार्गे मेंगलोर हा एक पदरी रेल्वे मार्गावर वाहतूक तसेच मध्य व पश्चिम रेल्वेला जोडणारा दिवा जंक्शन ते वसई रोड अशी वाहतूकही सूरु आहे. **(जिल्हा सांख्यिकी, २०१३)**

**औद्योगिक माहिती**

ठाणे जिल्ह्यात एकूण ७ तालूके असून त्यामध्ये २ शहरी तालूके, ३ अंशत: शहरी तालुके तर २ ग्रामीण तालुके आहेत. औद्योगिक दृष्ट्या अंबरनाथ, मुरबाड, कल्याण, भिवंडी ह्या तालुक्यांमध्ये लहान व कुटीर उद्योग करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्याबाबत भर देण्यात आला आहे. सातव्या पंचवार्षिक योजनेखाली दाखविलेल्या सर्व योजना आठव्या पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. केंद्र शासन अंगीकृत दारु गोळा व शस्त्र निर्मिती करणारा कारखाना अंबरनाथ या तालुक्यात आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी हे शहर हातमाग व यंत्रावर कपडे विणण्यासाठी प्रसिध्द आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने ठाणे जिल्ह्यात ०८ औद्योगिक वसाहती विकसित केल्या आहेत.

**एकूण तालुक्यांची माहिती :**

दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे व पालघर जिल्हा असे दोन जिल्हे झाल्यामुळे ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले. पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी ७ तालुके ठाणे जिल्ह्यात येतात ते पुढीलप्रमाणे ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर व मुरबाड असे आहेत.

**तक्ता क्र. ३.१**

**ठाणे जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची भौगोलिक क्षेत्र दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | तहसिल | भैगोलिक क्षेत्र | | एकूण गावे | एकूण शहरे | एकूण ग्रामपंचायत | सन २०११ नुसार जनगणना |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ($Km^2$) | (Sq. Miles) | | | | |
| १. | ठाणे | १४७.०० | ५७.०० | १४ | ३ | ०० | ३७,८७,०३६ |
| २. | कल्याण | १३७.१५ | ५२.९५ | ८७ | ३ | २२८ | १५,६५,४१७ |
| ३. | उल्हासनगर | ३३.७० | १३.०० | ०० | ०१ | ०० | ५,०६,०९८ |
| ४. | अंबरनाथ | ३८.०० | १५.०० | ७६ | ३ | ६९ | ५,६५,३४० |
| ५. | भिवंडी | १२७.१० | ४९.०६ | २१३ | १४ | २२० | ११,४१,३८६ |
| ६. | शहापूर | ६७.०० | २५.८७ | २२५ | ६ | २२८ | ३,१४,१०३ |
| ७. | मुरबाड | २१.५० | ०८.२८ | २०६ | १ | २०६ | १,९०,६५२ |
| | एकूण | ५७१.४५ | २२१.१६ | ८२१ | ३१ | ९५१ | ८०,७०,०३२ |

स्रोत : जिल्हा संख्यिकी कार्यालय, ठाणे

**१) ठाणे तालुका :**

ठाणे हे जिल्ह्याचे व तालूक्याचे मुख्य ठिकाण आहे. तसेच मुंबईच्या मध्य रेल्वे उपनगरीय मार्गावरील एक स्थानक आहे. हे व्यापारी पेठ म्हणून प्रसिध्द आहे. येथे अनेक उद्योगधंदे आहेत. लोकरी व सुती कापडाच्या गिरण्या तसेच कागद, रंग व धातूची उपकरणे, यंत्रे व लोखंडी सामानाचे कारखाने आहेत. येथील कोपिनेश्वराचे मंदिर प्रसिध्द आहे. ठाणे बंदर असून उल्हास नदीच्या मुखाशी तयार झालेल्या खाडीच्या काठावर वसलेले आहे. येथील खाडी ठाण्याची खाडी म्हणून ओळखली जाते. ठाणे व दिवा यांच्या दरम्यान पारसिकचा १.५ कि.मी. लांबीचा बोगदा प्रसिध्द आहे. भारतातील पहिली रेल्वे बोरीबंदर (सध्याचे छत्रपती

शिवाजी टर्मिनल), ते ठाणे दरम्यान दि. १६ एप्रिल १८५३ साली धावली. ठाणे जिल्ह्यात महानगरपालिकेची स्थापना दि. १ ऑक्टोबर १९८२ साली झाली. ठाण्यातील मासुंदा तलाव हा सर्वांत सुंदर तलाव आहे. सन २०११ च्या जनगणनेनूसार ठाणे तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः २०,२२,९४९ व महिला :१७,६४,०८७ मिळून एकूण ३७,८७,०३६ एवढी आहे. **(गगराणी, २००२)**

**२) कल्याण तालुका :**

हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून महत्वाचे जंक्शन आहे. हे उपनगरीय वाहतूक त्याचप्रमाणे लांब पल्ल्याच्या लोहमार्ग वाहतूकीसाठी अतिशय महत्वाचे आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनस येथून सुरु होणारी मध्य रेल्वेची लाईन कल्याण जंक्शन येथे दोन भागांमध्ये विभाजीत होते. येथून कर्जत आणि कसारा या दोन भागात रेल्वे लाईन विभागली गेल्यामुळे या स्थानकाला फार महत्व आहे.

विशेष म्हणजे इ. स. १०५० मध्येही याचे नाव कल्याण असेच होते. इतर गावांच्या नावाप्रमाणे त्यात बदल झाला नाही हे विशेष. हे शहर उल्हास नदीजवळ वसलेले असून ठाणे खाडी व वसई खाडीव्दारे अरबी समुद्राशी जोडले गेले आहे. मुंबईत वाढणारी प्रचंड गर्दी तसेच शासनाचे अनुकूल धोरण या सर्व घटनांमूळे उद्योजक या शहराकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. मुंबई शहरापासून जवळ पण प्रदूषणाची पातळी मात्र कमी असे याचे वैशिष्ट्ये सांगता येईल. येथे भात गिरण्या, मोटारीचे सुटे भाग तयार करण्याचे कारखाने कल्याण परिसरात आहेत. येथून रेती विटा व तांदळाची निर्यात जलमार्गाने केली जाते. येथून ३२ कि.मी. अंतरावर असलेला मलंगगड डोंगरावर हाजी मलंग बाबांचा प्रसिध्द दर्गा आहे. जवळच शहाड येथे सुप्रसिध्द बिर्ला मंदिर आहे. **(पाटिल आणि हांडे, २०१३)** सन २०११ च्या जनगणनेनूसार कल्याण तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः ८,२०,४९२ व महिला : ७,४४,९२५ मिळून एकूण १५,६५,४१७ एवढी आहे.

**३) उल्हासनगर तालुका :**

हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून ते उल्हास नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. कल्याण व अंबरनाथ या दोन शहरांमध्ये उल्हासनगर शहराचा विस्तार आहे. हा विस्तार

उल्हासनगर एक ते उल्हासनगर पाच असा आहे. **'सिंधूनगर'** असेही याला म्हणतात. उल्हास नदीमूळे उल्हासनगर हे नाव जास्त प्रसिध्दीस आले आहे. काही लोक उल्हासाचे, आनंदाचे नगर असेही याला म्हणतात. उल्हासनगरचा इतिहास थोडासा नजरेखालून घालणे आवश्यक आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर त्याचे दोन तुकडे झाले. एक हिंदुस्थान व दुसरा पाकिस्तान. पाकिस्तानातील सिंध प्रांतात राहणाऱ्यांना सिंधी म्हणत. यातील नेमक्या हिंदूवर अनन्वित अत्याचार झाले परिणामी शरणार्थी म्हणून सिंधी लोकांच्या झुंडीच्या झुंडी भारतात आल्या. त्यातील जवळपास १ लाख सिंधी लोकांना कल्याणपासून ५ कि.मी. अंतरावरील शरणार्थी छावणीमध्ये ठेवण्यात आले. नंतर सन १९४९ मध्ये या परिसराला तालुक्याचा दर्जा देऊन उल्हासनगर हे यांनी केले. सन १९५५ मध्ये उपनगरीय रेल्वेस्टेशन येथे आले. सन १९६० मध्ये नगरपालिका आणि आता तर येथे महानगरपालिका आहे. येथे रेडिओचे व प्लास्टिकच्या वस्तू तयार करण्याचे कारखाने आहेत. एक व्यावसायिक शहर म्हणून उल्हासनगरची भरभराट झाली आहे. आपल्यावरील पाकिस्तानी अत्याचाराच्या बदल्यात भरपूर काम करण्याचा वसा येथील सिंधी समाजाने घेतला आहे. **(जाधव, २०१५)** सन २०११ च्या जनगणनेनूसार उल्हासनगर तालुक्यांची लोकसंख्या पुरुष: २,६९,०४८ व महिला : २,३७,०५० मिळून एकूण ५,०६,०९८ एवढी आहे.

**४) अंबरनाथ तालुका :**

अंबरनाथ तालुक्यात मुंबई–पुणे लोहमार्गावरील प्रमुख शहर आहे. येथील अंबरेश्वराच्या क्षेत्रामुळे या स्थळास अंबरनाथ हे नाव पडले आहे. येथे रसायने, आगपेट्या, दारुगोळा, घड्याळे इ. वस्तूंचे कारखाने आहेत. धरमसी मोरारजी केमिकल को. लि. चा पहिला सल्फ्यूरिक ॲसिडचा कारखाना येथे असून तो आशियातील सर्वात मोठा कारखाना आहे. येथे प्राचीन शिवालय असून ते प्रेक्षणीय आहे. ते शिलाहार राजांनी ११ व्या शतकात बांधलेले असून पुरातन हेमाडपंथी शैलीचे मंदिर आहे. या मंदिरातील शिवलिंग स्वयंभू आहे. हे मंदिर जमिनीच्या पातळीवर बांधलेले आहे. अंबरनाथ हे मुंबई उपनगरी रेल्वेचे एक स्थानक आहे. **(कणेर, २०१५)** सन २०११ च्या जनगणनेनूसार अंबरनाथ तालुक्यांची लोकसंख्या पुरुष: २,९५,३५८ व महिला : २,६९,९८२ मिळून ५,६५,३४० एवढी आहे.

**५) भिवंडी तालुका :**

भिवंडी हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून ते ठाण्यापासून १५ कि.मी. अंतरावर आहे. मुंबई – आग्रा महामार्गावरील प्रमुख शहर आहे. भिवंडी हे यंत्रमाग व हातमागावरील कापडासाठी प्रसिध्द आहे. कापड व्यवसायामुळे भारताचे मँचेस्टर म्हणून या शहराचा कौतुकाने उल्लेख होतो. नामांकित औषधी कंपन्यांचे येथे मोठमोठे गोदाम आहेत. भिवंडी भारतातील सर्वात मोठे हातमागावरील केंद्र बनले आहे. येथे गालीचे व रेशमी कापड तयार केले जाते. भात गिरण्यांसाठी लागणारी यंत्रे भिवंडी परिसरात तयार केली जातात. येथे भात गिरण्या व लाकडाच्या वखारी आहेत.**(भोईर, २०१५)** सन २०११ च्या जनगणनेनूसार भिवंडी तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः ६,५३,७५८ व महिला : ४,८७,६२८ मिळून ११,४१,३८६ एवढी आहे.

**६) शहापूर तालुका :**

आज शहापूर म्हणून ओळखला जाणारा तालुका पूर्वी म्हणजे सुमारे दीड शतकापूर्वी 'कोळवण' तालुका म्हणून संबोधला जात होता. इ.स १८८० मध्ये कोळवण तालुका शहापूर तालुका म्हणून संबोधला जातो.

स्वातंत्र्याची पहाट उजाडली, तेव्हा ठाणे जिल्ह्यातील इतर अनेक गांवाप्रमाणेच शहापूरही तसं मागासलेलंच होतं. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी उपविभागात समाविष्ट करण्यात आलेला शहापूर तालुका क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा तालुका आहे. एकूण क्षेत्रफळ १,५४,२७० हेक्टर म्हणजे १९३९ चौ. कि.मी. आहे. सन २०११ च्या जनगणनेनूसार शहापूर तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः ३,१४,१०३ व महिला : १,६०,४६६ मिळून ३,१४,१०३ एवढी आहे.

सह्याद्रीच्या पर्वत रांगांतील डोंगरांनी वेढलेल्या शहापूर तालुक्याच्या उत्तरेस नाशिक जिल्हा आहे तर पूर्वेस नगर जिल्हा आहे. दक्षिणेस मुरबाड, कल्याण, भिवंडी हे तालुके तर पश्चिमेस वाडा तालूका आहे. आदिवासींची लोकसंख्या जास्त असल्याने शासन दरबारी आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. ठाकुर, वारली, कोकणा, कातकरी, काथोडी, महादेव कोळी या आदिवासी जमाती शहापूर तालुक्यातील आदिवासी जमातींपैकी आहेत.

मुंबई – आग्रा हा राष्ट्रीय मार्ग क्र. ३ शहापूर तालुक्यातून जात असून संपूर्ण तालुक्यातील त्याची लांबी ६५ कि.मी आहे. आणि मुंबई – कसारा हा रेल्वे मार्ग शहापूर तालुक्यातून जातो. मुख्य म्हणजे आसनगाव रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळ असलेलं हे गाव मुंबईपासून दोन तासांच्या अंतरावर आहे. मुंबई – आग्रा महामार्ग आणि मुंबई – कल्याण – कसारा – इगतपूरी रेल्वे मार्गामुळे तालुक्याचा विकास होण्यास मदत झाली. सन १८५५ मध्ये वासिंद म्हणजेच शहापूर (त्यावेळचा कोळवण) तालुक्याला रेल्वे आली. पण अगदी गेल्या दहा वर्षापर्यंत आसनगाव कसाऱ्यापर्यंत येणाऱ्या लोकलगाड्यांची संख्या नगण्य होती. शिवाय मुंबापुरीची तहान भागवणारं हे गाव. पण तरी ते दळणवळण, शिक्षण अशा अनेक बाबतीत मागासलेलंच होतं. शहापूर तालुक्यातील भातसा, तानसा आणि वैतरणा या तीन जलाशयामधून मुंबईचा पाणीपुरवठा होतो. तरीही आजतागायत हे एक उपेक्षित गाव म्हणूनच ओळखलं जातं. तालुक्यातील दुर्गम डोंगराळ प्रदेश एकमेकांशी जोडलेले आहेत. समुद्रसपाटी पासून शहापूर तालुक्याची उंची ७५ मीटर (२२५ फूट) आहे.

शहापूरचे हवामान साधारणपणे उष्ण व दमट आहे. नैऋत्य मौसमी वाऱ्यापासून होणाऱ्या पावसाचे प्रमाण सरासरी २००० मि. मि. आहे. भरपूर पाऊस आणि सदाहरीत जंगले यासाठी तालुक्याला प्रसिध्दी मिळाली आहे. वासिंदच्या आसपासचे जंगल हे शिकाऱ्यांचं खास मैदान आता ते जंगल नुसतं आठवणीत राहिलंय. काळानुसार परिस्थितीत स्थित्यंतरं होत असतात. शहापूर झपाट्यानं बदलतंय, वाढतंय. औद्योगिकरण, आधुनिकीकरणाचे परिणाम दिसायला लागलेत. **(कूलकर्णी, २००६)**

**७) मुरबाड तालुका :**

हे तालुक्याचे ठिकाण असून कल्याणपासून टोकावडे गावापर्यंत हा तालुका पसरलेला आहे. तालुक्यात प्रामुख्याने आदिवासी व ठाकर समाजाची वस्ती आहे. पर्यटक प्रिय असलेला माळशेज घाट याच तालुक्यात येतो. मुंबई व जवळपासच्या ठिकाणांहून छोट्या सहलींसाठी बरेच पर्यटक या परिसरात येतात. ठाणे जिल्हातील मुरबाड तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र पाहता बहुतेक ठिकाणे अती दुर्गम भाग आहेत. तसेच कित्येक भाग हा अनेक अडचणींना सामोरे जात आहे. सन २०११ च्या जनगणनेनूसार मुरबाड तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः ९७,२२८ व महिला : ९३,४२४ मिळून १,९०,६५२ एवढी आहे.

**तक्ता क्र. ३.२.**

**ठाणे जिल्ह्यातील तालुकानिहाय, स्थापना वर्षाप्रमाणे, नॅक मानांकन महाविद्यालयांचा तक्ता.**

| अ. क्र. | तालुका | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | स्थापना वर्ष | नॅक श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | Principal,<br>B. N. Bandodkar College of Science<br>'Jnanadweep' Chendani, Thane (W)<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |
| २ | ठाणे | Principal,<br>Joshi Bedekar College of Arts & Commerce<br>Chendani Bunder Road, Creek Land,<br>Near CIDCO Bus Stop, Thane (W)<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |
| ३ | ठाणे | Principal,<br>Motilal Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce<br>Amalendu Roye Marg, Sector 9 A, Plot No. 53, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane,<br>Pincode 400703 | १९७८ | ब++ |
| ४ | ठाणे | Principal,<br>Rayat Shikshan Sanstha's<br>Karmveer Bhaurao Patil College,<br>Sector - 15 A, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane,<br>Pincode 400703 | १९७९ | अ |
| ५ | ठाणे | Principal,<br>Dnyanasadhana College of Arts, Commerce & Science<br>Off. Eastern Express Highway, Dnyanasadhana Marg,<br>Near Eternity Mall, Dist. Thane,<br>Pincode : 400604 | १९८० | ब |
| ६ | ठाणे | Principal,<br>N.K.T. College of Commerce and Arts<br>Near C.K.P. Hall, Behind Collector Office, Kharkar Ali, Thane (W), Dist. Thane,<br>Pincode : 400601 | १९९० | ब |
| ७ | ठाणे | Principal,<br>Karnataka Sangha's<br>Manjunath College of Commerce<br>Kanchangaon, Khambalpada, Thakurli (E), Dist. Thane,<br>Pincode : 421201 | १९९९ | ब |
| ८ | ठाणे | Principal,<br>Smt. Janakibai Rama Salvi College of Arts, Commerce & Science<br>Manisha Nagar, Kalwa (W) Dist. Thane,<br>Pincode : 400605 | २००३ | ब |
| ९ | कल्याण | Principal,<br>Birla College of Arts, Science & Commerce<br>Birla College Road, Kalyan (W) Dist. Thane,<br>Pincode: 421304 | १९७२ | अ |
| १० | कल्याण | Principal,<br>Dombivli Shikshan Prasarak Mandal's<br>K. V. Pendharkar College of Arts, Science & Commerce.<br>Plot No. SPL-4, Opp. MIDC Office, Dombivli (E) Tal. Kalyan Dist. Thane, Pincode : 421203 | १९७९ | ब |
| ११ | कल्याण | Principal,<br>Model College<br>P-32, Residential Area, M.I.D.C. Dombivli (E), Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode : 400703 | १९८९ | अ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | कल्याण | Principal,<br>K. M. Agrawal College of Arts, Commerce & Science<br>Padgha Road, Gandhare, Kalyan (W), Dist. Thane,<br>Pincode : 421301 | १९९४ | अ |
| १३ | कल्याण | Principal,<br>Pragati College of Arts & Commerce,<br>Datta Nagar, Pragati College Road, Dombivli (E) Tal.<br>Kalyan, Dist. Thane, Pincode : 421201 | १९९७ | ब |
| १४ | कल्याण | Principal,<br>Rashtriya Shikshan Sanstha's<br>Swami Vivekanand Night College of Arts & Commerce.<br>Chhatrapati Bhavan, Ayare Road, Dattanagar, Dombivli (E), Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode : 421201 | १९९८ | ब |
| १५ | कल्याण | Principal,<br>Laxman Devram Sonawane College<br>Opp. Fire Station, Near Durgadi Kille, Murbad Road,<br>Kalyan (W), Dist. Thane, Pincode : 421302 | २००३ | ब |
| १६ | कल्याण | Principal,<br>Jeevandeep Shaikshnik Sanstha<br>Poi's Arts, Commerce & Science College<br>At. Goveli, Post : Rayate, Tal. Kalyan, Dist. Thane,<br>Pincode 421301 | २००४ | क |
| १७ | उल्हासनगर | Principal, R. K. Talreja College of Arts, Science and Commerce<br>Opp. A-1, Sweets Shop, Shivaji Chowk, Ulhasnagar-3,<br>Dist. Thane, Pincode : 421003 | १९६१ | ब+ |
| १८ | उल्हासनगर | Principal,<br>J. Watumull Sadhubella Girls College,<br>Near Govt. Dispensary, Ulhasnagar, Dist. Thane,<br>Pincode: 421001 | १९९४ | क++ |
| १९ | अंबरनाथ | Principal,<br>P. D. Karkhanis College of Arts & Commerce<br>Near Bhausaheb Paranjpe High School, Kansai Section,<br>Ambarnath (E) Dist. Thane, Pincode : 421501 | १९८६ | ब |
| २० | अंबरनाथ | Principal,<br>Bharat College of Commerce<br>Hendrepada, Kulgaon, Badlapur (W), Dist. Thane,<br>Pincode : 421503 | १९९१ | ब+ |
| २१ | अंबरनाथ | Principal,<br>Adarsh College of Arts & Commerce,<br>At post – Kulgaon, Near Kulgaon, Badlapur Muncipal Council Office, Tal. Ambernath, Dist. Thane Pincode : 421503 | १९९५ | ब |
| २२ | भिवंडी | Principal,<br>Bhiwandi Nizampur Nagarpalika Arts, Science & Commerce College<br>Dhamankar Naka, Varaldevi Road, Vidyashram,<br>Kamatghar, Tal. Bhiwandi, Dist. Thane Pincode : 421305 | १९६६ | ब+ |
| २३ | भिवंडी | Principal,<br>G. M. Momin Women's College,<br>Rais High School Campus, Thane Road, Bhiwandi, Dist. Thane, Pincode : 421302 | १९८९ | अ |
| २४ | शहापूर | Principal,<br>Sonubhau Baswant College of Arts & Commerce,<br>N. P. Vasa Marg, Savroli Road, Shahapur, Dist. Thane,<br>Pincode : 421601 | १९८४ | ब |
| २५ | मुरबाड | Principal,<br>J.S.M's Arts, Commerce & Science College<br>At. Gandhi Camp, Shivle, Post Shivle, Tal. Murbad, Dist. Thane Pincode : 421401 | १९८९ | ब |

## ३.४ पालघर जिल्ह्याचा समग्र आढावा :

**पालघर जिल्ह्याचा संक्षिप्त इतिहास :**

मुंबई शहरापासून १०० कि. मी. अंतरावर असलेला पालघर जिल्हा हा निसर्ग सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे. नागरी, डोंगरी व सागरी अशा तिन्ही प्रकारची भौगोलिक परिस्थिती असलेला हा जिल्हा आहे. अप्रतिम निसर्ग सौंदर्याचे वरदान या जिल्ह्याला लाभले आहे.

पूर्वीच्या अखंड ठाणे जिल्ह्यातील काही तालुके वेगळे करुन सागरी, डोंगरी अन नागरी अंग असलेल्या देशातील सर्वात मोठ्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन दि. ०१ ऑगस्ट २०१४ ला **'पालघर'** हा महाराष्ट्रातील ३६ वा जिल्हा म्हणून अस्तिवात आला. एकिकडे अरबी समुद्र तर दुसरीकडे सह्याद्रीच्या रांगा अशा दुहेरी प्राकृतिक वैशिष्ट्यांनी पालघर जिल्हा नटलेला आहे. वैशिष्ट्यपूर्ण **आदिवासी संस्कृती** हे या जिल्ह्याचे महत्तवाचे वैभव आहे. जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवणारी वारली चित्रकला आणि सुंदर नृत्याविष्कार तारपा नृत्य ही या जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख आहे.

जिल्ह्याचा प्राचीन इतिहास प्रामुख्याने ठाणे जिल्ह्याशी संलग्न आहे. पालघर जिल्ह्यातील जव्हार, वसई व पालघर तालुक्यांना सोनेरी इतिहासाचा वारसा आहे. वसई तालूक्यावर पूर्वी पोर्तुगीजांचे साम्राज्य होते. चिमाजी अप्पांनी वसई जिंकून पोर्तुगीज साम्राज्यावर मराठी झेंडा रोवला. इतिहास प्रसिध्द वसईचा भूईकोट किल्ला, अर्नाळा (सागरी)इ. किल्ले याच जिल्ह्यात आहेत. **(बालवाड, २०१५)** स्वातंत्र्यपूर्व काळात पालघर जिल्हा स्वातंत्र्यसंग्रामात अग्रणी होता. देशभक्तीचा जाज्वल्य वारसा जिल्ह्याने जपलेला आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये 'सन १९४२ च्या चलेजाव' आंदोलनामध्ये पालघर एक महत्वाचे केंद्र होते. इंग्रज साम्राज्याशी लढा देण्यासाठी पालघर तालुक्यात दि. १४ ऑगस्ट १९४२ रोजी पालघर येथे उठाव झाला होता. या उठावात काशिनाथ हरी पागधरे, गोविंद गणेश ठाकूर, रामचंद्र भिमाशंकर तिवारी, रामचंद्र महादेव चुरी, सुकूर गोविंद मोरे हे हुतात्मे झाले. या शहीदांची स्मृती म्हणून पालघर शहरामधील चौकासा नाव देऊन हुतात्मा स्मृती स्तंभ उभारलेला आहे. तसेच सन १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी पालघर तालुक्यातील वडराई ते सातपाटी पासून अनेक कार्यकर्ते सत्याग्रहात सहभागी झाले होते.

सातपाटी या ठिकाणी परदेशी मालाची होळी करण्यात आली होती. जव्हार येथे राजे मुकणे यांचे स्वतंत्र संस्थान होते. जव्हार येथील राजवाडा मुकणे यांच्या साम्राज्याची अजुनही साक्ष देत आहे. **(दांडेकर, १९६१)** जिल्ह्यातील वीज निर्मिती करण्याचा देशातील पहिला अणूउर्जा प्रकल्प पालघर तालुक्यातील तारापूर येथे आहे.

जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असला तरी वाढते औद्योगिकरण, शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजना व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामुळे रोजगारांची संधी उपलब्ध झाली आहे. पालघर जिल्ह्यातील सांस्कृतिक परिस्थिती महाराष्ट्रातील सांस्कृतिक परिस्थितीपेक्षा काही वेगळी नाही. फरक आहे तो आदिवासी व किनाऱ्यावरील समाजाच्या चालीरीतीत. पालघर जिल्ह्याचा निम्याहून अधिक भाग वारली, ठाकूर, कोकणा, कातकरी, मल्हार कोळी इ. जमातींनी व्यापलेला आहे.

वारली चित्रकला आणि प्रसिध्द तारपा नृत्य हे आदिवासींनी जपलेले सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. वारली चित्रकलेस ११०० वर्षाचा प्राचीन इतिहास आहे. या चित्रशैलीत आदिवासींचे जीवनरंग प्रतिबिंबीत होतात. या चित्रांसाठी वापरले जाणारे रंग पूर्णपणे नैसर्गिक असल्याने या चित्रकलेस देशांतून तसेच विदेशांतून मोठी मागणी आहे. वारली चित्रकला आणि तारपा नृत्य ही त्यांच्या समाजजीवनाची ओळख आहे.

वारली चित्रकलेमध्ये आदिवासी समाज्याच्या विविध चालीरिती तसेच दैनंदिन होणाऱ्या घडामोडी, आदिवासींच्या दैनंदिन जीवनात होणारे प्रसंग उदा. लग्न, नृत्य, विविध सण, निसर्गातील घडामोडी अशा प्रकारचे प्रसंग उत्तम प्रकारे चित्ररुपाने दाखवले जातात. सदर चित्रे कुठल्याही प्रकारच्या रासायनिक रंग न वापरता व बांबुच्या काड्यांचे ब्रश वापरुन काढली जातात. सदर कला आदिवासींच्या जीवनशैलीच्या विविध पैलुंवर प्रकाश टाकणारी चित्रकला असून या चित्रकलेला भारतात तसेच परदेशात खूप मागणी आहे.

शेतीबरोबरच किनारपट्टीमुळे मत्स्यव्यवसायातही जिल्हा अग्रेसर आहे. अनेक ऐतिहासिक किल्ले व प्रशस्त समुद्रकिनाऱ्यामुळे पालघर जिल्हा पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरत आहे तसेच जिल्ह्यात काही भाग वगळता नागरिकरणाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे नव्याने निर्माण झालेला पालघर जिल्हा एक कृषीसंपन्न जिल्हा होण्याकडे वाटचाल करत आहे. **(जिल्हाधिकारी, २०१५)**

**भौगोलिक स्थान :-**


पालघर जिल्ह्याचे भौगोलिक स्थान पाहिल्यास हा जिल्हा १९°.६९′ अक्षांश ते ७२°.७७′ या टप्प्यात येते. पालघर हा एक कोकण विभागातील उत्तरेकडचा जिल्हा आहे. दक्षिणेकडे उल्हास नदीचे खोरे तर उत्तरेस डोंगराळ वैतरणा नदीचा भुप्रदेश आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ५, ७,६६ चौ. कि. मी. असून त्यामध्ये सन २०११ च्या जनगणनेनूसार सदर जिल्ह्यात ८ तालुके असून ९०३ खेडी असून २० शहरांचा समावेश आहे.

पूर्वेकडे ठाणे आणि नाशिक जिल्हे तर पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेला मुंबई, ठाणे जिल्हा आणि उत्तरेला वलसाड जिल्ह्याच्या (गुजरात राज्याचा) घनदाट अरण्याचा भाग अशा जिल्ह्याच्या चतु:सिमा आहेत.

**भौगोलिक स्थान व स्वाभाविक रचना :**

**आकृती क्र. ३.१**

**भौगोलिक रचनेनुसार जिल्ह्याचे विभाग दर्शविणारी आकृती.**




पालघर जिल्ह्याची भौगोलिक रचना पाहता साधारणपणे तीन भौगोलिक विभाग पडतात. या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम तेथील लोकांचे राहणीमान व व्यवसाय यावर झालेला दिसून येतो. पहिला भौगोलिक विभाग हा सह्याद्रीच्या डोंगर रांगाकडील असून तो **'जंगलपट्टी'** या नावाने ओळखला जातो. यामध्ये प्रामुख्याने जव्हार, मोखाडा, विक्रमगड हे तालुके मोडतात. या जंगलपट्टी भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे.

या भागात प्रामुख्याने भात व नांगली यांची शेती केली जाते. अलिकडच्या काळात हळद लागवडीचा प्रयोग देखील यशस्वी झालेला दिसून येतो. याशिवाय जंगलातील लाकू डफाटा गोळा करणे व जंगलातील मध, लाख, व औषधी वनस्पती इत्यादी गौण उत्पादने गोळा करणे हा देखील व्यवसायाचा एक भाग आहे.

दुसरा भौगोलिक विभाग **'बंदरपट्टी'** म्हणून ओळखला जातो. यामध्ये वसई, पालघर, डहाणू, तलासरी हे तालुके मोडतात. थोडक्यात वसई, पालघर, डहाणू या तालुक्यांना विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या ७२० कि. मी. किनाऱ्यापैकी ११२ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा जिल्ह्याला लाभला असून मत्स्यव्यवसाय हा प्रमुख व्यवसाय आहे. तसेच त्यावर आधारीत मासे सुकविणे, कोळंबी संवर्धन प्रकल्प इत्यादी व्यवसाय केले जातात. पालघर तालुक्यातील सातपाटी, दातिवरे, मुरबे, नवापूर, दांडी, आलेवाडी, नांदगांव बंदर, तसेच वसई तालुक्यातील नायगांव, पाचु बंदर, किल्ला बंदर, अर्नाळा तसेच डहाणू तालुक्यामधील बोर्डी, चिंचणी व डहाणू या ठिकाणी मासेमारीची प्रमुख बंदरे आहेत. किनारपट्टी लगतच्या लहान मोठ्या गावातून मासेमारी व्यवसाय केला जातो. त्याचप्रमाणे भूजल मासेमारीसाठी हे क्षेत्र अनुकूल आहे. मासळीवरील प्रक्रिया व साठवणूक करण्यासाठी जिल्ह्यात शीतगृहे आहेत. सागरी मासेमारी बरोबरच भूजल मासेमारी केली जाते. पालघर तालुक्यातील सातपाटी येथून पापलेट व कोळंबी या माशांची निर्यात केली जाते.

तिसरा भौगोलिक विभाग **सपाटीचा प्रदेश** म्हणून ओळखला जातो यामध्ये वाडा तालुका मोडतो. जिल्ह्यातील सपाट पठारी प्रदेशामध्ये औद्योगिक पट्टे अस्तित्वात आहेत. यामध्ये मुख्यत: कापड उद्योग, रासायनिक कारखाने, अभियांत्रिकी उद्योग, स्टील उद्योग, इत्यादींचा समावेश आहे. बोईसर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक विभागात टाटा स्टील, जेएसडब्लू स्टील, विराज स्टील यासारख्ये पोलाद निर्मिती करणारे कारखाने आहेत. तसेच डि–डेकॅार, सियाराम यासारख्या कापड निर्मिती करणाऱ्या कंपन्या आहेत. **(दास्ताने, २०११)**

या उद्योगामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व पूरक व्यवसाय निर्मिती झालेली आहे. तसेच येथून मोठ्या प्रमाणात निर्यात होऊन परकीय चलन मिळते. त्याचप्रमाणे वसई तालुक्यातील वसई, विरार, नालासोपारा या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र विकसित झालेले आहे. डहाणू तालुक्यातील चिंचणी व पालघर तालुक्यातील तारापूर येथे घरोघरी पारंपारिक डायमेकींग हा प्रमुख व्यवसाय केला जातो.

जिल्ह्यातील पालघर, वाडा व वसई या तालुक्याचे क्षेत्र औद्योगिकदृष्ट्या विकसित असून मुंबई शहराच्या आधुनिक संस्कृतीच्या प्रभावाखाली आहे. तर उर्वरीत डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड या तालुक्यांचा प्रदेश डोंगराळ असून ग्रामीण भाग आदिवासी वस्तीने व्यापलेला आहे.

**क्षेत्रफळ :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४,६९६.९९ चौ. कि.मी. असून राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ०१.५२ टक्के आहे. क्षेत्रफळाचा विचार केला तर राज्यात जिल्ह्याचा १६वा क्रमांक लागतो. जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी पालघर तालुक्याचे क्षेत्रफळ सर्वात जास्त असून ते १०२३.०३ चौ. कि.मी. (२१.७० टक्के) तर सर्वात लहान तलासरी तालुका २६७.१८ चौ. कि.मी. (०५.६८ टक्के) क्षेत्रफळाचा आहे.

**प्रशासकीय विभाग :**

राज्यातील प्रादेशिक विभागापैकी कोकण प्रादेशिक विभागात पालघर जिल्ह्याचा समावेश आहे. प्रशासकीय नियंत्रण व दैनंदिन कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्यातील ८ तालुके असून प्रशासकीय कामे सुलभ होण्याच्या दृष्टीने सद्यस्थितीत एकूण दोन महसूल उपविभाग कार्यरत आहेत. ते पुढीलप्रमाणे डहाणू उपविभागांतर्गत डहाणू, पालघर, वसई व तलासरी तर जव्हार उपविभागांतर्गत जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड यांचा समावेश होतो.

जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय कार्यालय पालघर येथे असून जिल्ह्यातील कामकाजाच्या सोयीसाठी जव्हार येथे अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय कार्यरत आहे. पालघर जिल्हा मुख्यालय हे मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर असून पश्चिम रेल्वेचे एक मोठे स्थानक आहे व ते मुंबई पासून ११० कि.मी. अंतरावर आहे. **(बालवाड, २०१५)**

**जिल्ह्याच्या सीमा :**

महाराष्ट्राच्या वायव्य दिशेस सदर जिल्हा असून पूर्वेला ठाणे आणि नाशिक जिल्हे असून पश्चिमेला अरबी समुद्र पसरलेला आहे. दक्षिणेला मुंबई आणि ठाणे जिल्हा तर उत्तरेला वलसाड (गुजरात राज्य) आणि केंद्रशासीत (दादरा नगर हवेली) प्रदेश आहे. पालघर हा पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील भाग असून महाराष्ट्रातील कोकण पट्ट्याचा उत्तरेकडील भाग पालघर जिल्हा आहे.

**भूपृष्ठ रचना :**

जमिनीच्या प्रकारानुसार भूपृष्ठाची प्रामुख्याने दोन भागात विभागणी झालेली दिसून येते.

अ) काळी व वाळू मिश्रीत जमीन ही डहाणू, पालघर, वसई व ठाणे या तालुक़्यात आढळून येते. नद्यांच्या काठावर व मुखाशी गाळाचे संचयन झाल्यामुळे गाळाची मृदा निर्माण झाली आहे. वाळू मिश्रीत लोम प्रकारच्या या मृदेमध्ये सेंद्रिय द्रव्ये व ह्युमस यांचे प्रमाण जास्त असून पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते. ही मृदा सुपिक असून ती मुख्यत: भाताचे पीक, भाजीपाला व फळबाग यांच्या लागवडीस योग्य आहे. या मृदेत नारळी पोफळीच्या बागा असून अनेक प्रकारच्या पालेभाज्यांचे उत्पादन घेतले जाते. पश्चिम किनारपट्टीलगत सिंचनाकरीता विहिरींच्या पाण्याची उपलब्धता असल्यामुळे भाजीपाला, फुले, नारळ, केळी, चिकू इत्यादी नगदी पिके घेतली जातात.

ब) तांबडी जमीन ही मुख्यत: मोखाडा, तलासरी व पूर्वेकडच्या उतरणीवरील तालुक्यातील काही भागात आढळून येते. ही जमीन सुपिकतेच्या दृष्टिने कमी दर्जाची असल्याने नागली, नाचणी आणि वरी या सारख्या पिकांच्या लागवडीस उपयुक्त आहे. आता जव्हार व मोखाडा तालुक्यामध्ये हळदीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले आहे. विक्रमगड, वाडा, मोखाडा या आदिवासी भागात मोगऱ्याची लागवड केली जात असल्याने स्थानिक आदिवासींना रोजगार उपलब्ध झाला आहे.

थोडक्यात भात, वरी, नाचणी, वाल, चवळी, हरभरा, उडीद, मूग, कुळीथ, वांगी, चिकू, पेरु, आंबे, पपई, अननस, नारळ, केळी, बोरे, करवंदे, लिचीची फळे व गुलाबाचे पीक इ. चे उत्पन्न, घेतले जाते. **(जिल्हाधिकारी, २०१५)**

किनाऱ्यावरील पुळण मृदा : समुद्र किनारी भागात सागरी लाटांच्या संचयन कार्यामुळे रेती व वाळूयुक्त मृदांचे पट्टे निर्माण झाले असून त्यांना पुळण अथवा चौपाट्या म्हणतात केळवे, पालघर, तारापूर, चिंचणी, डहाणू, बोर्डी येथील चौपाट्या प्रसिद्ध आहेत. सागरी लाटांच्या संचयन कार्यामुळे पांढऱ्या शुभ्र रंगाच्या किंवा करड्या रंगाच्या रेताड व वाळूयुक्त मृदा निर्माण झाल्या आहेत. ह्या मृदा नापिक अनुत्पादक आहेत. या मृदेचा शेतीसाठी उपयोग

होत नाही. अलीकडे किनारपट्टीत खाजणाच्या भागात कृत्रिम तलावांची निर्मिती करुन कोळंबी व मत्स्य बीज सोडून मत्स्य व्यवसाय केला जातो. अलिकडे किनाऱ्यावरील पुळणमृदांच्या चौपाट्यांना पर्यटनदृष्ट्या विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

**नद्या :**

ठाणे जिल्ह्यात वैतरणा ही मुख्य नदी आहे. वैतरणा नदीचा उगम उत्तर पूर्वेलगतच्या नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक पायथ्यापासून होऊन ती दक्षिणेकडे वाहत जाऊन ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात प्रवेश करुन पुढे वाडा, पालघर, या तालुक्यातून वाहत जाऊन पालघर तालुक्याच्या दक्षिणेला नवघर येथे वैतरणा खाडीत अरबी समुद्रात मिळते. वैतरणा नदीच्या महत्वाच्या तीन उपनद्या पिंजाळ, मोखाड्याच्या घाटमाथ्यातून, देहेरजा उपनदी जव्हार तालुक्यातून तर सुर्या उपनदीचा उगम मोखाडा तालुक्यातून होते. पालघर जिल्हयात वसईची खाडी व मनोरची खाडी अशा प्रमुख खाड्या आहेत.

**हवामान :**

जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे सम आहे. तथापि ते सागर किनारी व किनारपट्टीच्या नजीक उष्ण व दमट आहे. किनारपट्टीतील वसई, पालघर व डहाणू या तालुक्यात हवामान उष्ण आहे. याउलट पूर्वेकडील सह्याद्री पर्वताच्या उतरणीला पायथ्याला सपाटी प्रदेशातील हवामान कमी उष्ण आहे. सर्वसाधारणपणे जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात हवा थंड असते.

**पर्जन्यमान :**

महाराष्ट्रात तापमान, आर्द्रता व पर्जन्य याबाबतीत स्थल परत्वे बदल आढळतो. महाराष्ट्रातील तापमान, पर्जन्य व सापेक्ष आर्द्रता इ. घटकांचा विचार केल्यास महाराष्ट्राचे डॉ. त्रिवार्था यांच्या वर्गीकरण सूचीनूसार प्रामुख्याने खालील प्रमाणे तीन हवामान विभाग करता येतात.

१.) उष्ण कटिबंधीय जास्त पर्जन्य हवामान विभाग

२.) उष्ण कटिबंधीय अर्धशुक हवामानाचा प्रदेश

३.) उष्ण कटिबंधीय दमट व कोरड्या हवामानाचा विभाग किंवा मान्सून सव्हाना हवामान प्रदेश

वरील वर्गीकरण सूचीनूसार पालघर जिल्ह्याचा समावेश हा कोकणपट्टीतील जास्त पर्जन्य प्रदेशामध्ये होतो. जिल्ह्यात नैऋत्य मान्सून या वाऱ्यापासून मुख्यतः पाऊस पडतो. सर्वसाधारणपणे जून ते सप्टेंबर हे पावसाळी महिने आहेत. सन २०११ मध्ये जिल्ह्यात सरासरी पाऊस २४५८ मि.मी. पडला असून सर्वात जास्त पाऊस जव्हार तालुक्यात ३५२२ मि.मी. तर सर्वात कमी पाऊस तलासरी तालुक्यात १८३४ मि. मी. पडला.

**खनिज संपत्ती :**

जिल्ह्यात प्रमुख खनिजांचे उत्पादन होत नाही अथवा खाणीही नाहीत. बॉक्साईट, वसई हाय खनिज तेल क्षेत्र (समुद्रात), दगडाच्या खाणी, समुद्रातुन रेती (वाळू) काढण्याचा व्यवसाय जिल्ह्यातील वसई, या परिसरात चालतो. जिल्ह्यातील काही भागात कंकर किंवा लाव्हा रसापासून तयार झालेल्या चुनखडीचा साठा सापडला आहे. चुनखडीचे पट्टे क्वचित एकत्र स्वरुपात परंतु मोठ्या प्रमाणात वसई ते डहाणू पर्यंत आढळतात. तसेच गंधकयुक्त खनिज पाण्याचे झरे कोकनार, सातीवली, वज्रेश्वरी व गणेशपुरी येथे आहेत. हे गंधकयुक्त पाणी औषधी गुणधर्माचे आहे.

**लोकसंख्या :**

जिल्ह्यातील बहुतांशी लोकसंख्या आदिवासी व कष्टकरी आहे. सन २०११ च्या जनगणने नुसार पालघर जिल्ह्याची लोकसंख्या पुरुष : १५,४५,७७९ व महिला : १४,४४,३३७ असे एकूण २९,९०,११६ इतकी असून नागरी आणि ग्रामीण लोकसंख्येची टक्केवारी पाहता नागरी लोकसंख्या १३,५२,२८३ एवढी आहे. ग्रामीण लोकसंख्या १६,३७,८३३ आहे. सागरी व डोंगरी अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना पालघर जिल्ह्याला लाभले आहे. पालघर जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी पुरुषः ५,५२,२१८ तर ५६५७९० महिला ह्या अनुसूचित जाती म्हणजेच आदिवासी प्रवर्गात मोडतात. पालघर जिल्ह्यात ०१ लोकसभेचे मतदार संघ (खासदार) आणि ०६ विधानसभेचे मतदार संघ (आमदार) एवढे लोकप्रतिनिधी आहेत.

**दशवार्षिक वाढ :**

सन २००१ ते सन २०११ या दशकात जिल्ह्याच्या लोकसंख्येत ३५.९४ टक्के वाढ झाली असून ही वाढ राज्याच्या १५.९९ टक्के वाढीपेक्षा अधिक आहे.

**घनता :**

महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रापैकी ०१.५२ टक्के क्षेत्र व्यापलेल्या पालघर जिल्ह्यात सन २०११ च्या जनगणनेनुसार पालघर जिल्ह्याची लोकसंख्येची घनता दर प्रती.चौ. कि.मी. ला ५६२ इतकी आहे. **(जाधव, २०१५)**

**साक्षरता :**

पालघर जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ६६.६५% आहे. त्यामधील पुरुषांचे प्रमाण ७२.३३% इतके आहे. तसेच महिलांचे प्रमाण ५९.२८% इतके आहे.

**स्त्री व पुरुष प्रमाण :**

सन २०११ च्या जनगणनेनुसार पालघर जिल्ह्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण १,४४४ इतके असून सदर प्रमाण सन २००१ च्या जनगणनेनुसार ८५८ इतके होते. राज्याचे हेच प्रमाण ९२५ इतके आहे.

**वनसंपत्ती :**

पालघर जिल्हा हा आदिवासी क्षेत्रात मोडणारा व जंगलाचा आहे. या जंगलात साग, ऐन, हिरडा इत्यादी वनस्पती आढळतात. त्याचप्रमाणे येथील जंगलामधून बांबू, गवत, इमारती लाकूड, डिंक, शिकेकाई, टेंभूर्णीची पाने, गवत, मेण, मध इत्यादींचे उत्पन्न मिळते. या जिल्हयाच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३०% पेक्षाही अधिक क्षेत्र वनांनी व्यापलेले आहे. मोखाडा, जव्हार, वाडा, शहापूर या तालुक्यांमध्ये वनांचे प्रमाण अधिक आहे. बिबट्या, तरस, कोल्हा, ससे इत्यादी प्राणी तसेच अनेक प्रकारचे पक्षी आढळतात. **(जाधव, २०१५)**

**वाहतूक व्यवस्था :**

मुंबई पासून जिल्हा मुख्यालयाचे अंतर सुमारे ७४ कि.मी. तर ठाणे शहरापासून ५३ कि.मी. अंतराव आहे. जिल्ह्याचे मुख्यालय पालघर येथे असून रस्ते व रेल्वेने इतर तालुक्यांशी जोडलेले आहेत. यामध्ये डहाणू, वसई हे तालुके पश्चिम रेल्वे व रस्ते या दोन्ही मार्गांनी जिल्हा मुख्यालयाशी जोडलेले आहे. पालघर–मनोर–वाडा रस्ता राज्यमार्ग क्रमांक ३४

ने वाडा, विक्रमगड, जव्हार, हे तालुके जोडलेले आहेत. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे २० कि.मी. अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ (मुंबई – अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग) हा मार्ग जात असून डहाणू व तलासरी हे तालुके जोडलेले आहेत.

तसेच पालघर जिल्ह्यातून तीन लोहमार्ग जातात.

१) मुंबई – दिल्ली लोहमार्ग : हा लोहमार्ग मुंबईहून गुजरात राज्यातील वडोदरामार्गे दिल्लीस जातो. यावर भाईंदर, वसई रोड, नालासोपारा, विरार, पालघर, डहाणू रोड व घोलवड ही जिल्ह्यातील रेल्वे स्थानके आहेत. वसई रोड हे जिल्ह्यातील जंक्शन आहे.

२) अहमदाबाद – वसई – लोहमार्ग : अहमदाबाद–वसई–कल्याण येथून निघून पनवेल मार्गे रत्नागिरीकडे जातो.

३) वसई – दिवा लोहमार्ग : मुंबई–दिवा जंक्शन मार्गे मेंगलोर या एक पदरी रेल्वे मार्गावर वाहतूक तसेच मध्य व पश्चिम रेल्वेला जोडणारा दिवा जंक्शन ते वसई रोड अशी वाहतूकही सूरु आहे.

**औद्योगिक माहिती :**

सातव्या पंचवार्षिक योजनेखाली दाखविलेल्या सर्व योजना आठव्या पंचवार्षिक योजनेत अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. या योजने अंतर्गत लहान व कुटीर उद्योग करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्याबाबत भर देण्यात आला आहे. जिल्ह्यात १ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेले क्षेत्र, ३ शासकीय सहकारी औद्योगिक वसाहती अस्तित्वात असून ५७५७ लघु उद्योग नोंदणीकृत, १८८३ अस्थायी लघु उद्योग नोंदणीकृत असून ४२७ मोठे/मध्यम उद्योग घटक अस्तित्वात आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेले औद्योगिक क्षेत्र एम.आय.डि.सी. तर तारापूर व पालघर जिल्हा शासनाच्या मदतीने उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहती असून त्यामध्ये १. दि पालघर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादीत, पालघर २. दि वसई तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादीत, ता. वसई ३. प्रियदर्शनी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादीत, ता. वाडा. **(जिल्हाधिकारी, २०१५)**

**एकूण तालुक्यांची माहिती :**

**तक्ता क्र. ३.३**

**पालघर जिल्ह्यातील एकूण तालुक्यांची भौगोलिक क्षेत्र दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | तहसिल | भौगोलिक क्षेत्र | | एकूण गावे | एकूण पाडे | एकूण ग्रामपंचायत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | (Ha) | (Sq. K.M.) | | | |
| १. | पालघर | १०२३०३ | १०२३.०३ | २२२ | ९६८ | १३३ |
| २. | वाडा | ३५८६२ | ३५८.६२ | १७० | ४२३ | ८५ |
| ३. | वसई | ७३२७६ | ७३२.७६ | १२५ | १४८ | ३१ |
| ४. | डहाणू | २६७१८ | ९६३.०० | १८३ | १०४० | ८५ |
| ५. | तलासरी | २६७१८ | २६७.१८ | ४६ | २३० | २२ |
| ६. | जव्हार | ५६६४० | ५६६.४० | १०९ | २६६ | ५० |
| ७. | मोखाडा | ४२४५६ | ४२४.५६ | ५९ | २२२ | २८ |
| ८. | विक्रमगड | ३५९४४ | ३५९.४४ | ९४ | ५२१ | ४३ |
| | एकूण | ४६९६९९ | ४६९६.९९ | १००८ | ३८१८ | ४७७ |

**स्त्रोत :** http://collectorpalghar.in/history.php?english=null access on 10.12.15.

**तालुक्यांची थोडक्यात माहिती पूढील प्रमाणे :–**

दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे व पालघर जिल्हा असे दोन जिल्हे झाल्यामुळे ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाले. पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी ८ तालुके पालघर जिल्ह्यात येतात त्यामध्ये पालघर, वाडा, वसई, डहाणू, तलासरी,  जव्हार, मोखाडा, आणि विक्रमगड तालुक्यांचा समावेश आहे.

**१) पालघर तालुका :**

पालघर तालुक्याचे एकूण क्षेत्र ८३५.६९ चौ. कि.मी. असून त्यातील ८१७.२२ चौ. कि.मी. क्षेत्र ग्रामीण भागात असून ९३ च्या वर गावे आहेत. पालघर हे ठाणे जिल्ह्यातील पश्चिम रेल्वेचे स्टेशन असून मुंबई पासून ९० कि. मी. अंतरावर आहे. समुद्र किनारी वसलेला व तसेच पालघर जिल्ह्यातील तालुक्यापैकी एक असलेला हा एक तालुका होय. पालघर तालुक्याचा विस्तार हा साधारणपणे १८११ हेक्टर आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा तालुका जरी लहान वाटत असला तरी तालुक्याचा विकास हा मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. सन

२०११ च्या जनगणनेनूसार पालघर तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः २,८८,५१४ व महिला : २,६१,६५२ मिळून ५,५०,१६६ एवढी आहे. पालघर तालुक्यात एकूण १३३ ग्रामपंचायती आहेत. या तालुक्याचे प्रशासकीय कामकाज हे पालघर या ठिकाणाहून चालते. पालघर व बोईसर तालुक्यातील प्रमूख बाजार पेठा होय. औद्योगिक दृष्टीने या तालुक्याची मोठ्या प्रमाणावर प्रगती झालेली आहे. तारापूर या गावात भारतातील पहिले अणूशक्ती केंद्र आहे. १६० मेगावॅट क्षमतेच्या २ अणुभट्या असलेला हा प्रकल्प सन १९६९ साली सुरु झाला. तालुक्यात सूर्या नदीचा विस्तार असल्यामुळे पिण्याचा योग्यरित्या पुरवठा होतो. या तालुक्यातून मुंबई–अहमदाबाद हा एमएच ८ क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग जातो. या तालुक्यात शेती हा प्रमूख व्यवसाय आहे. या तालुक्याच्या कार्यक्षेत्रात सूर्या धरण असल्यामुळे तालुक्यात जवळजवळ ७६% जलसिंचनाच्या सोयी झालेल्या आहेत. तालुक्यामध्ये केळवा हे पर्यटन स्थळ प्रसिध्द आहे.

**२) वाडा तालुका :**

महाराष्ट्र राज्यात पालघर जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असणारा तालुका म्हणजे वाडा होय. वाडा तालुक्याचा भौगोलिक विस्तार साधारणपणे ७६,३४२ चौ. कि.मी. आहे. वाडा तालुक्यातील एकूण ८५ ग्रामपंचायती आहेत. वाडा तालुक्यात एकूण १६७ गावे असून ४४७ पाड्यांची संख्या आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार वाडा तालुक्याची लोकसंख्या पुरुषः ९१,९९० व महिला : ८६,३८० मिळून १,७८,३७० एवढी आहे. तानसा, पिंजाळ, वैतरणा आणि राखाडी या चार महत्वपूर्ण नद्या याच तालुक्यातून वाहतात. वाडा या तालुक्यातील काही भागामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण झाल्यामुळे येथील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. असे असले तरीही येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. या तालुक्यात जनसिंचनाच्या सोई उपलब्ध असल्यामुळे येथील शेतकरी खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामात पिके घेत असतो. वाडा तालुक्यात उपलब्ध असलेला निसर्ग सौदर्यामुळे येथे अनेक पर्यटन स्थळ आहेत. त्यामध्ये कोहोज किल्ला, तिल्सेश्वर शिवमंदीर, परशुराम मंदीर गुंज आणि हातोबा देवस्थान यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा वाटतो. औद्योगिकरण व नैसर्गिक साधन संपत्ती यांची योग्य रितीने सांगड घातली गेल्यामुळे या तालुक्याच्या विकासात सतत भर पडत आहे.

**३) वसई तालुका :**

पश्चिम लोहमार्गावरील हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून येथे इतिहास प्रसिध्द किल्ला आहे. वसईच्या किनारपट्टीवर पोर्तुगीजांनी बांधलेला हा भव्य व अजिंक्य असा जलदुर्ग आहे. हा अजिंक्य किल्ला चिमाजी आप्पांनी इ.स. दि. २३ मे १७३९ मध्ये पोर्तुगीजांकडून जिंकला. तो सर करण्यासाठी त्यांना ३ वर्ष लागली. या किल्ल्यात चिमाजी आप्पांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. तसेच येथे एक भव्य चर्चसुध्दा आहे. काही ठिकाणी वसईचा उल्लेख बसीन असा केला जातो. फाऊंटनपेन तयार करण्याचा कारखाना वसई परिसरात आहे. येथे केळींच्या व पानवेलींच्या बागा आहेत. वसई येथील सुकेळी प्रसिध्द आहेत.

सन २०११ च्या जनगणनेनुसार वसई तालुक्याची लोकसंख्या पुरुषः ७,०९,७७१ व महिला : ६,३३,६३१ मिळून १३,४३,४०२ एवढी आहे. वसई तालुक्यात एकूण ३१ ग्रामपंचायती आहेत. वसई–विरार महानगरपालिका वसई येथे आहे. वसई रोड हे रेल्वे स्थानक पश्चिम रेल्वे वर आहे. वसईच्या खाडीमुळे वसई तालुका ठाणे जिल्ह्यापासून विभागला गेलेला आहे.

**४) डहाणू तालुका :**

डहाणू तालुक्याचे एकूण क्षेत्र ९५०.५० चौ. कि.मी. असून त्यातील ९५९.७६ चौ. कि.मी. क्षेत्र ग्रामीण भागात असून २०.७४ चौ. कि.मी. क्षेत्र शहरी भागात असून सदर तालुक्यात २७० च्या वर गावे आहेत. डहाणू हे मुंबई महानगरापासून सुमारे १२० कि.मी. अंतरावरचे, लोभस निसर्ग सौंदर्याचा टिळा मिरवणारे ठाणे जिल्ह्यातील पश्चिम किनाऱ्यावरील एक नितांत सुंदर ठिकाण आहे. डहाणू तालुका हा पालघर जिल्ह्यात असून मुख्यतः आदिवासी डोंगराळ भागात वसलेला आहे. डहाणू तालुक्याच्या उत्तरेस गुजरात राज्याची सीमा लागते. डहाणू तालुक्याच्या पूर्वेस डोंगराळ व आदिवासी भाग व पश्चिमेस बंदरपट्टी विखुरलेली आहे. डहाणू तालुक्यातून मुंबई अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ जातो. डहाणू तालुक्याचे उत्पन्नाचे मुख्य साधन भातशेती व मासेमारी आहे. तालुक्यात मुख्यतः रिलायन्स एनर्जीचा औष्णिक विद्युत प्रकल्प आहे. तालुक्यात साखरे, कवडास व सुर्या प्रकल्पाचे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरले जाते.

डहाणू तालुका हा भारतातील उत्तम प्रतीच्या चिकूच्या उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. या ठिकाणी विशेष 'चिक्कू महोत्सव' साजरा केला जातो. प्रसिध्द चिकू डहाणू तालूक्यातील घोलवड या गावी होतात. येथे चिकू, लाची व गुलाबाच्या बागा आहेत. भारतातल्या चिकू उत्पादनाच्या ५० टक्के उत्पादन हे डहाणू तालुक्यात होते. हे मासेमारीचे बंदर आहे. समुद्र किनाऱ्यावर लांबच लांब पसरलेली नारळाची व सूरुची झाडे पर्यटकांना आकर्षित करतात. लोखंडी रहाट, मोटारींचे सुटे भाग बनवण्याचे कारखाने येथे आहेत. येथे भात गिरण्या आहेत. होड्याही तयार केल्या जातात. तालुक्यात आदिवासींची वस्ती मोठ्या प्रमाणात असून आदिवासींची संस्कृती वारली चित्रकलेमुळे प्रसिध्द आहे. गेरुची पार्श्वभूमी असलेल्या भिंतीवर तांदळाच्या पांढऱ्या पिठाने साधे व सुबक आकार रंगविण्याची पध्दत हे या चित्रशैलीचे वैशिष्ट्ये समजले जाते. सन २०११ च्या जनगणनेनुसार डहाणू तालुक्यांची लोकसंख्या पुरुषः ४,०२,०९५ व महिला : १,९९,५७४ मिळून ४,०२,०९५ एवढी आहे.

**५) तलासरी तालुका :**

तलासरी तालुक्याचे एकूण क्षेत्र २८७.९२ चौ. कि.मी. असून त्यातील २६९.४५ चौ. कि.मी. क्षेत्र ग्रामीण भागात असून १८.४७ चौ. कि.मी. क्षेत्र शहरी भागात असून सदर तालुक्यात ३३५ च्या वर गावे आहेत. ठाणे या आदिवासी जिल्ह्यातील, गुजरात सीमेलगत असलेला अतिसंवेदनशील व अतिदुर्गम तालुका म्हणून गणला जातो. पालघर जिल्ह्यापासून सूमारे ७० कि.मी. अंतरावर तलासरी तालुका असून जिल्ह्यातील कमी ग्रामपंचायती (२२) असलेला तालुका आहे. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ २६,८६१ हेक्टर आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार तलासरी तालुक्याची लोकसंख्या पुरुषः ७६,४१७ व महिला : ७८,४०१ मिळून १,५४,८१८ एवढी आहे. तलासरी हा गुजरात व दादरा नगर हवेलीला लागून महाराष्ट्राचा शेवटचा तालुका आहे. तलासरी तालुक्यात कुर्झे येथे धरण असून त्यात मत्स्य पालन केले जाते. शिवाय झाई येथे तलासरी तालुक्यातील एकमेव समुद्रकिनारा आहे.

**६) जव्हार तालुका :**

जव्हार खरं तर महाराष्ट्रातील काहीसा दुर्लक्षित, दुर्गम असा भाग पण पावसाच्या दिवसात इथलं वातावरण मनाला वेड लावतं. दाट धुकं, थंड हवा, तुफान कोसळणारा पाऊस असं धुंद करणारं वातावरण इथे पावसाळ्याच्या दिवसात अनुभवास मिळतं. पालघर

जिल्ह्यातील आदिवासी वस्ती असणाऱ्या पर्यटन स्थळांमध्ये जव्हारचे स्थान अव्वल दर्जाचे आहे.

जव्हार हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून नाशिक – डहाणू मार्गावर आहे. हे उंच पठारावर असून समुद्र सपाटीपासून दीड हजार फूट उंचीवर असून निसर्गरम्य, विलोभनीय, जव्हार हे एकेकाळचं संस्थान, थंड हवेचे ठिकाण म्हणून सुप्रसिध्द आहे. चहुबाजूने तुटलेले कडे, दऱ्या, खोरी, त्यात वाढलेले गच्च जंगल आणि दरीत कोसळणारे पांढरे शुभ्र धबधबे असा नयनरम्य सृष्टीसोहळा पाहण्यास विशेषत: वर्षाऋतूत अनेक शहरवासी येथे येतात. पावसाळ्यात हा सारा परिसर हिरवागार व डोंगरातून कोसळणाऱ्या झऱ्यांनी व लहानमोठ्या धबधब्यांनी ओलाचिंब असतो. यामुळे या ठिकाणाला महाराष्ट्रातील चेरापुंजी म्हटलं तर वावगं ठरु नये. येथील हनुमान व सनसेट पॉईटस तसेच भुपतगड, दाभोसा धबधबा व काळमांडवी धबधबा ही प्रसिध्द ठिकाणे आवर्जुन पाहण्याजोगी आहेत.

मुंबईहून कसारा मार्गे सुमारे १६६ किमी आणि नाशिकहून सुमारे ८० किमीवर वसलेले जव्हार ठाण्याहून सुमारे १४० किमी अंतरावर आहे. मध्य रेल्वेच्या इगतपुरी स्थानकापासून जव्हार ६१ किमी लांब असून पश्चिम रेल्वेच्या डहाणू स्थानकापासून ६० किमी अंतरावर आहे.

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे पाय जव्हारला लागले दि. ०५ जानेवारी इ. स. १६६४ रोजी शिवाजी महाराज स्वत: जातीने सुरतेवर स्वारी करण्यास निघाले असता त्यांना जव्हारच्या राज्यातून जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा त्यांनी जव्हारच्या राजाची सदिच्छा भेट घेतली. जव्हारच्या राजांनी या मराठाराजाचे जंगी स्वागत केले. त्यांच्या या भेटीची आठवण जव्हारपासून दिड. कि.मी. अंतरावरील मूरुचूंडी गावाजवळ शिरपामाळ येथे एका कमानीच्या रुपाने जपून ठेवण्यात आली आहे.

येथे आदिवासींची लोकसंख्या जास्त असल्यामुळे या तालुक्यात आदिवासी उपयोजन क्षेत्रांतर्गत आदिवासींसाठी अनेक योजना राबविल्या जातात. येथील जयविलास राजवाडा पाहण्यासारखा असून अलिकडील काळात तो पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जव्हार तालुक्यांची लोकसंख्या पुरुष: ६९,३३३ व महिला : ७०,८५४ मिळून १,४०,१८७ एवढी आहे.

### ७) मोखाडा तालुका :

मोखाडा हा पालघर जिल्ह्यातील तालुका असून येथे तालुक्यांचे मुख्य ठिकाण आहे. जवळच सूर्यमाळ हे थंड हवेचे ठिकाण आहे. शेती हा या तालुक्यातील मुख्य व्यवसाय आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार मोखाडा तालुक्यांची लोकसंख्या पुरुष: ४१,६९१ व महिला : ४१,७६२ मिळून ८३,४५३ एवढी असून ५० महसूली गावे आणि २२६ पाड्यांचा समावेश असून या तालुक्यातील ग्रामपंचायतीची संख्या २८ आहे. मोखाड्यातील आदिवासींसाठी कल्याणकारी योजना आखण्यासाठी तसेच सार्वजनिक बांधकाम, पोषण आहार, शिक्षण, मानवविकास, रोजगार आदी अनेक योजना प्रभावी राबविण्यासाठी जव्हार येथे आदिवासी विकास विभाग कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.

### ८) विक्रमगड तालुका :

पालघर जिल्ह्यातील तालुक्यापैकी विक्रमगड हा तालुका असून या तालुक्यातील ग्रामपंचायती ची संख्या ४३ एवढी आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार विक्रमगड तालुक्याची लोकसंख्या पुरुष: ६८,४८९ व महिला : ६९,१३६ मिळून १,३७,६२५ एवढी आहे. विक्रमगड हा अती दुर्गम डोंगरी भाग म्हणून ओळखला जातो. विक्रमगड हे पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. पालघर जिल्ह्याच्या जव्हार उपविभागात हा तालुका येतो. वाडा, जव्हार, पालघर येथून विक्रमगड येथे जाता येते. विक्रमगड येथील आठवडी बाजार, बुधवार बाजार म्हणून प्रसिध्द आहे.

**तक्ता क्र. ३.४.**
**पालघर जिल्ह्यातील तालुकानिहाय, स्थापना वर्षाप्रमाणे,**
**नॅक मानांकन महाविद्यालयांचा तक्ता.**

| अ. क्र. | तालूका | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | स्थापना वर्ष | नॅक श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | पालघर | Principal,<br>Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce &<br>M. H. Mehta Science College,<br>Palghar (W) Tal. & Dist. Palghar,<br>Pincode : 401404 | १९७० | ब |
| २ | वाडा | Principal,<br>Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's<br>Arts, Commerce, & Science College.<br>Wada, Dist. Palghar,<br>Pincode : 421303 | १९८२ | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वसई | Principal, A. V. College of Arts, K. M. College of Commerce & E.S.A. College of Science.<br>Navghar, Vasai Road (W),<br>Dist. Palghar,<br>Pincode : 401202 | १९७१ | ब+ |
| ४ | वसई | Principal,<br>Gonsalo Garcia College of Arts & Commerce<br>Behind Vasai Cricket Ground, Near Vasai S.T. Depo.,<br>Tal. Vasai, Dist. Palghar,<br>Pincode : 401201. | १९८४ | ब+ |
| ५ | वसई | Principal,<br>Shankar Narayan College of Arts & Commerce.<br>Navghar, Mahavidyalaya Marg, Bhayander (E),<br>Dist. : Palghar, Pincode : 401105 | १९९४ | ब+ |
| ६ | वसई | Principal,<br>St. Joseph College of Arts & Commerce.<br>Satpala, Post : Agashi, Virar (W), Tal. Vasai,<br>Dist. Palghar, Pincode : 401301 | १९९५ | ब |
| ७ | वसई | Principal,<br>Viva College of Arts, Commerce & Science<br>Viva College Road, Virar (W), Tal. Vasai,<br>Dist. Palghar, Pin. 401303 | २००० | ब |
| ८ | डहाणू | Principal,<br>Sau. Sitabai Ramkrushna Karandikar Senior College of Commerce & Late Mehernosh Boman Burjor Irani College of Arts. At. Vadkun,<br>Post. Dahanu Road, Dist. Palghar,<br>Pincode : 401602 | १९८१ | ब+ |
| ९ | डहाणू | Principal,<br>P. L. Shroff College of Arts & Commerce<br>At Post Chinchani, Tal. Dahanu, Dist. Palghar,<br>Pincode : 401503 | १९८६ | ब |
| १० | डहाणू | Principal,<br>N. B. Mehta (Valwada) Science College<br>Acharya Bhise Vidyanagar, Bordi, Tal. Dahanu,<br>Dist. Palghar, Pincode : 401701 | १९९४ | ब |
| ११ | तलासरी | Principal,<br>Comrade Godavari Shamrao Parulekar College of Arts, Commerce & Science.<br>At & Post. : Talasari, Tal. Talasari, Dist. Palghar,<br>Pincode : 401606 | १९९४ | ब |
| १२ | जव्हार | Principal,<br>Gokhale Education Society's<br>Arts, Commerce & Science College Jawhar,<br>Dist. Palghar, Pincode : 401603 | १९८३ | ब |
| १३ | मोखाडा | Principal,<br>Rayat Shikshan Sanstha's<br>Arts, Science & Commerce College. Mokhada,<br>Tal. Mokhada, Dist. Palghar, | १९८४ | ब |
| | विक्रमगड | नॅक मानांकन महाविद्यालय नाही. | | |

## ३.५ आदिवासी समाज :

महाराष्ट्रात आदिवासी समाजाचे लोक सोळा जिल्ह्यांत कमी अधिक प्रमाणात विखुरलेले आहेत असे असले तरी आदिवासींच्या संख्ये प्रमाणे ठाणे, धुळे, नाशिक, रायगड, पुणे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड या जिल्ह्यात आढळून येते.

सद्यपरिस्थितीत पालघर जिल्ह्यात ७५% लोक आदिवासी अनुसूचित समाजाचे आहेत. त्यांच्याकरीता सर्व विकासाची दारे बंद होती. हा समाज आर्थिक व सामाजिक बंधनातून सुटू शकत नाही. तसेच त्यांच्यामध्ये जागरुकता नसल्यामुळे विकासाकडे जाणारा रस्ता कोणता हे सुध्दा माहित नव्हते. असा हा आदिवासी समाज सगळ्या स्तराने दुबळा असलेला आणि या दुबळ्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी विकास योजनांची प्रभावी व शीघ्रगतीने अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मंत्रालयाच्या पातळीवर सन १९८३ पासून आदिवासी विकास विभाग या नावाचा स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे.

आदिवासी समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत मागासलेले त्यांना इतर समाजाचा स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून निरनिराळ्या योजना सुरु केल्या आहेत. आदिवासी समाजाचा शीघ्रगतीने विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने विविध योजना कार्यान्वित करण्यासाठी ''आदिवासी विकास संचालनालय'' नाशिक येथे स्थापन करण्यात आले. **(महाराष्ट्र शासन, २००६)** विकासाच्या योजना जिल्हा पातळीवर राबविण्यासाठी आदिवासी विकास अधिकाऱ्यांची राज्यात २० प्रकल्प कार्यालये व अनेक स्वयंसेवी संस्थांची नोंदणी होत आहे.

**तक्ता क्र. ३.५.**

**अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती प्रवर्गानिहाय लोकसंख्या दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | तालुका | एकूण लोकसंख्या | अनुसूचीत जाती -- SC | | | अनुसूचीत जमाती --ST | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला | एकूण |
| १) | ठाणे | ३७,८७,०३६ | १,३३,४२१ | १,२३,६६ | २,५७,०८५ | ३८,९२८ | ३६,०१२ | ७४,९४० |
| २) | कल्याण | १५,६५,४१७ | ७७,७५४ | ७४,०२० | १,५१,७७४ | २८,१२७ | २६,३८९ | ५४,५१६ |
| ३) | उल्हासनगर | ५,०६,०९८ | ४४,५८४ | ४२,०९६ | ८६,६८० | ३,५१३ | ३,०६३ | ६,५७६ |
| ४) | अंबरनाथ | ५,६५,३४० | ३८,३८६ | ३७,३०० | ७५,६८६ | १८,५०५ | १७,७१६ | ३६,२२१ |
| ५) | भिवंडी | ११,४१,३८६ | २३,८६१ | १९,००० | ४२,८६१ | ४७,६४५ | ४५,०१९ | ९२,६६४ |
| ६) | शहापूर | ३,१४,१०३ | ९,२१८ | ८,८१० | १८,०२८ | ५६,५९४ | ५५,५८९ | १,१२,१८३ |
| ७) | मुरबाड | १,९०,६५२ | ५,५५६ | ५,४४१ | १०,९९७ | २३,६६२ | २३,६८१ | ४७,३४३ |
| **एकूण ठाणे जिल्हा** | | **८०,७०,०३२** | **३,३२,७८०** | **३,१०,३३** | **६,४३,१११** | **२,१६,९७४** | **२,०७,४६** | **४,२४,४४३** |
| १) | पालघर | ५,५०,१६६ | ८,७६४ | ८,२३५ | १६,९९९ | ८३,४२४ | ८४,७२८ | १,६८,१५२ |
| २) | वाडा | १,७८,३७० | २,२८८ | २,१९४ | ४,४८२ | ५१,१६० | ५०,५४९ | १,०१,७०९ |
| ३) | वसई | १३,४३,४०२ | २७,९८२ | २५,५५१ | ५३,५३३ | ४८,९२१ | ४९,३७७ | ९८,२९८ |
| ४) | डहाणू | ४,०२,०९५ | ३,२८५ | ३,२२८ | ६,५१३ | १,३५,८४२ | १,४२,०६ | २,७७,९०४ |
| ५) | तलासरी | १,५४,८१८ | १,०११ | १,०३२ | २,०४३ | ६८,६९९ | ७१,५७४ | १,४०,२७३ |
| ६) | जव्हार | १,४०,१८७ | ७१५ | ७३० | १,४४५ | ६३,२८० | ६५,१८२ | १,२८,४६२ |
| ७) | मोखाडा | ८३,४५३ | ८७३ | ७४९ | १,६२२ | ३८,२४६ | ३८,५९६ | ७६,८४२ |
| ८) | विक्रमगड | १,३७,६२५ | १८७ | १५४ | ३४१ | ६२,६४६ | ६३,७२२ | १,२६,३६८ |
| **ए. पालघर जिल्हा** | | **२९,९०,११६** | **४५,१०५** | **४१,८७३** | **८६,९७८** | **५,५२,२१८** | **५,६५,७९** | **११,१८,००८** |
| **एकूण** | | **११०६०१४८** | **३७७८८५** | **३५२२०४** | **७३००८९** | **७६९१९२** | **७७३२५९** | **१५४२४५१** |

**स्त्रोत :** http://www.mahasdb.maharashtra.gov.in > Home > Population Census - Adhoc Reports

ठाणे व पालघर जिल्ह्याचा एकूण विचार केल्यास दोन्ही जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गाची लोकसंख्या १५,४२,४५१ असून त्यामध्ये पुरुष : ७,६९,१९२ आणि महिला : ७,७३,२५९ आहेत तर अनुसूचित जाती प्रवर्गाच्या लोकसंख्येमध्ये पुरुष : ३,७७,८८५ आणि महिला : ३,५२,२०४ आहेत. म्हणजे पालघर जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे.

## ३.६ मुंबई विद्यापीठाची स्थापना / इतिहास :–

ईस्ट इंडिया कंपनीने सन १८५५ साली सर्व शैक्षणिक उपक्रमांच्या नियोजनासाठी आणि नियंत्रणासाठी भारताच्या प्रत्येक प्रांतांत 'शिक्षण विभाग' (डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन) स्थापन केले. तसेच मुंबई, कलकत्ता, व मद्रास येथे तीन विद्यापीठे सुरु

करण्याचा निर्णय घेतला यासंबंधीच्या योजनेची आखणी करण्यासाठी सर जेम्स कॅलव्हिल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

समितीच्या अहवालाच्या आधारे सरकारने सन १८५७ च्या कायदा क्रमांक दोन अन्वये दि. २४ जानेवारी १८५७ रोजी कलकत्ता विद्यापीठाची, कायदा क्रमांक बावीस अन्वये दि. १८ जून १८५७ रोजी मुंबई विद्यापीठाची आणि कायदा क्रमांक सत्तावीस अन्वये दि. ०५ सप्टेंबर १८५७ रोजी मद्रास विद्यापीठाची स्थापना केली. **(भट, १९९३)**

**विद्यापीठ ग्रंथालय :–**

शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्व आहे. विद्यापीठीय शिक्षणासंबंधीच्या अहवालात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ''उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्थांचा केंद्रबिंदू म्हणजे त्यांचे ग्रंथालय'' असा ग्रंथालयाचा  गौरव केला आहे. **(शिक्षण मंत्रालय, १९४९)** संशोधनामध्ये आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये ग्रंथालये महत्तवाची भूमिका बजावतात. विज्ञानातील संशोधनासाठी प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांची आवश्यकता असते तर मानव्यविद्या आणि समाजिक शास्त्रे विषयातील संशोधनासाठी ग्रंथालये व प्रयोगशाळा अशी दुहेरी भूमिका बजावते. विद्यापीठ ग्रंथालय हा विद्यापीठाचा एक भाग असल्यामुळे त्यांना विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करावी लागते.

**'' उच्च शिक्षणाच्या जबाबदारीसह, विद्यापीठातील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक यांना त्यांची उपयोगी साधनसामग्री व माहिती व सेवा पुरवण्याची जबाबदारी जे ग्रंथालय समर्थपणे स्विकारुन आपल्या संस्थेच्या उद्देशांची पूर्ती करतात त्यास 'विद्यापीठ ग्रंथालय' असे म्हणतात.''–** अजयकुमार शर्मा यांनी विद्यापीठ ग्रंथालयाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. **(शर्मा, १९९१)**

**''ज्या ग्रंथालयात सामान्य वाचकांच्या प्राप्त गरजा यथास्थित पार पाडून जिज्ञासू वाचकांची तृप्ती करण्यासाठी ज्या शक्ती किंवा शिल्लक शक्ती (Spair Capacity) वापरली जाते त्यास 'विद्यापीठ ग्रंथालय' असे म्हणतात.''– त्र्यं. दि. वाकनीस** यांनी ग्रंथालयाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. **(वाकनिस. १९७३)**

मुंबई विद्यापीठांतर्गत अनेक शैक्षणिक संस्था व ग्रंथालये आहेत, परंतू विद्यापीठे व महाविद्यालयामार्फतच खरी विद्यार्थ्यांची भावी पिढी घडत असते. त्यामुळे विद्यापीठ, महाविद्यालयीन ग्रंथालये या संदर्भात महत्वाची वाटतात.

मुंबई विद्यापीठाचे मध्यवर्ती ग्रंथालय आणि वेगवेगळ्या शिक्षण विभागाची विभागीय ग्रंथालये ही विद्यापीठाच्या बौध्दिक जीवनाची जणू जिवंत प्रतीकेच आहेत. ग्रंथालयात ७,५१,८३७ लाखाहुन अधिक ग्रंथसंग्रह असलेले फोर्ट ग्रंथालय आणि कलिना येथील ग्रंथालय **'फोर्ट लायब्ररी आणि कालिना लायब्ररी'** या लोकप्रिय नावांनी ओळखल्या जातात.

विद्यापीठाच्या शताब्दीच्यावेळी फोर्टमधील ग्रंथालयाची इमारत अपुरी पडू लागली होती. इमारतीच्या विस्ताराचा विचार केला जात होता सन १९६० मध्ये विद्यानगरी कालिना येथे विद्यापीठ ग्रंथालयाची भावी वाढ विद्यानगरीत होणे आवश्यक होते. विद्यानगरीतील पहिली संकल्पित इमारत ग्रंथालयाचीच होती. सन १९७१ मध्ये ग्रंथालयाचा एक विभाग विद्यानगरीत सुरु झाला. मात्र स्वतःच्या स्वतंत्र इमारतीत ग्रंथालय येण्यासाठी सन १९७६ सालाची वाट पाहावी लागली.

**कालिना ग्रंथालयाची अंतर्गत रचना :-**

कालिना विद्यानगरीतील **'जवाहरलाल नेहरु ग्रंथालय'** या नावाने ओळखली जाणारी ग्रंथालयाची इमारत म्हणजे वास्तुशास्त्रदृष्ट्या आणि कार्यदृष्ट्या विद्यानगरीतील सर्वोत्तम इमारत आहे. विद्यानगरी विकास समितीचे प्रारंभापासूनचे सदस्य आणि ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल डॉ. डी. एन. मार्शल यांच्या कल्पक दूरदृष्टीला त्याचे श्रेय आहे. ग्रंथालयाच्या इमारतीची विद्यानगरीतील मध्यवर्ती जागा, भावी विकासाचा सुयोग्य अंदाज, विपुल प्रकाश तसेच ग्रंथालयाची कार्यपध्दती लक्षात घेऊन केलेली विविध विभागांची अंतर्गत रचना ही या इमारतीची वैशिष्ट्ये आहेत. षट्कोनी रचना असलेले मध्यवर्ती सभागृह आणि त्याच्या पाच बाजूस भौतिक विज्ञाने, जैविक विज्ञाने, सामाजिक विज्ञाने, मानव्यविद्या भाषा आणि सर्वसाधारण अशा पाच मुख्य विषयविभागांसाठी पाच दुमजली इमारत विभाग असे या इमारतीचे स्वरुप आहे. **(आचार्य व इतर १९८०)**

विषय विभागांच्या इमारतीत ग्रंथसंग्रह विभाग आणि वाचनविभाग समांतर असून संग्रहविभागात मुक्तप्रवेश पध्दती आहे. ग्रंथालयाच्या पहिल्या मजल्यावर नियतकालिक संशोधक अभ्यासकांसाठी स्वतंत्र अभ्यासिका विभाग, संगणक विभाग, वातानुकूलित असा हस्तलिखित व दुर्मिळ ग्रंथसंग्रह विभाग, ग्रंथालयशास्त्र विभाग, दृक श्राव्य विभाग इत्यादी विभाग आहेत या इमारतीचा बांधकामखर्च बहूतांशी विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय समाज विज्ञान संशोधन संस्था, मुंबई महानगरपालिका आणि तत्सम खाजगी विश्वस्तनिधी यांच्या देणग्या, अनुदानातून करण्यात आला आहे.

**जवाहरलाल नेहरु ग्रंथालय – कालिना आणि राजाभाई टॉवर –फोर्ट यांची मनोरंजनात्मक तुलना :–**

जवाहरलाल नेहरु ग्रंथालयाची तुलना राजाभाई टॉवर येथील ग्रंथालयाशी करणे मोठे मनोरंजनात्मक ठरेल. फोर्ट मधील ग्रंथालयाची इमारत ही ऐतिहासिक वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमूना, राष्ट्रीय स्मारक आहे तर कालिना येथील ग्रंथालयाची इमारत ग्रंथालयशास्त्रातील अत्याधुनिक कल्पनांना अनुसरुन बांधलेली आहे.

फोर्ट मधील इमारतीच्या कलाकुसरीने नटलेल्या अलंकारात्मक दगडी भिंती त्यांच्यामध्ये साठवलेली हस्तलिखिते आणि प्राचीन ग्रंथ यांच्याव्दारे आपल्या समृध्द सांस्कृतिक संचिताची आठवण करुन देतात, तर नेहरु ग्रंथालयाच्या अनलंकृत सिमेंटच्या भिंती ग्रंथालयातील वर्तमानकालीन वैज्ञानिक परंपरेतील अभ्याससामग्रीची ओळख देतात. दोन्ही ग्रंथालयातील वातावरण किती भिन्न आहे.

फोर्ट ग्रंथालय ही भूतकाळात रमणाऱ्या प्रगल्भ संशोधकांचा स्वर्ग आहे या ग्रंथालयातील संस्कृत, अर्धमागधी, पाली, अरेबिक, मराठी, उर्दू, पर्शियन अशा प्राचीन भाषांतील असंख्य हस्तलिखिते, पोथ्या, दोलामुद्रिते, दुर्मिळ पुस्तके ही इतिहासाच्या संशोधनासाठी आदर्श पार्श्वभूमी आहे तर कालिना ग्रंथालय हे उत्साहाने बहरलेल्या सामाजिक, भौतिक, जैविक, विज्ञानातील संशोधन करु पाहणाऱ्या तरुण संशोधकांचे माहेरघर आहे.

मुंबई विद्यापीठातील ग्रंथालय म्हणजे खऱ्या अर्थाने विद्यापीठाचा मानबिंदू आहे. येथील ग्रंथसंग्रह अन्य विद्यापीठाच्या तुलनेने विशाल म्हणावा असा आहे. मात्र विशालतेबरोबरच येथील ग्रंथांची दुर्मिळता अत्यंत लक्षणीय आहे. विद्यापीठाच्या ग्रंथपाल व ग्रंथालय समितीने ग्रंथालयाच्या ग्रंथसमृध्दतेकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते. सदर ग्रंथालयात आज ७,५१,८३७ हून अधिक ग्रंथ सन्मानाने स्थानापन्न झालेले दिसतात. सर्व विषयांची शेकडो पुस्तके या संग्रहात आहेत. त्यात अति दुर्मिळ आणि एकमेव प्रत अशा श्रेणीत सुध्दा बरेच ग्रंथ आहेत. या ग्रंथसंग्रहाच्या संपन्नतेमागे बहुविध दृष्टी आढळून येते. 'विद्यार्थी' हा केंद्रवर्ती घटक नजरेसमोर ठेवून उत्तमोत्तम ग्रंथांचा समावेश येथे झाला आहे. एकोणिसाव्या शतकातील 'प्रबोधन' कालखंडातून प्रेरणा घेऊन आणि 'ज्ञानाची बहूलता हिच खरी संपत्ती' अशा निष्ठेतूनही हा संग्रह सतत वाढत राहिलेला आहे.

या ग्रंथालयाचे वैशिष्ट्य असे की, तो बहुशाखीय आणि बहुस्तरीय आहे. कालसुसंगतता आणि आधुनिकता हे त्याचे खास लक्षण आहे. असंख्य विषयांवरच्या देशी विदेशी ग्रंथांनी विद्यापीठाचे ग्रंथघर सतत विकसीत होत असते. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर एकेका ज्ञानविषयातील अधिकाधिक प्राधान्य प्राप्त होत असते. त्या त्या ज्ञानविषयातील अधिकाधिक ग्रंथांना तर ग्रंथालयात स्थान दिले जातेच, पण त्याचवेळी इतर विषयांतील नवनव्या मौलिक ग्रंथांनाही सामावून घेतले जाते.

चौफेरता, ग्रंथखरेदीतील विचक्षणता आणि दूरदृष्टी, ग्रंथनिवडीतील सुक्ष्मबुध्दी आणि ग्रंथसंग्रहाला दिलेले प्राधान्य यामुळे विद्यापीठाचे ग्रंथालय म्हणजे अभ्यासक, संशोधक आणि मुंबईकरांचे आनंदवन ठरले तर आश्चर्य नव्हे.

संपूर्ण संगणकीकरण झालेला ग्रंथसंग्रह, दुर्मिळ पुस्तकांचे जतन करण्यासाठी केलेली स्वतंत्र व्यवस्था, इंटरनेट सुविधा, ग्रंथारोग्यासाठी वारंवार होणारे प्रयत्न, अत्याधुनिक संगणक स्कॅनर्सची व्यवस्था यासारख्या गेल्या दशकातील अनेक उपक्रमांमुळे विद्यापीठाच्या ग्रंथालयाला जणू नवसंजीवन आणि नवी उमेद प्राप्त झाली आहे. या ग्रंथालयाचा लौकिक सतत वाढतोच आहे. **(मुंबई विद्यापीठ वर्षवृत्ते १९८२)**

## ३.७. सारांश :

संशोधकाने ठाणे जिल्हा हा संशोधनासाठी निवडला असल्यामुळे ठाणे जिल्ह्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक माहिती पाहणे गरजेचे आहे. दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नविन जिल्हा झाल्यामुळे पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी ७ तालुके ठाणे जिल्ह्यात तर ८ तालुके पालघर जिल्ह्यात येतात. सदर प्रकरणामध्ये संशोधकाने सद्यस्थितीत असलेल्या ठाणे–पालघर जिल्ह्याबद्दल तसेच त्यामध्ये येणाऱ्या तालुक्यांच्या माहितीचे सादरीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

तसेच संशोधकाने संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाच्या पूर्व इतिहासाचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामूख्याने महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त आढावा, महाराष्ट्राची भौगोलिक माहिती, ठाणे जिल्ह्याचा समग्र आढावा, पालघर जिल्ह्याचा समग्र आढावा, आदिवासी समाज, मुंबई विद्यापिठाची स्थापना / इतिहास इत्यादी बाबत उहापोह केला आहे.

===XOX===

# संदर्भ सूची


१. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, (२०१४). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४–१५. मुंबई. Retrieved on April 17, 2015., from https://www.maharashtra.gov.in/PDF/EcoSurvey _2015_Mar.pdf.

२. आचार्य, बाळकृष्ण बापु व शिंगणे मोरो विनायक, नाईक बापुराव – संपा. (१९८०). मुंबईचा वृतांत. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

३. कणेर, अरुण. (२०१५). संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हे. नागपूर : पाचघरे प्रकाशन. पृ.क्र. १०१–१०५.

४. कूलकर्णी, विजय., (२००६). शहापूर दर्शन. डोंबिवली : आरती प्रकाशन, पृ.क्र. ११–२९.

५. गगराणी, भूषण., (२००२). विविधतेने नटलेला ठाणे जिल्हा. *लोकराज्य*, ५४, पृ.क्र. ३४–३८.

६. जाधव, देवा., (२०१५). चालू घडामोडी. पूणे : द युनिक अ‍ॅकॅडमी. पृ.क्र. ११.

७. जाधव, तुकाराम., (२०१५). महाराष्ट्र वार्षिकी २०१५. पूणे : द युनिक अ‍ॅकॅडमी, पृ.क्र. ३–३७.

८. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, (२०१३). जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१३ (ठाणे जिल्हा). ठाणे. Retrieved from https://mahades.maharashtra.gov.in / files/ publication / dsa_thane _2013 .pdf

९. जिल्हाधिकारी कार्यालय, (२०१५). ठाणे जिल्हा. Retrieved April 11, 2015., from http://www.thane.nic.in/index.html

१०. जिल्हाधिकारी कार्यालय, (२०१५). पालघर जिल्हा. Retrieved April 11, 2015., from http://collectorpalghar.in/about.php?english=null.

११. दास्ताने, संतोष., (२०११). महाराष्ट्र : २०११. पूणे : दास्ताने रामचंद्र आणि कं. १–५१.

१२. दांडेकर, विष्णू वामन. (संपा) (१९६१). पालघर तालूका चित्रमय दर्शन १८१८ – १९६०. पालघर : भाईलाल पटेल, अध्यक्ष, महात्मा गांधी सेवा संघ पालघर. पृ.क्र. २७ ते ३२.

१३. पाटील, राहूल., आणि हांडे, कपिल., (२०१३). अत्यावश्यक इतिहास व भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह). पूणे : द युनिक ॲकॅडमी, पृ.क्र. ९–२३.

१४. बालवाड, रमेश. (२०१५). आपला पालघर जिल्हा. लातूर : विद्याभारती प्रकाशन. पृ.क्र. ५–७, २१–३१

१५. भट, सुधा. (१९९३). मुंबई विद्यापीठाची वाटचाल (१८८५–१९९२). मुंबई : पॉप्युलर प्रकाशन

१६. भोईर, चंद्रकांत., (२०१५). अस्तित्वातील ठाणे व पालघर जिल्हा २०१५–२०१६. ठाणे : भोईटे प्रकाशन, पृ.क्र. ६–१५.

१७. महाराष्ट्र शासन, (२००६). आदिवासी विकास पुस्तिका. मुंबई : महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.

१८. महाराष्ट्र शासन, (२००७). जिल्हा परीषद ठाणे दैनंदिनी. ठाणे : सामान्य प्रशासन विभाग. पृ.क्र. १–५.

१९. मुंबई विद्यापीठ वर्षवृत्ते : १९८२–८३ ते १९९०–९१. मुंबई : विद्यापीठ प्रकाशन विभाग

२०. वाकनिस. त्र्यं. दि. (१९७३). ग्रंथालय संघटन. पुणे : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

२१. शर्मा, अजयकुमार. (१९९१). पुस्तकालय विज्ञान खंड–१. दिल्ली : वर्ल्ड बुक हाऊस.

२२. शर्मा, के. के. (२००५). इंटेलेक्चूअल्स संदर्भ महाराष्ट्र : राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन खंड–०५. भोपाळ : इंटेलेक्चुअल बुक पृ.क्र. १६६५–१७०८.

२३. शिक्षण मंत्रालय, सर्वपल्ली राधाकृष्णन. (१९४९). सर्वपल्ली राधाकृष्णन अहवाल. दिल्ली : भारत सरकार प्रकाशन विभाग. पृ.१९६.

२४. Chaudhari, K. K. (1982). Gazetteer of India, Maharashtra State, Thane District Bombay : Government Central Press.

२५. Directorate of census of operations, Maharashtra. (2011). District Census Handbook : Village and Town wise Primary Censes Abstract (PCA) 2011, Thane, (Report No. Series – 28, Part XII-B) Retrieved from http://www.censusindia.gov.in/2011census/dchb/2721_PART_B_DCHB _%20THANE.pdf

===XOX===

# प्रकरण चौथे

# महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा एक आढावा.

## ४.१ प्रस्तावना :

ग्रंथालये ही महाविद्यालयांचा अविभाज्य भाग आहे. महाविद्यालयातील ग्रंथालये हि वाचकांचे बौध्दिक कुतूहल भागविण्याचे काम करतात. महाविद्यालयांचे उद्दिष्टये ग्रंथालयांशिवाय पूर्ण होऊ शकत नाहीत. ग्रंथालयाचे महत्तवाचे उद्दिष्ट वाचकाची गरज भागविण्यासाठी योग्य ती माहिती योग्य त्या वेळेला, योग्य त्या वाचकाला वितरीत करणे होय.

थोडक्यात महाविद्यालयाचा आरसा ग्रंथालय असतो. महाविद्यालयातील उच्चशिक्षणाचे स्थान, शिक्षणाचे महत्तव, उद्दिष्ट्ये, आधुनिक शिक्षण त्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट, डिजीटलायझेशन यामूळे ग्रंथालयाचे स्वरुप बदलत आहे.

हूशार व गुणवत्तापूर्ण विद्यार्थी तयार करण्याचे काम महाविद्यालयीन ग्रंथालये करतात. कमीत कमी वेळेत योग्य ते वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ज्ञान साधनांचा वाढलेला अवाका, त्यांची प्रचंड उपलब्धता, माहितीतील वाढ, ग्रंथालयांच्या आर्थिक समस्या अशा घटकांचा विचार करता ग्रंथालयांचा वापर व्यवस्थापन उपयोग ई. सर्व दृष्टीने सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. जेणेकरुन त्यांना असणाऱ्या समस्यांवर उपाय शोधता येईल.

## ४.२ महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्वरुप / कार्य / महत्तव : एक आढावा :

शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा पुरविणाऱ्या ग्रंथालयास शैक्षणिक ग्रंथालय म्हणतात. शैक्षणिक ग्रंथालये शिक्षण संस्थांना त्यांची शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करतात.

**शैक्षणिक ग्रंथालयाचे घटक :**

शैक्षणिक ग्रंथालयामध्ये शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांचा समावेश होतो. यांपैकी सदर संशोधनात महाविद्यालयीन ग्रंथालयां बाबत अभ्यासणार आहोत.

**महाविद्यालयीन ग्रंथालय :**

महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अध्यापक यांना ग्रंथालय सेवा देण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय.

**विद्यापीठीय ग्रंथालय :**

विद्यापीठातील विद्यार्थी, अध्यापक आणि संशोधक यांना आवश्यक ते वाचनसाहित्य पुरविण्यासाठी व योग्य त्या संदर्भ व माहितीसेवा देण्यासाठी विद्यापीठाने चालविलेले ग्रंथालय म्हणजे विद्यापीठीय ग्रंथालय होय. **(कुंभार, २००६)**

**वाचक वर्ग :**

कोणत्याही उद्देशाने व्यक्तीगतरित्या किंवा समूहाव्दारे ग्रंथालयाला भेट देणाऱ्यांना साधारपण ग्रंथालयाचा वाचकवर्ग असे म्हणतात.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयांचा एकत्रित विचार करण्याचे प्रमुख कारण असे, की महाविद्यालये व विद्यापीठे ह्या जवळजवळ एकाच पातळीवरील शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. एकमेकांशी त्या इतक्या पूरक आहेत की एकाचा विचार केल्याशिवाय दुसऱ्याची चर्चा पूर्ण होणारच नाही.

महाविद्यालयीन ग्रंथालयांना अनन्य साधारण महत्व आहे. युनिव्हर्सिटी एज्यूकेशन कमिशनचे (१९४९) अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मतानुसार, विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील सर्व कार्यांचा केंद्रबिंदू ग्रंथालय आहे. संशोधनामध्ये आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यापीठीय ग्रंथालय महत्वाची भूमिका बजावते.

ग्रंथालयाचे शिक्षणातील महत्व विचारात घेऊन भारतातील विद्यापीठात ग्रंथालयाचा योग्य विकास होण्यावर वेगवेगळ्या समित्या, कमिशन, आयोग स्थापन करण्यात आले. **(नखणे, २००६)** वेगवेगळ्या समित्या, कमिशन, आयोग ह्यांनी ग्रंथालय व ग्रंथालयामार्फत होणाऱ्या कार्यावर तसेच विकासावर जास्त भर दिला. मग ते कोणत्याही स्वरुपातील ग्रंथालय असोत.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचे कार्ये :-**

१. शिक्षकांना व विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयातील ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वाचन साहित्य पुरविणे.

२. संशोधनासाठी आवश्यक ती माहिती पुरविणे.

३. महाविद्यालाच्या सर्व उपक्रमासाठी आवश्यक त्या ग्रंथालयीन सेवा व सुविधा पुरविणे.

४. विद्यार्थांना आनंद आत्मबोध, आधुनिक व्यवसाय मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास इ. संदर्भातील वाचनसाहित्य पुरविणे.

५. अभ्यासासाठी योग्य / पोषक असे वातावरण निर्माण करणे.

थोडक्यात, महाविद्यालयातील वाचकांना सर्वतोपरी मदत करणे. याशिवाय पूर्वजांच्या अनुभवातून निर्माण झालेले ज्ञान तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्याचे कार्य ग्रंथालय करते.

तसेच निरंतर शिक्षण, दूरशिक्षण आणि मुक्त शिक्षण पध्दतीमध्ये ग्रंथालयांना विशेष महत्व आहे.

या शिक्षण पध्दतीमध्ये वाचनसाहित्य आणि पर्यायाने ग्रंथालय हेच शिक्षणाचे प्रमुख साधन असते. तसेच ज्ञानाच्या विश्वात दररोज नवनवीन विषयाची उत्पत्ती होत असतांना नवीन आलेल्या प्रत्येक विषयावरील सर्वच उपलब्ध साहित्य हे वाचकाला घेणे शक्य नसते अशी ग्रंथ खरेदीकरुन वाचकांना उपलब्ध करुन देतात. हे विशेष महत्वाचे कार्य महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत होत असते.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचे उद्दिष्टे :-**


- उपयुक्त असा वाचनसाहित्य संग्रह विकसित करणे जसे पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, पुरवणी वाचन साहित्य.
- महाविद्यालयातील विविध उपक्रम चालविण्यासाठी ग्रंथालयीन पुरक सेवा देणे.
- वाचकांना विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा व सुविधा पुरविणे.
- महाविद्यालयीन ग्रंथालय समृध्द् व अद्ययावत ठेवणे.

- ग्रंथालय साधनसंपत्तीचे जतन व परिरक्षण करणे.
- अध्ययन, अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी पालक संस्थेला मदत करणे.
- संशोधनाचा वेग व गुणवत्ता वाढविण्यास मदत करणे.
- महाविद्यालयीन ग्रंथालयात अभ्यासक्रमिक पुस्तके व त्यास आवश्यक अशा पूरक ग्रंथाचा समावेश करुन विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढीस लावणे.
- प्राचीन वाड्मयाचा संग्रह जितका आवश्यक आहे तितकीच आधुनिक ग्रंथ व नियतकालिके ग्रंथालयात ठेवणे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचे घटक :-**

**आकृती क्र. ४.१**

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचे घटक दर्शविणारी आकृती**




## ४.३ महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवा : एक प्रभावी साधन :-

**ग्रंथालय म्हणजे...**

''ग्रंथालय म्हणजे पुस्तके आणि इतर वाड्.मयीन वाचन साहित्य यांचा एकत्र केलेला संग्रह, ज्याचा उपयोग वाचन, अभ्यास व सल्लामसलतीसाठी केला जातो.'' **हॅरॉडस लायब्ररीयन्स ग्लोसरीनुसार** (Ranganathan 2006)

**ग्रंथालयीन सेवा :**

ग्रंथालयामध्ये अनेक वाचक येत असतात. त्या वाचकांना त्यांना हव्या असलेल्या ग्रंथांचा संबंध जुळवून देणे. हा संबंध वाचकांना हव्या असलेल्या वेळी, त्याच्या गरजेच्या वेळी जुळवून देतांना व्यक्तीगत लक्ष देणे आवश्यक असते. त्यामध्ये आत्मीयता हवी. वाचकांविषयी

सहानुभूती हवी. अशा स्वरुपाचा संबंध वाचक आणि ग्रंथ यामध्ये जुळवून देणे ही उत्तम ग्रंथालय सेवा होय. **(बाहेती, २००३)**

माहिती विस्फोटाची सूरवात दुसऱ्या महायुध्दानंतर झाली. पेटंट्स, पुर्नमुद्रिते आणि नियतकालिके यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मोठ्या प्रमाणात येणाऱ्या माहितीचे योग्य प्रकारे नियोजन करुन नेहमी माहिती संशोधकांपर्यंत पोहचविण्याची गरज निर्माण झाली. या गरजेमधूनच ग्रंथालयीन सेवेचा विकास झाला.

आजच्या गतिमान काळामध्ये सर्व स्तरांवरुन माहितीची मागणी केली जाते. उपलब्ध माहिती पैकी मागणी केलेली नेमकी माहिती शोधून देण्याचे नेमके कार्य ग्रंथालयीन सेवांतर्गत येते. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे माहिती संकलनाच्या व प्रदान करण्यांच्या साधनांमध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे.


''गरज ही शोधाची जननी आहे.'' त्यानुसार ग्रंथालय सेवा अधिक तत्परतेने देण्यासाठी नवनवीन गोष्टींचा समावेश ग्रंथालयात काळानुरुप होत गेला. 'ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे.' ग्रंथालयाच्या गरजा वाचकांच्या गरजेप्रमाणे वाढत गेल्या. वाचकांची संख्या, साहित्यांची संख्या, विषय, नवीन संशोधन, वाचकांच्या अपेक्षा, गरज यातून नवनवीन शोध लागत गेले. नवनवीन शोधामुळे म्हणजे नवीन तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयाचा चेहरा मोहरा बदलत गेला. **(बाहेती, २००३)**

आज माहिती तंत्रज्ञान युगात आणि विज्ञानवर्षात या संकल्पना जाणून घेऊन त्या संकल्पनेत वरवर पाहता भेद दिसत नसला तरी सूक्ष्म अभ्यास केल्यास तो फरक आपणास जाणवतो.

ग्रंथालये ही फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहेत. वाचनसाहित्याच्या स्वरुपात थोडाफार बदल झाला परंतू ग्रंथालये हे तीन घटकावर अवलंबून असतात.

**आकृती क्र. ४.२.**

**ग्रंथालयाचे घटक दर्शविणारी आकृती**




१) वाचन साहित्य २) वाचक ३) ग्रंथालयीन सेवा.

ग्रंथालयातील वाढलेली वाचनसाहित्याची संख्या, वाचकांची संख्या, सेवेचा वाढता व्याप हे सर्व सांभाळणे मानवीदृष्ट्या शक्यच राहत नाही म्हणून ग्रंथालयात संगणक आले संगणकाच्या तंत्रज्ञानामुळे अधिक प्रभावी सेवा देता येऊ लागल्या. संगणकाच्या आज्ञावलीमुळे आणि बारकोड तंत्रज्ञानामुळे सर्वांचा वेळ वाचतो. वाचकांना हवी ती ग्रंथालयाविषयी माहिती संगणकाच्या साह्याने मिळू लागली. परिणामी संगणकाच्या साह्याने सेवा पुरवल्या जाऊ लागल्या.

## ४.४ ग्रंथालयीन सेवा एक आढावा :–

ग्रंथालय ही सेवा देणारी संस्था आहे. ग्रंथालयाच्या प्रकारानुसार ग्रंथालयाचे वाचक बदलतात. व वाचकांच्या प्रकारानुसार ग्रंथालयाच्या सेवा बदलतात. प्रत्येक प्रकारच्या वाचकाच्या गरजा भिन्न असतात. शैक्षणिक ग्रंथालयाचे वाचक प्रामुख्याने शैक्षणिक कार्यांशी संबंधित असतात. त्यांच्या गरजा प्रामुख्याने अभ्यासक्रमाशी निगडीत असतात. वाचकांना समाधानकारक सेवा देता याव्यात यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या ग्रंथपालास आपले वाचक आणि त्यांच्या गरजा माहित असणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथालय देत असलेल्या सेवांमधील त्रुटी माहित करुन घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी ग्रंथालय सेवांचे मूल्यमापन करणे आवश्यक असते.

**वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवा :**

**सेवा :** ग्रंथालय सर्वमान्य व्हावे, ग्रंथालयाचे वाचक वाढावे, ग्रंथालयाची प्रशंसा व्हावी, ग्रंथालय दर्जेदार व्हावे असे वाटत असेल तर वाचकांना हवी असलेली माहिती चटकन मिळावयास हवी यासाठी ग्रंथालय काही सेवा देते. **(थोरात, २००७)**

कोणत्याही ग्रंथालयात निरनिराळ्या वाचनसाहित्याचा संग्रह केलेला असतो. हे साहित्य वाचकांनी पाहावे, हाताळावे त्याचा अधिक वापर करावा हाच ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश असतो. केवळ त्या साहित्याचे संरक्षण करावे हा उद्देश नसतो. त्यामुळे ग्रंथालयात जेवढ्या जास्त सेवा, सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील तेवढ्याच जास्त प्रमाणात वाचकवर्ग ग्रंथालयाकडे आकर्षित होत असतो. ग्रंथालयशास्त्राच्या पाच सूत्रांचा हाच संदेश आहे. ग्रंथालयातील वाचक जास्त जिज्ञासू असतो, विशिष्ट माहिती मागणारा, ती कमी वेळात प्राप्त व्हावी अशी अपेक्षा असणारा असल्यामुळे ग्रंथालयातील सेवा खूपच कार्यक्षम असणे जरुरीचे असते. याच बरोबर निरनिराळ्या उपयुक्त सेवा वाचकांना उपलब्ध करुन देणे हे ही ग्रंथालयाचे कर्तव्य ठरते.

ज्ञानाच्या वाढीचा प्रचंड वेग लक्षात घेता एका ग्रंथालयास एका विषयावरील सर्व वाचनसाहित्य उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे इतर ग्रंथालयांशी सहकार्य करुन ती माहिती मिळवावी लागते. तीही कमी वेळात. वाचकांना ग्रंथालयातील माहिती उपलब्ध स्वरुपात नको असते. त्यावर संस्कार करुन ती माहिती योग्य स्वरुपात पुरविण्याचे काम ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना करावे लागते.

ग्रंथालयातील वाचकासाठी विविध प्रकारच्या सेवा सुरु करणे शक्य आहे. कोणत्याही ग्रंथालयात असणारा ग्रंथसंग्रह, कर्मचारीवर्ग, ग्रंथालयाची आर्थिक स्थिती, उपलब्ध जागा, विविध सेवांसाठी आवश्यक असणारी उपकरणे इत्यादी बाबींवर या सेवा उपलब्ध करुन देणे अवलंबून असते. प्रत्येक प्रकारच्या सेवेची मागणी नियमितपणे आणि मोठ्या प्रमाणावर नेहमीच येत राहील असे नाही तथापि येणाऱ्या वाचकास सेवा देणे जरुरीचे असते. ग्रंथालयात विविध प्रकारच्या सेवा सर्वसाधारण दिल्या जातात.

**१) पारंपरिक सेवा**

देवघेव सेवा (Lending Services)

संदर्भ सेवा (Reference Services)

वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical  Services)

वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings Services)

बहिःशाल सेवा (Extensive Services)

**२) आधुनिक सेवा**

प्रचलित जागरुक सेवा (CA  Services)
निवडक माहितीचे प्रसारण सेवा (SDI Services)

वाचकांना निर्देशन सेवा (Indexing Services)

प्रतिलिपी सेवा (Photocopy Services)

सार सेवा (Abstacting Services)

**३) संगणक सेवा** (Computer)

इंटरनेट, ई–मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search Services)

ओपॅक सेवा (OPAC Services)

ऑनलाईन डेटाबेस सेवा (Online Database Services)

ऑफलाईन डेटाबेस सेवा (Offline Databas Services)

प्रलेख प्रदान सेवा (Document Delivery Services)

संशोधकाने ग्रंथालयीन सेवांचे तिन विभागात वर्गीकरण केले असून पहिला विभाग पारंपारीक सेवा, दुसरा विभाग आधुनिक सेवा तर तिसऱ्या विभागात संगणक सेवांचा समावेश केला आहे. ग्रंथालया मार्फत देण्यात येणाऱ्या  सेवांचे विवेचन खालीलप्रमाणे.

**१) पारंपरिक सेवा**

**१. देवघेव सेवा (Lending Services)** :

**सेवेचे स्वरुप :** ग्रंथालयाकडे असलेल्या वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी ही सेवा दिली जाते. ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी तसेच घरी वाचण्यासाठी वाचनसाहित्य देण्यासाठी देवघेव सेवा दिली जाते.

**''सभासदांना उसनवारीने दिलेल्या ग्रंथांची नोंद ज्या पध्दतीने करतात तिला देवघेव पध्दती म्हणतात.''**

सात दिवस कालावधीसाठी १ किंवा २ पुस्तके वाचकांना दिली जातात. दिलेल्या कालावधीत पुस्तक परत न केल्यास देय दिनांकानंतर दंड घेतला जातो. त्याचबरोबर ग्रंथ आरक्षण म्हणजे वाचकांसाठी ग्रंथ राखून ठेवला जातो.

थोडक्यात, ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारी पुस्तके, ग्रंथ उपलब्ध असतात. ग्रंथालयामध्ये ग्रंथालय पुस्तकांचे देवघेवीचे संघटन करावे लागते. ग्रंथालयातील देवघेवीचा विचार करुन ग्रंथालयातील पुस्तके, नियतकालिके यांच्या कमीतकमी दुबार प्रती घेण्याचे ग्रंथालय टाळते. त्यामुळे उत्कृष्ट ग्रंथ संग्रह निर्माण करुन आणि सर्व ग्रंथांचे एकूण समृध्द ग्रंथ संग्रहाने वाचकांची अधिक चांगली सेवा निर्माण होऊ शकते.

देवघेव सेवेमध्ये विद्यार्थ्यांचे ग्रंथालय कार्ड यांच्या स्वरुपात पुस्तकांचे देवाणघेवाण होते. त्यासाठी विद्यार्थ्यांना ओळखपत्राच्या आधारे ग्रंथालय कार्ड तयार करण्याची पध्दत आहे. ह्या कार्डवर विद्यार्थ्याचा फोटो, नाव, पत्ता व इतर शैक्षणिक माहिती असते. तसेच प्रत्येक कार्डवर विद्यार्थी वर्ग क्रमांक, शैक्षणिक वर्ष, विद्यार्थी सही, ग्रंथपाल सही असते. व ह्या कार्डची नोंद एका रजिस्टरच्या माध्यमातून त्या वर्षासाठी केली जाते. व अशाप्रकारे ग्रंथालय कार्ड तयार करुन त्या कार्डच्या मार्फत विद्यार्थ्यांना हवे ते ग्रंथ किंवा क्रमिक पुस्तके ग्रंथालयातून आठ दिवसांच्या मुदतीकरीता दिले जातात. अशाच प्रकारे शिक्षकांनाही कार्ड पध्दतीने देवघेव सेवा पुरविली जाते. प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांसाठी हे कार्ड नवीन बनविले जाते.

**२. संदर्भ सेवा (Reference Services) :**

**सेवेचे स्वरुप :** विद्यार्थी, वाचक तसेच शिक्षक वाचक यांना काही प्रश्न उदभवतात यावेळी ग्रंथालय त्यांना संदर्भ सेवा देते. ग्रंथालयामध्ये नियतकालीक, संदर्भ ग्रंथ तसेच इतर अभ्यास विषयक ग्रंथांच्या स्वरुपात सदर सेवा दिली जाते. तसेच प्रतिलिपी सेवेच्या स्वरुपात संदर्भ सेवा दिली जाते. ग्रंथालयामध्ये असलेले ग्रंथपाल व सहकारी विद्यार्थ्यांना ओळखपत्र घेऊन व रजिस्टरवर वाचकांचे नाव व सही अशा स्वरुपात नोंद घेऊन वाचकांना संदर्भ सेवा पुरविली जाते. हे संदर्भ ग्रंथ विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये बसूनच वाचावे लागतात.

काही वेळेला वाचकांना संदर्भ ग्रंथात माहिती सापडत नसेल तर ग्रंथपाल माहिती शोधून देण्याचा प्रयत्न करतात. या ग्रंथालयामध्ये तात्कालीक आणि व्यापक अशा दोन स्वरुपाची संदर्भ सेवा देतात. वाचकांची गरज पाहता माहिती मिळणे लगेच शक्य असल्यास

तात्काळ माहिती पुरविली जाते. अन्यथा मुदत देऊन पुन्हा विचारणा करण्यास वाचकांना सांगितले जाते. ह्यामध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तक, संदर्भग्रंथ, कथा कादंबऱ्या यांचा शोध घ्यावयाचा असल्यास ग्रंथालयामार्फत कार्यरत ग्रंथालयीन आज्ञावली वापरुन सोय उपलब्ध करुन देण्यात येते. अशा स्वरुपातून ग्रंथालयातून संदर्भ सेवा पुरविली जाते. संदर्भ सेवेव्दारे वाचकाला हवी ती माहिती दिली जाते. त्यामुळे वाचकास ग्रंथालय सेवेबाबत विश्वास निर्माण होतो. वाचकांची संख्या वाढते आणि ग्रंथालायीन कर्मचाऱ्यासही समाधान प्राप्त होते. वाचकांना विशिष्ट माहिती आवश्यक असल्यामुळे वारंवार सदर सेवेची गरज भासते. ग्रंथालयाकरीता ही एक महत्तवाची सेवा आहे. बरेचदा संदर्भसेवा प्रस्थापित संदर्भग्रंथापुरती मर्यादीत राहत नाही तर ग्रंथालयातील सर्वच ग्रंथ संदर्भग्रंथ बनतात. हे ग्रंथालयातील सर्वच कर्मचाऱ्यांनी समजावून घेतले पाहिजे. तसे लक्षात घेऊन काम केल्यास ग्रंथालयातील सर्वच कर्मचारी पुरेशा अनुभवानंतर सदर सेवा प्रभावी देऊ शकतात.

### ३. वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services) :

**सेवेचे स्वरुप :** ग्रंथसूची बिब्लिओग्राफी हा शब्द 'बिब्लिओन' म्हणजे ग्रंथ व 'ग्राफेन' म्हणजे लिहिणे या शब्दापासून निर्माण झाला आहे. म्हणून ग्रंथसूची म्हणजे 'ग्रंथलेखन' असेही म्हणता येईल पण पुढे त्यात बदल होऊन 'ग्रंथाविषयी लेखन' असा अर्थ प्रचारात आला.

ग्रंथसूची म्हणजे यादी या यादीला एक विशिष्ट पध्दत असते. एखाद्या मान्य असलेल्या पध्दतीप्रमाणे प्रमाणाकाप्रमाणे केलेली असते. एखाद्या व्यक्तीविषयी वा विषयासंबंधी इतर प्राथमिक साधनांमुळे मिळालेल्या संदर्भाची सूची असते. या ग्रंथ सूचीची रचना लेखकाच्या वर्णानुक्रमानुसार केलेली असते.

**'ग्रंथसूची म्हणजे ग्रंथांचे अचूक वर्णन करण्याची कला किंवा शास्त्र.' व्हॅन होईसन यांच्या मते**

**'एका विशिष्ट विषयाची, साहित्यातील विषयाची विशिष्ट लेखकांची प्रकाशकांच्या पुस्तकांची यादी.' –– द. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी मते**

ग्रंथालयामध्ये विविध प्रकारचे ग्रंथ आहेत. अशा ग्रंथांच्या सूची ग्रंथालयामध्ये करण्यात आलेल्या आहेत. सूची सेवेमुळे विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये कोणकोणत्या विषयाची व लेखकांची

पुस्तके ग्रंथालयामध्ये आहेत हे लगेच पाहता येते. ग्रंथालयामध्ये ग्रंथालयांची सूची तयार केली जाते. तसेच आज्ञावलीच्या मदतीनेही सूची तयार करण्यात येते, त्यामुळे वाचकांना तीचा शोध घेणे सोपे जाते. ह्यासाठी AACR-II प्रमाणे तालिकीकरण केले जाते. सदर तालिकीकरण तीन प्रकारे तयार केले जाते. विषयवार सूची, ग्रंथनाम सूची, लेखकनाम सूची अशा वेळी वाचकांना आवश्यक असलेले पुस्तक कोणत्या विषयाचे आहे, कोणत्या लेखकाचे आहे हे पाहण्यास मदत होते. सदर सेवेमुळे वाचकांचा वेळ वाचतो.

### ४. वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings Services)

**सेवेचे स्वरुप :** वर्तमानपत्रे हे ज्ञानप्राप्तीचे महत्तवाचे साधन आहे. जी माहिती ग्रंथरुपात, नियतकालिकांतील लेखाच्या स्वरुपात प्रकाशित होण्याइतकी मोठी नसते अशी माहिती वर्तमानपत्रातून प्रकाशित केली जाते. वर्तमानपत्रातील बातम्यांना विषयाचे बंधन नसते. किंबहुना नव्याने शोध लागलेल्या संशोधनाचे परिक्षण अथवा ते लोकप्रिय करण्यासाठीचे वृत्त वर्तमानपत्रात प्रकाशित केले जाते. आणख़ी असे की, वर्तमानपत्र प्रकाशित होत असलेल्या स्थानिक महत्तवाच्या बातम्यांमुळे वर्तमानपत्रे त्या परिसराचा इतिहास दर्शवितो. सबब वर्तमानपत्रे हे माहितीचे प्राथमिक साधन समजले जाते. ग्रंथालयाच्या निगडीत विषयातील आलेल्या बातम्या वर्तमानपत्राच्या कात्रणाच्या स्वरुपात काढल्या जातात. ही कात्रणे एका स्वतंत्र कागदावर वेगवेगळी चिकटविली जातात. वर्तमानपत्राचे नाव, दिनांक, पृष्ठ क्रमांक इ. लिहिला जातो. अशा कात्रणांचा संग्रह विषयनिहाय वेगवेगळ्या संचिकेमध्ये ठेवला जातो व वाचकांच्या गरजेनुसार सदर कात्रणांची सेवा दिली जाते.

ग्रंथालयामध्ये येणाऱ्या वर्तमानपत्रांत काही वेळेला आवश्यक असणारी माहिती वाचकांच्या नजरेस पडत नाही. त्या माहितीची गरज भासल्यास वाचकांना ती माहिती मिळावी या हेतूने ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रातील कात्रणे काढून ती एकत्र स्वरुपात साठवून संग्रही ठेवली जाते. वाचक सदर कात्रणे पाहून योग्य व आवश्यक माहिती मिळवू शकतो. सदर सेवा ही वर्तमानपत्रा व्यतिरिक्त इतर नियतकालिके, मासिके यांचीही कात्रणे संग्रहीत करुन देता येऊ शकते.

### ५. बहिःशाल सेवा (Extensive Services)

**सेवेचे स्वरुप :** वाचन सवयी जागृत करणे. यासाठी वाचक आणि ग्रंथ एकत्र आणण्यात ग्रंथालय सेवक, ग्रंथपाल यशस्वी झाले पाहिजेत. ग्रंथालयाव्दारे वाचक आकर्षित करण्याची मोहीम हाती घ्यावी लागते. त्यासाठी ग्रंथालयात विविध स्तरातील वाचकांसाठी व्याख्याने व चर्चा आयोजित करता येतात. अभ्यासप्रेमी गटामध्ये सुध्दा परिसंवाद घडवून आणता येतात. यामुळे ग्रंथसंग्रहाची माहिती वाचकांना व अन्य लोकांना होते. ग्रंथालयात ग्रंथपालांनी स्थानिक तसेच राष्ट्रीय सण, उत्सव साजरे करावेत. त्यांना अनुषंगिक ग्रंथ प्रदर्शने भरवावीत. निरनिराळ्या स्तरावर वेगवेगळ्या स्पर्धा आयोजित कराव्यात. याव्दारे वाचक ग्रंथाकडे, ग्रंथालयाकडे आकृष्ट होतील याची दक्षता घ्यावी.

ग्रंथालयातील तालिका वाचकांना त्यांना हवा असणारा ग्रंथ ग्रंथालयात आहे किंवा नाही हे शोधण्यास मदत करते. वर्गीकृत रचना ग्रंथांचे मांडणीवरील स्थान दर्शविते. संदर्भ सेवा तर नेहमीच मदतीला असते. अशा तऱ्हेने देवघेव, संदर्भ, आंतर ग्रंथालयीन देवघेव, भाषांतर इत्यादी सेवा ह्या नेहमीच्या सेवा होत. यापेक्षा वेगळ्या सेवा ग्रंथालयामार्फत दिल्या जातात त्यांना विस्तारीत सेवा असे म्हणतात. **(सुतार, २०११)**

सदर सेवेमध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या सेवांचा समावेश होतो.

**वाचन साहित्य उपलब्ध करणे :**

ग्रंथालयाकडे असलेल्या वाचनसाहित्याचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी ही सेवा उपलब्ध केली जाते. महाविद्यालयीन ग्रंथालय ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी तसेच घरी वाचण्यासाठी वाचनसाहित्य उपलब्ध करते. या पाठ्यपुस्तके, नियतकालिके आणि वर्तमानपत्रे ह्यांचा समावेश होतो.

पाठ्यपुस्तके : महाविद्यालयीन ग्रंथालये पाठ्यपुस्तके घरी वाचण्यासाठी देतात. जास्त मागणी असलेल्या व मर्यादीत प्रती असलेल्या पाठ्यपुस्तकांच्या आरक्षणाची सेवा महाविद्यालयीन ग्रंथालय उपलब्ध करते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'बुक बँक' योजनेतंर्गत पाठ्यपुस्तकांचे संच निवडक विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी उपलब्ध करतात. Overnight Issuing ची सुविधाही पुरवितात. गृहपाठ आणि प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालये विद्यार्थांना योग्य ते संदर्भग्रंथ पुरवितात.

नियतकालिके आणि वर्तमानपत्रे : विद्यार्थी आणि अध्यापकांना अद्ययावत ज्ञान मिळविण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालये सामान्य / संकीर्ण नियतकालीके इत्यादी उपलब्ध करुन देतात. यासाठी स्थानिक तसेच राष्ट्रीय पातळीवरची वर्तमानपत्रे वाचकांना उपलब्ध करुन देतात.

**ग्रंथालय परिचय :**

महाविद्यालयात नव्यानेच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन ग्रंथालयाबद्दल काहीच माहिती नसते. ग्रंथ कोठून घ्यावा, एका वेळेस किती ग्रंथ घरी वाचण्यासाठी नेता येतात, ग्रंथालय कोणकोणत्या सेवा देते, संदर्भ ग्रंथ कोठे आहेत. इ. अनेक प्रश्न ग्रंथालयाच्या नवीन वाचकांच्या मनामध्ये असतात. या प्रश्नांची उत्तरे ग्रंथालयाच्या नवीन वाचकास मिळावीत, वाचकांच्या ग्रंथालयाबद्दलची किमान माहिती व्हावी या हेतूने महाविद्यालय ग्रंथालय 'ग्रंथालय परिचय (Orientation) कार्यक्रम आयोजित करते.'

तसेच यामध्ये ग्रंथपाल वाचकांना ग्रंथालय यंत्रणेची ओळख करुन देतो. यामध्ये ग्रंथालयासंबंधीची माहिती पुस्तिका देणे, ग्रंथालयांची भूमिका, वाचन साहित्याचे प्रकार, ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा तालिकेचा उपयोग, संगणकीय प्रणालीचा वापर इ. गोष्टींचा अंतर्भाव असतो.

**नवीन ग्रंथांची यादी :**

ग्रंथालयात नव्याने आलेल्या ग्रंथांच्या याद्या नियमितपणे तयार करुन त्या वाचकांसाठी वितरीत केल्या पाहिजेत. त्यायोगे नवीन ग्रंथांची माहिती ग्रंथप्रेमी वाचकांना मिळू शकेल व त्यांच्याकडून अशा पुस्तकांना मागणी येईल.

**ग्रंथ प्रदर्शनी :**

ग्रंथालयात नवीन आलेली पुस्तके एखाद्या दर्शनी ठिकाणी प्रदर्शित करुन ठेवणे. अशा रितीने आकर्षकरित्या प्रदर्शित केलेल्या नव्या ग्रंथांकडे वाचकांचे लक्ष चटकन वेधले जाते. ज्यांना ते ग्रंथ आवडतात ते वाचक ग्रंथांसाठी आपली मागणी नोंदवितात. अशा नवीन घेतलेल्या ग्रंथांची आकर्षक मांडणी अनेक ग्रंथालयात हल्ली करुन ठेवतात.

**ग्रंथ प्रदर्शन :**

ग्रंथालयामध्ये दरवर्षी नवनवीन वाचक येतात त्याचप्रमाणे दरवर्षी विविध प्रकारचे ग्रंथ येत असतात. वाचक हे प्रत्येकवेळी सर्व ग्रंथ पाहू शकत नाहीत. त्यावेळी वाचकांना सर्व ग्रंथ पाहता यावेत, हाताळता यावेत, चाळता यावेत यासाठी ग्रंथालय ठराविक कालावधीनंतर ग्रंथ प्रदर्शन भरवते. ग्रंथ प्रदर्शन हे सुवर्ण महोत्सव, शताब्दी, जयंती आणि विशेष दिनी या सारख्या प्रसंगावर भरविले जाते. प्रदर्शन पाहण्यासाठी इतर वाचकही ग्रंथालयामध्ये येतात त्यामुळे ग्रंथालयाचे सदस्य होण्याची उत्सुकता त्यांच्यामध्ये निर्माण होते. ग्रंथ प्रदर्शन ही सेवा ग्रंथालय आपल्या भावी वाचकांना देते.

**वाचन प्रशिक्षण / उद्‌बोधन कार्यक्रम :**

वाचकांना ग्रंथालयाचा आणि तेथील संग्रहाचा परिणामकारक उपयोग करताना विविध पातळ्यांवरील वाचकांना मदत व्हावी यासाठी एक ग्रंथालय परिचय किंवा ग्रंथालयातील साहित्याचा उपयोग कसा करावा याविषयी वाचकांना मार्गदर्शन करण्याचा कार्यक्रम आहे. ग्रंथालयातील संग्रहाचा आणि ग्रंथालयीन सेवांचा उपयोग चांगल्या प्रकारे करुन घेण्यास मदत व्हावी या दृष्टीने सदर कार्यक्रम शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ यांमधील वाचकांकरिता, संशोधन संस्थांमध्ये नवीनतेने प्रवेश करणाऱ्यांकरिता योजले जातात.

**वाचन कक्ष / अभ्यासिकेची सोय :**

वाचकांना ग्रंथालयात बसून ग्रंथ तसेच नियतकालिके वाचता यावीत यासाठी वाचन कक्ष / अभ्यासिकेची सुविधा देण्यात येते.

सदर अभ्यासिकेत उत्कृष्ट फर्निचर, टेबल खुर्ची, विद्युत उपकरणे तसेच आवश्यक गोष्टींची मांडणी केलेली असते. तसेच एकाच वेळी जास्तीत जास्त वाचक बसून वाचन कक्ष / अभ्यासिकेच्या सोयीचा फायदा घेऊ शकतील अशी व्यवस्था करण्यात आलेली असते. महाविद्यालयीन ग्रंथालय साधारणपणे ७ ते ८ तास उघडे असते. परंतु अभ्यासिका १० ते १२ तास उपलब्ध करुन दिल्या जातात.

## २) आधुनिक सेवा

### १. प्रचलित जागरुकता सेवा (Current Awareness Services)

**सेवेचे स्वरुप :** अद्ययावततेच्या दृष्टीने नियतकलिकांचे स्थान कोणीच घेऊ शकत नाही. परिसंवाद व चर्चा सत्रे यांची इतिवृत्ते, अहवाल, पेट्ंटस व राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय प्रमाणके यासंबंधीची माहिती नियतकालिके विशेष अहवालाच्या स्वतंत्र पुस्तिका वगैरे वेगवेगळ्या प्रकारच्या प्रलेखातून प्रकाशित होत असते. अशी प्रकाशित माहिती गरजू अभ्यासू व व्यासंगी उपयोजकाच्या दृष्टीसमोर आणणे म्हणजेच प्रचलित जागरुकता सेवा होय.

**प्रचलित जागरुकता म्हणजे**

**''प्रलेख प्राप्त झाल्याबरोबर त्यांचे परीक्षण व सिंहावलोकन करुन त्याव्दारे संघटनेच्या कार्यक्रमास उपयुक्त होईल अशा माहितीची निवड करुन ती माहिती ज्या व्यक्तिंच्या कार्यास उपयुक्त ठरेल त्या व्यक्तींना सादर करुन देण्याच्या प्रणालीची स्थापना करणे म्हणजेच प्रचलित जागरुकता सेवा देणे होय.''     -- स्ट्रॉस आणि रिडम यांच्या मते.**

**''अशी ग्रंथालय सुविधा की जिच्यायोगे संशोधनाचे किंवा संशोधक समूहाच्या संशोधन कार्यावर परिणाम करणारी ताजी, अद्ययावत माहिती त्यांच्यापर्यंत अगदी वेळेवर आणि योग्य त्या स्वरुपात पोहोचविली जाईल.'' (सुतार, २०११)**

**''विशिष्ट विषयाच्या प्रचलित किंवा अद्ययावत नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखांसंबंधीच्या ग्रंथवर्णनविषयक माहिती किंवा अनुक्रमणिका पृष्ठासंबंधी माहिती देणारी सेवा''**

प्राथमिक प्रलेख व या प्रलेखाचे नियकालिकांतील निर्देशन वा सार म्हणजे प्रचलित जागरुकता सेवा होय. स्थानिक स्तरावर ही सेवा जास्त परिणामकारक ठरते.

ग्रंथालयामध्ये माहितीचा संग्रह केलेला असतो. सदर माहितीमध्ये दररोज नवनवीन माहितीची भर पडत असते. सर्व माहिती संशोधकास ग्रंथालयाबाहेर पाहावयास मिळेल असे नाही. वाचनसाहित्य प्रकाशित होण्यापूर्वी अथवा प्रकाशित झाल्यानंतर ग्रंथालयाकडे त्याची प्रसिध्दी प्रपत्र येत असतात. कधी वृत्तपत्रांत, नियतकालिकांत एखादी संशोधकास उपयुक्त

असलेली माहिती प्रकाशित होते. ही माहिती ग्रंथालयाने जागरुकपणे संबंधीत संशोधकाला कळविणे म्हणजे ग्रंथालयातील प्रचलित जागरुकता होय.

ग्रंथालयामध्ये येणारी नवनवीन माहिती, ग्रंथांची यादी, नियतकलिकांची यादी, नवीन वर्तमान पत्र इत्यादी सर्व प्रकारची माहिती ग्रंथपाल विभाग प्रमुखाला पुरवितो त्यामुळे ही माहिती वाचकांना मिळते. नियतकालिकांचे कंटेंट पेज देखील दर महिन्याला पाठविले जातात. त्यामुळे ग्रंथालयात नवीन वाचन साहित्य आलेले आहे याची वाचकांना कल्पना येते.

काही वेळेला या माहितीचे पोस्टर करुन किंवा सुचना फलकावर लावून नवनवीन घडामोडींची कल्पना वाचकांना येते. या प्रचलित जागरुक सेवेचा वाचकांना बराच फायदा होतो. वाचकांना ग्रंथालयामध्ये नवीन साहित्य आले का? ह्या बाबत विचारपुस करण्यासाठी सतत ग्रंथालय कर्मचाऱ्यांकडे फेऱ्या माराव्या लागत नाही. अशी सेवा ग्रंथालयीन कर्मचारी किती तत्परतेने पुरवितो यावर ग्रंथालयाची उपयुक्तता ठरत असते. एकूणच प्रचलित जागरुकता सेवा ही ग्रंथालयाची महत्वाची सेवा आहे. थोडक्यात सदर सेवा वाचकांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर शोधून देण्यास मदत करते.

### २. निवडक माहितीचे प्रसारण सेवा (Selective Dissemination of Information Services)

**सेवेचे स्वरुप :** निवडक माहितीचे प्रसारण सेवा या सेवेसाठी मुळ इंग्रजी शब्द Selective Dissemination of Information असा आहे म्हणजे माहितीचे निवडक प्रसारण करण्याची ही सेवा आहे. याचाच अर्थ की, माहिती प्रसारणासाठीच असली तरी प्रसारण हे विचारपूर्वकच व योजनाबध्द असे करावे लागते. सर्व प्रचलित माहिती उपयुक्त असली तरी सर्व संशोधकांना ती सारख्याच प्रमाणात उपयुक्त ठरेल असे नाही. यासाठी संशोधकांच्या नेमक्या गरजांशी जुळेल अशी पडताळून पाहिलेली माहितीच त्यांना द्यावी लागते. त्यांना तिचा किती उपयोग झाला हे विचारुन मग पुढील प्रसारणाबाबत धोरण ठरवावे लागते. **(नरगुंदे, २००५)**

**व्याख्या :**

**''निवडक माहितीचे प्रसारण ही संस्थांतर्गत अशी सेवा आहे, ज्याव्द्ारे विविध माहिती स्त्रोतांमधील नवीन माहिती शोधून त्या माहितीचा महत्तम उपयोग प्रचलित**

**कामकाजासाठी ज्या ठिकाणी अधिक होईल अशा ठिकाणी तिचा ओघ वळवून माहितीची उपयुक्तता वाढीस लावली जाते.'' (सुतार, २०११)**

ग्रंथालयातून दिली जाणारी ही एक महत्वाची सेवा आहे. सदर सेवा वाचकांच्या मागणीवरुन दिली जाते. एखादा वाचक नव्याने संशोधन सुरु करतो. त्याला त्या विषयावरील निवडक माहिती शोधून वाचनासाहित्य कोणते उपयुक्त ठरेल ते सांगितले जाते.

वाचकास काही वेळा कोणती माहिती पाहिजे हे निश्चित करता येते, परंतु ती माहिती नेमकी कोठे मिळू शकेल, त्यातील इतर घटक कोणते हे ठरविणे शक्य होत नाही. अशा वेळी ग्रंथालयाव्दारे त्या माहितीचा स्त्रोत शोधून दिला जातो. ही माहिती अनेक प्रलेखात असू शकते, परंतु त्यातील निवडक माहितीच दिली जाते. विशिष्ट विषयावरील उपयुक्त माहिती प्रलेखांची माहिती देणे असे ग्रंथालयातील निवडक माहितीच्या प्रसारण सेवेचे स्वरुप असते. (Luhn, 1961)

वाढत्या माहिती प्रवाहाच्या जमान्यात वेचक माहितीसेवा देण्याची गरज आहे. योग्य वाचकापर्यंत निवडक माहिती कोणत्याही साधनाच्या मदतीने पोहिचविणे हे या सेवेचे वैशिष्ट्य आहे. या सेवेसाठी ग्रंथालयाच्या वाचकांच्या गरजेचा कल लक्षात घेणारे सर्वेक्षण करणे योग्य ठरते.

त्यादृष्टीने ग्रंथालयातील संशोधक व अभ्यासक यांचे युजर्स प्रोफाईल (User Profile) तयार करुन त्या आधारावर त्यांना सातत्याने माहिती पुरविण्यावर या सेवेमध्ये विशेष लक्ष दिले जाते. योग्य माहिती निवडणे, त्याची वाचकाला सूचना देणे, त्यात भर पडणारी माहिती सातत्याने पुरवित राहणे, दिलेल्या माहितीत सुधारणा करणे ही या सेवेची वैशिष्ट्ये आहेत.

निवडक माहितीची प्रसारण सेवा आणि प्रचलित जागरुकता सेवेमध्ये थोडे साम्य असले तरी त्यात फरक आहे. निवडक माहितीची प्रसारण सेवा वाचकांच्या मागणीनंतर दिली जाते तर प्रचलित जागरुकता सेवा ग्रंथपाल स्वतः पुढाकार घेऊन पुरवितात. सदर सेवा देण्यासाठी ग्रंथपालास आपल्या ग्रंथालयातील वाचनसाहित्याची परिपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. आपल्या ग्रंथालयात माहिती मिळणे शक्य नसल्यास इतरत्र कोठे मिळू शकेल हे देखील माहिती हवे. ही माहिती उपलब्ध असल्यास सदर सेवेचा वेग वाढतो.

साहजिकच अधिक वाचक ग्रंथालयाकडे आकृष्ट होतात. हल्ली सदर सेवेसाठी संगणकाचा वापर केल्यास त्याने खूपच प्रभावी सेवा देता येऊ शकते. ज्याव्दारे विशिष्ट वाचकाला त्याच्या आवडीची आणि त्याला हव्या असलेल्या विशिष्ट विषयावर संबंधित माहिती संगणकाच्या साहाय्याने पुरविली जाते. एकूणच ग्रंथालयाकरीता ही अत्यंत उपयुक्त सेवा आहे.

**३. वाचकांना निर्देशन सेवा (Indexing Services)**

**सेवेचे स्वरुप :** सार सेवेप्रमाणेच निर्देशन सेवा ही देखील ग्रंथालयातील एक महत्तवाची सेवा आहे. संशोधकाने सर्व वाचनसाहित्यांपैकी त्यातील नेमके कोणते वाचनसाहित्य उपयोगाचे आहे ते ठरविलेले नसते. शिवाय नेमके कोणते वाचनसाहित्य कोठे उपलब्ध आहे हे वाचकास माहिती नसते. या कारणामुळे ग्रंथालयीन कर्मचारी वाचकास लागणाऱ्या माहितीची ग्रंथालयातील जागा दर्शवितो. अशा सेवेस निर्देशन सेवा असे म्हणतात.

प्रलेखांमध्ये समाविष्ट हव्या असलेल्या माहितीची निश्चित जागा दाखविण्याचे कार्य निर्देशाव्दारे केले जाते. निर्देशांचे मुख्यत्वेः लेखक निर्देश, विषय निर्देश, शिर्षक निर्देश, टिप्पणवजा (Annotated) निर्देश आणि सूचीविषयक निर्देश असे प्रकार पडतात.

**निर्देशाची व्याख्या :**

**''प्रत्येक बाब पद किंवा विषय शोधून काढण्यासाठी पुरेशी माहिती देणारी व पध्दतशीरपणे मांडणी केलेली यादी म्हणजे निर्देश होय.'' —— युनेस्को**

**''प्रलेख किंवा प्रलेखांच्या समुहात उल्लेख असलेली नावे किंवा विषय कोणत्या स्थानी आढळेल हे दर्शविण्यासाठी पध्दतशीरपणे रचना केलेली यादी म्हणजेच निर्देश होय.'' (सुतार, २०११)**

एखाद्या विषयावर उपयुक्त असणारे वाचन साहित्य कोणते याबाबत वाचकाला मार्गदर्शन करणे असे या सेवेचे स्वरुप असते. बहुतेक वेळा ही माहिती सोपी, सहज प्राप्त होणारी असते. उदा. विशिष्ट विषयाचा वर्गांक कोणता, एखाद्या लेखकाची कोणती पुस्तके आपणाकडे उपलब्ध आहेत. विशिष्ट पुस्तक उपलब्ध आहे का? असल्यास कोठे सापडेल अशा प्रकारचे प्रश्न वाचक विचारीत असतो. ग्रंथालयीन कर्मचारी सदर प्रकारच्या प्रश्नांना

योग्य उत्तर देऊन वाचकास योग्य साहित्याकडे निर्देश करतो त्यामुळे सदर सेवेस निर्देशन सेवा असे म्हटले जाते. सदर सेवेअंतर्गत वाचकास योग्य माहितीची जागा सांगितली जाते. प्रत्यक्ष माहिती दिली जात नाही हे महत्वाचे. ग्रंथालयातील सदर सेवेचे स्वरुप बहुधा व्यक्ती पातळीवरील सेवेचे असते.

### ४. प्रतिलिपी सेवा (Photocopy Services)

**सेवेचे स्वरुप :** सन १९५४ मध्ये प्रलेखाच्या सर्व प्रकारच्या हुबेहुब पुनर्निर्मिती करिता प्रतिलिपी हा शब्द वापरण्यात आला. यामध्ये फोटोकॉपींग, ब्ल्यू प्रिटिंग, इलेक्ट्रोकॉपींग, थर्मोकॉपिंग इ. शी संबंधीत सर्व प्रक्रिया आणि तंत्रांचा समावेश होतो.

**'' प्रलेखांची प्रतिलिपी आणि प्रतिरुपे या दोहोंकरिता वापरण्यात येणाऱ्या विशिष्ट लिखाणाच्या संपूर्ण संग्रहाची प्रक्रिया आणि पध्दती होय.'' -- हॉकन्स यांच्या मते**

ग्रंथालयातील वाचकास काही ग्रंथांतील माहिती, नियतकालीकांमधील लेख सवडीने वाचावयाचे असतात. तर काही वारंवार वापरावयाचे असतात. काही साहित्य दुर्मिळ असल्याने ग्रंथालयाबाहेर देता येत नाही. सदर कारणांमुळे एखाद्या वाचनसाहित्यातील विशिष्ट माहिती वाचकांना मूळ स्वरुपात प्रतिलिपीव्दारे दिल्यास ते खूपच उपयुक्त ठरते. प्रतिलिपी करण्याकरीता झेरॉक्स, सीडी रोम, पेन ड्राइव्ह यांचा वापर करणे शक्य असते. यासाठी येणारा खर्च संबंधित वाचकांकडून नाममात्र दरात प्राप्त करता येतो. वाचकांच्या गरजेनुसार हव्या त्या स्वरुपात मूळ साहित्याची प्रतिलिपी उपलब्ध करुन देता येते.

मात्र अशा प्रकारे प्रतिलिपी पुरवित असताना वाचनसाहित्यासाठी असणाऱ्या स्वामित्व कायद्याकडे दुर्लक्ष करुन चालत नाही. मूळ ग्रंथांपैकी जास्तीत जास्त एक तृतीयांश साहित्य केवळ उपलब्ध करुन देता येते. प्रतिलिपी करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री ग्रंथालयात उपलब्ध असणे आवश्यक असते आणि वाचकांना ज्या स्वरुपात प्रतिलिपी वापरणे शक्य होते त्या स्वरुपात पुरविणे आवश्यक असते.

ग्रंथालयामध्ये वाचक हे सतत वाचनास येत असतात. परंतु काही माहिती किंवा एखाद्या नियतकालिकामधील लेख मोजक्याच स्वरुपात वाचकांना हवी असते. त्यावेळी

वाचकांना तो ग्रंथ किंवा नियतकालिक घेऊन ग्रंथालयाच्या बाहेर जावे लागते व आवश्यक मजकूराच्या प्रती घ्याव्या लागतात. अशा वेळी त्या वाचनसाहित्याची नासधूस होण्याची शक्यता नाकारता येत नाहीत. ह्यासाठी ग्रंथालयामार्फत काही रक्कम नाममात्र मूल्य स्वरुपात घेऊन ग्रंथालयामार्फत वाचकांना प्रतिलिपी सेवा दिली जाते. त्यामुळे वाचकांना कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त प्रती उपलब्ध करुन दिल्या जातात.

**५. सार सेवा (Abstacting Services)**

**सेवेचे स्वरुप :** सार आणि सारलेखन उपयोजकांचा वेळ महत्तवाचा ही गोष्ट लक्षात घेऊन काही सेवा व त्यांची तंत्रे यांचा उपयोग होऊ लागला त्यापैकी सारलेखन ही एक.

**''मूळ लेखाचा / प्रकाशनाचा गाभा किंवा संक्षिप्त रुप म्हणजे सार होय.'' –जे. एच. शेरा** यांच्या म्हणण्यानुसार

**''सार हा प्रलेखनाचा अचूकपणे केलेला आणि संक्षिप्त केलेला प्रतिनिधीच असतो. मात्र त्यामध्ये भाष्य, टिका नसते आणि सार कोणी केले असाही फरक नसतो. सार लेखकाने स्वत: लिहिले असले अथवा अन्य व्यक्तीने लिहिले असेल तर ते सारच असते.'' वेल** यांची व्याख्या ही अमेरीकन नॅशनल सँडर्ड इन्स्टिटयूटच्या (ANSI) च्या सारलेखनाचे प्रमाणक यांचा एक भाग आहे. **(कुंभार, २००६)**

विविध क्षेत्रांत प्रकाशित होत असलेल्या नियतकालिकांची तसेच अन्य साहित्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. दुसऱ्या बाजूला ग्रंथालयातील वाचकास हे साहित्य वाचण्यासाठी पुरेसा वेळ उपलव्ध नाही. यामुळे अशा साहित्यांची संपूर्ण मूळ प्रत वाचकास देण्याऐवजी थोडक्यात सारांश तयार करुन दिल्यास वाचकास हवी ती माहिती मिळू शकते. या सेवेस सार सेवा म्हणतात.

सदर सेवा देण्यासाठी संबंधित विषयाची तांत्रिक भाषा, त्यातील संज्ञा समजणारी व्यक्ती ग्रंथालयात उपलब्ध असणे जरुरीचे असते. आवश्यक तो लेख संपूर्ण स्वरुपात ग्रंथालयात उपलब्ध असावा लागतो. लेखाची भाषा जाणणारा कर्मचारी ग्रंथालयात उपलब्ध असावा लागतो. सार सेवा देणे सदर कारणांमुळे फार मोजक्या ग्रंथालयांना शक्य होते. शिवाय

सार सेवा देण्यामध्ये मूळ लेख प्राप्त होणे, तो वाचून त्या विषयाच्या जाणकाराने त्याचा सारांश तयार करणे यामध्ये बराच कालावधीही जातो पण एखाद्या विषयावर परिपूर्ण माहितीसाठा करुन ठेवणे शक्य होते. सध्या बहुतेक ग्रंथालयात सारलेखन करणारी नियतकालिके वर्गणी भरुन प्राप्त होतात यामुळे पुन्हा आपल्या ग्रंथालयात अशी सेवा देण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नेमणे आवश्यक नसते.

### ३) संगणक सेवा (Computer Services)

**सेवेचे स्वरुप :** ग्रंथालयामध्ये संगणकातील ग्रंथालयीन आज्ञावलीच्या माध्यमाव्दारे ग्रंथांच्या सूची, तालिका उपलब्ध होतात. सदर सेवेमुळे वाचकांना कोणते वाचनसाहित्य उपलब्ध आहेत याबाबतची इत्थंभूत माहिती प्राप्त होते. सर्वात महत्तवाचे ग्रंथाबाबत वर्गांक व संग्रहांक पाहण्यासाठी वाचकांना प्रत्यक्ष ग्रंथ हाताळावा लागत नाही तर त्याबाबतची माहिती आज्ञावलीत असलेल्या OPAC च्या माध्यमातून वाचक ते घेऊ शकतात.

### १. इंटरनेट, ई–मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search)

इंटरनेट हा आजच्या युगात परवलीचा शब्द झालेला आहे. अवकाशातील निरनिराळ्या उपग्रहांमुळे संदेशवहनाच्या क्षेत्रात क्रांती होऊन लक्षणीय प्रगती झालेली आहे. यामुळे जग जवळ आले आहे. म्हणजेच माहितीचे वैश्विकीकरण झालेले आहे. एका देशातील माहिती साधने दुसऱ्या देशात बसून हाताळणे शक्य झाले आहे. ही किमया इंटरनेट या माहिती जाळ्यामुळे झालेली आहे. माहितीशास्त्राच्या क्षेत्रात पूर्वीचे ज्ञान आणि नवीन निर्माण झालेले ज्ञान या दोन्हींचाही वापर अपरिहार्य झालेला आहे. वाचकाला कोणतीही माहिती उपलब्ध व्हावी म्हणून ग्रंथालयात इंटरनेटची सेवा उपलब्ध असणे आवश्यक झाले आहे. यासाठी लागणारा खर्च लक्षात घेता वाचकाला ना नफा ना तोटा या तत्वावर ही सेवा उपलब्ध करुन देता येते.

दोन व्यक्ती एकमेकांशी संपर्क साधण्याकरता पूर्वी सांगावा, पत्रे यांचा उपयोग करीत असत परंतु आताच्या युगात ई–मेलव्दारे सहज संपर्क होऊ शकतो.

**ई–मेल सेवा :**

ई मेल म्हणजे इलेक्ट्रॉनिक मेलमुळे संगणक वापरणाऱ्यांना स्थानिक तसेच जागतिक पातळीवर संदेशांची देवाणघेवाण करणे शक्य झाले आहे. प्रत्येक पत्रपेटीस एक पत्ता असतो, ज्याला ई–मेलचा पत्ता म्हणतात. त्या नावावर पाठविलेले संदेश त्या पत्रपेटीत जमा होतात. ई–मेलव्दारे पाठविलेले संदेश एका क्षणात जगाच्या कुठल्याही स्थळी पोहोचवले जातात. आलेल्या संदेशांचे वर्गीकरण करुन ते ठराविक फोल्डरमध्ये साठवून ठेवता येतात.

इंटरनेटव्दारा इलेक्ट्रॉनिक संदेशाची देवाण–घेवाण ई–मेल करते. ही जलद गती सेवा आहे. या सेवेमार्फत फोटो, आवाज, फाईल पाठवू शकतो किंवा मिळवू शकतो. ही सेवा कमी खर्चीक आहे यामुळे उपयोजक एकमेकांच्या सानिध्यात येतात. सदर सेवा आर्थिक बचतीची सेवा आहे. **(पवार, २००९)**

**ब्राऊझिंग सेवा :**

ब्राऊझिंग सेवा ही इंटरनेटव्दारा दिली जाणारी एक गतिशील सेवा आहे. ही सेवा वाचकाला रिमोट संगणकामधील / माहिती साठ्यातील माहिती मिळविण्यासाठी व दाखविण्यासाठी उपयोगी पडते. वाचकाने मागणी केली नाही तरी ही माहिती रिमोट संगणक त्याला प्राप्त करुन देते.

इंटरनेट प्रमाणेच दोन व्यक्तींतील संपर्काकरीता, पत्र व्यवहाराकरीता आता ई–मेल व ब्राऊझिंग चा वापरही केला जात आहे. यामुळे कमी वेळात आणि कमी खर्चात आपसांत संपर्क साधणे शक्य होते. म्हणून वाचकांच्या सोयीसाठी सदर सेवा ग्रंथालयात सुरु करणे काळाची गरज आहे. इंटरनेट, ई–मेल, ब्राऊझिंग सेवा या नव्यानेच सुरु झाल्या असल्यामुळे याचा वापर करण्याकरीता ग्रंथालयामध्ये प्रशिक्षण, सुचना फलक लावणे इ. मार्गांनी त्यास प्रसिध्दी देणे आवश्यक आहे.

**२. ओपेक सेवा (OPAC Services)**

**सेवेचे स्वरुप :** 'ओपेक म्हणजे पारंपारिक तालिकेचे संगणकीय स्वरुप होय. ओपेकच्या सहाय्याने ग्रंथसूचीय माहिती अधिक सक्षमतेने मिळविणे शक्य झाले आहे. ऑन

लाईन पब्लिक ॲक्सेस कॅटलॉग (OPAC) ही तालिका अनेक प्रकारांनी वाचकांना शोधकार्यात मदत करते, मार्गदर्शन करते. पत्र तालिकेपेक्षा ही अधिक उपयोगी पडणारी तालिकीकरणाची रचना आहे. ओपेक ही संगणकीय तालिका आहे. वाचकांना त्यांच्या माहितीचा शोध रिमोट टर्मिनलव्दारा घेता येतो. अशा तऱ्हेने ही तालिका तालिकेविषयीची अनेक वैशिष्ट्ये वाचकांना दाखवू शकते. तसेच त्याला सर्वसमावेशक शोधासाठी मदत करते. त्यामुळे एकापेक्षा अनेक ठिकाणी वाचक शोध घेऊ शकतो. इतर तालिकांद्वारा ही तालिका ग्रंथालयाच्या संग्रहामध्ये प्रवेश करुन देते उदा. लेखकतालिका, शिर्षकतालिका, विषयतालिका, वर्गिकृत तालिका इ.

याव्यतिरिक्त ग्रंथोपार्जनाची शिर्षके, साहित्याचा राखीव हक्क, वैयक्तिक माहिती प्रसारण, स्मरणपत्रे इ. गोष्टी ई–मेल व्द्‌ारा देऊ शकतो. या तालिकेत ऑनलाईन प्रवेश हा ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने सोयीचा ठरतो.

ग्रंथालयातून संगणकाचा वापर अपरिहार्य झाला आहे. नवीन निर्माण होणारे वाचनसाहित्य संगणकात नोंदविले जाते. परंतु ग्रंथालयाकडे असणारे यापूर्वीचे वाचनसाहित्य संगणकात नोंदविणे अत्यंत वेळ घेणारे, कष्टाचे काम असते. एकदा हे काम पूर्ण झाल्यावर ग्रंथालय विविध संगणकीय सेवा सुरु करु शकते त्यापैकी एक ओपॅक सेवा.

सदर सेवेव्दारे वाचक त्यास आवश्यक असलेल्या तसेच संगणकात नोंदविलेल्या वाचनसाहित्य संग्रहाची पाहणी/शोध करु शकतो. सदर पाहणी/शोध ही प्रत्यक्ष ग्रंथापर्यंत न जाता आज्ञावलीव्दारे पुरविण्यात येते.

**३. ऑनलाईन डेटाबेस सेवा (Online Database Services)**

**सेवेचे स्वरुप : ''ऑनलाईन म्हणजे आवश्यक असणारी माहिती ग्रंथसूची संदर्भाच्या सहाय्याने संगणकाच्या माध्यमातून शोधणे होय.''** नॅप यांच्या मते

**''ऑनलाईन म्हणजे माहिती प्राप्तीच्या क्रियेमध्ये जेव्हा उपकरण किंवा संयंत्र हे प्रेषण साखळी (ट्रान्समिशन लाईन) किंवा मध्यवर्ती प्रक्रिया संचाशी (सेंट्रल प्रोसेसिंग युनिटशी) सरळ जोडलेले असते तेव्हा त्याला ऑनलाईन असे म्हणतात.''**

माहितीच्या युगात माहितीची निर्मिती अगणित संख्येने होत आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर विशेषतः संगणकाचा उपयोग वाढत आहे. त्यामुळे ऑनलाईन माहितीसेवेकडे लोकांचा कल वाढला आहे. वाचकाला हवी असलेली माहिती कोणत्या संगणकाच्या माहितीसंचात साठवलेली आहे हे वाचक स्वत:च शोधून काढतो. वाचक त्या संगणकातील माहिती संचाशी संवाद साधून माहिती मिळवितो म्हणून ही ऑनलाईन माहिती सेवा होय. ही माहिती एकाच वेळी अनेक उपयोजकांना मिळते कारण ह्या माहितीचे जलद संप्रेषण होते. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे उपयोजकाशी त्या प्रलेखाचा प्रत्यक्ष संबंध येतो.

सदर ऑन लाईन सेवेसाठी टेलिफोन, इंटरनेटवरील सूचनांची देवाण घेवाण करणारा महत्वाचा संगणकीय भाग (मोडेम) व इतर गोष्टींची आवश्यकता असते. यांचा उपयोग करुन वाचक स्वत:चा प्रवेश संकेत शब्द (User Name) आणि ई–मेल देऊन माहितीसंचाशी संपर्क साधू शकतो. त्या माहितीसंचाशी संगणकीय जाळ्यामार्फत जुळणी झाल्यानंतर वाचक माहितीचा शोध घेऊ शक़तो.

यामध्ये मुद्रित प्रतीपेक्षा जादा प्रवेशमुद्दे सापडू शकतात. शोधकार्याला गतिशीलता असते. यातील संदर्भ वाचक प्रिंट आऊट घेऊ शकतो. यामुळे ही ऑनलाईन डेटाबेस सेवा फायदेशीर ठरते. ऑनलाईन सेवांतर्गत ई–वृत्तपत्रे, ई–जर्नल्स व नियतकालिके, ई–बुक्स, ऑनलाईन नेटवर्क्स, डेटाबेसेस, सी. डी. रोमस इ. स्वरुपातील वाचनसाहित्याव्दारे वाचकांना सेवा पुरविता येते. अनेक प्रकाशकांच्या डेटाबेसचा वापर ऑन लाईन तंत्रज्ञानामुळे शक्य झाला असून नामवंत प्रणालींव्द्ारे जागतिक पातळीवर साहित्याचा वापर करणे सुलभ बनले आहे. हल्ली सर्वच विद्यापीठ ग्रंथालये आणि बहुतांश महाविद्यालयीन ग्रंथालये विविध प्रकारचे डेटाबेसेस उपार्जित करतात.

**४. ऑफलाईन डेटाबेस सेवा (Offline Database)**

**सेवेचे स्वरुप : ''ऑफलाईन म्हणजे माहिती प्राप्तीच्या क्रियेमध्ये जेव्हा उपकरण किंवा संयंत्र हे प्रेषण साखळी (ट्रान्समिशन लाईन) किंवा मध्यवर्ती प्रक्रिया संचाशी (सेंट्रल प्रोसेसिंग युनिटशी) सरळ जोडलेले नसते तेव्हा त्याला ऑफलाईन असे म्हणतात.''**

ग्रंथालयात संगणकाचा वापर अपरिहार्य झाला आहे. नवीन निर्माण होणारे वाचनसहित्य संगणकावर नोंदविले जाते. परंतु ग्रंथालयातील यापूर्वीची वाचनसाहित्य संगणकात नोंदविणे अत्यंत वेळ घेणारे, कष्टाचे काम असते. एकदा हे काम पूर्ण झाल्यावर ग्रंथालयात विविध संगणकीय सेवा सुरु करु शकतो. बऱ्याच विषयांवरील साहित्य सध्या सी. डी. रोमवर उपलब्ध होत आहे. विश्वकोष, नियतकालिकेदेखील सी. डी. रोमवर उपलब्ध होत आहेत. त्यामुळे सी. डी. रोमव्दारे माहितीचा शोध घेण्यासाठी सेवा ग्रंथालय सुरु करु शकते.

**५. प्रलेख प्रदान सेवा (Document Delivery Services)**

**सेवेचे स्वरुप :** डॉक्युमेंट डिलिव्हरी सिस्टिम हे ग्रंथालय देवघेवीसाठी उपयुक्त साधन म्हणून नावारुपास येत आहे. यामध्ये सध्यातरी मुद्रीत स्वरुपातील माहिती फॅक्समध्ये रुपांतरीत करुन पाठविली जाते. या माध्यमातून लेखाच्या झेरॉक्स प्रती पाठविण्यापेक्षा प्रत्यक्ष लेखच फॅक्सव्दारे पाठविणे शक्य होते. सदर पध्दतीमध्ये माहिती किंवा लेख तात्काळ पाठविला जात असल्याने वेळेची व पैशाची बचत होते. आता या पुढील काळ हा डिजिटल ग्रंथालयाचा काळ असणार आहे. ग्रंथालयातील सर्व साहित्य नसले तरी बराचसा भाग हा डिजिटल स्वरुपात असणार आहे. अशा दळणवळणासाठी संगणक व उपग्रहासारख्या दळणवळणाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेण्यात येतो व भविष्यातील सदर सेवेचे स्वरुप इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट डिलिव्हरी सिस्टिम स्वरुपातील असणारे म्हणजेच Full Text साहित्य हे इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट डिलिव्हरी सिस्टिमने (EDDS) पाठविणे सोपे जाणार आहे. **(पवार आणि इतर, २००५)**

वरील साधनांशिवाय सी.डी. रोम हेही इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट डिलिव्हरी सिस्टिम साठी प्रभावीपणे वापरता येते. यामध्ये सूचीबध्द् फुल टेक्स्ट् अशा दोन्ही प्रकारचा डाटा समाविष्ट केला जातो. सी.डी. रोमव्दारे टेक्स्ट्, आवाज आणि व्हिडिओ स्वरुपातील माहितीची देवाण–घेवाण केली जाते.

वर नमूद केलेल्या विविध सेवांच्या विवेचनावरुन ग्रंथालयाच्या कामाच्या वैशिष्ट्यांची कल्पना येते. ग्रंथालयात असणारी माहिती, वाचनसाहित्य वाचकास त्वरेने उपलब्ध व्हावे म्हणून सदर सेवा उपयुक्त ठरतात. वाचकाला विशिष्ट माहितीच हवी असते. म्हणून

ग्रंथालयाला उपलब्ध माहिती योग्य प्रकारे साठविणे आवश्यक असते. संगणकाच्या वापरामूळे अशी माहिती कमी जागेत साठविणे आणि कार्यक्षम व त्वरित देवा देणे ग्रंथालयांना शक्य झाले आहे. माहिती क्षेत्रातील निरनिराळी साधने सर्वप्रथम ग्रंथालयात वापरली जातात. या साधनांची उपयुक्तता सिध्द झाल्यानंतर अन्य प्रकारच्या ग्रंथालयांत त्यांचा वापर सुरु केला जातो त्या दृष्टीने ग्रंथालयांचे महत्तव आहे.

वरील सेवांचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, ग्रंथालयातील काही सेवा पारंपारिक स्वरुपाच्या आहेत तर काही सेवा प्रगत तंत्रज्ञानाशी निगडित आहेत. ग्रंथालयात उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग, ग्रंथालयाची आर्थिक स्थिती आणि असलेल्या वाचनसाहित्याचे प्रकार यावर सेवांची सुरुवात आणि वापर केला जातो. कोणत्याही ग्रंथालयात वरीलपैकी सर्वच सेवा उपलब्ध असतात असे नाही. परंतु वाचकांच्या गरजेनुसार योग्य त्या सेवा सुरु करुन ग्रंथालय लोकप्रिय करणे तेथील व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांच्या हाती असते.

## ४.५ महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सेवांचे मूल्यमापन :

विशिष्ट महाविद्यालयीन ग्रंथालय वाचकांना किती उपयुक्त आहे हे ठरविणे म्हणजे त्यांच्या सेवांचे मूल्यमापन करणे होय. परंतु ग्रंथालय सेवांचे मूल्यमापन करण्यामध्ये अनेक अडचणी येतात. कारण ग्रंथालयापासून मिळणाऱ्या फायद्याचे आर्थिक परिणामांमध्ये मोजमाप करणे शक्य नसते. तरीही खालील कसोट्यांच्या आधारावर महाविद्यालयीन ग्रंथालय सेवांचे मूल्यमापन करणे शक्य आहे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या मूल्यमापन कसोट्या :**

महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या कसोट्यांशी संबंधित प्रश्नांच्या उत्तरांचे विश्लेषण ग्रंथालयाची कार्यक्षमता दर्शविणे होय. **(कुंभार, २००६)**

**१. वाचकांचे सर्वसाधारण समाधान :**

वाचक ग्रंथालय सेवांबाबत किती प्रमाणात समाधानी आहे यावरुन ग्रंथालयाची कार्यक्षमता मोजणे शक्य आहे.

**२. वाचनसाहित्याची उपलब्धता :**

वाचकांनी मागणी केलेल्या वाचनसाहित्यापैकी किती वाचनसाहित्य ग्रंथालयाने उपलब्ध केले; वाचकांनी मागणी केलेल्या स्वरुपातील वाचनसाहित्य उपलब्ध केले का; मागणी केलेले वाचनसाहित्य मिळवून देण्यासाठी किती वेळ लावला, इत्यादी प्रश्नांच्या साहाय्याने ग्रंथालय सेवांचे मूल्यमापन करता येते.

**३. संदर्भ व माहिती सेवांचा दर्जा :**

वाचकांना सामान्यपणे माहिती किती वेळात मिळते; माहिती किती अचूक व अद्ययावत आहे या प्रश्नांच्या साहाय्याने मुल्यमापन करता येते. तसेच ग्रंथालयीन सेवांची व्याप्ती, रचना, उपलब्धतेतील तत्परता यावरुनही ग्रंथालयांची परिणामकारकता मोजता येते.

**४. सर्वसाधारण कार्यक्षमता :**

वाचनसाहित्याच्या तांत्रिक प्रक्रियेसाठी (तालिकीकरण, वर्गीकरण) लागणारा वेळ, देव–घेव कार्यासाठी लागणारा वेळ. इत्यादी बाबी विचारात घेऊन महाविद्यालयीन ग्रंथालयांचे मूल्यमापन करणे शक्य आहे.

**५. आर्थिक परिणामकारकता :**

यामध्ये विशेषकरुन महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या आर्थिक व्यवहाराची कार्यक्षमता तपासली जाते. उदा. वाचनसाहित्यावर योग्य ती सूट अथवा डिस्काऊंट दिलेला आहे का? वाचनसाहित्य देणगी, अदलाबदल परतभेट इतर मार्गांने मिळविले का? शक्य तेथे आगाऊ रक्कम भरुन वाचनसाहित्य सवलतीच्या दरात मिळविले आहे का? इत्यादी प्रश्नांच्या साहाय्याने आर्थिक व्यवहारांचे मूल्यमापन करणे शक्य होते.

तसेच इतर तंत्राचा वापर करुन महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असलेली माहिती मिळविता येते.

१) प्रश्नावली २) मुलाखत ३) ग्रंथालयीन कार्यांच्या नोंदी ४) निरीक्षण तंत्र इ.

केस स्टडीज, ऑपरेशन्स रिसर्च, मूल्य–नफा (कॉस्टबेनेफिट) विश्लेषण या पध्दतींचा अवलंब करुनही ग्रंथालयीन सेवांचे मूल्यमापन करता येते.

## ४.६ ग्रंथालयीन सेवा–सुविधा आणि बदलते स्वरुप :

कोणत्याही सेवा सुविधा देत असतांना त्या पारंपारिक व आधुनिक या दोन्ही गोष्टींवर अवलंबून असतात. किंबहूना त्यांच्या सहाय्याने अधिक परिपूर्ण व दर्जेदार सेवा देणे शक्य होते. यात प्रामूख्याने पारंपारिक पध्दतीत स्थानिक परिस्थितीचा विचार केलेला असतो. तर आधुनिक पध्दतीत तंत्रज्ञानाचा अधिकाअधिक वापर करण्यावर अधिक भर दिलेला असतो. दोन्ही पध्दतीत ग्रंथालये आपापल्या परिने वाचकांना प्रभावी सेवा सुविधा देण्यात गुंतलेल्या असतात आणि जास्त अचूकतेकडे त्यांचा अविरत प्रयत्न असतो. थोडक्यात ग्रंथालयामार्फत अनेक सेवा सुविधा वाचकांना देण्यात येतात काही कारणास्तव या सेवासुविधांमध्ये बदल घडवून आणावे लागतात परंतू त्यामुळे ग्रंथालयाच्या मूळ सेवा सुविधांमध्ये तसेच संकल्पनेत परिवर्तन होत नाही.

ग्रंथालयात ज्ञान व माहिती साधने संग्रहित केली जातात. ग्रंथालयाचा मूळ उद्देश ज्ञान व माहिती संग्रहण हा असला तरी संग्रहित ज्ञान व माहिती ग्रंथालयाच्या वाचकांपर्यत पोहचविणे हे अविरत कार्य ग्रंथालयाकडून केले जाते. संग्रहित ज्ञान व माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रंथालयास विविध साधनांचा वापर करावा लागतो. ग्रंथालय सेवा हे त्याचे माध्यम आहे. पारंपारिक संग्रह व त्यावर आधारीत सेवा आणि आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे वापरले जाणारे वाचन साहित्य त्याचे संग्रहण व त्याव्दारे सेवा अशा दुहेरी सेवांचा समन्वय साधून वाचकांना सक्षम सेवा देणे हे ग्रंथालयासमोर मोठे आव्हान आहे.

ग्रंथालयांच्या पारंपारिक सेवा सुविधांचे स्वरुप तंत्रज्ञनाच्या वाढत्या वापराबरोबर काळाच्या ओघात झपाट्याने बदलत चालले आहे. ग्रंथालयीन सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने विकसीत झालेल्या व तंत्रज्ञानातील रोज नव्याने होणाऱ्या बदलांमूळे ग्रंथालयीन सेवासुविधेत बदल करणारी माध्यमे वापरात यायला लागली आहेत.

आजच्या बदलत्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इलेक्ट्रोनिक उपकरणांच्या वापरामुळे ग्रंथालयीन सेवांची परिभाषा बदलत चालली आहे. पारंपारिक सेवांचे स्वरुप बद्लणे गरजेचे झाले आहे. तरीही नवीन तंत्रज्ञान, इलेक्ट्रोनिक उपकरणे, माहितीचे आंतरराष्ट्रीय स्त्रोत ह्यांची जमवाजमव करुन ती वाचकांपर्यंत पोहचवतांना बऱ्याच अडचणींना ग्रंथालयांना सामोरे जावे लागते. संदर्भ सेवांचे पूर्वीचे स्वरुप कालबाह्य ठरत आहे. संगणकीय जाळे (Networks), वेब

(Web), माहितीचा पुरवठा इलेक्ट्रोनिक उपकरणांचा वापर व त्यासाठी लागणारी साधनसामुग्री, प्रभावी दळणवळण, देवाण घेवाण (Communication) दूर सेवा व तंत्रज्ञान ह्यांची जरुरी वाढत आहे.

योग्य ती माहिती गोळा करणे तिचे मूल्यमापन करणे व योग्य त्या स्वरुपात वाचकांना पुरविणे व त्यांच्या गरजा भागविणे हे ग्रंथपालांचे प्रमुख कर्तव्य आहे. ह्या प्रयत्नांत आधुनिक तंत्रज्ञान हे एक मौल्यवान साधन आहे. या आधुनिक तंत्रांचा वापर काहीही झाले तरी ग्रंथालयाची मूलभूत उद्दिष्टे बदलू शकत नाही. ग्रंथालय सेवेची परंपरा आणि सतत बदलणारे तंत्रज्ञान यांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र. ४.१**

**ग्रंथालयीन सेवा सुविधा आणि बदलते स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| **ग्रंथालयीन सेवा** | **पारंपारीक पध्दत** | **आधुनिक पध्दत (नवे प्रवाह)** |
|---|---|---|
| देवघेव सेवा | वाचकांना ग्रंथालयीन ओळखपत्राच्या / कार्डच्या मार्फत ग्रंथ ग्रंथालयातून मुदतीकरता दिले जातात. | आधुनिक पध्दतीत बारकोड व आरएफआडी सारख्या तंत्रज्ञानाने ग्रंथदेवघेवीचा कार्यकाल कमी करण्यास खुपच मदत होते. त्याच बरोबर हे काम बिनचुकही होते. आधुनिकतेमूळे अद्यावत सांख्येकीय माहिती प्राप्त होते. Bar Code Technology. |
| संदर्भसेवा | पारंपारीक संदर्भ साधने, शब्दकोश, ज्ञानकोश. इ. व्दारे | ऑनलाईन संदर्भसाधनांचा जसे Wikipedia, इंटरनेटवरील Instant Messaging तंत्राचा वापर केला जातो. तसेच वाचकांना Full-Text माहिती पूरविण्यासाठी Open Access Journals आणि Open Archieves चा वापर केला जातो. |
| वाचनसाहित्याची सूची सेवा | ग्रंथसूचीय माहीती शोधुन लिहून घेणे क्रमप्राप्त. | संगणकाचा तसेच इंटरनेटच्या प्रभावी वापराने हि सेवा अधिक प्रभावी देणे शक्य आहे. |

| | | |
|---|---|---|
| वर्तमानपत्र कात्रण सेवा | वर्तमान पत्रातील कात्रणाच्या स्वरुपात हि सेवा दिली जाते. | इलेक्ट्रोनिक कात्रण सेवा<br>ई–वृत्तपत्रे, ई–जर्नल्स व नियतकालिके, ई–बुक्स |
| प्रचलीत जागरुकता सेवा | पारंपारीक पध्द्तीत मुद्रित दाखनोंद यादी, अनुक्रमाणिका, पृष्ठाची प्रत, प्रत्यक्ष ग्रंथ मांडणी विषयांच्या याद्या सूची ह्यांच्या सहाय्याने दिली जाते. | संगणकाचा तसेच इंटरनेटचा वापराने हि सेवा अधिक प्रभावी देणे शक्य झाले आहे. उदा. अद्यावत आकडेवारी नवीन संकल्पना सिध्दांत योजना इ.<br>१) E-TOC – Electronic Table of Contents इलेक्ट्रोनिक अनुक्रमणिका, पृष्ठ सेवा.<br>२) Book Alerting Service नव ग्रंथांची सूचना. |
| माहिती तंत्रज्ञान आधारीत सेवा | शक्य नाही | इंटरनेटच्या माध्यमातून, वाचनसाहित्य विकास, प्रचलित जागरुकता सेवा CAS, निवडक माहितीचे प्रसारण सेवा SDI, आंतर ग्रंथालयीन सेवा ILL, संदर्भसेवा Reference Service सेवा प्रभावी देणे शक्य. |
| इंटरनेट | इंटरनेटमुळे पारंपारीक ग्रंथालयांच्या समस्या आणि ग्रंथ माध्यमाच्या मर्यादा नष्ट झाल्यात. | हायपरलिंकमुळे, वर्ल्ड वाईड वेबच्या सहाय्याने माहितीचा शोध, संग्रह व प्रसारण याबाबतचा नवीन मार्ग निर्माण झाला. E-mail & Networking माध्यमातून सेवा |
| ई–मेल | वाचकांच्या चौकशीअंती संदेशाची देवाण घेवाण पारंपारीक पध्दतीने होते. | ई–मेलव्दारे पाठविलेले चौकशी स्वरुपातील संदेश एका क्षणात जगाच्या कुठल्याही स्थळी पोचवले जातात. |
| ब्राऊझिंग सेवा | पारंपारीक पध्दतीने शोध मोहीम | ऑनलाईन वेगवेगळ्या पध्दतीने शोधतंत्रात वाढ. |
| तालिका सेवा | तालिका पत्र, वर्गीकरण, तालिकीकरणाव्दारे उपलब्ध | पारंपारीक तालिकेचे संगणकीय स्वरुप, पत्ररुप तालिकेपेक्षा शोध घेण्यास सोपे व जास्त |

| | | |
|---|---|---|
| | | सोयीस्कर. Online Public Access Catalogues, |
| ऑनलाईन डेटाबेस सेवा | शक्य नाही | अनेक विषयातील संशोधन साहित्य एकत्रित स्वरुपात ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देणे.<br>सूचीबध्द डेटा तसेच फूल टेक्स पध्दतीत डेटांचा समावेश. |
| ऑफलाईन डेटाबेस सेवा | शक्य नाही | अनेक विषयातील संशोधन साहित्य एकत्रित सीडी स्वरुपात ऑफलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देणे.<br>सूचीबध्द डेटांचा समावेश. |
| प्रलेख प्रदान सेवा | ग्रंथालयातील पारंपारीक साहित्याची दूय्यम प्रत तयार करुन देण्याची पध्दत. | EDDS – इलेक्ट्रोनिक डॉक्युमेंट डिलीव्हरी सर्व्हिस यात ग्रंथालयातील साहित्य डिजीटल स्वरुपात असल्याने देवणघेणे सोपे. |

ग्रंथालय सेवांची परंपरा आणि सतत बदलणारे तंत्रज्ञान याबाबत गॉर्मन यांनी खालील घटकांचें विवेचन केल्याचे आढळते. **(Gorman, 2003)**

- लघु व दिर्घ मुदतीच्या उद्देशांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा समावेश करणे.
- उपलब्ध असलेल्या उच्च दर्जाच्या वाचनसाहित्याकडे वाचकांना आकर्षित करण्यासाठी देण्यात येणाऱ्या संदर्भ सेवांचा पुनर्विचार करणे.
- वाचन साहित्य वाचकांना सहज उपलब्ध होण्यासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने तालिकीकरणात सुधारणा करणे.
- साक्षरतेचा प्रसार करण्याच्या ग्रंथालयाच्या भुमिकेला पाठिंबा देणे.
- मन:शांती, ऐक्य व स्थिरता प्राप्त करण्यासाठी तांत्रिक ताण दूर करणे.
- ग्रंथालयाची परंपरा व विकसित तंत्रज्ञान यांमध्ये समतोल राखून ग्रंथपालांसमोर येणाऱ्या अडचणी व नवीन आव्हाने स्विकारणे.

## ४.७ नॅक – मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन आणि ग्रंथालय प्रशासन :

NAAC नॅक National Assessment Accreditation Counil थोडक्यात नॅक हे संक्षिप्त रुप असून १९८६ साली केंद्र सरकारने नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविले. त्या धोरणांचा कृती आराखडा प्रसिध्द केला गेला. या कृती आराखड्यामधून भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तेची, मूल्यमापनाची संकल्पना पुढे आली. कालबाह्य शिक्षण, संशोधनाचा खालावलेला दर्जा, जूनाट व निरुपयोगी अभ्यासक्रम, आधुनिकीकरणाचा अभाव, नवीन बदलास होणारा विरोध इत्यादींमूळे शैक्षणिक गुणवत्ता घसरु लागली. उच्च शिक्षणातील गुणवत्तेची होणारी घसरण थांबवून गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करण्यासाठी नॅक ची स्थापना करण्याचे ठरले.

त्यानूसार दि. १६ सप्टेंबर १९९४ रोजी विद्यापीठ अनुदान कायदा, १९५६ च्या कायद्यातील विभाग ३ च्या कलम १२ CCC अंतर्गत राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्विकृती परिषद (National Assessment Accreditation Counil ) ची स्थापना करण्यात आली. **(बुवा. जी. २००७).**

नॅक चे प्रमुख उद्दिष्ट विविध शैक्षणिक संस्थांमधील गुणवत्तेची तपासणी करणे तसेच यथायोग्य मूल्यमापन करणे हे आहे. गुणवत्ता ही विविध घटकांवर आधारीत असते. त्यात संस्थेने चालविलेले विविध अभ्यासक्रम, त्यांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारे पर्याय, चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांची व्याप्ती, त्यांची सखोलता हे सर्व लक्षात घेतले जाते. अर्थात ह्या सर्व बाबी त्या शैक्षणिक संस्थेत येणाऱ्या वा घेतल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांची बौध्दिक कुवत, आजुबाजूचे वातावरण, शिक्षकांचे, ग्रंथपालांचे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान, शिक्षकांचे विषय शिकविण्यातील कसब, ग्रंथालय व त्यामार्फत देण्यात येणाऱ्या सेवासुविधा, संस्थेचे एकंदर व्यवस्थापन आणि आर्थिक स्थिती, ग्रंथालय तसेच एक़ंदर संघटनात्मक रचना आणि इतर संबंधित घटक ह्यांवर अवलंबून असते. नॅकचा एकंदर दृष्टीकोन सर्व संस्थांच्या बाबतीत नि:पक्षपातीपणाचा आहे.

संस्थेचे प्रथम मूल्यांकन झाल्यानंतर एक–दोन महिन्यांमध्ये नॅकतर्फे संबंधित संस्थेला मिळालेला दर्जा कळविला जातो. एकदा मिळालेला दर्जा पाच वर्षांसाठी ग्राह्य असतो. त्यामुळे दर पाच वर्षांनी संस्थेचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक असते.

राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्विकृती परिषदेतर्फे – नॅकतर्फे करण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनास सर्व महाविद्यालये सामोरे जाण्याची तयारी करीत आहेत. अशा वेळी संस्थाचालक, प्राचार्य, ग्रंथपाल व इतर कर्मचारी यांच्या मनात विविध शंका, प्रश्न उपस्थित होतात.

विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू मानल्याने त्यांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरविल्या जातात याकडे नॅक ने लक्ष वेधले आहे. ग्रंथालयाच्या दृष्टीने विचार केल्यास ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधांमध्ये वाढ करणे त्यामध्ये ग्रंथालय वाचकांसाठी जास्तीत जास्त वेळ खूले ठेवणे, अभ्यासिकेची वेळ वाढविणे, विद्यार्थ्यांना अधिकाधिक पुस्तके हातण्यासाठी सोय करणे, संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता, वर्तमानपत्रे व मासिके, संगणक केंद्र, इंटरनेट सुविधा, विद्यार्थी मार्गदर्शन केंद्र, रोजगार मार्गदर्शन केंद्र इत्यादी उपक्रमांची संख्या वाढविणे. ग्रंथालयांचे स्वतःचे जुने स्वरुप बदलून आधुनिकीरण करण्यास सामोरे जाणे त्यामध्ये ग्रंथालयाचे संगणकीकरण, आधुनिक संकल्पनांचा स्विकार, व्यवस्थापनाच्या नव्या तत्वांची अंमलबजावणी, इंटरनेटचा वापर इत्यादीव्दारे आधुनिकीकरण करण्यावर भर देणे. कालबाह्य संकल्पनांचा त्याग करुन नवीन कालानुरुप बदल करुन सामुहीक प्रयत्नाव्दारे गुणवत्ता वाढीकडे वाटचाल करण्याबाबत नॅककडून आग्रह धरला जात आहे किंबहुना ते बदल आवश्यक आहे.

संस्थेचे प्रथम मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन असो ग्रंथालयाचे मूल्यमापन हा महत्वाचा टप्पा आहे. अलिकडच्या काळात ग्रंथालय आणि ग्रंथालयीन सेवांमध्ये अमूलाग्र बदल झाला आहे. ग्रंथालयांनी नवीन आव्हाने स्विकारली आहेत. त्यामूळे ग्रंथालयाचा मूल्यमापनाच्या मापकात सुधार झाला आहे. ग्रंथालये निश्चितच शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन कार्यातील महत्वाचे आधार स्तंभ आहेत. ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवासुविधा व त्याचे व्यवस्थापन, ग्रंथालयीन समिती, ग्रंथालयीन कर्मचारी, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञानाचा

वापर, ग्रंथालयाचे सर्वसाधारण धोरण, अर्थव्यवस्था, ग्रंथालयीन सेवासुविधांचा एकूण वापर, आढावा, आकडेवारी, थोडक्यात ग्रंथालयाचे प्रशासन आदर्श पध्दतीने हाताळल्यास ग्रंथालयाचा वापर अधिकाधीक क्षमतेने होऊन वाचकांचे समाधान होईल यात शंका नाही.

## ४.८ विद्यापीठ व महाविद्यालयातील ग्रंथालय व माहिती सेवांसाठी नॅक गुणवत्ता दर्शक मार्गदर्शिका :

नॅक (राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषद) बेंगलोर या संस्थेव्दारे विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालया करीता मार्गदर्शिका प्रकाशित केली आहे. उच्च शिक्षण संस्थेची गुणवत्ता अनेक बाबींवर अवलंबून असते. ग्रंथालय हे त्या पैकी एक आहे. मूल्यांकन प्रकियेत अचूकता साधण्याकरीता सतत प्रयोग करावे लागतात व परिषद तसे प्रयत्न वेळोवेळी करीत असते.

परिषद पूर्ण संस्थेचे मूल्यांकन करते व ग्रंथालय हे त्या संस्थेचा एक हिस्सा आहे, जे पूर्ण संस्थेच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत असते. संस्थेचे ग्रंथालय हे संस्थेच्या शैक्षणिक कार्यात महत्त्वाचा आधार देऊन दिशा देण्याचे कार्य करत असते. आजच्या उच्च तंत्रज्ञानयुक्त शैक्षणिक वातावरणामध्ये ग्रंथालयांनी, शिक्षक, विद्यार्थी व संशोधकाच्या शैक्षणिक कार्यकाळाचा अधिकाधिक वेळ व्याप्त केला आहे, भविष्यात यात अधिक भर पडणार आहे. यामुळेच ग्रंथालयाचे शास्त्रिय दृष्ट्या मूल्यमापन केल्याने ग्रंथालयाचे शैक्षणिक विकासातील स्थान सुरक्षित व वृध्दिंगत राहील. म्हणून नॅक परिषदेने तज्ञ लोकांशी चर्चा करुन ग्रंथालयासाठी गुणवत्तेचे निकष ठरवून शैक्षणिक ग्रंथालयांना मार्गदर्शन केले आहे.

Guidelines on Quality Indicators in Library and Information Services : Affliated / Constituent Colleges :

मूल्यांकन प्रक्रियेत ग्रंथालयाचे मूल्यमापन हा महत्त्वाचा टप्पा आहे. जिथे ग्रंथसंग्रह, सेवा व अतिरिक्त पण सुसंगत कार्याचे अवलोकन केले जाते. ग्रंथालयाचे मूल्यमापन करताना नॅक परिषदेतर्फे काही निकष लावले आहेत.

उदा. संस्थेचे वयोमान, संस्थेतर्फे शिकविले जाणारे अभ्यासक्रम इत्यादी. संस्थांना दोन मुख्य भागात विभागले आहे. एक विद्यापीठ स्तरीय संस्था यात विद्यापीठ, खाजगी विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालये व पदव्यूत्तर महाविद्यालये. दुसऱ्या भागात विद्यापीठांशी संलग्न

महाविद्यालये. या सर्व संस्थांच्या ग्रंथालयासाठी पूढील मार्गदर्शक सूचना आहेत. **(NAAC, 2014)**

A**.) ग्रंथालय व माहिती सेवांचे व्यवस्थापन** : (Management of Library and Information Services)

खालील कमीतकमी निकषाच्या आधारे ग्रंथालयाची गुणवत्ता ठरवली जाते.

१.) ग्रंथालये किती दिवस उघडे असते.

सदर निकषाच्या आधारे ग्रंथालय शनिवार, रविवार व इतर सुट्ट्यांच्या दिवशी विद्यार्थी व शिक्षकांसाठी खूले ठेवले जाते का?

२.) कार्यालयीन वेळा.

या निकषाव्दारे ग्रंथालयाची उघडण्याची वेळ व बंद करण्याची वेळ पाहिली जाते. एकंदर दिवासातून जास्तीत जास्त वेळ ग्रंथालय वाचकांसाठी खूले ठेवले जाते का?

३.) ग्रंथालय सल्लागार समिती :

ग्रंथालय सल्लागार समिती आहे का? ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचे योगदान नमुद केलेले असावे.

४.) ग्रंथपाल नियुक्ती :

ग्रंथपालाची नियुक्ती शासकीय / विद्यापीठ / युजीसी यांनी वेळोवेळी आखून दिलेल्या नियमानूसार झालेली आहे का?

५.) ग्रंथालयीन मनुष्यबळ विकास :

शासन व युजीसी इ. संस्थेच्या नियमानुसार ग्रंथालयात मनुष्यबळ आहे का? त्यांची शैक्षणिक पात्रता नियमानुसार आहे का? माहिती सेवा देण्यास ते कर्मचारी व्यावसायिक दृष्ट्या सक्षम आहेत का? प्रशिक्षण व इतर व्यावसायिक कार्यक्रमात सहभाग घेण्याकरिता त्यांना प्रोत्साहित केले जाते का?

६.) ग्रंथालय इमारत व पायाभूत सुविधा :

ग्रंथालयीन इमारत स्वतंत्र आहे का? ग्रंथालयाच्या जागेचे नियोजन केले आहे का? ग्रंथालयात स्वागतकक्ष, बैठक व्यवस्था, वाचन कक्ष, नियतकालिक विभाग, देवघेवविभाग, संदर्भविभाग इ. भागात विभागणी केली आहे का?

ग्रंथालयाच्या पायाभूत सूविधांवर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथालयाच्या पायाभूत सूविधांमध्ये, ग्रंथालयीन शांतता, वाचकांसाठी आसन व्यवस्था, नियतकालिकांचे डिसप्ले रॅक, प्रकाश योजना, इ. आहेत का? ग्रंथालयात पुरेसे फर्निचर आहे का? ह्यामध्ये सूयोग्य फर्निचर, टेबल्स इ. ग्रंथालयीन सुविधेत खेळती हवा, पिण्याचे शुध्द पाणी, स्वच्छता गृह, ग्रंथालयात सूचना व मार्गदर्शक फलक इ. सोयी ग्रंथालयात आहेत का?

७.) अभ्यासिकेची बैठक व्यवस्था :

अभ्यासिकेतील आसन व्यवस्था विद्यार्थी व शिक्षक यांच्या एकूण क्षमतेच्या प्रमाणात आहे?

८.) अख़ंड विज व्यवस्था :

ग्रंथालयात विज पूरवठा खंडीत झाल्यास जनरेटर किंवा इतर पर्यायी मार्गाने वीज पूरवठा करण्यात येतो का?

९.) ग्रंथालय इमारत देखभाल व स्वच्छता :

ग्रंथालय इमारतीची नियमित देखभाल व स्वच्छता केली जाते का?

१०.) ग्रंथालयीन संगणक व इंटरनेट सेवा :

ग्रंथालयात संगणक व इंटरनेट सेवा वाचकांना पूरविली जाते का? ई–ग्रंथालय सुविधा पुरविण्यासाठी पुरेसे संगणक ग्रंथालयात असावेत. आवश्यक इंटरनेट सेवा व त्या व्दारे ई–साधने, डिजीटल माहितीसेवा ग्रंथालयातून देण्यात यावी.

११.) ग्रंथालयीन संगणकीकरण :

ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे का? ग्रंथालयीन कामकाजासाठी ग्रंथालयीन आज्ञावलीचा वापर केला जातो का? ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्याच्या व वाचकांच्या नोंदीं पूर्ण असाव्यात.

१२.) अर्थव्यवस्था :

ग्रंथालयाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रमाण बध्द् वाढ होणे आवश्यक आहे. संस्थेची व्याप्ती, विविध वाचन साहित्यावरील खर्च, माहिती तंत्रज्ञान उपलब्धते वरील खर्च अधोरेखित केला पाहिजे. राज्य, केंद्र, व विद्यापीठ अनुदान मंडळा खेरीज मिळणारे अनुदान वाचन साहित्य, ग्रंथखरेदी व ग्रंथालयीन सेवांच्या विकासासाठी वापरले जावे.

१३.) वाचन साहित्य संग्रह विकास, ग्रंथ परिगणन (Stock Verification), ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची सोय. इ. :

ग्रंथालयाने वाचन संग्रह विकासा संदर्भात नव्या सेवा, अनुदानाची मदत, अनुदानात वार्षिक वाढ, पुस्तक बांधणी पध्दत, कालबाह्य ग्रंथ, हरवलेल्या पुस्तकाबातचे धोरण, ग्रंथ परिगणन, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची सोय इ. बाबत धोरणे ठरविणे आवश्यक आहे.

**B.) ग्रंथसंग्रह आणि ग्रंथालयीन सेवा :** (Collection and Services Provided to Users)

**१.) ग्रंथसंग्रह :**

ग्रंथालयाच्या उद्दिष्टानुसार व वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथालयात विभिन्न, विश्वासार्ह आणि अद्ययावत ग्रंथसंग्रहाची वाढ करणे आवश्यक आहे. छापील, ऑनलाईन, ऑफलाईन स्वरुपातील वाचन साहित्य व त्या साहित्यासाठी लागणारी साधने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. सर्व माहिती साधने शासन, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि तत्सम मंडळाच्या निकषानुसार असावीत. ग्रंथालयात ग्रंथ, पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धात्मक परिक्षेसाठीचे वाचन साहित्य, मानके, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रचलित नियतकालीके, बॅक व्हॉल्यूम, सीडी / डिव्हीडी, दृकश्राव्य इ. स्वरुपात ग्रंथसंग्रह असणे अपेक्षित आहे.

| 1. Mention the Total Collection of Documents | |
|---|---|
| i) | Books |
| ii) | Text Books |
| iii) | Reference Books |
| iv) | Current Journals<br>Indian, Foreign |
| v) | Peer Reviewed Journals |
| vi) | Back Volumes of Journals |
| vii) | Magazines |
| viii) | E-Information Resources<br>CD's / DVD's<br>Databases<br>Online Journals |
| ix) | Special Collection<br>Competitive Examninations<br>Braille Materials / Rare Collection<br>AV Materials |
| x) | Book Bank |

**२.) ग्रंथालयीन सेवा :**

शैक्षणिक कार्यात ग्रंथालयाचा महत्वाचा सहभाग असतो. संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संस्थेने ग्रंथालयामार्फत प्रमाण बध्द गुणवत्ता पूर्ण सेवांची सोय करणे आवश्यक आहे. ग्रंथालयातर्फे संख़्यात्मक व गूणात्मक सेवा देणे क्रमप्राप्त आहे. ह्यामध्ये ग्रंथालयाव्दारे संदर्भ सेवा ते इलेक्ट्रॅानिक माहितीसेवा पर्यंतच्या विभिन्न सेवा देणे अपेक्षित आहे.

**१.) ग्रंथालयात खालील सेवा दिल्या जातात का?**

१. देवघेव सेवा (Circulation Services)

२. वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Clippings Services)

३. वाचनसाहित्याची सूची सेवा (Bibliographical Services)

४. प्रचलित जागरुकता सेवा (Information Display and Notification Services)

५. संदर्भ सेवा (Reference / Referral Serices)

६. प्रतिलिपी सेवा (Photocopy and Printing Services)

७. बहिःशाल सेवा (User Orientation / Information Literacy Extensive Services)

८. आंतर ग्रंथालयीन सेवा (Resource Sharing / Inter Library Loan Services)

९. इंटरनेट व संगणक आधारीत सेवा (Internet / Digital Resources Availability)

१०. इतर सेवा (Any Other Serivces)

**C.) ग्रंथालयीन सेवेचा एकूण वापर** (Extent of the Use of Services)

ग्रंथालयीन कार्याची गुणवत्ता टिकविण्यासाठी ग्रंथालयीन कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे हा आढावा ग्रंथालयीन सेवेच्या वापरावरील आकडेवारीवरुन घेता येते. ग्रंथालयीन सेवेचा व कार्याच्या वापराचा आढावा घेण्याकरीता पुढील निकषाचा आधार घेता येतो.

१.) दररोज किती वाचकांना ग्रंथांची सरासरी देवाण घेवाण केली जाते?

२.) प्रतिमाह दिलेल्या संदर्भ सेवेची संख्या.

३.) प्रतिमाह प्रत्येक वाचकांना दिलेल्या सेवा.

४.) ग्रंथालयाला प्रतिमाह भेट दिलेल्या वाचकांची संख्या व त्यांनी वाचलेल्या वाचन साहित्याची संख्या. **(NAAC, 2014)**

**D.) महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी सर्वोत्कृष्ट सेवा** : (Best Practices for College Libraries)

ग्रंथालयासाठी आदर्श पध्दतीने शैक्षणिक क्षमतेचा वापर व्हावा व वाचकांचे समाधान व्हावे या करिता खालील आदर्श नमुने दिले आहेत.

०१. ग्रंथालयाचे संगणकीकरण व ग्रंथालयीन आज्ञावलीचा वापर.

०२. ग्रंथालयाचे माहिती पत्रक प्रसिध्द करणे.

०३. विद्यार्थी व शिक्षक वाचक यांच्या ग्रंथालय भेटीचा आलेख नोटीस बोर्डवर लावणे.

०४. वाचकांच्या वेगवेगळ्या समुहानूसार प्रचलित जागरुकता सेवा देणे.

०५. मार्गदर्शन शिबीर, व्यवसाय मार्गदर्शन शिबीरातून माहिती देणे.

०६. इंटरनेट व संगणक आधारीत सेवांबाबत जागृती वाढविणे.

०७. माहिती साक्षरता / प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

०८. सुचना पेटी व त्यावरील कार्यवाही.

०९. नव्या वाचन साहित्याचे प्रदर्शन / नव्या वाचन साहित्य सुचीचे विभागांना वाटप.

१०. वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करुन घेण्यासाठी ग्रंथप्रदर्शन इ. उपक्रम राबविणे.

११. ग्रंथचर्चा, ग्रंथालयीन साक्षरता उपक्रम राबविणे.

१२. गुणवंत वाचक पुरस्कार, माहिती साक्षरतेचे वर्ग, संगणक साक्षरता इ. कार्यक्रम राबविणे.

१३. वेगवेगळ्या स्पर्धा, मार्गदर्शन शिबीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इ. आयोजन.

१४. वाचकांकडून ग्रंथालय सेवेसंबंधी शास्त्रशुध्द पध्दतीने तयार केलेल्या प्रश्नावलीच्या माध्यमातून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे. **(NAAC, 2014)**

## ४.९ विद्यापीठ अनुदान आयोग (University Grants Commission) :

विद्यापीठ अनुदान आयोग ही उच्च शिक्षणातील शिखर संस्था सन १९५६ मध्ये The University Grant Commission Act 1956 या कायद्यानुसार भारत सरकारव्दारे कायदेशीर दर्जा झालेल्या या संस्थेने भारतातील उच्च शिक्षणाच्या विकासात भरीव योगदान दिलेले आहे. सुरुवातीच्या काळापासून आयोगाने ग्रंथालयांचे उच्च शिक्षणातील महत्व लक्षात घेऊन पंचवार्षिक विकास योजनांमध्ये ग्रंथालयांच्या उपक्रमांना प्राधान्य दिले. वाचनसाहित्याचा संग्रह, इमारत, कर्मचारी, आधुनिकीकरण इत्यादींसंदर्भात कमिटी, चर्चासत्राच्या स्वरुपात विकासाच्या

दृष्टीकोनातून पावले उचलण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे प्रथम अध्यक्ष डॉ. सी. डी. देशमुख यांनी १९५७ मध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयांना सुव्यवस्थित कार्यरत ठेवता यावे यासाठी आयोगाला मार्गदर्शन करणारी ग्रंथालय समिती स्थापन केली.

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रत्येक क्षेत्रात गुणात्मक व दर्जात्मक वाढ होताना आढळून येत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या प्रयत्नात या क्षेत्रात कार्यरत शिक्षकांकरिता F-3-1/2009 दिनांक ३० जुन २०१० या क्रमांकाच्या रेग्युलेशनव्दारे Performance Apppraisal System विकसित केली आहे. शिक्षक संवर्गात येणाऱ्या विविध पदांकरीता Academic Performance Indicator (API) विकसित करताना या रेग्युलेशनमधील Appendix III अंतर्गत तक्ता क्र. VII ते IX हे महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथपालांकरिता तयार केलेले आहेत. या तक्त्यांच्या तसेच रेग्युलेशनमधील इतर बाबींचा सखोल अभ्यास केल्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उच्च शिक्षच क्षेत्रात कार्यरत असलेल्या ग्रंथालयांकडून / ग्रंथपालांकडून काय अपेक्षा आहेत हे लक्षात येते. शिवाय या माध्यमातून महाविद्यालय व विद्यापीठ ह्यांची गुणात्मक वाढ करतांना त्यांची ग्रंथालये कशी असावीत ही बाबदेखील स्पष्ट होते. **(खेरडे, २०११)**

दि. ३० जून २०१० च्या रेग्युलेशनमधील Appendix III अंतर्गत नमूद तक्ता क्र VII नुसार महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर कार्य करणाऱ्या ग्रंथपालास यापुढे इतर शिक्षकांप्रमाणेच एकंदर तीन स्तरांवर आपली योग्यता सिध्द करावी लागेल. या तीन स्तरांवर पूर्ण करावयाच्या जबाबदाऱ्या खाली नमूद केलेल्या शीर्षकांतर्गत देण्यात आलेल्या आहेत.

घटक १ : Procorement, Organization and Deleivery of Knowledge and Information through Library Service.

घटक २ : Co-curricular, Extension and Professional Development Related Activities.

घटक ३ : Research and Academic Contributions.

उपरोक्त तीन स्तरावर कार्य करताना ग्रंथपालाने आपली कर्तृत्व क्षमता पारंपारिक ग्रंथालयीन कार्यास महत्व देऊन आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सिध्द करावयाची आहे. सदर स्तर अभ्यासल्यास महाविद्यालयीन ग्रंथपालास ग्रंथालयाचे व्यवस्थापन करणे,

ग्रंथालयाच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या विकासात योगदान देणे व सोबतच आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारावर संशोधनाव्दारे ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयाच्या परिसीमा वाढविण्यात महत्वाची भूमीका पार पाडणे ह्या तीने मुख्य मुद्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

घटक १ : Procorement, Organization and Deleivery of Knowledge and Information through Library Service.

अ) ग्रंथालयीन संसाधनांचे व्यवस्थापन, ग्रंथ नियतकालिके, अहवाल इत्यादींची देखभाल :

ग्रंथालयाव्दारे माहिती अखेच्या उपभोक्त्यापर्यंत वेळेत पोहचविण्याची जबाबदारी ग्रंथपाल व ग्रंथालयातील इतर कर्मचारी यांची असते. ही जबाबदारी यशस्वीरित्या पेलताना ग्रंथालयात ग्रंथोपार्जन व स्टॉक विभागातील कामांव्दारे मजबूत पायाभरणी करणे गरजेचे ठरते. याकरिता ग्रंथ / नियतकालिक यांच्या निवडीची योग्य प्रकिया, वर्गीकरण, तालीकीकरण, सुयोग्य मांडणी व त्यांची देखभाल इ. कामावर भर देणे आवश्यक आहे.

आ) ग्रंथालयीन सेवा :

उपरोक्त नमूद ग्रंथोपार्जन तसेच देखभाल विभागाव्दारे करण्यात येणारी कामे सक्षमतेने तसेच शास्त्रोक्त पध्दतीने करताना त्याचे धोरण निश्चित केल्यास त्याचा चांगला परिणाम ग्रंथालयीन सेवा प्रदान करताना निश्चितच दिसून येईल. ग्रंथालय उपभोक्त्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविताना साहित्य शोध व प्राप्ती सेवेवर विद्यापीठ अनुदान आयोगाने विशेषत्वाने भर दिलेला आहे. यासारख्या सेवा प्रदान करताना खालील नमूद ग्रंथालयीन सेवा आपल्या उपभोक्त्यांना देणे आवश्यक आहे.

१. ग्रंथ देवघेव सेवा
२. संदर्भ सेवा
३. अलर्ट सेवा
४. वृत्तपत्र कात्रण सेवा
५. इंटरनेट सेवा
६. प्रतिलिपी सेवा
७. उपभोक्ता प्रशिक्षण सेवा

इ) अहवाल, हस्तपुस्तिका, संकेतस्थळ विकासात सहभाग :

महाविद्यालयाच्या वार्षिक अहवालात तसेच संकेतस्थळावर ग्रंथालयाची माहिती असणे गरजेचे आहे. महाविद्यालयाव्दारे वार्षिक अहवाल प्रकाशित होत असल्यास त्यामध्ये ग्रंथालयाचे

ग्रंथसंग्रह, ग्रंथालयाच्या वेळा, ग्रंथालयातील कार्यरत कर्मचारी वर्ग, ग्रंथालयाव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा, ग्रंथालयाची विशेष उपलब्धी, ग्रंथालयाव्दारे राबविले जाणारे उपक्रम, ग्रंथालयाचे नियम, इत्यादी माहिती देणे अपेक्षित आहे. तसेच छापील ग्रंथ / नियतकालीके यांच्यासह इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपातील वाचन साहित्याची उपलब्धता ही बाब ग्रंथालयात दिवसेंदिवस रुढ होत आहे या करिता INFIBNET चा N-LIST हा प्रकल्प महाविद्यालयात राबविणे आवश्यक आहे.

घटक २ : Co-curricular, Extension and Professional Development Related Activities.

अभ्यासक्रम पूरक व विस्तारित स्वरुपातील उपक्रम ग्रंथालयाव्दारे राबविणे ही बाब ग्रंथालयाकरिता आवश्यक आहे. उपभोक्यांना महाविद्यालयाव्दारे आयोजित निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, चर्चासत्रे इ. अभ्यासक्रम पूरक स्वरुपातील कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक आहे. याशिवाय महाविद्यालयाच्या ग्रंथालयेतर विविध समित्यांमध्ये योगदान देणे गरजेचे आहे.

अ) अभ्यासक्रम पूरक व विस्तारित उपक्रम :

विद्यार्थी, शिक्षक, संशोधक ह्यांना त्यांच्या अभ्यासक्रमासंबंधित आवश्यक माहिती प्राप्तीकरीता ग्रंथालयाव्दारे दिल्या जाणाऱ्या विविध ग्रंथालयीन सेवा या व्यतिरिक्त अनेक पूरक व विस्तारीत उपक्रम राबविणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामूख्याने

- ग्रंथालयाव्दारे उत्कृष्ट वाचक पारितोषिक सुरु करणे.
- विद्यार्थांकरिता विविध विषयांवर चर्चासत्र, वादविवाद स्पर्धेचे आयोजन करणे.
- वादविवाद स्पर्धेसमान शैक्षणिक व बौध्दिक स्वरुपाच्या कार्यक्रमाच्या तयारीकरीता विद्यार्थ्यांना सहकार्य करणे.
- जुन्या प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देणे.

ब) सामुदायिक जीवनात तसेच पालक संस्थेच्या व्यवस्थापनेत सहभाग :

पालक संस्थेच्या व्यवस्थापनेत तसेच विद्यापीठ स्तरावर ग्रंथपालांचा सहभाग असावा ही अपेक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाची आहे. यामध्ये ग्रंथालय समितीसह महाविद्यालयाव्दारे गठित विविध समित्यांमध्ये सहभाग घेणे इ.

क) ग्रंथपालन व्यवसाय विकासात सहभाग :

ग्रंथपालन क्षेत्राच्या विकासात ग्रंथपालांनी आपले भरीव योगदान देणे काळाची गरज आहे. याकरिता व्यावसायिक संघटनेचे सदस्यत्व स्वीकारणे, विषयाशी संबंधित परिषद, चर्चासत्रे, कार्यशाळा यांमध्ये सहभागी होणे.

घटक ३ : Research and Academic Contributions.

या घटकाव्दारे ग्रंथपालांना स्वत:करिता गुण प्राप्त करताना आपली योग्यता सिध्द करावे लागते.

- नियतकालिकत लेख व परिषद अहवालामध्ये शोध निबंध प्रसिध्द करणे.
- ग्रंथ लिखाण
- संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून संशोधन
- संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्य करणे.
- उदबोधन / उजळणी वर्गात सहभाग, परिषदांमध्ये शोधनिबंधाचे सादरीकरण.

**४.९.१ एन–लिस्ट कन्सोर्शिया :**

विद्यापीठ अनुदान आयोगाने INFLIBNET ची स्थापना केली. तसेच सर्व विद्यापीठांना ई–संसाधने पुरविण्यासाठी UGC-INFONET Digital Library Consortium या प्रकल्पाची स्थापना करण्यात आली. यामध्ये भारतातील विद्यापीठांना ई–संसाधने (E-Books/E-Journals) उपलब्ध करुन देण्यात आली. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी National Library & Information Services Infrastructure for Scholarly Content (N-LIST) हा प्रकल्प UGC INFONET Digital Library Consortia तसेच INDEST-AICTE आणि IIT, Delhi यांच्या संयुक्त विद्यमाने ४ मे २०१० मध्ये एन–लिस्ट कन्सोर्शियाची स्थापना करण्यात आली. एन–लिस्ट मध्ये सद्यस्थितीत ३००००० पेक्षा जास्त E-Books आणि ६३०० पेक्षा जास्त E-Journals, Mathscinet Bibliographic Database उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. ऑनलाइन डेटाबेस वाचनसाहित्य ह्याचा कायदेशीर वापर करणे आणि स्वतंत्ररित्या सभासदत्व घेणे हे एन–लिस्ट कन्सोर्शियामुळे शक्य झाले आहे. http://nlist.inflibnet.ac.in हे एन–लिस्ट कन्सोर्शियाचे संकेतस्थळ आहे.

**४.९.२ एन–लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यासाठी ग्रंथालयाने पूर्ण करावयाच्या बाबी :**

एन–लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यासाठी महाविद्यालयाने खालील जबाबदाऱ्या पूर्ण करणे अपेक्षित आहे.

- इंटरनेशी जोडलेले संगणक उपलब्ध करुन देणे.
- एन–लिस्ट मधील ई–संसाधनांचा वापर कसा करावा याविषयी विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांना प्रशिक्षण देणे.
- एन–लिस्ट संकेतस्थळावरुन ऑनलाइन / ऑफलाईन फॉर्म भरुन घेणे व आवश्यक ती कागदपते जोडून INFLIBNET च्या पत्यावर पाठविणे.
- एन–लिस्ट आणि महाविद्यालयीन ग्रंथालय यांच्यामधील दुवा म्हणून संपर्क व्यक्तीची निवड करणे.
- कॉलेज ॲडमीन मार्फत आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच विद्यार्थ्यांचे युजरनेम आणि पासवर्ड तयार करणे.

**४.९.३ एन–लिस्ट चे सभासदत्व :**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत 12B / 2F चे निकष ज्या महाविद्यालयांनी पूर्ण केलेले आहेत असे महाविद्यालये एन–लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यास पात्र आहेत. 12B / 2F चे निकष पूर्ण केलेल्या महाविद्यालयांना रु. ५७५० तर 12B / 2F चे निकष पूर्ण नकेलेल्या महाविद्यालयांना रु. ३४५०० वार्षिक वर्गणी भरावी लागते. एन–लिस्ट कन्सोर्शियामध्ये कृषी (Agriculture), इंजिनिअरिंग (Enanagement), वैद्यकीय (Medical), औषधनिर्मिती शास्त्र (Pharmacy), दंतचिकित्सा (Dentishtry) नर्सिंग (Nursing) इत्यादी महाविद्यालयांना सभासद होता येत नाही. **(हेरोळे, २०१७)**

इलेक्ट्रोनिक स्वरुपातील वाचनसाहित्याचा वाढता ओघ तसेच त्यांच्या वाढत्या किंमती व ग्रंथालयांची आर्थिक चणचण यांमुळे कोणतेही ग्रंथालय वाचनसाहित्यांच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होऊ शकत नाही म्हणूनच ग्रंथालयीन उपभोक्त्यांकरिता विविध संस्थांद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील वाचनासाहित्याचा समावेश असलेले अनेक ग्रंथालय कन्सोर्शिया विकसित झालेले आहेत. एन–लिस्ट कन्सोर्शियामुळे महाविद्यालय स्तरावर ग्रंथालयांचा खर्चाचा प्रश्न थोडाफार प्रमाणात सुटलेला आहे.

## ४.१० महाविद्यालयीन नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्य:स्थिती :

**तक्ता क्र. ४.२.**

**महाविद्यालयीन नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्य:स्थिती**

| अ. क्र. | मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील एकूण महाविद्यालये | नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन झालेली महाविद्यालये | संशोधनासाठी पात्र महाविद्यालये | संशोधनासाठी प्रतिसाद दिलेली महाविद्यालये | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ९५ | ३९ | ३९ | **३८** | **९७%** |

**स्त्रोत :** http://archive.mu.ac.inttenroll2%20THANE-ASC%20PRINTED%20FILE.pdf

सदर संशोधनामध्ये मुंबई विद्यापीठ अंतर्गत संलग्न येणाऱ्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा समावेश आहे यात प्रामुख्याने कला, वाणिज्य, व विज्ञान अशा एकत्रित शाखा असलेली शिवाय अलग अलग विद्या शाखा असलेल्या महाविद्यालयांचा समावेश असून एकूण ९५ महाविद्यालयांचा समावेश होतो. ३९ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन झाले असल्याने ती महाविद्यालये संशोधनासाठी पात्र ठरली असून पैकी ३८ महाविद्यालयांनी संशोधनासाठी लागणारी माहीती प्रश्नावली इ. भरुन दिलीत. एकूण पात्र महाविद्यालये व एकूण प्रतिसाद दिलेल्या महाविद्यालयाचे प्रमाण ९७% आहे .

## ४.११. सारांश :

सदर प्रकरणात संशोधकाने संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाच्या आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामूख्याने महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्वरुप / कार्य / महत्व : एक आढावा, महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवा एक प्रभावी साधन, ग्रंथालयीन सेवा एक आढावा, महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या सेवांचे मूल्यमापन, ग्रंथालयीन सेवा सुविधा आणि बदलते स्वरुप, नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन आणि ग्रंथालय प्रशासन, विद्यापीठ व महाविद्यालयातील ग्रंथालय व माहिती सेवांसाठी नॅक गुणवत्ता दर्शक मार्गदर्शिका, महाविद्यालयीन नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन सद्य:स्थितीबाबत उहापोह केला आहे.

===XOX===

## संदर्भ सूची


१. कुंभार, राजेंद्र. (२००६). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालय. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. पृ. क्र.१–६,२१–२६.

२. खेरडे, मोहन. (२०११). विद्यापीठ अनुदान आयोगास अपेक्षित उच्च शिक्षण क्षेत्रातील महाविद्यालयीन ग्रंथपालांची भूमिका. ज्ञानगंगोत्री, (३) पृ.क्र. ०४–२८.

३. थोरात, लक्ष्मण. (२००७). ग्रंथालय माहितीशास्त्र. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स पृ. क्र. १६७–१८५.

४. देशपांडे, एच. व्ही. (२००५). नॅक पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयांचे प्रशासन. सातारा : सुखदा सौरभ प्रकाशन.

५. देशपांडे, एच. व्ही. (२००४). ग्रंथालयांचे विविध प्रकार व त्यांची कार्ये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृष्ठ क्र. २९ ते ३४.

६. नरगुंदे, रेवती. (२००५). प्रलेखन आणि माहितीशास्त्र (तत्वे, तत्रे, पध्दती आणि प्रणाली). पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

७. नखणे, मिनल. (२००६).भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या. पुणे : नित्यनुतन प्रकाशन. पृ. क्र. २०२ ते २२८.

८. पवार, परितोष. (२००९). संदर्भसेवा अधिक क्षमतेने देण्यास इंटरनेटचा उपयोग. ज्ञानगंगोत्री. पृ.क्र. ९६.

९. पवार, एस. पी., बडकते, सविता., पवार. आर. जी. आणि जाधव सुनंदा. (२००५). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन. पृ.क्र. २५०–२७०.

१०. बाहेती, एस. आर.(सप्टेंबर २००३). बदलत्या काळात डिजीटल ग्रंथालयाचे स्वरुप आणि महत्व. ग्रंथपरिवार. पृ.क्र. ४५.

११. माडीवाले, द. बा. (१९८८). महाविद्यालयीन ग्रंथालय व्यवस्थापन. पूणे : नुतन प्रकशन.

१२. सप्रे, निलम (२००८). निक्षणातील विचार प्रवाह. कोल्हापूर : फडके प्रकाशन, पृष्ठ क्र. १२९ ते १४१.

१३. सुतार, धनंजय भगवान.(२०११). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. वाराणशी : ए. बी. एस. पब्लिकेशन. पृ. क्र. ७९–१०९.

१४. हेरोळे, पुनम. (२०१७). एन–लिस्ट कन्सोर्शिया – महाविद्यालयान ग्रंथालयांसाठी वददान. ज्ञानगंगोत्री, पृ. क्र.२३–३३.

१५. Chaudhari, K. K. (1982). Gazetteer of India, Maharashtra State, Thane District Bombay : Government Central Press.

१६. Directorate of census of operations, Maharashtra. (2011). District Census Handbook : Village and Town wise Primary Censes Abstract (PCA) 2011, Thane, (Report No. Series – 28, Part XII-B) Retrieved from http://www.censusindia.gov.in/2011census/dchb/2721_PART_B_DCHB_%20THANE.pdf

१७. Gorman, Michael. (2003). Enduring library : technology, tradition and the quest for balance. Chicago : American Library Association, 157pp. ISBN : 0-8389-0846-2 £

१८. Gaskill, H. V. Dunbar, R. M. & Brown, C. H. (1934). An analytical study of the use of a college library. The Library Quarterly, Vol. 4, No. 4, pp 544-587.

१९. India University Grants Commission. (1965) University and college libraries containing the report of the library committee and the proceedings of the seminar. New Delhi : UGC, Pp. 228.

२०. Krishna G. (2006). Leadership in academic library of the present century, ILA Bulletin, 43 (3) pp 13-17.

૨૧. Luhn, H. P. (1961). Selective dissemination of new scientific information with the aid of electronic processing equipment. American Documentation Vol.12, 1961, P. 131.

૨૨. NAAC (2014). Guidelines on Quality indicators in Library and Information Servies : Affiliated / Constituent Colleges. Retrieved from http:// naacindia.org/ circulars/ Guidelines-Colleges-Library.pdf

૨૩. NAAC (2014) New Methodology of Assessment & Accreditation (Effective from 1st April 20014) Retrieved from http:// naacindia.org/ publications/ methodology 20070.pdf

૨૪. Ranganathan S. R.(2006). Reference services. New Delhi : Ess Ess Publication.

===XOX===

# प्रकरण पाचवे.

# माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण.

## ५.१ माहिती संकलन :

वर्णनात्मक संशोधन पध्दतीत माहिती संकलनासाठी आवश्यक तेथे पाहणी हे तंत्र वापरले असून पाहणी तंत्राचे प्रश्नावली हे साधन माहिती गोळा करण्यासाठी वापरले आहे. सदर संशोधनात **''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** अभिप्रेत असून त्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित केलेली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या ठाणे जिल्ह्यातील महाविद्यालयातील ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलित केल्या आहेत. अशा भेटीमधून ग्रंथपाल, अध्यापक वर्ग, विद्यार्थी वाचक यांच्याकडून स्वतंत्र प्रश्नावली भरुन घेतल्या आहेत. तसेच त्यांच्याशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. सदर प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधकाने ग्रंथालयीन सेवा सुविधांबाबतची सद्यस्थिती, गरजा, अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला असून भविष्यकालीन योजना जाणून घेण्यासाठी ग्रंथपालांची प्रश्नावली मार्गदर्शक ठरली आहे. सदर संशोधनासाठी सन २०१४–१५ ते २०१५–१६ या शैक्षणिक वर्षातील वाचकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## ५.२ प्रश्नावली व त्यास मिळालेला प्रतिसाद :–

एकूण ९५ महाविद्यालयांपैकी ३९ महाविद्यालये पात्र ठरली. एकूण महाविद्यालयांच्या बाबतीत हे प्रमाण ४१.५०% असून त्यामध्ये नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांचा माहितीचा अभ्यास केला असता एकूण ३९ पैकी ३८ महाविद्यालयांनी प्रश्नावली भरुन दिल्या असल्याने त्यांचे हे प्रमाण ९७.४३% आहे.

**तक्ता क्र. ५.१**

**प्रश्नावली वाटप व त्यास मिळालेला प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| एकूण वाचक | | | प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप | | | एकूण नमुना | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| ७८६९० | १३८० | ३९ | १९०० | ९५० | ३८ | **०२.४१ %** | **६८.८४ %** | **९७.४३ %** |

| प्रत्यक्ष प्रश्नावली वाटप | | | मिळालेला प्रतिसाद | | | एकूण प्रतिसाद शेकडा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल | विद्यार्थी | प्राध्यापक | ग्रंथपाल |
| १९०० | ९५० | ३९ | १६४८ | ७८१ | ३८ | **८६.७३ %** | **८२.२१ %** | **९७.४३ %** |

एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या ७८६९०, एकूण प्राध्यापक १३८० व एकूण ग्रंथपाल ३९ असून १९०० विद्यार्थी वाचकांना प्रश्नावलीचे वाटप करण्यात आले होते. एकूण प्रवेशित विद्यार्थीच्या बाबतीत प्रश्नावली वाटण्याचे हे प्रमाण २.४१% असून या १९०० प्रश्नावल्यांपैकी १६४८ विद्यार्थी वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या आहेत. हा प्रतिसाद ८६.७३% आहे.

तर एकूण १३८० प्राध्यापक वाचकांपैकी ९५० प्रत्यक्ष प्राध्यापक वाचकांना प्रश्नावली वाटण्यात आल्या हे प्रमाण ६८.८४% असून या ९५० प्राध्यापक वाचकांनापैकी ७८१ प्राध्यापक वाचकांनी प्रश्नावल्या भरुन दिल्या प्रश्नावलीचे हे प्रमाण ८२.२१% आहे.

तर ग्रंथपालांच्या प्रश्नावली बाबत एकूण ३९ पैकी ३८ ग्रंथपालांकडून प्रश्नावल्या भरुन मिळाल्या हे प्रमाण ९७.४३% आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी आवश्यक तेथे सरासरी या सांख्यिकीय तंत्राचा वापर केला आहे.

## ५.३ विश्लेषण व सादरीकरण वाचक प्रश्नावली : विद्यार्थ्यांसाठी

विद्यार्थी वाचकांची प्राथमिक माहिती जाणून घेण्यासाठी महाविद्यालयाचे नाव, हजेरी क्रमांक, वाचक विद्यार्थ्यांचे नाव, स्त्री/ पुरुष, शाखा : विज्ञान /वाणिज्य /कला, व वर्ष प्रथम/व्दितीय/तृतीय असे प्रश्न विचारण्यात आले असून सदर प्रश्नांच्या माध्यमातून विद्यार्थी वाचकांबाबत माहिती जाणून घेण्यात आली.


**तक्ता क्र. ५.२**
**स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ८९१ | ७५७ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ५४% | ४६% | **१००%** |

सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल विद्यार्थी प्रश्नावलीत स्त्री ५४% (८९१) वाचकांनी पुरुष वाचकांपेक्षा ४६% (७५७) जास्त प्रतिसाद नोंदविल्याचे लक्षात येते. थोडक्यात विद्यार्थांपेक्षा विद्यार्थीनीनी सदर प्रश्नावलीस जास्त प्रतिसाद दिल्याचे लक्षात येते.

**आलेख क्र. ५.१**

**स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा आलेख.**




**तक्ता क्र. ५.३**


**विद्याशाखा निहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विज्ञान | वाणिज्य | कला | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ५६० | ७६५ | ३२३ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ३४% | ४६% | २०% | **१००%** |

सर्वेक्षणासाठी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी वाचकांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या. विद्याशाखानिहाय प्रतिसादांचा विचार केल्यास एकूण विद्यार्थी वाचकांपैकी ४६% (७६५) वाणिज्य शाखेतील असून ३४% (५६०) वाचक विज्ञान शाखेतील तर २०% (३२३) वाचक कला शाखेतील ग्रंथालयाच उपयोग करीत असल्याचे लक्षात येते.

**आलेख क्र. ५.२**

**विद्याशाखा निहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा आलेख.**



**तक्ता क्र. ५.४.**


**वर्षनिहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष | तृतीय वर्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ६३५ | ५९४ | ४१९ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ३९% | ३६% | २५% | **१००%** |

वर्षनिहाय वाचकांचा विचार केल्यास एकूण विद्यार्थी वाचकांपैकी ३९% (६३५) वाचक प्रथम वर्षातील असून ३६% (५९४) वाचक व्दितीय वर्षातील तर २५% (४१९) वाचक तृतीय वर्षातील आहेत.

**आलेख क्र. ५.३.**

**वर्षनिहाय विद्यार्थी वाचक संख्या दर्शविणारा आलेख**




प्र.१ला. तुम्ही ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे?

विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर करण्यासाठी आठवड्यातून किती वेळा भेटी देतात हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नातच त्यांचे भेटी देण्याच्या स्वरुपाबाबत १. दररोज, २. दोन दिवसातून एकदा, ३. याहून अधिक, ४. कधीच नाही असे पर्याय देण्यात आले होते. त्या शिवाय कधीच नसल्यास त्याबाबत कारणमीमासा जाणून घेण्यासाठी पर्याय क्र. ४ मध्ये स्वतंत्र कारण नोंदविण्याची सोय दिली होती.

**तक्ता क्र. ५.५.**

**विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**


| क्र. | तपशिल | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दररोज | ६५२ | ४०% |
| २. | दोन दिवसातून एकदा | ८०० | ४९% |
| ३. | याहून अधिक | १७२ | १०% |
| ४. | कधीच नाही | २४ | ०१% |
| | **एकूण** | **१६४८** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल विद्यार्थी वाचकांपैकी ४९% (८००) विद्यार्थी वाचक दोन दिवसातून एकदा, ४०% (६५२) विद्यार्थी वाचक दररोज ग्रंथालयाला भेट देतात आणि १०% (१७२) विद्यार्थी वाचक याहून अधिक वेळा तर ०१% (२४) विद्यार्थी वाचक ग्रंथालयात कधीच भेट देत नाहीत असे वाचक भेटीचे स्वरुप लक्षात येते.

हे प्रमाण केवळ ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थी वाचकांचेच आहे. ग्रंथालयात येणाऱ्या विद्यार्थी वाचकांचे सर्वेक्षण करण्यात आले असल्याने हे प्रमाण १००% आहे परंतु संपूर्ण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केल्यास हे प्रमाण वेगळे असू शकते.

**आलेख क्र. ५.४.**

**विद्यार्थी वाचकांचे भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**




प्र.२रा. ग्रंथालयाला भेट देण्याचे कारण.

विद्यार्थी वाचक ग्रंथालयात कशासाठी येतात ते जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर प्रश्नास एकूण ५ पर्याय देण्यात आले होते त्यापैकी १. ग्रंथ देवघेवीसाठी, २. संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, ३. नियतकालिक पाहण्यासाठी, ४. अभ्यासिकेत बसण्यासाठी, ५. इतर कारणासाठी तक्ता क्रमांक २ नुसार सदर प्रश्नास प्रतिसाद मिळाला.

**तक्ता क्र. ५.६.**


**विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथ देवघेवीसाठी, | ३५८ | १८% |
| २. | संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, | २१० | १०% |
| ३. | नियतकालिक पाहण्यासाठी, | २३९ | १२% |
| ४. | अभ्यासिकेत बसण्यासाठी, | १११० | ५५% |
| ५. | इतर कारणासाठी | ११९ | ०५% |
| | **एकूण** | **२०३६** | **१००%** |

ग्रंथालयाच्या भेटी देण्याचा मूख्य उद्देश अभ्यासिकेत बसणे, ग्रंथ देवघेव करणे इ. असतो. ५५% (१११०) विद्यार्थी वाचक अभ्यासिकेत बसण्यासाठी, १८% (३५८) वाचक ग्रंथ देवघेवीसाठी, १२% (२३९) नियतकालिक पाहण्यासाठी, १०% (२१०) संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, तर ०५% (११९) इतर कारणासाठी ग्रंथालयास भेट देतात असे वरील तक्त्यानुसार लक्षात येते.

**आलेख क्र. ५.५.**

**विद्यार्थी वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा आलेख.**




प्र.३रा. आपण ग्रंथालयात सर्व साधारण किती वेळ असता?

ग्रंथालयात विद्यार्थी वाचक किती वेळ असतात हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात ४ पर्याय देण्यात आले होते त्यापैकी १. एक तासापेक्षा कमी, २. एक ते दोन तास, ३. दोन तासापेक्षा जास्त, ४. इतर.

**तक्ता क्र. ५.७.**


**विद्यार्थी वाचक ग्रंथालयात किती वेळ असतात ते दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एक तासापेक्षा कमी, | ४४३ | २७% |
| २. | एक ते दोन तास, | ८०८ | ४९% |
| ३. | दोन तासापेक्षा जास्त, | ३५० | २१% |
| ४. | इतर | ४७ | ०३% |
| | एकूण | १६४८ | १००% |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, ग्रंथालयात ४९% (८०८) विद्यार्थी वाचक एक ते दोन तासासाठी, २७% (४४३) विद्यार्थी वाचक एक तासापेक्षा कमी वेळासाठी, २१% (३५०) विद्यार्थी वाचक दोन तासापेक्षा जास्त वेळासाठी तर ०३% (४७) विद्यार्थी वाचक वरील वेळेपेक्षा कमी अधिक वेळेत ग्रंथालयात वावरतात.

**आलेख क्र. ५.६.**

**विद्यार्थी वाचक ग्रंथालयात किती वेळ असतात ते दर्शविणारा आलेख.**




प्र.४ था. ग्रंथालयात आपल्या विषयाच्या वाचन साहित्याबाबत आपला अभिप्राय नोंदवा.

ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या विषय वाचनसाहित्यातील कोणत्या वाचनसाहित्यावर विद्यार्थी वाचकांचा भर आहे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून वाचनसाहित्य प्रकारामध्ये १. सर्वसाधारण ग्रंथ, २. क्रमिक ग्रंथ, ३. संदर्भ ग्रंथ व प्रत्येक प्रकारास समाधानकारक, असमाधानकारक व सांगता येत नाही हे तीन पर्याय विचारण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.८.**


**वाचन साहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | समाधानकारक | | असमाधानकारक | | सांगता येत नाही | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | सर्वसाधारण ग्रंथ | १०६२ | **६४%** | ४१० | २५% | १७६ | ११% | १६४८ | १००% |
| २. | क्रमिक ग्रंथ | ६२९ | **३८%** | ७४१ | ४५% | २७८ | १७% | १६४८ | १००% |
| ३. | संदर्भ ग्रंथ | ७८२ | **४७%** | ५४५ | ३३% | ३२१ | १९% | १६४८ | १००% |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, वाचनसाहित्या बाबत विद्यार्थी वाचक १) सर्वसाधारण ग्रंथाबाबत ६४% (१०६२), समाधानकारक, २) क्रमिक ग्रंथाबाबत ३८% (६२९) समाधानकारक तर ३) संदर्भ ग्रंथाबाबत ४७% (७८२) विद्यार्थी वाचक समाधानी असल्याचा अभिप्राय नोंदविला आहे.

**आलेख क्र. ५.७.**

**वाचन साहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र.५ वा. ग्रंथालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तक पेढी योजनेचा लाभ घेतला आहे काय?

विद्यार्थी वाचक पुस्तक पेढी योजनेचा लाभ घेतात की नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.९.**

**पुस्तक पेढी योजनेचा लाभ दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ८६१ | ७८७ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ५२% | ४८% | **१००%** |

५२% (८६१) विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तक पेढीचा लाभ घेतला असून ४८% (७८७) विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तक पेढीचा लाभ घेतला नाही असे लक्षात येते.

**आलेख क्र. ५.८.**
**पुस्तक पेढी योजनेचा लाभ दर्शविणारा आलेख.**




प्र.६ वा. ग्रंथालयीन पुढील सेवांबाबत अभिप्राय नोंदवा.

ग्रंथालयातील सेवांबाबत अभिप्राय जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता सदर प्रश्नात पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा असे प्रकार करण्यात आले आहेत. **पारंपरिक सेवांमध्ये** १. देवघेव सेवा, २. संदर्भ सेवा, ३. वाचनसाहित्याची सूची सेवा, ४. वर्तमानपत्रे कात्रण सेवा, ५. बहिःशाल सेवा **आधुनिक सेवांमध्ये** ६. प्रचलित जागरुकता सेवा, ७. निवडक माहितीचे प्रसारण सेवा, ८. वाचकांना निर्देशन सेवा, ९. प्रतिलिपी सेवा, १०. सार सेवा **संगणक सेवांमध्ये** ११. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा १२. ओपेक सेवा, १३. ऑन लाईन डेटाबेस सेवा, १४. ऑफ लाईन डेटाबेस सेवा, १५. प्रलेख प्रदान सेवा. इ. सेवांचा समावेश करण्यात आला होता. त्या सेवा कशा वाटतात हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक सेवांमध्ये समाधानकारक, असमाधानकारक व सांगता येत नाही ह्या पर्यांयांच्या आधारे अभिप्राय जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला. सदर प्रश्नास खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला.

**तक्ता क्र. ५.१०.**

**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | **समाधानकारक** | | असमाधानकारक | | सांगता येत नाही | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| | **पारंपरिक सेवा** | | | | | | | | |
| १. | देवघेव सेवा | १२३० | **७५%** | २९४ | १८% | १२४ | ०८% | १६४८ | १००% |
| २. | संदर्भ सेवा | १०६३ | **६५%** | ४३० | २६% | १५५ | ०९% | १६४८ | १००% |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा | ८९५ | **५४%** | ४९५ | ३०% | २५८ | १६% | १६४८ | १००% |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा | ९६८ | **५९%** | ५१८ | ३१% | १६२ | १०% | १६४८ | १००% |
| ५. | बहिःशाल सेवा | ५७१ | **३५%** | ६७३ | ४१% | ४०४ | २५% | १६४८ | १००% |
| | **सरासरी** | **९४५** | **५८%** | **४८२** | **२९%** | **२२१** | **१४%** | **१६४८** | **१००%** |
| | **आधुनिक सेवा** | | | | | | | | |
| ६. | प्रचलित जागरुकता सेवा | ५६६ | **३४%** | ६९९ | ४२% | ३८३ | २३% | १६४८ | १००% |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा | ५८४ | **३५%** | ७४८ | ४५% | ३१६ | १९% | १६४८ | १००% |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा | ६७९ | **४१%** | ७५८ | ४६% | २११ | १३% | १६४८ | १००% |
| ९. | प्रतिलिपी सेवा | ५५७ | **३४%** | ७३६ | ४५% | ३५५ | २२% | १६४८ | १००% |
| १०. | सार सेवा | ४४५ | **२७%** | ८२३ | ५०% | ३८० | २३% | १६४८ | १००% |
| | **सरासरी** | **५६६** | **३४%** | **७५३** | **४६%** | **३२९** | **२०%** | **१६४८** | **१००%** |
| | **संगणक सेवा** | | | | | | | | |
| ११. | इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा | ६३० | **३८%** | ७८५ | ४८% | २३३ | १४% | १६४८ | १००% |
| १२. | ओपॅक सेवा | ५०८ | **३१%** | ७७४ | ४७% | ३६६ | २२% | १६४८ | १००% |
| १३. | ऑन लाईन डेटाबेस सेवा | ५४० | **३३%** | ७९९ | ४८% | ३०९ | १९% | १६४८ | १००% |
| १४. | ऑफ लाईन डेटाबेस सेवा | ४८७ | **३०%** | ८३२ | ५०% | ३२९ | २०% | १६४८ | १००% |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा | ३५६ | **२२%** | ८५२ | ५२% | ४४० | २७% | १६४८ | १००% |
| | **सरासरी** | **५०४** | **३१%** | **८०८** | **४९%** | **३३५** | **२०%** | **१६४८** | **१००%** |

ग्रंथालयीन सेवांबाबत प्राप्त सर्वेक्षणात ग्रंथालयीन सेवांना मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **समाधानकारक** या पर्यायानुसार **उतरत्या क्रमाने** केलेली आहे.

**पारंपरिक सेवा :**

सर्वेक्षणावरुन असे लक्षात येते की, १. देवघेव सेवेबाबत (Lending) ७५% (१२३०), २. संदर्भ सेवेबाबत (Reference) ६५% (१०६३), ३. वर्तमानपत्रे कात्रण सेवेबाबत (Newspaper clippings Services) ५९% (९६८) ह्या सेवांची समाधानकारक

पातळी सरासरी ५८% (९४५) पेक्षा जास्त असून ४. वाचनसाहित्याची सूची सेवेबाबत (Bibliographical Services) ५४% (८९५), ५. बहिःशाल सेवेबाबत (Extensive Services) ३५% (५७१) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ५८% (९४५) पेक्षा कमी आहे. ग्रंथालयांनी वरील सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा ह्या अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आधुनिक सेवा :**


सर्वेक्षणावरुन असे लक्षात येते की, ६. वाचकांना निर्देशन सेवेबाबत (Indexing Services) ४१% (६७९), ७. निवडक माहितीचे प्रसारण सेवेबाबत (S.D.I. Services) ३५% (५८४), ८. प्रचलित जागरुकता सेवेबाबत (C.A. Services) ३४% (५६६) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३४% (५६६) पेक्षा जास्त असून, ९. प्रतिलिपी सेवेबाबत (Indexing Services) ३४% (५५७), १०. सार सेवेबाबत (Abstacting Services) २७% (४४५) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३४% (५६६) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**संगणक सेवा :**

सर्वेक्षणावरुन असे लक्षात येते की, ११. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवेबाबत (Online Search) ३८% (६३०), १२. ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search) ३३% (५४०), १३. ओपेक सेवेबाबत (OPAC Search) ३१% (५०८) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३१% (५०८) पेक्षा जास्त असून, १४. ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search) ३०% (४८७), १५. प्रलेख प्रदान सेवेबाबत (DDS) २२% (३५६) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३१% (५०८) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.९.**

**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र.७ वा. आपणांस ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना काही अडचणी येतात काय?

ग्रंथालयाच्या सेवा मिळवितांना विद्यार्थी वाचकांना काही अडचणी येतात काय ह्या बाबत माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला. ह्यात होय किंवा नाही ह्या पर्यायाचा वापर करुन प्रतिसाद मिळविला.

**तक्ता क्र. ५.११.**

**ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | १११८ | ५३० | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ६८% | ३२% | **१००%** |


६८% (१११८) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येतात तर ३२% (५३०) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत नाहीत.

ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपारीक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केल्यानंतर सदर सेवांबद्दल ६८% (१११८) विद्यार्थी

वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येतात तर ३२% (५३०) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत नाहीत असे निदर्शनास येते.

**आलेख क्र. ५.१०.**

**ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा आलेख.**




उत्तर होय असल्यास अडचणी जाणून घेण्यासाठी पुढील ४ पर्याय सुचविण्यात आले. १. ग्रंथालयीन वेळा सोयीच्या नाहीत. २. ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहिती नाही, ३. पुरेशी गरज वाटत नाही, ४. इतर सदर पर्यायास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.१२.**


**ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथालयीन वेळा सोयीच्या नाहीत | ४४७ | २४% |
| २. | ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहिती नाही | ६६७ | ३७% |
| ३. | पुरेशी गरज वाटत नाही | ५२५ | २९% |
| ४. | इतर | १८६ | १०% |
| | **एकूण** | **१८२५** | **१00%** |

ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी ह्यात ३७% (६६७) विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहीती नाही, पुरेशी गरज वाटत नाही असे सांगणारे २९% (५२५) विद्यार्थी वाचक असून, ग्रंथालयीन वेळा सोयीच्या नाहीत बाबत २४% (४४७) तर इतर अडचणी बाबत १०% (१८६) विद्यार्थी वाचकांनी अभिप्राय नोंदविला.

**आलेख क्र. ५.११.**

**ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना येणाऱ्या अडचणी दर्शविणारा आलेख**




प्र. ८वा. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग करता?

विद्यार्थी वाचक ग्रंथालयातील वाचनसाहित्याची अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर करतात ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास एकूण ७ पर्याय देण्यात आले होते. त्यामध्ये अ. इंटरनेटवरील माहिती, ब. प्रिंटेड पुस्तके, क़. प्रिंटेड नियतकालिके, ड. ई–बुक्स, ई. ई–जर्नल्स, फ. वर्तमानपत्रे, ग. इतर असे पर्याय होते.

**तक्ता क्र. ५.१३.**


**विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी साधनांचा उपयोग दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | इंटरनेटवरील माहिती | ९८९ | २३% |
| २. | प्रिंटेड पुस्तके, | ८४१ | २०% |
| ३. | प्रिंटेड नियतकालिके | ४०९ | १०% |
| ४. | ई–बुक्स | ३६९ | ०९% |
| ५. | ई–जर्नल्स | ४४४ | १०% |
| ६. | वर्तमानपत्रे | १०७३ | २५% |
| ७. | इतर | १५९ | ०४% |
| | **एकूण** | **४२८४** | **१००%** |

प्रतिसादांचे **उतरत्या क्रमाने** मांडणी केल्यास असे लक्षात येते की,

विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी ज्या साधनांचा वापर करतात त्या ग्रंथालयीन सेवांची यशस्विता ग्रंथालयीन साधनांवर अवलंबून असते. वाचकांनी ग्रंथालयीन साधनांचा योग्य प्रमाणात वापर केल्यास ग्रंथालयीन सेवा अधिक दर्जेदार होईल यात शंका नाही. ग्रंथालयातील कोणत्या साधनांचा वापर वाचक करतात ते एकूण ७ पर्यायांच्या माध्यमातून जाणून घेण्यात आले. वर्तमानपत्र २५% (१०७३), इंटरनेटवरील माहिती २३% (९८९), प्रिंटेड पुस्तकांचा वापर २०% (८४१), प्रिंटेड नियतकालिके १०% (४०९), ई–जर्नल्स १०% (४४४), ई–बुक्स ०९% (३६९)तर इतर साधनांचा वापर ०४% (१५९) विद्यार्थी वाचक करतात.

**आलेख क्र. ५.१२.**
**विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी साधनांचा उपयोग दर्शविणारा आलेख.**




प्र. ९वा. आपण ग्रंथ संग्रहाबाबत समाधानी आहात काय?

विद्यार्थी वाचकांचे ग्रंथ संग्रहाबाबतचे मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास १. होय, २. नाही, ३. सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते.


**तक्ता क्र. ५.१४.**
**ग्रंथ संग्रहाबाबत समाधान दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | सांगता येत नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ८७२ | ५८० | १९६ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ५३% | ३५% | १२% | **१००%** |

५३% (८७२) विद्यार्थी वाचक ग्रंथ संग्रहाबाबत समाधानी असून ३५% (५८०) विद्यार्थी वाचक ग्रंथ संग्रहाबाबत समाधानी नसून १२% (१९६) विद्यार्थी वाचकांनी ग्रंथ संग्रहाबाबत सांगता येत नाही असे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.१३**

**ग्रंथ संग्रहाबाबत समाधान दर्शविणारा आलेख.**




प्र.१०वा. ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय?

ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबाबत मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून सदर प्रश्नास दोन पर्याय देण्यात आले होते. १. होय, २. नाही.

**तक्ता क्र. ५.१५.**


**ग्रंथालयातील भौतिक सुविधाबाबत मत दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी प्रतिसाद | ८७७ | ७७१ | **१६४८** |
| २. | शेकडा प्रमाण | ५३% | ४७% | **१००%** |

५३% (८७७) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा जाणवतात तर ४७% (७७१) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा जाणवत नाहीत असे मत नोंदविले आहे. एकूण १४ मुद्यांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्यात आला.

**आलेख क्र. ५.१४.**

**ग्रंथालयातील भौतिक सुविधाबाबत मत दर्शविणारा आलेख.**




प्र. ११वा. ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा?

ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबद्दल विद्यार्थी वाचकांना काय वाटते हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून सदर प्रश्नात एकूण १४ मुद्यांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्यात आला त्यामध्ये १. ग्रंथालयाची जागा, २. ग्रंथालयीन स्वच्छता, ३. फर्निचर – खुर्च्या, ४.फर्निचर – टेबलांबाबत, ५. फर्निचर – फूटरेस्टस, ६. प्रकाश योजना, ७. स्वछता गृह, ८. पिण्याचे पाण्याबाबत, ९. वाचनकक्षाच्या क्षमता, १०. आवाज / ग्रंथालयाची शांतता, ११. खेळत्या हवेबाबत, १२. फ्लोरींग बाबत, १३. अंतर्गत मांडणी बाबत, १४. सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत तसेच प्रत्येक मूद्यामध्ये अत्यंत समाधानकारक, समाधानकारक, सांगता येत नाही, असमाधानकारक, अत्यंत असमाधानकारक पर्यायांच्या माध्यमातून अभिप्राय नोंदवून घेण्याचा प्रयत्न केला.

**तक्ता क्र. ५.१६.**

**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

(अत्यंत असमाधानकारक पर्यायांनुसार)

| क्र. | तपशिल | **अत्यंत समाधानकारक** | | समाधानकारक | | सांगता येत नाही | | असमाधानकारक | | अत्यंत असमाधानकारक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण | विद्यार्थी प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | ग्रंथालयाची जागा | ३४६ | **२१%** | ५७६ | ३५% | ८६ | ०५% | ४९३ | ३०% | १४७ | ०९% |
| २. | ग्रंथालयीन स्वच्छता | ५९३ | **३६%** | ६९२ | ४२% | ८२ | ०५% | १९८ | १२% | ८३ | ०५% |
| ३. | फर्निचर – खुर्च्या | ५३१ | **३२%** | ५६० | ३४% | ९८ | ०६% | ३९१ | २४% | ६८ | ०४% |
| ४. | फर्निचर – टेबल | ५२० | **३२%** | ५४३ | ३३% | १२० | ०७% | ४१६ | २५% | ४९ | ०३% |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | फर्निचर फूटरेस्टस | ४४९ | **२७%** | ५९३ | ३६% | २०८ | १३% | ३५४ | २१% | ४४ | ०३% |
| ६. | प्रकाश योजना | ५६७ | **३४%** | ७९३ | ४८% | १३५ | ०८% | १२० | ०७% | ३३ | ०२% |
| ७. | स्वछता गृह | २९६ | **१८%** | ४७७ | २९% | १२४ | ०८% | ५७० | ३५% | १८१ | ११% |
| ८. | पिण्याचे पाणी | ३२४ | **२०%** | ५१० | ३१% | १९६ | १२% | ४८७ | ३०% | १३१ | ०८% |
| ९. | वाचनकक्षाच्या क्षमता | ३१३ | **१९%** | ४६१ | २८% | १३१ | ०८% | ५९५ | ३६% | १४८ | ०९% |
| १०. | आवाज / ग्रंथालयीन शांतता | ३८१ | **२३%** | ६०९ | ३७% | १५१ | ०९% | ३९० | २४% | ११७ | ०७% |
| ११. | खेळती हवा | ५४३ | **३३%** | ७२५ | ४४% | १५४ | ०९% | १८१ | ११% | ४५ | ०३% |
| १२. | फ्लोरींग | ४१० | **२५%** | ७२५ | ४४% | २४० | १५% | २२४ | १४% | ४९ | ०३% |
| १३. | अंतर्गत मांडणी | ३२९ | **२०%** | ६७५ | ४१% | १४१ | ०९% | ४३२ | २६% | ७१ | ०४% |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | ३६२ | **२२%** | ६०९ | ३७% | १४६ | ०९% | ४३३ | २६% | ९८ | ०६% |
| | **सरासरी** | **४२६** | **२६%** | **६११** | **३७%** | **१४४** | **०९%** | **३७७** | **२३%** | **९०** | **०५%** |


ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **अत्यंत समाधानकारक** या पर्यायानुसार **उतरत्या क्रमाने** केलेली आहे.

**अत्यंत समाधानकारक :** १ . ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत ३६% (५९३), २. प्रकाश योजनाबाबत ३४% (५६७), ३. खेळत्या हवेबाबत ३३% (५४३), ४. फर्निचर – खुर्च्याबाबत ३२% (५३१), ५. फर्निचर – टेबलांबाबत ३२% (५२०), ६. फर्निचर – फूटरेस्टसबाबत २७% (४४९) ह्या सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २६% (४२६) पेक्षा जास्त असून, ७. फ्लोरींगबाबत २५% (४१०), ८. आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत २३% (३८१), ९. सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत २२% (३६२), १०. ग्रंथालयाच्या जागेबाबत २१% (३४६), ११. पिण्याचे पाण्याबाबत २०% (३२४), १२. अंतर्गत मांडणीबाबत २०% (३२९), १३. वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत १९% (३१३), १४. स्वछता गृहाबाबत १८% (२९६) ह्या सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २६% (४२६) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सुविधांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सुविधा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.१५.**

**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख.**

(अत्यंत असमाधानकारक पर्यायांनुसार)




प्र.१२वा. ग्रंथालयात कोणत्या उणीवा / दोष जाणवतात ते सांगा?

विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयात कोणत्या उणीवा/दोष जाणवतात ते व्यक्त करण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ५.१७.**

**विद्यार्थी वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात उणीवा/दोष दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | प्रतिसाद | उणीवा/दोष |
|---|---|---|
| ०१. | ४७% | ग्रंथालयायीन शांतता नसणे व ग्रंथालयात भ्रमणध्वनीचा वापरामूळे त्रास. |
| ०२. | ३८% | ग्रंथालयात जागेचा अभाव |
| ०३. | ३६% | ग्रंथालयात बसण्याची अपूरी व्यवस्था |
| ०४. | २१% | तटस्थ राहून मत व्यक्त केले नाही. |
| ०५. | १८% | क्रमिक पुस्तकांची संख्या असणे. |
| ०६. | १३% | संदर्भ ग्रंथांची संख्या वाढविणे. |
| ०७. | १३% | क्रमिक ग्रंथांच्या नवीन आवृत्तीची कमतरता |
| ०८. | १२% | ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहित नसल्याबाबत |
| ०९. | ११% | वाचकांना संदर्भ ग्रंथ कसे हाताळावेत याबाबत मार्गदर्शन करण्याबाबत |

| | | |
|---|---|---|
| १०. | ०९% | वाचक ग्रंथालयीन सूचनांचे पालन करीत नाही |
| ११. | ०७% | खेळती हवा राहण्यासाठी पंख्यांची संख्या वाढविणे. |
| १२. | ०७% | संगणक संख्या वाढविणे |
| १३. | ०७% | ग्रंथ मिळण्यासाठी फार उशीर लागतो. |
| १४. | ०६% | वाचन कक्षाची क्षमता वाढविणे. |
| १५. | ०६% | संगणक सेवा बऱ्याच वेळा बंद असतात. |
| १६. | ०६% | Overnight Issue सेवा देण्यात यावी. |
| १७. | ०६% | कमीत कमी दोन ग्रंथ देण्यात यावेत |
| १८. | ०४% | ग्रंथालयात पुरेसा प्रकाश नाही. |
| १९. | ०४% | ग्रंथालयीन कर्मचारी कमी जाणवतात. |
| २०. | ०४% | ओपेक व्दारे ग्रंथ शोधण्यास फार वेळ लागतो. |
| २१. | ०३% | वृत्तपत्रे वाचक वाचन झाल्यावर व्यवस्थित ठेवत नाही. |
| २२. | ०२% | वीज खंडीत झाल्यास पर्यायी सोय असणे गरजेचे वाटते. |

प्र. १३वा. ग्रंथालयात कोणत्या सुधारणा व्हाव्यात असे वाटते? आपले मत नोंदवा?

ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांना कोणत्या सुधारणा होणे अत्यंत गरजेचे वाटते ह्या बाबत मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ५.१८.**

**विद्यार्थी वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात आवश्यक सुधारणा दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | प्रतिसाद | उणीवा/दोष |
|---|---|---|
| ०१. | ५०% | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे वाटते. |
| ०२. | २९% | तटस्थ राहून आपले मत व्यक्त केले नाही. |
| ०३. | १३% | इंटरनेट स्पीड वाढणे गरजेचे वाटते. |
| ०४. | १३% | देवघेवीच्या वेळा वाढविणे गरजेचे वाटते. |
| ०५. | १२% | देवघेवीसाठी कोणता एक दिवस न ठेवता कोणत्याही दिवशी ग्रंथांची देवाण घेवाण करण्यात यावी. |
| ०६. | ११% | ग्रंथालयीन टेबल/खुर्च्या जास्त वेळ बसण्याजोग्या नाहीत. |
| ०७. | ०९% | प्रश्नपत्रिका संच परिपूर्ण नसतात. |
| ०८. | ०७% | Property Counter ची जागा सुस्थितीत असावी. |
| ०९. | ०७% | प्रतिलिपी सेवेत सुधारणा करणे आवश्यक आहे. |
| १०. | ०६% | स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांची संख्या वाढवावी व सदर पुस्तके घरी नेण्यासाठी द्यावीत. |
| ११. | ०५% | वायफाय कनेक्शन दिल्यास भ्रमणध्वनी मार्फत ग्रंथालयीन आज्ञावलीचा (Apps, QR Code etc.) वापर करणे शक्य होऊ शकतो. |
| १२. | ०४% | संगणक सेवा हाताळण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक वाटते. |
| १३. | ०४% | कचरापेटीची दुर्गंधी कमी करावी व वेळोवेळी स्वच्छ ठेवावी. |

## वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी
## माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण

### ५.४. विश्लेषण व सादरीकरण वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी


प्राध्यापक वाचकांची प्राथमिक माहिती जाणून घेण्यासाठी महाविद्यालयाचे नाव, प्राध्यापकांचे नाव, स्त्री/ पुरुष, शाखा : विज्ञान /वाणिज्य /कला, व सेवाकाल यासंबंधी प्रश्न विचारण्यात आले असून सदर प्रश्नांच्या माध्यमातून प्राध्यापकांबाबत माहिती जाणून घेण्यात आली.

**तक्ता क्र. ५.१९.**
**स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा तक्ता**

| क्र. | तपशिल | स्त्री | पुरुष | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ४४७ | ३३४ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ५७% | ४३% | **१००%** |

सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचकांपैकी ५७% (४४७) स्त्री प्राध्यापक आणि ४३% (३३४) पुरुष प्राध्यापकांनी प्रतिसाद नोंदविला. थोडक्यात पुरुष प्राध्यापकांपेक्षा स्त्री प्राध्यापकांनी सदर प्रश्नावलीस जास्त प्रतिसाद दिल्याचे लक्षात येते.

**आलेख क्र. ५.१६**
**स्त्री पुरुष निहाय संख्या दर्शविणारा आलेख**





**तक्ता क्र. ५.२०.**
**विद्याशाखा निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | विज्ञान | वाणिज्य | कला | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | २५२ | ३०६ | २२३ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ३२% | ३९% | २९% | **१००%** |

विद्याशाखा निहाय प्रतिसादांचा विचार केल्यास एकूण प्राध्यापक वाचकांपैकी ३९% (३०६) वाचक वाणिज्य शाखेतील असून ३२% (२५२) वाचक विज्ञान शाखेतील तर २९% (२२३) कला शाखेच्या प्राध्यापकांनी आपला प्रतिसाद नोंदविला.

**आलेख क्र. ५.१७.**

**विद्याशाखा निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा आलेख**




**तक्ता क्र. ५.२१.**


**सेवाकाल निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | सेवाकाल कालावधी वर्ष | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१ ते ०५ वर्ष | ०६ ते १० वर्ष | ११ ते १५ वर्ष | १६ ते २० वर्ष | २१ ते २५ वर्ष | २६ ते ३० वर्ष | ३१ ते ३५ वर्ष | **एकूण** |
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | २३३ | २०४ | १०३ | ११४ | ५९ | ४८ | २० | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ३०% | ३६% | १३% | १५% | ०८% | ०६% | ०३% | **१००%** |

वरील तक्यावरुन असे लक्षात येते की, सेवाकालनिहाय प्राध्यापक वाचकांचा विचार केल्यास ३६% (२०४) प्राध्यापक वाचक हे ०६ ते १० वर्ष सेवाकाल दरम्यान असून ३०% (२३३) प्राध्यापक वाचक ०१ ते ०५ वर्ष सेवाकाल दरम्यान, १५% (११४) प्राध्यापक वाचक १६ ते २० वर्ष सेवाकाल दरम्यान, १३% (१०३) प्राध्यापक वाचक ११ ते १५ वर्ष सेवाकाल दरम्यान, ०८% (५९) प्राध्यापक वाचक २१ ते २५ वर्ष सेवाकाल दरम्यान, ०६% (४८) प्राध्यापक वाचक २६ ते ३० वर्ष सेवाकाल दरम्यान असून  ३१ ते ३५ वर्ष सेवाकाल दरम्यान ०३% (२०)प्राध्यापक वाचक ग्रंथालयाच उपयोग करीत असल्याचे लक्षात येते.

**आलेख क्र. ५.१८.**

**सेवाकाल निहाय प्राध्यापक वाचक संख्या दर्शविणारा आलेख**




प्र.१ला. तुम्ही ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप कोणत्या प्रकारचे आहे?

प्राध्यापक वर्ग ग्रंथालयाचा वापर करण्यासाठी आठवड्यातून किती वेळा भेटी देतात हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नातच पूढील पर्याय देण्यात आले आहे. १. दररोज, २. दोन दिवसातून एकदा, ३. याहून अधिक, ४. कधीच नाही असे पर्याय देण्यात आले होते या शिवाय कधीच नसल्यास त्याबाबत कारणमीमांसा जाणून घेण्यासाठी पर्याय क्र. ४ मध्ये स्वतंत्र कारण नोंदविण्याची सोय दिली होती.

**तक्ता क्र. ५.२२.**


**प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दररोज | २३२ | ३०% |
| २. | दोन दिवसातून एकदा | ३७८ | ४८% |
| ३. | याहून अधिक | १७० | २२% |
| ४. | कधीच नाही | ०१ | ००% |
| | **एकूण** | **७८१** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचकांपैकी ४८% (३७८) प्राध्यापक वाचक दोन दिवसातून एकदा, ३०% (२३२) प्राध्यापक वाचक दररोज ग्रंथालयाला भेट देतात. त्या खालोखाल तर २२% (१७०) प्राध्यापक वाचक याहून अधिक वेळा ग्रंथालयाला भेट देण्याचे स्वरुप लक्षात येते.

हे प्रमाण केवळ ग्रंथालयात येणाऱ्या प्राध्यापक वाचकांचेच आहे. ग्रंथालयात येणाऱ्या प्राध्यापक वाचकांचे सर्वेक्षण करण्यात आले असल्याने हे प्रमाण १००% आहे परंतु संपूर्ण महाविद्यालयातील प्राध्यापक वाचकांचे सर्वेक्षण केल्यास हे प्रमाण वेगळे असू शकते.

**आलेख क्र. ५.१९.**
**प्राध्यापक वाचकांचे भेटी देण्याचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**




प्र.२रा. ग्रंथालयाला भेट देण्याचे कारण.

प्राध्यापक वाचक ग्रंथालयात कशासाठी येतात ते जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सदर प्रश्नास एकूण ५ पर्याय देण्यात आले होते त्यापैकी १. ग्रंथ देवघेवीसाठी, २. संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, ३. नियतकालिक पाहण्यासाठी, ४. अभ्यासिकेत बसण्यासाठी, ५. इतर कारणासाठी तक्ता क्रमांक २ नुसार सदर प्रश्नास प्रतिसाद मिळाला.


**तक्ता क्र. ५.२३.**
**प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथ देवघेवीसाठी, | ४१८ | २४% |
| २. | संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, | ५९० | ३३% |
| ३. | नियतकालिक पाहण्यासाठी, | ३७१ | २१% |
| ४. | अभ्यासिकेत बसण्यासाठी, | २९० | १६% |
| ५. | इतर कारणासाठी | ९६ | ०५% |
| | **एकूण** | **१७६५** | **१००%** |

सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचकांपैकी ३३% (५९०) संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी, २४% (४१८) वाचक ग्रंथ देवघेवीसाठी, २१% (३७१) नियतकालिक पाहण्यासाठी, १६% (२९०) प्राध्यापक वाचक अभ्यासिकेत बसण्यासाठी, तर ५% (९६) इतर कारणासाठी ग्रंथालयास भेट देतात असे वरील तक्त्यानुसार लक्षात येते.

**आलेख क्र. ५.२०.**

**प्राध्यापक वाचकांचे ग्रंथालयाला भेटी देण्याचे कारण दर्शविणारा आलेख.**




प्र.३रा. ग्रंथालयात आपल्या विषयाच्या वाचन साहित्याबाबत आपला अभिप्राय नोंदवा.

ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या विषयनिहाय वाचनसाहित्यातील कोणत्या वाचनसाहित्यावर प्राध्यापक वाचकांचा भर आहे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून वाचनसाहित्य प्रकारामध्ये १. सर्वसाधारण ग्रंथ, २. क्रमिक ग्रंथ, ३. संदर्भ ग्रंथ व प्रत्येक प्रकारास समाधानकारक, असमाधानकारक व सांगता येत नाही हे तीन पर्याय विचारण्यात आले होते. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचकां कडून खालील अभिप्राय नोंदविण्यात आले.


**तक्ता क्र. ५.२४.**

**वाचन साहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | **समाधानकारक** | | असमाधानकारक | | सांगता येत नाही | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | सर्वसाधारण ग्रंथ | ५१० | **६५%** | २२३ | २९% | ४८ | ०६% | ७८१ | १००% |
| २. | क्रमिक ग्रंथ | ३८१ | **४९%** | ३१९ | ४१% | ८१ | १०% | ७८१ | १००% |
| ३. | संदर्भ ग्रंथ | ४२३ | **५४%** | २७० | ३५% | ८८ | ११% | ७८१ | १००% |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, ग्रंथालयीन वाचनसाहित्याबाबत सर्वसाधारण ग्रंथ हे ६५% (५१०) समाधानकारक असून क्रमिक ग्रंथ ४९% (३८१) तर संदर्भ ग्रंथाबाबत ५४% (४२३) प्राध्यापक वाचक समाधानी आहेत. असा अभिप्राय नोंदविला आहे.

**आलेख क्र. ५.२१.**
**वाचन साहित्याबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र.४ वा. ग्रंथ निवडीमध्ये आपला सहभाग असतो काय?

प्राध्यापक वाचकांचा ग्रंथ निवडीबाबतचा सहभाग जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता.


सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.२५.**
**ग्रंथ निवडी बाबत सहभाग दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ६१४ | १६७ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ७९% | २१% | **१००%** |

७९% (६१४) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथ निवडीमध्ये आपला सहभाग असतो तर २१% (१६७) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथ निवडीमध्ये आपला सहभाग नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.२२.**
**ग्रंथ निवडी बाबत सहभाग दर्शविणारा आलेख.**



प्र.५ वा. ग्रंथालय समितीमध्ये आपण काम केले आहे काय?

प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालय समितीमध्ये काम केल्याचा अनुभव आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.२६.**

**ग्रंथालय समितीतील कार्यानुभवाचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ३०५ | ४७६ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ३९% | ६१% | **१००%** |

**आलेख क्र. ५.२३.**

**ग्रंथालय समितीतील कार्यानुभवाचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख**




३९% (३०५) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालय समितीमध्ये भाग घेतला असून ६१% (४७६) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालय समितीमध्ये भाग घेतला नाही असे मत नोंदविले आहे.

प्र.६ वा. शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्ष आहे काय?

ग्रंथालयामधील प्राध्यापक वाचकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्ष सुविधा आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढीलप्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.२७.**


**शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्ष बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ६३० | १५१ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ८१% | १९% | **१००%** |

८१% (६३०) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालय स्वतंत्र संदर्भकक्षाबाबत होय मत तर १९% (१५१) प्राध्यापक वाचकांनी स्वतंत्र संदर्भकक्षाबाबत नाही असे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.२४.**

**शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्षाबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख**




प्र.७ वा. आपण एखाद्या विषयामध्ये संशोधन केले आहे काय?

प्राध्यापक वाचकांचा संशोधनाबाबतचा कल जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन केले होते. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढीलप्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.२८.**

**प्राध्यापक वाचकांचा संशोधनाबाबतचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ५१५ | २६६ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ६६% | ३४% | **१००%** |

**आलेख क्र. ५.२५.**

**प्राध्यापक वाचकांचा संशोधनाबाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख**



६६% (५१५) प्राध्यापक वाचकांनी संशोधन केले असून ३४% (२६६) प्राध्यापक वाचकांनी संशोधन केलेले नसल्याचे मत नोंदविले आहे.

सदर प्रश्नातच उपप्रश्न विचारण्यात आला होता की, प्रस्तुत लेखन करत असताना आपणास या ग्रंथालयातील वाचन साहित्य उपयुक्त ठरले का? ह्या बाबत प्रतिसाद खालील प्रमाणे.


**तक्ता क्र. ५.२९.**

**संशोधन कार्यात वाचन साहित्याच्या उपयुक्ततेबाबतचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | थोड्याफार प्रमाणात | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ३७४ | ५२ | ८९ | **५१५** |
| २. | शेकडा प्रमाण | ७३% | १०% | १७% | **१००%** |

**आलेख क्र. ५.२६.**

**संशोधन कार्यात वाचन साहित्याच्या उपयुक्ततेबाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




नमुना दाखल घेतलेल्या एकूण ७८१ प्राध्यापक वाचकांपैकी ५१५ म्हणजे ६६% प्राध्यापक वाचकांनी संशोधन केलेले असून त्या पैकी ७३% (३७४) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग झाला असून १७% (८९) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयीन वाचन साहित्याचा थोड्याफार प्रमाणात उपयोग झाला तर १०% (५२) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयीन वाचन साहित्याचा उपयोग झाला नसल्याचे मत नोंदविले आहे.

प्र.८ वा. आपण ग्रंथ संग्रहाबाबत समाधानी आहात काय?


प्राध्यापक वाचक ग्रंथालयातील ग्रंथ संग्रहाबाबत समाधानी आहेत काय हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन केले होते. सदर प्रश्नात होय, नाही व सांगता येत नाही असा पर्याय देण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.३०.**
**ग्रंथ संग्रहाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक प्रतिसाद | ३८१ | ३२७ | ७३ | **७८१** |
| | शेकडा प्रमाण | ४९% | ४२% | ०९% | **१००%** |

**आलेख क्र. ५.२७.**
**ग्रंथ संग्रहाबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख**




ग्रंथ संग्रहाबाबत एकूण ४९% (३८१) प्राध्यापक वाचक समाधानी असून ४२% (३२७) प्राध्यापक वाचक समाधानी नाही तर ०९% (७३) प्राध्यापक वाचकांनी सांगता येत नाही असे मत नोंदविले.

प्र.९ वा. ग्रंथालयीन पुढील सेवांबाबत अभिप्राय नोंदवा.

ग्रंथालयातील सेवांबाबत अभिप्राय जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला **पारंपरिक सेवांमध्ये** १. देवघेव सेवा, २. संदर्भ सेवा, ३. वाचनसाहित्याची सूची सेवा, ४. वर्तमानपत्रे कात्रण सेवा, ५. बहिःशाल सेवा **आधुनिक सेवांमध्ये** ६. प्रचलित जागरुकता सेवा, ७. निवडक माहितीचे प्रसारण सेवा, ८. वाचकांना निर्देशन सेवा, ९. प्रतिलिपी सेवा, १०. सार

सेवा **संगणक सेवांमध्ये** ११. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा १२. ओपेक सेवा, १३. ऑन लाईन डेटाबेस सेवा, १४. ऑफ लाईन डेटाबेस सेवा, १५. प्रलेख प्रदान सेवा. इ. सेवांचा समावेश करण्यात आला होता. त्या सेवा कशा वाटतात हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक सेवांमध्ये समाधानकारक, असमाधानकारक व सांगता येत नाही ह्या पर्यायांच्या आधारे अभिप्राय जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला. सदर प्रश्नास खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला.

**तक्ता क्र. ५.३१.**

**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.** (समाधानकारक, पर्यांयां नुसार)

| क्र. | तपशिल | **समाधानकारक** | | असमाधानकारक | | सांगता येत नाही | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| | **पारंपरिक सेवा** | | | | | | | | |
| १. | देवघेव सेवा | ६९३ | **८९%** | ६७ | ०९% | २१ | ०३% | ७८१ | १००% |
| २. | संदर्भ सेवा | ६२४ | **८०%** | १२७ | १६% | ३० | ०४% | ७८१ | १००% |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा | ४६७ | **६०%** | २५१ | ३२% | ६३ | ०८% | ७८१ | १००% |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा | ४४२ | **५७%** | २६२ | ३४% | ७७ | १०% | ७८१ | १००% |
| ५. | बहिःशाल सेवा | २७३ | **३५%** | ३५२ | ४५% | १५६ | २०% | ७८१ | १००% |
| | **सरासरी** | **५००** | **६४%** | **२१२** | **२७%** | **६९** | **०९%** | **७८१** | **१००%** |
| | **आधुनिक सेवा** | | | | | | | | |
| ६. | प्रचलित जागरुकता सेवा | २९५ | **३८%** | ३४२ | ४४% | १४४ | १८% | ७८१ | १००% |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा | २६१ | **३३%** | ४०२ | ५१% | ११८ | १५% | ७८१ | १००% |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा | ३८४ | **४९%** | ३२२ | ४१% | ७५ | १०% | ७८१ | १००% |
| ९. | प्रतिलिपी सेवा | २९४ | **३८%** | ३८७ | ५०% | १०० | १३% | ७८१ | १००% |
| १०. | सार सेवा | २५८ | **३३%** | ४१२ | ५३% | १११ | १४% | ७८१ | १००% |
| | **सरासरी** | **२९८** | **३८%** | **३७३** | **४८%** | **११०** | **१४%** | **७८१** | **१००%** |
| | **संगणक सेवा** | | | | | | | | |
| ११. | इंटरनेट, ई मेल, ब्राऊझिंग सेवा | ४७५ | **६१%** | २५६ | ३३% | ५० | ०६% | ७८१ | १००% |
| १२. | ओपेक सेवा | ३५१ | **४५%** | ३०१ | ३९% | १२९ | १७% | ७८१ | १००% |
| १३. | ऑन लाईन डेटाबेस सेवा | ३३९ | **४३%** | ३६१ | ४६% | ८१ | १०% | ७८१ | १००% |
| १४. | ऑफलाईन डेटाबेस सेवा | २८६ | **३७%** | ४०३ | ५२% | ९२ | १२% | ७८१ | १००% |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा | १७२ | **२२%** | ४५४ | ५८% | १५५ | २०% | ७८१ | १००% |
| | **सरासरी** | **३२५** | **४१%** | **३५५** | **४६%** | **१०१** | **१३%** | **७८१** | **१००%** |

ग्रंथालयीन सेवांबाबत प्राप्त सर्वेक्षणात ग्रंथालयीन सेवांना मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **समाधानकारक** या पर्यायानुसार **उतरत्या क्रमाने** केलेली आहे.

**पारंपरिक सेवा :**

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, १. देवघेव सेवेबाबत (Lending) ८९% (६९३), २. संदर्भ सेवेबाबत (Reference) ८०% (६२४) ) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ६४% (५००) पेक्षा जास्त असून, ३. वाचनसाहित्य सूची सेवेबाबत (Bibliographical Services) ६०% (४६७), ४. वर्तमानपत्रे कात्रण सेवेबाबत (Newspaper clippings Services) ५७% (४४२) ५. बहिःशाल सेवेबाबत (Extensive Services) ३५% (२७३) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ६४% (५००) पेक्षा कमी आहे. ग्रंथालयांनी वरील सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा ह्या अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आधुनिक सेवा :**


निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ६. वाचकांना निर्देशन सेवेबाबत (Indexing Services) ४९% (३८४), ७. प्रचलित जागरुकता सेवेबाबत (C.A. Services) ३८% (२९५), ८. प्रतिलिपी सेवेबाबत (Indexing Services) ३८% (२९४) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३८% (२९८) पेक्षा जास्त असून, ९. निवडक माहितीचे प्रसारण सेवेबाबत (S.D.I. Services) ३३% (२६१), १०. सार सेवेबाबत (Abstacting Services) ३३% (२५८) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३८% (२९८) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**संगणक सेवा :**

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ११. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवेबाबत (Online Search) ६१% (४७५), १२. ओपेक सेवेबाबत (OPAC Search) ४५% (३५१), १३. ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search) ४३% (३३९), ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ४१% (३२५) पेक्षा जास्त असून, १४. ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search) ३७% (२८६), १५. प्रलेख प्रदान

सेवेबाबत (DDS) २२% (१७२) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ४१% (३२५) पेक्षा कमी आहेत. ग्रंथालयांनी प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.२८.**
**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र.१० वा. आपणास ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना काही अडचणी येतात काय?


ग्रंथालयाच्या सेवा मिळवितांना प्राध्यापक वाचकांना काही अडचणी येतात काय ह्या बाबत माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला. ह्यात होय किंवा नाही ह्या पर्यायास पूढील प्रतिसाद मिळविला.

**तक्ता क्र. ५.३२.**
**ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ४३८ | ३३८ | ०५ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ५६% | ४३% | ०१% | **१००%** |

५६% (४३८) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येतात आणि ४३% (३३८) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत नाहीत तर ०१% (०५) प्राध्यापक वाचकांनी तटस्थ म्हणून मत नोंदवीले.

**आलेख क्र. ५.२९.**
**ग्रंथालयाच्या सेवांबाबत अडचणी दर्शविणारा आलेख.**




प्र.११ वा. पूरक वाचन करण्यासाठी आपण वर्गात विद्यार्थ्यांना सूचना करता का?


ग्रंथालयातील पूरक वाचन करण्यासाठी प्राध्यापक वाचक विद्यार्थ्यांना सूचना करतात किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. ह्यात होय किंवा नाही हा पर्याय सूचविण्यात आला होता. उत्तर होय असल्यास कोणत्या प्रकारच्या वाचनसाहित्यासाठी शिफारस करतात ते जाणून घेण्यासाठी एकूण ७ पर्याय देण्यात आले होते त्यात १. इंटरनेटवरील माहिती, २. प्रिंटेड पुस्तके, ३. प्रिंटेड नियतकालिके, ४. ई–बुक्स, ५. ई–जर्नल्स, ६. वर्तमानपत्रे, ७. इतर त्यास पूढील प्रतिसाद मिळविला.

**तक्ता क्र. ५.३३.**
**पूरक वाचन करण्यासाठी दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ७६७ | १४ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ९८% | ०२% | **१००%** |

९८% (७६७) प्राध्यापक वाचकांना विद्यार्थ्यांना वर्गात पूरक वाचन करण्यास सूचना करतात तर तर ०२% (१४) प्राध्यापक वाचक पूरक वाचन करण्यास सूचना करीत नाहीत.

**आलेख क्र. ५.३०.**
**पूरक वाचन करण्यासाठी दर्शविणारा आलेख.**



होय या उत्तरास ९८% (७६७) प्रतिसाद मिळाला असून त्यांच्या उपप्रश्नास विचारलेल्या पर्यायास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.३४.**


**वाचन साहित्याच्या शिफारस प्रकारानुसार प्राप्त प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | इंटरनेटवरील माहिती | ५४७ | २०% |
| २. | प्रिंटेड पुस्तके | ५६६ | २१% |
| ३. | प्रिंटेड नियतकालिके | ३६९ | १४% |
| ४. | ई–बुक्स, | २९९ | ११% |
| ५. | ई–जर्नल्स | ३४९ | १३% |
| ६. | वर्तमानपत्रे | ५२१ | १९% |
| ७. | इतर | ६२ | ०२% |
| | **एकूण** | **२७१३** | **100%** |

वाचन साहित्याबाबत प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे – १. प्रिंटेड पुस्तकांबाबत २१% (५६६), २. इंटरनेटवरील माहितीबाबत २०% (५४७), ३. वर्तमानपत्रांबाबत १९% (५२१), ४. प्रिंटेड नियतकालिकांबाबत १४% (३६९), ५. ई–जर्नल्सबाबत १३% (३४९), ६. ई–बुक्सबाबत ११% (२९९), ७. इतर ह्या पर्यायास ०२% (६२) प्रतिसाद नोंदविला गेला होता. ह्या मध्ये प्राध्यापक वाचकांनी शब्दकोष, संदर्भकोष, संस्कृतीकोष, सांख्यिकीय माहिती पुस्तिका, प्रकल्पाधारित साहित्य, संदर्भ ग्रंथ, Annual Reports इ. वाचन साहित्य सूचविले.

**आलेख क्र. ५.३१.**

**वाचन साहित्याच्या शिफारस प्रकारानुसार प्राप्त प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**



प्र. १२वा. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग करता?

प्राध्यापक वाचक आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी ग्रंथालयातील कोणत्या साधनांचा वापर करतात ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास एकूण ७ पर्याय देण्यात आले होते. त्यामध्ये अ. इंटरनेटवरील माहिती, ब. प्रिंटेड पुस्तके, क़. प्रिंटेड नियतकालिके, ड. ई–बुक्स, ई. ई–जर्नल्स, फ. वर्तमानपत्रे, ग. इतर असे पर्याय होते. सर्वात महत्वाच्या साधनास प्राधान्य क्रमांक १ देण्यास सांगितला होता व उर्वरित साधनांस त्याच्या महत्त्वानुसार २,३,४ या क्रमाने क्रम द्यावयास सांगितला होता.

**तक्ता क्र. ५.३५.**
**प्राध्यापक वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांचा उपयोग दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्राधान्यक्रम | | | | | | | प्राध्यापक प्रतिसाद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **०१/ %** | **०२/ %** | **०३/ %** | **०४/ %** | **०५/ %** | **०६/ %** | **०७/ %** | |
| १. | इंटरनेटवरील माहिती | २४७ | १५९ | १५७ | ११८ | ६० | ३९ | ०१ | ७८१ |
| | | **३२%** | **२०%** | **२०%** | **१५%** | **०८%** | **०५%** | **००%** | **१००%** |
| २. | प्रिंटेड पुस्तके, | २६८ | १९२ | १४६ | ६५ | ५२ | ५८ | ०० | ७८१ |
| | | **३४%** | **२५%** | **१९%** | **०८%** | **०७%** | **०७%** | **००%** | **१००%** |
| ३. | प्रिंटेड नियतकालिके | ७५ | १३३ | १६१ | १६८ | १३६ | १०४ | ०४ | ७८१ |
| | | **१०%** | **१७%** | **२१%** | **२२%** | **१७%** | **१३%** | **०१%** | **१००%** |
| ४. | ई–बुक्स | ४४ | १३१ | १०८ | १६६ | १९० | १३५ | ०७ | ७८१ |
| | | **०६%** | **१७%** | **१४%** | **२१%** | **२४%** | **१७%** | **०१%** | **१००%** |
| ५. | ई–जर्नल्स | ५४ | ५६ | १०३ | १२४ | २२७ | २१४ | ०३ | ७८१ |
| | | **०७%** | **०७%** | **१३%** | **१६%** | **२९%** | **२७%** | **००%** | **१००%** |
| ६. | वर्तमानपत्रे | ८९ | १०८ | १०८ | १३६ | ११० | २२६ | ०४ | ७८१ |
| | | **११%** | **१४%** | **१४%** | **१७%** | **१४%** | **२९%** | **०१%** | **१००%** |
| ७. | इतर | ०२ | ०२ | ०२ | ०५ | १० | ०५ | १० | ३६ |
| | | **०६%** | **०६%** | **०६%** | **१४%** | **२८%** | **१४%** | **२८%** | **१००%** |

वाचन साहित्य निहाय साधनांची वर्गवारी खालीलप्रमाणे लक्षात येते,

O-01. **इंटरनेटवरील माहिती** : सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. ३२%(२४७) वाचक **०१ला** प्राधान्य क्रम देतात, ०२. २०%(१५९) वाचक **०२ला** प्राधान्य देतात, ०३.

२०%(१५७) वाचक **०३रा** प्राधान्य देतात, ०४. १५%(११८) वाचक **०४ला** प्राधान्य देतात, ०५. ०८% (६०) वाचक **०५ला** प्राधान्य देतात, ०६. ०५% (३९) वाचक **०६ला** प्राधान्य देतात तर ०७. ००% (०१) वाचक **०७ला** प्राधान्यक्रम देतात.

O-2. **प्रिंटेड पुस्तके :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. ३४%(२६८) वाचक **०१ला** प्राधान्य क्रम देतात, ०२. २५%(१९२) वाचक **०२ला** प्राधान्य देतात, ०३. १९%(१४६) वाचक **०३ला** प्राधान्य देतात, ०४. ०८% (६५) वाचक **०४था** प्राधान्य देतात, ०५. ०७%(५८) वाचक **०५वा** प्राधान्य देतात, ०६. ०५% (५२) वाचक **०६वा** प्राधान्य देतात, ०७. ००% (०४) वाचक **०७ला** प्राधान्यक्रम देतात.

O-03. **प्रिंटेड नियतकालिके :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. २२%(१६८) वाचक **०४ला** प्राधान्य क्रम देतात, ०२. २१%(१६१) वाचक **०३ला** प्राधान्य देतात, ०३. १७%(१३६) वाचक **०५ला** प्राधान्य देतात, ०४. १७% (१३३) वाचक **०२ला** प्राधान्य देतात, ०५. १३%(१०४) वाचक **०६ला** प्राधान्य देतात, ०६. १०% (७५) वाचक **०१ला** प्राधान्य देतात, ०७. ०१% (०४) वाचक **०७ला** प्राधान्यक्रम देतात.

O-04. **ई–बुक्स :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. २४%(१९०) वाचक **०५ला** प्राधान्य क्रम देतात, ०२. २१%(१६६) वाचक **०४ला** प्राधान्य देतात, ०३. १७%(१३५) वाचक **०६ला** प्राधान्य देतात, ०४. १७% (१३१) वाचक **०२ला** प्राधान्य देतात ०५. १४%(१०८) वाचक **०३रा** प्राधान्य देतात, ०६. ०६% (४४) वाचक **०१ला** प्राधान्य देतात आणि ०७. ०१% (०७) वाचक **०७वा** प्राधान्य देतात.

O-05. **ई–जर्नल्स :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. २९%(२२७) वाचक **०५वा** प्राधान्य क्रम देतात, ०२. २७%(२१४) वाचक **०६वा** प्राधान्य देतात, ०३. १६%(१२४) वाचक


**0४ला** प्राधान्य देतात, ०४. १३% (१०३) वाचक **0३ला** प्राधान्य देतात, ०५. ०७%(५६) वाचक **0२ला** प्राधान्य देतात , ०६. ०७%(५४) वाचक **0१ला** प्राधान्य देतात, ०७. ००% (०३) वाचक **0७ला** प्राधान्य देतात.

O-06. **वर्तमानपत्रे :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. २९%(२२६) वाचक **0६ला** प्राधान्य क्रम देतात, ०२. १७%(१३६) वाचक **0४था** प्राधान्य देतात, ०३. १४%(११०) वाचक अनुक्रमे **0५वा,** प्राधान्य देतात, ०४. १४%(१०८) वाचक अनुक्रमे **0२रा, व 0३रा** प्राधान्य देतात ०५. ११% (८९) वाचक **0१ला** प्राधान्य देतात, ०६. ०१%(०४) वाचक **0७वा** प्राधान्य देतात.

O-07. **इतर :** सदर साधनास प्राध्यापक वाचकांनी दिलेल्या प्राधान्य क्रमानुसार टक्केवारी स्वरुपात मांडणी पुढीलप्रमाणे ०१. २८%(१०) वाचक अनुक्रमे **0५वा व 0७वा** प्राधान्य क्रम देतात, ०२. १४%(०५) वाचक अनुक्रमे **0४था व 0६वा** प्राधान्य देतात, ०३. ०६%(०२) वाचक अनुक्रमे **0१ला, 0२रा व 0३रा** प्राधान्य देतात.

**आलेख क्र. ५.३२.**

**प्राध्यापक वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांचा उपयोग दर्शविणारा आलेख.**



प्र. १३वा. ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय?

ग्रंथालयामधील भौतिक सुविधेबाबतचे मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास दोन पर्याय देण्यात आले होते. १. होय, २. नाही.

**तक्ता क्र. ५.३६.**


**ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | तटस्थ | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक प्रतिसाद | ३४६ | ४३० | ०५ | **७८१** |
| २. | शेकडा प्रमाण | ४४% | ५५% | ०१% | **१००%** |

४४% (३४६) प्राध्यापक वाचक ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत समाधानी असून ५५% (४३०) प्राध्यापक वाचक ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत समाधानी नसून ०१% (०५) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत तटस्थ असल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.३३.**

**ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा आलेख.**




प्र. १४वा. ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा?

ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबद्दल प्राध्यापक वाचकांना काय वाटते हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून सदर प्रश्नात एकूण १४ मुद्यांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्यात आला. त्यामध्ये १. ग्रंथालयाची जागा, २. ग्रंथालयीन स्वच्छता, ३. फर्निचर – खुर्च्या, ४. फर्निचर – टेबलांबाबत, ५. फर्निचर – फूटरेस्टस, ६.

प्रकाश योजना, ७. स्वछता गृह, ८. पिण्याचे पाण्याबाबत, ९. वाचनकक्षाच्या क्षमता, १०. आवाज / ग्रंथालयाची शांतता, ११. खेळत्या हवेबाबत, १२. फ्लोरींगबाबत, १३. अंतर्गत मांडणीबाबत, १४. सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत तसेच प्रत्येक मुद्यांमध्ये अत्यंत समाधानकारक, समाधानकारक, सांगता येत नाही, असमाधानकारक, अत्यंत समाधानकारक पर्यायांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

**तक्ता क्र. ५.३७.**
**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**


| क्र. | तपशिल | **अत्यंत समाधानकारक** | | समाधानकारक | | सांगता येत नाही | | असमाधानकारक | | अत्यंत असमाधानकारक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण | प्राध्यापक प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | ग्रंथालयाची जागा | २२४ | **२९%** | ३२८ | ४२% | ४० | ०५% | १७९ | २३% | १० | ०१% |
| २. | ग्रंथालयीन स्वच्छता | २६१ | **३३%** | ३९० | ५०% | ५५ | ०७% | ७२ | ०९% | ०३ | ००% |
| ३. | फर्निचर – खुर्च्या | २३५ | **३०%** | ३५८ | ४६% | ५२ | ०७% | १२६ | १६% | १० | ०१% |
| ४. | फर्निचर – टेबल | २३७ | **३०%** | ३६९ | ४७% | ४८ | ०६% | ११४ | १५% | १३ | ०२% |
| ५. | फर्निचर – फूटरेस्टस | १८२ | **२३%** | ३२७ | ४२% | १०७ | १४% | १४४ | १८% | २१ | ०३% |
| ६. | प्रकाश योजना | २८० | **३६%** | ३८३ | ४९% | ४० | ०५% | ६२ | ०८% | १६ | ०२% |
| ७. | स्वछता गृह | १४५ | **१९%** | २५५ | ३३% | ११० | १४% | १९० | २४% | ८१ | १०% |
| ८. | पिण्याचे पाणी | १३२ | **१७%** | २४२ | ३१% | ११४ | १५% | २१८ | २८% | ७५ | १०% |
| ९. | वाचनकक्षाच्या क्षमता | १४३ | **१८%** | ३२४ | ४१% | ६० | ०८% | २१४ | २७% | ४० | ०५% |
| १०. | आवाज/ ग्रंथालयीन शांतता | २३१ | **३०%** | ३२४ | ४१% | ४३ | ०६% | १३८ | १८% | ४५ | ०६% |
| ११. | खेळती हवा | ३०५ | **३९%** | ३४२ | ४४% | ६० | ०८% | ५६ | ०७% | १८ | ०२% |
| १२. | फ्लोरींग | २१२ | **२७%** | ४११ | ५३% | ७७ | १०% | ७१ | ०९% | १० | ०१% |
| १३. | अंतर्गत मांडणी | २३४ | **३०%** | ३८४ | ४९% | ६९ | ०९% | ७२ | ०९% | २२ | ०३% |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | १९१ | **२४%** | ४०७ | ५२% | ७१ | ०९% | ८४ | ११% | २८ | ०४% |
| | **सरासरी** | **२१५** | **२८%** | **३४६** | **४४%** | **६८** | **०९%** | **१२४** | **१६%** | **२८** | **०४%** |

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **अत्यंत समाधानकारक** या पर्यायानुसार **उतरत्या क्रमाने** केलेली आहे.

१. खेळत्या हवेबाबत ३९% (३०५), २. प्रकाश योजनाबाबत ३६% (२८०), ३. ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत ३३% (२६१), ४. फर्निचर – टेबलांबाबत ३०% (२३७), ५. फर्निचर – खुर्च्याबाबत ३०% (२३५), ६. अंतर्गत मांडणीबाबत ३०% (२३४),

७. आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत ३०% (२३१), ८. ग्रंथालयाच्या जागेबाबत २९% (२२४), ह्या भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २८% (२१५) पेक्षा जास्त आहे. ग्रंथालयांनी वरील भौतिक सुविधा दर्जेदार देणे आवश्यक आहे तर ९. फ्लोरींगबाबत २७%. (२१२), १०. सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत २४% (१९१), ११. फर्निचर – फूटरेस्टसबाबत २३% (१८२), १२. स्वछता गृहाबाबत १९% (१४५), १३. वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत १८% (१४३), १४. पिण्याचे पाण्याबाबत १७% (१३२), ह्या सेवांची भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २८% (२१५) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सदर भौतिक सुविधा अधिक प्रभावी देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.३४**
**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र.१५वा. ग्रंथालयात कोणत्या उणीवा/दोष जाणवतात ते सांगा?

प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयात कोणत्या उणीवा/दोष जाणवतात ते व्यक्त करण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ५.३८.**
**प्राध्यापक वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात उणीवा/दोष दर्शविणारा तक्ता.**

| **अ. क्र.** | **प्रतिसाद** | **उणीवा/दोष** |
|---|---|---|
| ०१. | ४८% | पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे. |
| ०२. | ३५% | स्वच्छता गृहात स्वच्छता व सुधारणा करणे. |
| ०३. | ३२% | इंटरनेटचा वेग फार मंद गतीने जाणवतो तो वाढविण्यासाठी शक्य तो प्रयत्न करणे. |
| ०४. | २५% | संगणक संख्या वाढविणे. |
| ०५. | २२% | संदर्भ ग्रंथांची संख्या वाढविणे. |
| ०६. | ३०% | संगणक सेवा बऱ्याच वेळा बंद असतात. |
| ०७. | ३०% | स्वतंत्र, सूसज्ज आणि अधिक क्षमता असलेली वाचनकक्षाची आवश्यकता |
| ०८. | २१% | तटस्थ राहून आपले मत व्यक्त केले नाही. |

प्र. १६वा. ग्रंथालयात कोणत्या सुधारणा व्हाव्यात असे वाटते? आपले मत नोंदवा?

ग्रंथालयात प्राध्यापक वाचकांच्या मते कोणत्या सुधारणा होणे अत्यंत गरजेचे वाटते ह्या बाबत मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ५.३९.**
**प्राध्यापक वाचकांच्या दृष्टीने ग्रंथालयात आवश्यक सुधारणा दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | प्रतिसाद | उणीवा/दोष |
|---|---|---|
| ०१. | २९% | ई–बुक्स संख्या वाढवावीत व ते वापरण्याबाबत जागरुकता वाढविणे. |
| ०२. | २८% | ग्रंथालयात शांतता असावी. |
| ०३. | २६% | जागेची कमतरता जाणवते. |
| ०४. | २३% | ग्रंथालय संपूर्ण संगणकीकरण केलेले असावेत. |
| ०५. | २१% | तटस्थ राहून आपले मत व्यक्त केले नाही. |
| ०६. | २०% | क्रमिक ग्रंथात वेगवेगळ्या लेखकांचे ग्रंथ असावेत. |
| ०७. | २०% | आंतरराष्ट्रीय दर्जाची नियतकालीकांची संख्या वाढवावीत. |
| ०८. | २०% | प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावीत. |
| ०९. | २०% | इंटनेटची सुविधा, Computer Printouts, प्रतिलिपी सेवा देणे आवश्यक आहे. |
| १०. | २०% | नियतकालीकांची संख्या वाढविणे. |
| ११. | १९% | नव्याने दाखल होणाऱ्या वाचनसाहित्य वाचकांपर्यंत पोहचण्यासाठी वेळोवेळी कार्यक्रम राबविणे |
| १२. | १८% | ई–लर्निंगसाठी सुविधा उपलब्ध करुन देणे |

| | | |
|---|---|---|
| १३. | १६% | ग्रंथालयीन सेवा दर्जेदार असाव्यात व त्यात नवनवीन कल्पनांचा वापर करुन त्या वाचकापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. |
| १४. | १४% | ऑन लाईन सेवा अद्यावत असाव्यात. |
| १५. | १४% | सूचना व मार्गदर्शक फलक सुसज्ञ व प्रभावी असावेत. |
| १६. | १३% | ग्रंथालयातील वातावरण आल्हाददायक असावे. |
| १७. | ११% | ग्रंथालयीन कर्मचारी सहकार्य करीत नाहीत. |
| १८. | ११% | आवश्यक नसलेल्या ग्रंथ रद्दबादल करावेत जेणेकरुन नवीन येणाऱ्या वाचनसाहित्यास जागा उपलब्ध होईल. |
| १९. | ११% | OPAC सेवा दर्जेदार असावी तसेच मोबाईल आज्ञावली व्दारे त्याचे संचलन होणे काळाची गरज वाटते. |
| २०. | ०९% | वाचनसाहित्य मिळण्यास वेळ लागतो. |
| २१. | ०८% | प्राध्यापक ग्रंथ नोंदणी रजिस्टर अद्यायावत नसते किंबहुना त्यात ताळमेळ सुधारणे गरजेचे आहे. |
| २२. | ०८% | वाचनसाहित्याची मांडणी विभागनिहाय करणे गरजेचे आहे. |
| २३. | ०५% | वायफाय कनेकश्न दिल्यास भ्रमणध्वनी मार्फत ग्रंथालयीन आज्ञावलीचा (Apps) वापर करणे शक्य होऊ शकतो. |
| २४. | ०४% | कचरापेटीची दुर्गंधी कमी करावी. |
| २५. | ०४% | ग्रंथालयीन कर्मचारी कमी जाणवतात. |

# प्रश्नावली : ग्रंथपालांसाठी
# माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण

## ५.५ विश्लेषण व सादरीकरण प्रश्नावली : ग्रंथपालांसाठी

प्रस्तुत संशोधनासाठी अभिप्रेत असलेली माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित केली असून संशोधनात येत असलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली संकलित केल्या आहेत. ग्रंथालयीन भेटीमधून ग्रंथपालांशी वैयक्तिक व प्रत्यक्ष चर्चा करुन परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधकाने केला आहे.

ठाणे व पालघर जिल्हायात एकूण ३९ वरिष्ठ महाविद्यालये असून संशोधकाने या सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथपालांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रश्नावली भरुन घेतल्या. त्यापैकी ९७% (३८) ग्रंथपालांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला असून ०३% (०१) महाविद्यालयांनी सदर प्रश्नावलीस प्रतिसाद दिला नसून त्या महाविद्यालयाचे पूर्ण नाव, स्थापना वर्ष, नॅक मूल्यांकन वर्ष इ. माहिती तक्ता क्र. ५.३६ मध्ये नमूद केली आहे. माहितीचे विश्लेषण करणे सोयीस्कर व्हावे म्हणून तालुकानिहाय माहाविद्यालयाची माहिती नमूद करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ५.४०.**

**महाविद्यालय पूर्ण नाव, स्थापना वर्ष, नॅक मूल्यांकन श्रेणी माहिती दर्शविणारा तालुकानिहाय तक्ता.**

| अ. क्र. | तालुका | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | स्थापना वर्ष | नॅक श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर | Principal, R. K. Talreja College of Arts, Science and Commerce<br>Opp. A-1, Sweets Shop, Shivaji Chowk, Ulhasnagar-3, Dist. Thane, Pincode : 421003 | १९६१ | ब+ |
| २ | भिवंडी | Principal, Bhiwandi Nizampur Nagarpalika Arts, Science & Commerce College<br>Dhamankar Naka, Varaldevi Road, Vidyashram, Kamatghar, Tal. Bhiwandi, Dist. Thane<br>Pincode : 421305 | १९६६ | ब+ |
| ३ | ठाणे | Principal, B. N. Bandodkar College of Science<br>'Jnanadweep' Chendani, Thane (W)<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |
| ४ | ठाणे | Principal, Joshi Bedekar College of Arts & Commerce<br>Chendani Bunder Road, Creek Land, Near CIDCO Bus Stop, Thane (W)<br>Pincode : 400601 | १९६९ | अ |
| ५ | पालघर | Principal, Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar (W) Tal. & Dist. Palghar,<br>Pincode : 401404 | १९७० | ब |


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | वसई | Principal, A. V. College of Arts, K. M. College of Commerce & E.S.A. College of Science.<br>Navghar, Vasai Road (W), Dist. Palghar,<br>Pincode : 401202 | १९७१ | ब+ |
| ७ | कल्याण | Principal, Birla College of Arts, Science & Commerce<br>Birla College Road, Kalyan (W) Dist. Thane,<br>Pincode: 421304 | १९७२ | अ |
| ८ | ठाणे | Principal, Motilal Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce<br>Amalendu Roye Marg, Sector 9 A, Plot No. 53, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane,<br>Pincode 400703 | १९७८ | ब++ |
| ९ | कल्याण | Principal, Dombivli Shikshan Prasarak Mandal's K. V. Pendharkar College of Arts, Science & Commerce.<br>Plot No. SPL-4, Opp. MIDC Office, Dombivli (E) Tal. Kalyan Dist. Thane, Pincode : 421203 | १९७९ | ब |
| १० | ठाणे | Principal, Rayat Shikshan Sanstha's Karmveer Bhaurao Patil College,<br>Sector - 15 A, Vashi, Navi Mumbai, Dist. Thane,<br>Pincode 400703 | १९७९ | अ |
| ११ | ठाणे | Principal, Dnyanasadhana College of Arts, Commerce & Science<br>Off. Eastern Express Highway, Dnyanasadhana Marg, Near Eternity Mall, Dist. Thane<br>Pincode : 400604 | १९८० | ब |
| १२ | डहाणू | Principal, Sau. Sitabai Ramkrushna Karandikar Senior College of Commerce & Late Mehernosh Boman Burjor Irani College of Arts & BSES Junior College of Science.<br>At. Vadkun, Post. Dahanu Road,<br>Dist. Palghar, Pincode : 401602 | १९८१ | ब+ |
| १३ | वाडा | Principal, Shikshak Sanchalit Shikshan Sanstha's Arts, Commerce, & Science College.<br>Wada, Dist. Palghar, Pincode : 421303 | १९८२ | ब |
| १४ | जव्हार | Principal, Gokhale Education Society's Arts, Commerce & Science College<br>Jawhar, Dist. Palghar, Pincode : 401603 | १९८३ | ब |
| १५ | शहापूर | Principal, Sonubhau Baswant College of Arts & Commerce,<br>N. P. Vasa Marg, Savroli Road, Shahapur, Dist. Thane, Pincode : 421601 | १९८४ | ब |
| १६ | वसई | Principal, Gonsalo Garcia College of Arts & Commerce<br>Behind Vasai Cricket Ground, Near Vasai S.T. Depo., Tal. Vasai, Dist. Palghar,<br>Pincode : 401201. | १९८४ | ब+ |
| १७ | मोखाडा | Principal, Rayat Shikshan Sanstha's Arts, Science & Commerce College.<br>Mokhada, Tal. Mokhada, Dist. Palghar, | १९८४ | ब |
| १८ | उल्हासनगर | Principal, P. D. Karkhanis College of Arts & Commerce<br>Near Bhausaheb Paranjpe High School, Kansai Section, Ambarnath (E) Dist. Thane,<br>Pincode : 421501 | १९८६ | ब |
| १९ | डहाणू | Principal, P. L. Shroff College of Arts & Commerce<br>At Post Chinchani, Tal. Dahanu, Dist. Palghar,<br>Pincode : 401503 | १९८६ | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | कल्याण | Principal, Model College<br>P-32, Residential Area, M.I.D.C. Dombivli (E),<br>Tal. Kalyan, Dist. Thane,<br>Pincode : 400703 | १९८९ | अ |
| २१ | भिवंडी | Principal, G. M. Momin Women's College,<br>Rais High School Campus, Thane Road, Bhiwandi,<br>Dist. Thane, Pincode : 421302 | १९८९ | अ |
| २२ | मूरबाड | Principal, J.S.M's Arts, Commerce & Science College<br>At. Gandhi Camp, Shivle, Post Shivle, Tal. Murbad,<br>Dist. Thane Pincode : 421401 | १९८९ | ब |
| २३ | ठाणे | Principal, N.K.T. College of Commerce and Arts<br>Near C.K.P. Hall, Behind Collector Office, Kharkar Ali, Thane (W), Dist. Thane,<br>Pincode : 400601 | १९९० | ब |
| २४ | बदलापूर | Principal, Bharat College of Commerce<br>Hendrepada, Kulgaon, Badlapur (W), Dist. Thane,<br>Pincode : 421503 | १९९१ | ब+ |
| २५ | वसई | Principal, Shankar Narayan College of Arts & Commerce.<br>Navghar, Mahavidyalaya Marg, Bhayander (E),<br>Dist. : Palghar,<br>Pincode : 401105 | १९९४ | ब+ |
| २६ | उल्हासनगर | Principal, J. Watumull Sadhubella Girls College,<br>Near Govt. Dispensary, Ulhasnagar, Dist. Thane,<br>Pincode: 421001 | १९९४ | क++ |
| २७ | डहाणू | Principal, N. B. Mehta (Valwada) Science College<br>Acharya Bhise Vidyanagar, Bordi,<br>Tal. Dahanu, Dist. Palghar,<br>Pincode : 401701 | १९९४ | ब |
| २८ | तलासरी | Principal, Comrade Godavari Shamrao Parulekar College of Arts, Commerce & Science.<br>At & Post. : Talasari, Tal. Talasari,<br>Dist. Palghar, Pincode : 401606 | १९९४ | ब |
| २९ | कल्याण | Principal, K. M. Agrawal College of Arts, Commerce & Science<br>Padgha Road, Gandhare, Kalyan (W), Dist. Thane,<br>Pincode : 421301 | १९९४ | अ |
| ३० | बदलापूर | Principal, Adarsh College of Arts & Commerce,<br>At post – Kulgaon, Near Kulgaon, Badlapur Muncipal Council Office, Tal. Badlapur ,<br>Dist. Thane<br>Pincode : 421503 | १९९५ | ब |
| ३१ | वसई | Principal, St. Joseph College of Arts & Commerce. Satpala,<br>Post : Agashi, Virar (W), Tal. Vasai, Dist. Palghar,<br>Pincode : 401301 | १९९५ | ब |
| ३२ | कल्याण | Principal, Pragati College of Arts & Commerce,<br>Datta Nagar, Pragati College Road, Dombivli (E)<br>Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode : 421201 | १९९७ | ब |
| ३३ | कल्याण | Principal, Rashtriya Shikshan Sanstha's Swami Vivekanand Night College of Arts & Commerce.<br>Chhatrapati Bhavan, Ayare Road, Dattanagar,<br>Dombivli (E), Tal. Kalyan, Dist. Thane,<br>Pincode : 421201 | १९९८ | ब |
| ३४ | ठाणे | Principal, Karnataka Sangha's Manjunath College of Commerce<br>Kanchangaon, Khambalpada, Thakurli (E), Dist. Thane, Pincode : 421201 | १९९९ | ब |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | वसई | Principal, Viva College of Arts, Commerce & Science<br>Viva College Road, Virar (W), Tal. Vasai, Dist. Palghar, Pin. 401303 | २००० | ब |
| ३६ | ठाणे | Principal, Smt. Janakibai Rama Salvi College of Arts, Commerce & Science<br>Manisha Nagar, Kalwa (W) Dist. Thane, Pincode : 400605 | २००३ | ब |
| ३७ | कल्याण | Principal, Laxman Devram Sonawane College Opp. Fire Station, Near Durgadi Kille, Murbad Road, Kalyan (W), Dist. Thane, Pincode : 421302 | २००३ | ब |
| ३८ | कल्याण | Principal, Jeevandeep Shaikshnik Sanstha Poi's Arts, Commerce & Science College<br>At. Goveli, Post : Rayate, Tal. Kalyan, Dist. Thane, Pincode 421301 | २००४ | क |

**आलेख क्र. ५.३५**

**तालुकानिहाय नॅक मानांकीत महाविद्यालयांची संख्या दर्शविणारा आलेख**




वरील आलेखानुसार असे लक्षात येते कि, दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन ठाणे व पालघर असे दोन जिल्हे तयार झाले. पूर्वी असलेल्या १५ तालुक्यांपैकी **०७ तालुके ठाणे जिल्ह्यात** येतात ते पुढीलप्रमाणे ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी, शहापूर व मूरबाड असे असून ठाणे जिल्ह्यात संशोधन प्रबंधास प्राप्त नॅक मानांकीत महाविद्यालयाची संख्या **२५** तर **०८ तालुके पालघर जिल्ह्यात** येतात त्यामध्ये पालघर, वाडा, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, आणि विक्रमगड तालुक्यांचा

समावेश होतो. पालघर जिल्ह्यात संशोधन कार्यासाठी प्राप्त नॅक मानांकीत महाविद्यालयाची संख्या **१४** आहे.

प्रश्नावलीतील उत्तराधारे प्राप्त माहितीचे विश्लेषण करताना प्रश्नाच्या गाभ्यानुसार शिर्षकांचे निर्धारण केलेले आहे. या शिर्षकाखाली प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व सादरीकरण पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र. ५.४१.**

**ग्रंथपाल प्रश्नावलीस मिळालेला प्रतिसाद**

| क्र. | तपशिल | एकूण वाटप प्रश्नावली | मिळालेला प्रतिसाद | न मिळालेला प्रतिसाद |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३९ | ३८ | ०१ |
| २. | शेकडा प्रमाण | **१००%** | **९७%** | **०३%** |

संशोधनाच्या व्याप्ती ठरविण्यासाठी लावलेल्या निकषानुसार ठाणे व पालघर जिल्हायात एकूण ३९ वरिष्ठ महाविद्यालये असून संशोधकाने या सर्व महाविद्यालयांच्या ग्रंथपालांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रश्नावली वाटल्या. त्यापैकी ९७% (३८) ग्रंथपालांनी प्रश्नावलीस प्रतिसाद दिला असून ०३% (०१) महाविद्यालयांनी सदर प्रश्नावलीस प्रतिसाद दिला नाही.

**ग्रंथपाल प्रश्नावली विश्लेषण**

सदर संशोधनात संशोधकाने माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीचा वापर केला असून त्याचे विश्लेषण हे प्रथम विचारलेला प्रश्न, त्यामागील उद्देश व त्या अनुषंगाने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण या क्रमाने केले आहे.

प्र. १ ते ५ ग्रंथालयाबाबतची समग्र माहिती त्यामध्ये ग्रंथालयाचे नांव, स्थापना वर्ष, दूरध्वनी क्रमांक, फॅक्स, ई–मेल, ग्रंथपालाचे नाव, शैक्षणिक पात्रता, सेवेतील कार्यकाल इ. जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आले होते.

संशोधकास आपल्या संशोधन कार्यासाठी महाविद्यालयांची / ग्रंथालयांची नावे व स्थापना कारकीर्द किती वर्षाची आहे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.


**तक्ता क्र. ५.४२.**

**ग्रंथालयाची स्थापना वर्ष दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | स्थापना वर्ष | ग्रंथालयांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सन १९६१ ते १९७० | ०५ | १३% |
| २. | सन १९७१ ते १९८० | ०६ | १६% |
| ३. | सन १९८१ ते १९९० | १२ | ३२% |
| ४. | सन १९९१ ते २००० | १२ | ३२% |
| ५ | सन २००१ ते २०१० | ०३ | ०८% |
| | एकूण | ३८ | १००% |

**आलेख क्र.५.३६**

**ग्रंथालयाची स्थापना वर्ष दर्शविणारा आलेख.**




वरील आलेखावरुन असे लक्षात येते की, अनुक्रमे सन १९८१ ते १९९० व सन १९९१ ते २००० या कालावधीत ३२% (१२) ग्रंथालयांची स्थापना झाली असून सन १९७१ ते १९८० च्या कालावधीत १६% (०६) ग्रंथालयांची तर सन १९६१ ते १९७० च्या कालावधीत १३% (०५) ग्रंथालयांची आणि सन २००१ ते २०१० ह्या कालावधीत ०८% (०३) ग्रंथालयांची स्थापना झाल्याचे निदर्शनास येते.

प्र.०६ला. शासनाच्या ग्रंथालयीन आकृतीबंधानुसार आपल्या ग्रंथालयात कर्मचारी नियुक्ती झाली आहे काय?

सदर प्रश्नाच्या माध्यमातून ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती शासनाच्या आकृतीबंधानुसार झाली आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न विचारण्यात आला होता.

**तक्ता क्र. ५.४३.**


**आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २९ | ०९ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ७६% | २४% | **१००%** |

७६% (२९) ग्रंथपालांनी आपल्या ग्रंथालयामध्ये ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती आकृतीबंधानुसार झाल्याबाबत मत नोंदविले असून २४% (०९) ग्रंथपालांनी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती आकृतीबंधानुसार नसल्याबाबत मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.३७.**

**आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती दर्शविणारा आलेख.**




प्र. ०७वा. महाराष्ट्र शासनाच्या स्टाफ फॉर्म्युल्यानुसार सेवकांची संख्या व प्रत्यक्ष उपलब्ध सेवकांची संख्या.

महाराष्ट्र शासनाच्या स्टाफ फॉर्म्युल्यानुसार सेवकांची संख्या ग्रंथालयात आहे का ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नाच्या माध्यमातून ग्रंथालयात ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, ग्रंथालय लेखनिक (लिपीक), ग्रंथालय परिचर, इतर कर्मचारी वृंद ह्याबाबत मत जाणून घेतले.


**तक्ता क्र. ५.४४.**

**आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन सेवकांची संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ग्रंथपाल | साहाय्यक ग्रंथपाल | ग्रंथालय लिपीक | ग्रंथालय परिचर | इतर कर्मचारी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३८ | ०८ | १५ | ३८ | ०८ | **१०७** |
| २. | शेकडा प्रमाण | ३६% | ०७% | १४% | ३६% | ०७% | **१००%** |

**आलेख क्र. ५.३८.**

**आकृतीबंधानुसार ग्रंथालयीन सेवकांची संख्या दर्शविणारा आलेख**




दि. २६ ऑगस्ट १९९९ च्या महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एनजीसी–२२९९/४७९५/विशी–४ च्या अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग आकृतीबंधानुसार असणे आवश्यक आहे. ३६% (३८) ग्रंथालयात ग्रंथपाल व ग्रंथालय परिचर असून १४% (१५) ग्रंथालयात ग्रंथालय लिपिक व ०७% (०८) ग्रंथालयात साहाय्यक ग्रंथपाल आणि ०७% (०८) ग्रंथालयात इतर कर्मचारी वृंद असल्याचे लक्षात येते.

प्र. ०८वा. ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय आहे का?

ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात होय किंवा नाही असा पर्याय देण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.४५.**


**ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २४ | १४ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ६३% | ३७% | **१००%** |

६३% (२४) ग्रंथपालांनी ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय असून ३७% (१४) ग्रंथपालांनी नसल्याबाबत मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.३९.**

**ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय दर्शविणारा आलेख.**




उत्तर होय असल्यास सदर प्रश्नास उपप्रश्नाच्या माध्यमातून स्वरुप विचारण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.४६.**


**ग्रंथालयीन कर्मचारी वृंदासाठी प्रशिक्षणाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यशाळांचे आयोजन | १२ | १९% |
| २. | प्रत्येक कर्मचाऱ्यास स्वतंत्र मार्गदर्शन | १९ | ३०% |
| ३. | अन्य संस्थाकडे पाठवून प्रशिक्षित करतो. | १८ | २९% |
| ४. | व्यावसायिक शिक्षणाकरीता पाठवतो. | १२ | १९% |
| ५ | इतर | ०२ | ०३% |
| | **एकूण** | **६३** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते की, प्रत्येक कर्मचाऱ्यांस स्वतंत्र मार्गदर्शन स्वरुपास ३०% (१९), अन्य संस्थाकडे पाठवून प्रशिक्षित करण्यासाठी २९% (१८), कार्यशाळांच्या आयोजनास १९% (१२) व व्यावसायिक शिक्षणाकरीता १९% (१२), तर इतर स्वरुपास ०३% (०२) प्रतिसाद मिळाला.

**आलेख क्र. ५.४०.**

**ग्रंथालयीन कर्मचारी वृंदासाठी प्रशिक्षणाचे स्वरुप दर्शविणारा आलेख**



प्र. ०९वा. ग्रंथालयाचे एका वर्षातील कामकाजाचे दिवस :

ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या वापरासाठी वर्षातून एकूण किती दिवस उघडे ठेवले जाते हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते.

सर्व ग्रंथालये ही एकाच विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येत असल्याने विद्यापीठाच्या निकषानुसार ग्रंथालयाचे जास्तीत जास्त कामकाजाचे दिवस २८० ठरवून देण्यात आले आहे.

प्र. १०वा. ग्रंथालयाचे एका दिवसातील कामकाजाचे तास.

ग्रंथालय वाचकांसाठी एका दिवसातून किती वेळ उघडे ठेवले जाते हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास प्राप्त प्रतिसादानुसार प्रत्येक ग्रंथालय आपल्या दैनंदिन वेळेत जास्तीत जास्त कालावधीसाठी वाचकांसाठी खुले असते.

प्र. ११वा. ग्रंथालयातील ग्रंथांचे वर्गीकरण कोणत्या पध्दतीने केले जाते?

ग्रंथालयात ग्रंथवर्गीकरण करणे आवश्यक असते. वर्गीकरणामुळे एका विषयातील व एका लेखकाचे ग्रंथ एकत्र येतात. ग्रंथालयात नवीन वाचनसाहित्य दाखल झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण कोणत्या पध्दतीनुसार करतात याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास दशांश DDC, व्दिबिंदू CC, यूडीसी UDC, इतर असे चार पर्याय देण्यात आले होते.


वाचन साहित्याच्या वर्गीकरण पध्दती बाबत असे निदर्शनास येते की, १००% (३८) ग्रंथालयात DDC (Dewey Decimal Classification) दशांश वर्गीकरण पध्दतीचा वापर होत आहे.

**तक्ता क्र. ५.४७.**

**वर्गीकरण आवृत्ती दर्शविणारा तक्ता**

| **क्र.** | **तपशिल** | **१८वी** | **१९वी** | **२०वी** | **२१वी** | **२२वी** | **२३वी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ०१ | १० | ०६ | ०८ | ०९ | ०४ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ०३% | २६% | १६% | २१% | २४% | ११% | **१००%** |

**आलेख क्र. ५.४१.**
**वर्गीकरण आवृत्ती दर्शविणारा आलेख**




वर्गीकरण आवृत्तीबाबत असे निर्दर्शनास येते की, १८व्या आवृत्तीचा वापर ०३% (०१) ग्रंथालये करतात, १९व्या आवृत्तीचा वापर २६% (१०) ग्रंथालये करतात, २०व्या आवृत्तीचा वापर १६% (०६) ग्रंथालये करतात, २१व्या आवृत्तीचा वापर २१% (०८) ग्रंथालये करतात, २२व्या आवृत्तीचा वापर २४% (०९) ग्रंथालये करतात, तर २३व्या आवृत्तीचा वापर ११% (०४) ग्रंथालये करतात.

प्र. १२वा. ग्रंथालयाची तालिका अद्ययावत आहे का?

तालिकीकरणामुळे ग्रंथांचे स्थान समजते. ग्रंथालयाचे तालिकीकरण अद्ययावत आहे का व असल्यास कोणत्या प्रकारचे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास AACR-2, AACR-2R, CCC, इतर असे एकूण चार पर्याय देण्यात आले होते.


**तक्ता क्र. ५.४८.**
**ग्रंथालयाची तालिकाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २६ | १२ | ३८ |
| २. | शेकडा प्रमाण | ६८% | ३२% | १००% |

६८% (२६) ग्रंथालयाची तालिका अद्ययावत असून १२% (१२) ग्रंथालयाची तालिका अद्ययावत नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.४२.**

**ग्रंथालयाची तालिकाबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




सदर प्रश्नातच उत्तर होय असल्यास कोणत्या तालिका प्रकारानुसार केले जाते हे जाणून घेण्यासाठी उपप्रश्न विचारण्यात आला होता.


**तक्ता क्र. ५.४९.**

**ग्रंथालयाची तालिका प्रकाराबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | AACR-2 | AACR-2R | CCC | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३२ | ०० | 00 | ०६ | ३८ |
| २. | शेकडा प्रमाण | ८४% | ००% | ००% | १६% | १००% |

**आलेख क्र. ५.४३.**

**ग्रंथालयाची तालिका प्रकाराबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**



८४% (३२) ग्रंथालयाये ही O-1 (AACR-2) नुसार तर १६% (०६) ग्रंथालयाये ही O-4 (इतर) नुसार म्हणजे (OPAC) स्वरुपात असून अनुक्रमे ००% (००) ग्रंथालयाये ही O-2 (AACR-2R) व O-3 (CCC) ००% (००) नुसार तालिकाकरण करतात.

प्र. १३वा. आपल्या ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे काय?

ग्रंथालयाचे संगणकीकरणाबाबत माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. होय किंवा नाही ह्या पर्यायाच्या माध्यमातून प्रतिसाद नोंदविण्यास सांगितला होता. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.५०.**


**ग्रंथालय संगणकीकरणाबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | ३३ | ०५ | **३८** |
| | शेकडा प्रमाण | ८७% | १३% | **१००%** |

८७% (३३) ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असून १३% (०५) ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले नसल्याबाबत मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.४४.**

**ग्रंथालय संगणकीकरणाबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख**




प्र. १४वा. संगणकीकरणासाठी कोणती आज्ञावली (Software) वापरण्यात येते?

ग्रंथालयात वापरण्यात येणाऱ्या आज्ञावलीच्या माहिती करीता सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नास SOUL, SLIM, LIBSYS, LIBSUITE, LIBRARIAN, LIBRA, इतर असे एकूण ०७ पर्याय देण्यात आले होते. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.५१.**


**ग्रंथालयात वापण्यात येणाऱ्या आज्ञावली (Software) बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | O-1 SOUL | O-2 SLIM | O-3 LIBSYS | O-4 LIBSUITE | O-5 LIBRARIAN | O-6 LIBRA | O-7 इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १५ | ०४ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ११ | **३३** |
| २. | शेकडा प्रमाण | ४५% | १२% | ०३% | ०३% | ०३% | ००% | ३३% | **१००%** |

O-1. SOUL आज्ञावली ४५% (१५), O-2. SLIM आज्ञावली १२% (०४), O-3. LIBSYS आज्ञावली ०३% (०१), O-4. LIBSUITE आज्ञावली ०३% (०१), O-5. LIBRARIAN आज्ञावली ०३% (०१), O-6. LIBRA आज्ञावली ००% (००), इतर आज्ञावलीस ३३% (११) प्रतिसाद लाभला आहे. इतर आज्ञावलीत प्रामुख्याने Biyani Tel. , In house, Lib. Pro, E-Granthalaya, Koha, Library Management, MKCL ह्या आज्ञावलींचा समावेश आहे.

**आलेख क्र. ५.४५.**

**ग्रंथालयात वापरण्यात येणाऱ्या आज्ञावली (Software) बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




प्र. १५वा. ग्रंथालयास स्वतंत्र इमारत आहे का?

ग्रंथालयाचा विचार करता, ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत आहे किंवा नाही जे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.५२.**

**ग्रंथालय स्वतंत्र इमारती बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | १० | २८ | ३८ |
| | शेकडा प्रमाण | २६% | ७४% | १००% |

७४% (२८) ग्रंथालयास स्वत:ची स्वतंत्र इमारत नसून फक्त २६% (१०) ग्रंथालयास स्वत:ची इमारत असल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.४६.**
**ग्रंथालय स्वतंत्र इमारती बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख**




थोडक्यात ७४% (२८) महाविद्यालयीन ग्रंथालयास स्वतंत्र ग्रंथालय इमारत नसून त्या महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्थान मुख्य इमारतीत आहे तर २६% (१०) ग्रंथालयास स्वतंत्र इमारत असून ही बाब ग्रंथालयाच्या विकासात उल्लेखनीय आहे.

प्र. १६वा. विभागवार क्षेत्रफळ व बैठक व्यवस्था.

ग्रंथालयांना आपल्या प्रत्यक्ष व संभाव्य वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन ग्रंथालयाचे एकूण विभागवार विभागणी करुन ग्रंथालय विकसित करणे आवश्यक असते. सदर प्रश्नाच्या माध्यमातून ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ व उपलब्ध क्षेत्रफळांची वाचकांच्या गरजेनुसार केलेली विभागणी जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. विश्लेषण खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. ५.५३.**
**ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा तक्ता.** **(चौ. फूट)**


| क्र. | तपशिल | १००० ते २००० | २००१ ते ३००० | ३००१ ते ४००० | ४००१ ते ५००० | ५००१ ते ६००० | ६००१ ते ७००० | ७००१ ते ८००० | ८००१ ते ९००० | ९००१ ते १०००० | १०००० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १५ | ०७ | ०५ | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २. | शेकडा प्रमाण | ३९% | १८% | १३% | ११% | ०५% | ०३% | ०३% | ०३% | ०३% | ०३% |

ग्रंथालयाचे क्षेत्रफळानुसार वर्गवारी केल्यास १००० ते २००० ह्या वर्गवारीत ३९% (१५) ग्रंथालये येत असून २००१ ते ३००० ह्या वर्गवारीत १८% (०७) ग्रंथालये तर ३००१ ते ४००० ह्या वर्गवारीत १३% (०५) ग्रंथालये, ४००१ ते ५००० ह्या वर्गवारीत ११% (०४)

ग्रंथालये, ५००१ ते ६००० ह्या वर्गवारीत प्रत्येकी ०५% (०२) ग्रंथालये येतात तर अनुक्रमे ७००१ ते ८०००, ८००१ ते ९०००, ९००१ ते १०००० व १०००० पेक्षा जास्त चौ. फूटात प्रत्येकी ०३% (०१) ग्रंथालये येतात.

**आलेख क्र. ५.४७.**

**ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा आलेख.**





**तक्ता क्र. ५.५४.**

**ग्रंथालयाचे विभागवार क्षेत्रफळ दर्शविणारा तक्ता. (चौ. फूट)**

| क्र. | तपशिल | १०० ते २०० | २०१ ते ३०० | ३०१ ते ४०० | ४०१ ते ५०० | ५०१ ते ६०० | ६०१ ते ७०० | ७०१ ते ८०० | ८०१ ते ९०० | ९०१ ते १००० | १००० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तालिका कक्ष | २० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **९५%** | **०५%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |
| २ | ग्रंथपाल कक्ष | २६ | ०५ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **८४%** | **१६%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |
| ३ | देवघेव विभाग | २० | ०८ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **६९%** | **२८%** | **००%** | **००%** | **००%** | **०३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |
| ४ | संदर्भ विभाग | ०७ | ०९ | ०२ | ०३ | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ |
| | | **२८%** | **३६%** | **०८%** | **१२%** | **०८%** | **००%** | **०४%** | **००%** | **००%** | **०४%** |
| ५ | संगणक विभाग | १३ | १० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **५२%** | **४०%** | **०४%** | **०४%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |
| ६ | ऑडिओ–व्हिडीओ विभाग | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **६७%** | **००%** | **००%** | **३३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |
| ७ | प्रतिलिपी विभाग | ०९ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| | | **९०%** | **१०%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | नियतकालिके विभाग | १८ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | | ८६% | ००% | १०% | ००% | ००% | ००% | ००% | ००% | ००% | ०५% |
| ९ | प्राध्यापक वाचन कक्ष | १४ | ०५ | ०५ | ०१ | ००% | ०१ | ००% | ००% | ००% | ००% |
| | | ५४% | १९% | १९% | ०४% | ००% | ०४% | ००% | ००% | ००% | ००% |
| १० | विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका | १० | ०४ | ०१ | ०१ | ०५ | ०२ | ०० | ०१ | ०१ | १० |
| | | २९% | ११% | ०३% | ०३% | १४% | ०६% | ००% | ०३% | ०३% | २९% |
| ११ | विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका | ०८ | ०३ | ०१ | ०१ | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०४ | ०२ |
| | | ३३% | १३% | ०४% | ०४% | १३% | ०४% | ००% | ०४% | १७% | ०८% |
| १२ | ग्रंथसंग्रह विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०८ | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | १३ |
| | | ०३% | ०६% | ०९% | २४% | ०३% | ०३% | ०६% | ०६% | ०३% | ३८% |

**आलेख क्र. ५.४८.**
**ग्रंथालयाचे विभागवार क्षेत्रफळ दर्शविणारा आलेख.**




O-01. ९५% (२०) ग्रंथालयात तालिका कक्ष १०० ते २०० चौ. फूट जागेत असून ०५% (०१) ग्रंथालयात तालिका कक्ष २०१ ते ३०० चौ. फूट जागेत आहे.

O-02. ८४% (२६) ग्रंथालयात ग्रंथपाल कक्ष १०० ते २०० चौ. फूट जागेत असून १६% (०५) ग्रंथालयात तालिका कक्ष २०१ ते ३०० चौ. फूट जागेत आहे.

O-03. ६९% (२०) ग्रंथालयात देवघेव विभाग १०० ते २०० चौ. फूट जागेत असून २८% (०८) ग्रंथालयात २०१ ते ३०० चौ. फूट जागेत आहे तर ०३% (०१) ग्रंथालयात ६०१ ते ७०० चौ. फूट जागेत आहे

O-04. ३६% (०९) ग्रंथालयात संदर्भ विभाग २०१ ते ३०० चौ. फूट जागेत तर २८% (०७) ग्रंथालयात १०० ते २०० चौ. फूट जागेत, १२% (०३) ग्रंथालयात ४०१ ते ५०० तर अनुक्रमे ०८% (०२) ग्रंथालयात ३०१ ते ४०० व ५०१ ते ६०० चौ. फूट जागेत आणि अनुक्रमे ०४% (०१) ग्रंथालयात ७०१ ते ८०० व १००० पेक्षा जास्त चौ. फूट जागेत आहे.

O-05. ५२% (१३) ग्रंथालयात संगणक विभाग १०० ते २०० चौ. फूट जागेत असून ४०% (१०) ग्रंथालयात २०१ ते ३०० चौ. फूट जागेत तर अनुक्रमे ०४% (०१) ग्रंथालयात ३०१ ते ४००, ४०१ ते ५०० चौ. फूट जागेत आहे.

O-06. ६७% (०२) ग्रंथालयात ऑडिओ–व्हिडीओ विभाग १०० ते २०० चौ. फूट जागेत असून ३३% (०१) ग्रंथालयात ४०१ ते ५०० चौ. फूट जागेत आहे.

O-07. ९०% (०९) ग्रंथालयात प्रतिलिपी विभाग १०० ते २०० चौ. फूट जागेत असून १०% (०१) चौ. फूट जागेत आहे.

O-08. ८६% (१८) ग्रंथालयात नियतकालिके विभाग १०० ते २०० चौ. फूट जागेत असून १०% (०२) ग्रंथालयात ३०१ ते ४०० चौ. फूट जागेत आहे तर ०५% (०१) ग्रंथालयात १००० पेक्षा जास्त जागेत आहे.

O-09. ५४% (१४) ग्रंथालयात प्राध्यापक वाचन कक्ष १०० ते २०० चौ. फूट जागेत तर अनुक्रमे १९% (०५) २०१ ते ३००, ३०१ ते ४०० चौ. फूट जागेत, अनुक्रमे ०४% (०१) ग्रंथालयात ४०१ ते ५०० व ६०१ ते ७०० चौ. फूट जागेत आहे.

O-10. अनुक्रमे २९% (१०) ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष १०० ते २०० व १००० पेक्षा जास्त चौ. फूट जागेत असून १४% (०५) ग्रंथालयात ५०१ ते ६०० चौ. फूट जागेत, ११% (०४) ग्रंथालयात २०१ ते ३०० चौ. फूट जागेत, ०६% (०२) ग्रंथालयात ६०१ ते ७०० चौ. फूट जागेत, आणि अनुक्रमे ०३%

(०१) ३०१ ते ४००, ४०१ ते ५००, ८०१ ते ९०० व ९०१ ते १००० चौ. फूट जागेत आहे.

O-11. ३३% (०८) ग्रंथालयात विद्यार्थ्यांनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका कक्ष १०० ते २०० चौ. फूट जागेत, १७% (०४) ०१ ग्रंथालयात ९०१ ते १००० चौ. फूट जागेत, अनुक्रमे १३% (०३) ग्रंथालयात २०१ ते ३००, ५०१ ते ६०० चौ. फूट जागेत असून, ०८% (०२) ग्रंथालयात १००० पेक्षा जास्त चौ. फूट जागेत, आणि अनुक्रमे ०४% (०१) ग्रंथालये हि ३०१ ते ४००, ४०१ ते ५००, ६०१ ते ७००, ८०१ ते ९०० चौ. फूट जागेत आहे.

O-12. ३८% (१३) ग्रंथालयात ग्रंथसंग्रह विभाग १००० पेक्षा जास्त चौ. फूट जागेत असून २४% (०८) ग्रंथालयात ४०१ ते ५०० चौ. फूट जागेत, ०९% (०३) ग्रंथालयात ३०१ ते ४०० चौ. फूट जागेत, अनुक्रमे ०६% (०२) २०१ ते ३००, ७०१ ते ८००, ८०१ ते ९०० चौ. फूट जागेत तर ०३% (०१) १०० ते २००, ५०१ ते ६००, ६०१ ते ७००,९०१ ते १००० चौ. फूट जागेत आहे.

सदर प्रश्नातच दोन उपप्रश्न विचारण्यात आलेले होते, अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असतात काय? आणि अभ्यासिका आसनव्यवस्था विद्यार्थी यांच्या एकूण क्षमतेच्या १०% इतकी आहे काय? सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.५५.**


**अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असण्याबाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ०६ | ३२ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | १६% | ८४% | **१००%** |

१६% (०६) ग्रंथालये सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असून ८४% (३२) ग्रंथालये सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू नसल्याबाबतचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.४९**

**अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असण्याबाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




तसेच दुसऱ्या प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.५६.**


**अभ्यासिका आसनव्यवस्था दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १८ | २० | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ४७% | ५३% | **१००%** |

५३% (२०) ग्रंथालयामधील अभ्यासिकेतील आसनव्यवस्था विद्यार्थ्यांच्या एकूण क्षमतेच्या १०% इतकी नसून ४७% (१८) ग्रंथालयात असल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.५०**

**अभ्यासिका आसनव्यवस्था दर्शविणारा आलेख.**



प्र. १७ ते १९. ग्रंथालय समिती आहे काय?, ग्रंथालय समिती सभासद संख्या, ग्रंथालय समितीच्या वर्षातून किती सभा होतात?

सदर प्रश्नाच्या साहाय्याने ग्रंथालयीन समिती व त्याबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

महाविद्यालयीन ग्रंथालयाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी, सल्ला देण्यासाठी मदत व्हावी याकरिता ग्रंथालय समिती आहे का? यासाठी होय व नाही असे पर्याय देण्यात आले होते. प्राप्त उत्तराच्या आधारे असे निदर्शनास येते की, १००% (३८) ग्रंथालयात ग्रंथालय समिती आहे.

**तक्ता क्र. ५.५७.**


**ग्रंथालय समिती सभासद संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ ते ०५ | ०६ ते १० | ११ ते १५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १२ | २१ | ०५ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ३२% | ५५% | १३% | **१००%** |

३२% (१२) ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समिती सभासद संख्या ही ०१ ते ०५ मध्ये आहे तर ५५% (२१) ग्रंथालयाते ही संख्या ०६ ते १० मध्ये असून १३% (०५) ग्रंथालयात ही संख्या ११ ते १५ अशी असून ग्रंथालय समितीचा कालावधी एक वर्षाचा आहे. ग्रंथालय समितीच्या सभा नियमितपणे घेतल्या जातात.

**आलेख क्र. ५.५१.**

**ग्रंथालय समिती सभासद संख्या दर्शविणारा आलेख.**




**तक्ता क्र. ५.५८.**

**ग्रंथालय समितीच्या सभा संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ग्रंथालय समितीच्या सभा संख्या | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | |
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ०४ | १८ | ०८ | ०७ | ०१ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ११% | ४७% | २१% | १८% | ०३% | **१००%** |

**आलेख क्र. ५.५२.**

**ग्रंथालय समितीच्या सभा संख्या दर्शविणारा आलेख.**




एकूण प्राप्त माहितीनुसार ४७% (१८) ग्रंथालये ग्रंथालय समितीच्या वर्षातून **दोन** वेळा सभा घेतात, २१% (०८) ग्रंथालय समितीच्या वर्षातून **तीन** वेळा सभा होत असून १८% (०७) ग्रंथालयात वर्षातून **चार** वेळा सभा होतात आणि ११% (०४) ग्रंथालयात ह्या सभा वर्षातून **एक** वेळा घेत असून ०३% (०१) ग्रंथालयात ग्रंथालय समितीच्या वर्षातून **पाच** वेळा सभा होत असल्याचे मत नोंदविण्यात आले आहे.

प्र. २०वा. ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग किती प्रमाणात होतो?

ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग ह्या बाबत मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. त्यास अत्यंत चांगला, बरा, समाधानकारक, असमाधानकारक, सांगता येत नाही असे पर्याय सुचविण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.५९.**


**ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | अत्यंत चांगला | बरा | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | ०८ | १२ | १८ | ०० | ०० | **३८** |
| | शेकडा प्रमाण | २१% | ३२% | ४७% | ००% | ००% | **१००%** |

४७% (१८) ग्रंथालयांच्या मते ग्रंथालय समितीचा ग्रंथालयाच्या विकासात **समाधानकारक** उपयोग होतो. ३२% (१२) ग्रंथालयांच्या मते ग्रंथालय समितीचा ग्रंथालयाच्या विकासात **बरा** उपयोग होतो. तर २१% (०८) ग्रंथालयांच्या मते ग्रंथालय समितीचा ग्रंथालयाच्या विकासात **अत्यंत चांगला** उपयोग होतो.

**आलेख क्र. ५.५३**

**ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग दर्शविणारा आलेख.**




प्र. २१वा. ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा.


ग्रंथालयात असलेली ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा व त्या ग्रंथसंपदेचे स्वरुप जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, सर्वसाधारण ग्रंथ, इतर ग्रंथ असे पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.६०.**

**ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | १०००० ते २०००० | २०००१ ते ३०००० | ३०००१ ते ४०००० | ४०००१ ते ५०००० | ५०००१ ते ६०००० | ६०००१ ते ७०००० | ७०००१ ते ८०००० | ८०००१ ते ९०००० | ९०००१ ते १००००० | १००००० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १६ | ०८ | ०४ | ०२ | ०१ | ०४ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| २. | शेकडा प्रमाण | ४२% | २१% | ११% | ०५% | ०३% | ११% | ००% | ००% | ०३% | ०५% |

आलेख क्र. ५.५४.
ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा दर्शविणारा आलेख.





ग्रंथालयात असलेली ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ४२% (१६) ग्रंथालयात १०००० ते २०००० ग्रंथसंपदा आहे. २१% (०८) ग्रंथालयात २०००१ ते ३०००० ग्रंथसंपदा असून अनुक्रमे ११% (०४) ग्रंथालयात ३०००१ ते ४०००० व ६०००१ ते ७०००० ग्रंथसंपदा आहे. ०५% (०२) ग्रंथालयात ४०००१ ते ५०००० व १००००० पेक्षा जास्त ग्रंथसंपदा आहे तर ०३% (०१) ग्रंथालयात ५०००१ ते ६०००० व ९०००१ ते १००००० ग्रंथसंपदा आहे. सदर प्रश्नातच ग्रंथसंपदेचे स्वरुप जाणून घेण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

तक्ता क्र. ५.६१.
ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदेचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.

| क्र. | तपशिल | १०००० ते २०००० | २०००१ ते ३०००० | ३०००१ ते ४०००० | ४०००१ ते ५०००० | ५०००१ ते ६०००० | ६०००१ ते ७०००० | ७०००१ पेक्षा जास्त | एकूण / शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्रमिक पुस्तके | २९ | ०३ | ०६ | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **७६%** | **०८%** | **१६%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| २ | संदर्भ ग्रंथ | ३० | ०४ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **८२%** | **११%** | **०३%** | **०५%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ३ | सर्वसाधारण ग्रंथ | २३ | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ३८ |
| | | **९२%** | **०५%** | **००%** | **००%** | **००%** | **०३%** | **००%** | **१००%** |
| ४ | इतर ग्रंथ | १२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **३२%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |

**आलेख क्र. ५.५५.**

**ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदेचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**




O-01. ७६% (२९) ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांची ग्रंथसंपदा हि १०००० ते २०००० ह्या दरम्यान आहे तर १६% (०६) ग्रंथालयात हिच ग्रंथसंपदा ३०००१ ते ४०००० दरम्यान असून ०८% (०३) ग्रंथालयात सदरची ग्रंथसंपदा २०००१ ते ३०००० दरम्यान आहे.

O-02. ८२% (३०) ग्रंथालयात संदर्भ ग्रंथांची ग्रंथसंपदा ही १०००० ते २०००० ह्या दरम्यान आहे तर ११% (०४) ग्रंथालयात सदरची ग्रंथसंपदा २०००१ ते ३०००० दरम्यान असून ०५% (०२) ग्रंथालयात ग्रंथसंपदा ४०००१ ते ५०००० दरम्यान आहे आणि ०३% (०१) ग्रंथालयात हिच ग्रंथसंपदा ३०००१ ते ४०००० दरम्यान आहे.

O-03. ९२% (२३) ग्रंथालयात सर्वसाधारण ग्रंथांची ग्रंथसंपदा ही १०००० ते २०००० ह्या दरम्यान आहे तर ०५% (०२) ग्रंथालयात सदरची ग्रंथसंपदा २०००१ ते ३०००० दरम्यान असून ०३% (०१) ग्रंथालयात हिच ग्रंथसंपदा ६०००१ ते ७०००० आहे.

O-04. ३२% (१२) ग्रंथालयात इतर ग्रंथांची ग्रंथसंपदा ही १०००० ते २०००० ह्या दरम्यान आहे असे मत नोंदविले आहे.


प्र. २२वा. दररोज किती ग्रंथांची सरासरी देवाण घेवाण होते?

ग्रंथालयात दररोज सरासरी किती वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते याबाबतची माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन केले होते.

**तक्ता क्र. ५.६२.**
**ग्रंथालयात दररोज सरासरी वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते १५० | १५१ ते २०० | २०१ ते २५० | २५१ ते ३०० | ३०१ ते ३५० | एकूण / शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी | ०६ | १२ | ०३ | ०६ | ०५ | ०४ | ०२ | ३८ |
| | | **१६%** | **३२%** | **०८%** | **१६%** | **१३%** | **११%** | **०५%** | **१००%** |
| २ | प्राध्यापक | ३८ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **१००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ३ | कर्मचारी वर्ग | २४ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **६३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ४ | अभ्यागत (Visiters) | ११ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **२९%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |

**आलेख क्र. ५.५६.**
**ग्रंथालयात दररोज सरासरी वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण दर्शविणारा आलेख.**




ग्रंथालयात विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग, अभ्यागतांना सरासरी खालील प्रमाणे ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते. ३२% (१२) ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांना सरासरी ५१ ते १०० दरम्यान ग्रंथांची देवाण घेवाण दररोज केली जाते, १००% (३८) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० प्राध्यापक वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते, ६३% (२४) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० कर्मचारी वर्गास ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते तर २९% (११)

ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० अभ्यागत (Visiters) वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते.

सदर प्रश्नातच दोन उपप्रश्न विचारण्यात आले होते की, विद्यार्थी वाचकांना ग्रंथ किती दिवसांकरीता देतात? आणि ग्रंथ उशीरा आल्यास विलंब शुल्क किती लावता? ह्या बाबत एकूण प्राप्त माहितीनूसार **सात दिवस** म्हणजे एक आठवडा ग्रंथ हे विद्यार्थी वाचकांना देण्यात येतात शिवाय सदर देय कालावधी नंतर येणाऱ्या ग्रंथास दर दिवशी **रु. एक** विलंब शुल्क लावले जाते असे मत नोंदविण्यात आले आहे.

प्र. २३वा. ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा याकरीता पुरेसे आहे काय?

सद्य स्थितीतील ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी पुरेसे आहे काय हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास होय किंवा नाही असे पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.६३.**


**ग्रंथालयात उपलब्ध असलेले फर्निचर संबंधी प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १८ | २० | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ४७% | ५३% | **१००%** |

४७% (१८) ग्रंथालयामधील उपलब्ध असलेले फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा पुरविण्यास पुरेसे असून ५३% (२०) ग्रंथालयामध्ये हे प्रमाण पुरेसे नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.५७.**

**ग्रंथालयात उपलब्ध असलेले फर्निचर प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**



प्र. २४वा. ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर तपशिल.

ग्रंथालयात प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या फर्निचर बाबत तपशिल जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.६४.**

**ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ ते ०५ | ०६ ते १० | ११ ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते २०० | २०१ ते ३०० | ३०० पेक्षा जास्त | एकूण / शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कपाटे | ०२ | ०३ | ०७ | ०८ | ०६ | ०२ | ०६ | ०४ | ०० | ०० | ३८ |
| | | **०५%** | **०८%** | **१८%** | **२१%** | **१६%** | **०५%** | **१६%** | **११%** | **००%** | **००%** | **१००%** |
| २ | खुर्च्या | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०६ | १२ | १३ | ०१ | ०२ | ३८ |
| | | **००%** | **००%** | **०५%** | **०३%** | **०३%** | **१६%** | **३२%** | **३४%** | **०३%** | **०५%** | **१००%** |
| ३ | रॅक | ०९ | ०६ | ०३ | ०४ | ०३ | ०२ | ०२ | ०३ | ०० | ०० | ३८ |
| | | **२४%** | **१६%** | **०८%** | **११%** | **०८%** | **०५%** | **०५%** | **०८%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ४ | टेबल्स | ०५ | ०७ | १३ | ०८ | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०० | ०० | ३८ |
| | | **१३%** | **१८%** | **३४%** | **२१%** | **०३%** | **०३%** | **०३%** | **०५%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ५ | पेपर स्टॅण्ड | २७ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **७१%** | **०३%** | **०३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ६ | सूचना फलक | ३६ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **९५%** | **०३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ७ | काच फलक | ३२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **८४%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ८ | तालिका केबिन्स | १८ | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **४७%** | **०८%** | **०३%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| ९ | ग्रंथ प्रदर्शनी कपाट | २८ | ०० | ०३ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **७४%** | **००%** | **०८%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |
| १० | इतर | ०९ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **२४%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **००%** | **१००%** |

O-01. २१% (०८) ग्रंथालयात २१ ते ३० कपाट संख्या असून १८% (०७) ग्रंथालयात हेच प्रमाण ११ ते २० आहे. अनुक्रमे १६% (०६) ग्रंथालयात हे प्रमाण ३१ ते ४०, ५१ ते १०० दरम्यान असून ११% (०४) ग्रंथालयात १०१ ते २०० इतके आहे आणि

०८% (०३) ग्रंथालयात ०६ ते १०, व अनुक्रमे ०५% (०२) ग्रंथालयात हेच प्रमाण ०१ ते ०५ व ४१ ते ४० दरम्यान आहे.

O-02. ३४% (१३) ग्रंथालयात खुर्च्यांचे प्रमाण हे १०१ ते २०० च्या दरम्यान असून ३२% (१२) ग्रंथालयात ५१ ते १०० च्या दरम्यान आहे. १६% (०६) ग्रंथालयात हे प्रमाण ४१ ते ५० दरम्यान आणि अनुक्रमे ०५% (०२) ग्रंथालयात ११ ते २०, ३०० पेक्षा जास्त आहे तर ०३% (०१) ग्रंथालयात हे २१ ते ३०, ३१ ते ४०, २०१ ते ३०० च्या दरम्यान आहे.

O-03. ग्रंथालयातील रॅकचे प्रमाण २४% (०९) ग्रंथालयात ०१ ते ०५ असून १६% (०६) ग्रंथालयात ०६ ते १०, ११% (०४) ग्रंथालयात २१ ते ३०, ०८% (०३) ग्रंथालयात हे प्रमाण ११ ते २०, ३१ ते ४०, आणि १०१ ते २०० असे आहे तर अनुक्रमे ०५% (०२) ग्रंथालयात हे प्रमाण ४१ ते ५०, ५१ ते १०० दरम्यान आहे.

O-04. ग्रंथालयातील टेबल्सच्याबाबतीत ३४% (१३) ग्रंथालयात ११ ते २० असून २१% (०८) ग्रंथालयात हे प्रमाण २१ ते ३०, १८% (०७) ग्रंथालयात प्रमाण ०६ ते १० आहे. तर १३% (०५) ग्रंथालयात हे प्रमाण ०१ ते ०५ तर ०५ % (०२) ग्रंथालयात ह्याचे प्रमाण १०१ ते २०० व अनुक्रमे ०३% (०१) ग्रंथालयात हे ३१ ते ४०, ४१ ते ५०, ५१ ते १०० पर्यंत आहे.

O-05. ग्रंथालयातील पेपरस्टॅण्डच्या बाबतीत ७१% (२७) ग्रंथालयात ०१ ते ०५ च्या दरम्यान असून अनुक्रमे ०३% (०१) ग्रंथालयात हे प्रमाण ०६ ते १० व ११ ते २० च्या दरम्यान आहे.

O-06. ग्रंथालयातील सूचना फलकाच्याबाबतीत ९७% (३७) ग्रंथालयात ०१ ते ०५ च्या दरम्यान असून ०३% (०१) ग्रंथालयात ०६ ते १० च्या दरम्यान आहे.


O-07. ग्रंथालयातील काच फलकाच्याबाबतीत ८४% (३२) ग्रंथालयात ०१ ते ०५ च्या दरम्यान आहे.

O-08. ग्रंथालयातील तालिका पत्रे ठेवण्याच्या केबिन्सच्याबाबतीत ४७% (१८) ग्रंथालयात ०१ ते ०५ च्या दरम्यान असून ०८% (०३) ग्रंथालयात हेच प्रमाण ०६ ते १० दरम्यान आहे तर ०३% (०१) ग्रंथालयात हे प्रमाण ११ ते २० च्या दरम्यान आहे.

O-09. ग्रंथालयातील ग्रंथ प्रदर्शनी कपाटांच्याबाबतीत ७४% (२८) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ०५ च्या दरम्यान असून ०८% (०३) ग्रंथालयात हेच प्रमाण ११ ते २० दरम्यान आहे.

O-10. ग्रंथालयातील इतर उपलब्ध फर्निचरबाबत २४% (०९) ग्रंथालयांनी मत नोंदविले असून त्यामध्ये संगणक टेबल, ओपेक साठी काच टेबल, विद्यार्थ्यांनसाठी दैनंदिन स्लिप भरण्यासाठी डेस्क टेबल इ साहित्याचा समावेश केला आहे.

**आलेख क्र. ५.५८**
**ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर बाबत स्वरुप दर्शविणारा आलेख.**




प्र. २५वा. ग्रंथालयीन साधनांचा तपशिल.

प्रत्यक्ष ग्रंथालयात असलेल्या ग्रंथालयीन साधनांचा तपशिल जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.६५.**
**ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ नग | ०२ नग | ०३ नग | ०४ नग | ०५ नग | ०६ नग | ०७ नग | ०८ नग | ०९ नग | १० पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Typewriter | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | Computers | ०० | ०४ | ०४ | ०५ | ०७ | ०२ | ०० | ०१ | ०२ | १२ |
| ३ | Printers | २१ | ०७ | ०७ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | Scanner | २३ | ०७ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | Photocopy Machines | २० | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ६ | Bar Code Printers | १४ | ०५ | ०१ | ०० | ००० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ७ | Digital Cameras | ०९ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०० |
| ८ | Fax | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ९ | Ups Back up Facility | १७ | ०१ | ०० | ०३ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ |
| १० | Others | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

**आलेख क्र. ५.५९**

**ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा आलेख.**




O-01. ०२ ग्रंथालयात Typewriter असून, त्याची संख्या ०१ आहे.

O-02. ग्रंथालयातील संगणकाच्याबाबतीत १२ ग्रंथालयात १० पेक्षा जास्त संगणक संख्या असून त्याखाली ०७ ग्रंथालयात ०५ संगणक आहेत तर ०५ ग्रंथालयात ०४ संगणक आहेत, अनुक्रमे ०४ ग्रंथालयात ०२ व ०३ संगणक असून अनुक्रमे ०२ ग्रंथालयत ०६ व ०९ संगणक आहेत तर ०१ ग्रंथालयात ०८ संगणक संख्या आहे.

O-03. ग्रंथालयातील Printers च्याबाबतीत २१ ग्रंथालयात ०१ प्रिंटर असून अनुक्रमे ०७ ग्रंथालयात प्रत्येकी ०२ व ०३ प्रिंटर आहेत तर ०१ ग्रंथालयात ०५ प्रिंटर आहेत.

O-04. ग्रंथालयातील Scanner च्या बाबतीत २३ ग्रंथालयात ०१ Scanner असून ०७ ग्रंथालयात ०२ व ०१ ग्रंथालयात ०२ Scanner आहेत.

O-05. ग्रंथालयातील Photocopy Machines च्याबाबतीत २० ग्रंथालयात ०१ Photocopy Machine असून ०२ ग्रंथालयात ०२ Photocopy Machines आहेत.

O-06. ग्रंथालयातील Bar Code Printers च्याबाबतीत १४ ग्रंथालयात ०१ Bar Code Printer असून ०५ ग्रंथालयात ०२ तर ०१ ग्रंथालयात ०३ Bar Code Printers आहेत.

O-07. ग्रंथालयातील Digital Cameras च्याबाबतीत ०९ ग्रंथालयात ०१ Digital Camera असून ०१ ग्रंथालयात ०२ तर ०१ ग्रंथालयात ०३ Digital Cameras असल्याचे मत नोंदविण्यात आले आहे.

O-08. केवळ ०१ ग्रंथालयात Fax Machine उपलब्ध आहे.

O-09. ग्रंथालयातील Ups Back up Facility च्याबाबतीत१७ ग्रंथालयात ०१ Ups Back up Facility असून ०१ ग्रंथालयात ०२ Ups Back up Facility आहेत. ०३ ग्रंथालयात ०४, ०१ ग्रंथालयात ०५, ०१ ग्रंथालयात ०८, ०१ ग्रंथालयात ०९, तर ०२ ग्रंथालयात १० पेक्षा जास्त Ups Back up Facility उपलब्ध आहेत.

O-10. ग्रंथालयातील इतर साधनांच्याबाबतीत ०३ ग्रंथालयांनी CCTV यंत्रणा, ०१ ग्रंथालयात Barcode Scanner, I Pad, इ. उपलब्ध साधनांचा समावेश असल्याचे नोंदविलेले आहे.

प्र. २६वा. ग्रंथालयात दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग आहे काय?

ग्रंथालयात दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.६६.**


**दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभागास प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ०६ | ३२ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | १६% | ८४% | **१००%** |

८४% (३२) ग्रंथालयामध्ये दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग नसून १६% (०६) ग्रंथालयात दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग असल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.६०.**

**दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभागास प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




प्र. २७वा. ग्रंथालयात खालीलपैकी कोणती दृकःश्राव्य साधने उपलब्ध आहेत?

ग्रंथालयात कोण कोणती दृकःश्राव्य साधने उपलब्ध आहे ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.६७.**

**ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ नग | ०२ नग | | क्र. | तपशिल | ०१ नग | ०२ नग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेलिव्हिजन | ०२ | ०० | | ४ | डिव्हीडी प्लेअर | ०६ | ०१ |
| २ | व्हिसीआर | ०० | ०० | | ५ | एल. सी. डी. | ०५ | ०३ |
| ३ | केबल नेटवर्क | ०६ | ०१ | | ६ | इतर | ०२ | ०० |

O-01. टेलिव्हिजन असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०२ आहे.

O-02. कोणत्याही ग्रंथालयात व्हिसीआर नाही.


O-03. ०६ ग्रंथालयात ०१ केबल नेटवर्क असून ०१ ग्रंथालयात ०२ केबल नेटवर्क आहेत.

O-04. ०६ ग्रंथालयात ०१ डिव्हीडी प्लेअर असून ०१ ग्रंथालयात ०२ डिव्हीडी प्लेअर आहेत.

O-05. ०५ ग्रंथालयात ०१ एल. सी. डी. असून ०३ ग्रंथालयात ०२ एल. सी. डी. आहेत.

O-06. इतर दृकःश्राव्य साधनात O.H.P. Projecter, Speakers, Extended Harddisk बाबत ०२ ग्रंथालयात मत नोंदविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ५.६१**
**ग्रंथालयातील उपलब्ध साधनांचा तपशिल दर्शविणारा आलेख.**




प्र. २८वा. मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे का?


ग्रंथालयात मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे किंवा नाही ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.६८.**
**ग्रंथालयात मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | ३२ | ०६ | **३८** |
| | शेकडा प्रमाण | ८४% | १६% | **१००%** |

८४% (३२) ग्रंथालयामध्ये मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध असून १६% (०६) ग्रंथालयामध्ये मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.६२**
**ग्रंथालयात मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**



प्र. २९वा. ग्रंथालयात खालीलपैकी कोणते मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे?

ग्रंथालयात कोणकोणते मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.


**तक्ता क्र. ५.६९.**

**ग्रंथालयातील उपलब्ध मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ नग | ०२ नग | ०३ नग | ०४ नग | ०५ नग | ०५ पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मॅप्स/नकाशा | ०३ | ०२ | ०० | ०१ | ०५ | १९ |
| २ | हस्तलिखीते | ०२ | ०० | ०० | ०१ | ०० | ०२ |
| ३ | अहवाल | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०८ |
| ४ | प्रबंध | ०५ | ०१ | ०३ | ०० | ०२ | ११ |
| ५ | प्रोजेक्ट रिपोर्टस | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | १२ |
| ६ | हस्तपुस्तिका | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०४ |
| ७ | प्रतिलिपी | ०० | ०४ | ०० | ०० | ०१ | ०६ |
| ८ | ॲटलास | ०५ | ०१ | ०१ | ०२ | ०० | ०६ |
| ९ | तक्ते | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ |
| १० | मानके | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० |
| ११ | प्रि–प्रिंट् | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| १२ | समिती अहवाल | ०० | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०१ |
| १३ | पुस्तिका | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| १४ | इतर | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |

**आलेख क्र. ५.६३**

**ग्रंथालयातील उपलब्ध मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा आलेख.**



O-01. मॅप्स/नकाशा बाबत १९ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त असून ०५ ग्रंथालयात ०५ आहेत तर ०३ ग्रंथालयात ०१ असून ०२ ग्रंथालयात ०२ आहेत.

O-02. हस्तलिखीत बाबत अनुक्रमे ०२ ग्रंथालयात कमीत कमी ०१ व जास्तीत जास्त ०५ पेक्षा जास्त हस्तलिखीत असून फक्त ०१ ग्रंथालयात ०४ असल्याचे मत नोंदविले आहे.

O-03. ०८ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त अहवाल आहेत.

O-04. प्रबंध ११ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त, ०५ ग्रंथालयात ०१ तर ०३ ग्रंथालयात ०३ व ०२ ग्रंथालयात ०५ आणि ०१ ग्रंथालयात ०२ आहेत.

O-05. प्रोजेक्ट रिपोर्टस हे १२ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त तर ०२ ग्रंथालयात ०३ आहेत.

O-06. हस्तपुस्तिका ०४ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त असून ०१ ग्रंथालयात ०१ आहे.

O-07. प्रतिलिपी ०६ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त असून ०४ ग्रंथालयात ०२ आहेत तर ०१ ग्रंथालयात ०५ आहेत.

O-08. ॲटलास ०६ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त असून ०५ ग्रंथालयात ०१ आहेत तर ०२ ग्रंथालयात ०४ असून अनुक्रमे ०१ ग्रंथालयात प्रत्येकी ०२ व ०३ आहेत.

O-09. अनुक्रमे प्रत्येकी ०१ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त, ०५, ०३, ०२, ०१ ह्या संख्येत आहेत.

O-10. ०१ ग्रंथालयात मानकांची संख्या ०३ असल्याचे दिसून येते तर

O-11 प्रि–प्रिंट् बाबतीत ०१ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त आहेत.

O-12. समिती अहवाल अनुक्रमे प्रत्येकी ०१ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त, ५, ४ ह्या संख्येत असून ०२ ग्रंथालयात ०२ संख्येने उपलब्ध आहेत.

O-13. पुस्तिका ०१ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त आहे तर ०१ ग्रंथालयात ०२ पुस्तिका उपलब्ध आहेत.

O-14. इतर मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य ०१ ग्रंथालयात ०५ पेक्षा जास्त आहे.

प्र. ३०वा. अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे का?

सदर प्रश्नास होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७०.**


**ग्रंथालयात अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | ३१ | ०७ | **३८** |
| | शेकडा प्रमाण | ८२% | १८% | **१००%** |

८२% (३१) ग्रंथालयामध्ये अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध असून १८% (०७) ग्रंथालयामध्ये अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.६४**

**ग्रंथालयात अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




प्र. ३१वा. ग्रंथालयात खालीलपैकी कोणते अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे?

ग्रंथालयात कोणकोणते अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७१**

**ग्रंथालयातील उपलब्ध अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | १०० ते २०० | २०१ ते ३०० | ३०१ ते ४०० | ४०१ ते ५०० | ५०१ पेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डिजीटल नकाशे | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| २ | मायक्रोफिल्म | ०१ | ०० | ०० | ०० | ०० |
| ३ | ऑडियो कॅसेट्स | १४ | ०० | ०० | ०० | ०० |
| ४ | सी. डी. | १७ | ०६ | ०१ | ०४ | ०५ |
| ५ | डि. व्ही. डी. | १५ | ०२ | ०२ | ०० | ०० |
| ६ | इतर | ०२ | ०० | ०० | ०० | ०० |

O-01. डिजीटल नकाशे हे अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य कोणत्याही ग्रंथालयात नसल्याबाबतचे मत नोंदविण्यात आले आहे.

O-02. मायक्रोफिल्म हे अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य ०१ ग्रंथालयात १०० ते २०० च्या संख्येत असल्याबाबतचे मत नोंदविण्यात आले आहे.

O-03. ऑडियो कॅसेट्स १४ ग्रंथालयात १०० ते २०० च्या दरम्यान आहेत.


O-04. सी. डी. १७ ग्रंथालयात १०० ते २०० च्या दरम्यान असून ०६ ग्रंथालयात २०१ ते ३०० दरम्यान आहेत आणि ०५ ग्रंथालयात ५०१ पेक्षा जास्त तर ०४ ग्रंथालयात ४०१ ते ५००, व ०१ ग्रंथालयात ३०१ ते ४०० च्या दरम्यान आहेत.

O-05. डी. व्ही. डी. १५ ग्रंथालयात १०० ते २०० च्या दरम्यान असून अनुक्रमे प्रत्येकी ०२ ग्रंथालयात २०१ ते ३०० आणि ३०१ ते ४०० दरम्यान आहेत.

O-06. इतर अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्यात व्हि. डी. ओ. कॅसेट बाबत ०२ ग्रंथालयात १०० ते २०० संख्या असल्याचे मत नोंदविलेले आहे.

**आलेख क्र. ५.६५**

**ग्रंथालयातील उपलब्ध अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य दर्शविणारा आलेख.**



प्र. ३२वा. आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ वाचकांना दिला जातो का?

कोणतेही ग्रंथालय परिपूर्ण नसते. त्यामूळे एका ग्रंथालयास दुसऱ्या ग्रंथालयाची मदत घ्यावीच लागते. ग्रंथालयामार्फत परिसरातील इतर ग्रंथालयांना ग्रंथालयीन सेवेचा लाभ दिला जातो का नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७२.**


**आंतर ग्रंथालयीन सेवेला लाभ दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २४ | १४ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ६३% | ३७% | **१००%** |

६३% (२४) ग्रंथालये हि आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देतात तर ३७% (१४) ग्रंथालये हि सेवा देत नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**आलेख क्र. ५.६६**

**आंतर ग्रंथालयीन सेवेला लाभ दर्शविणारा आलेख.**





सदर प्रश्नातच एक उपप्रश्न विचारण्यात आला होता की असल्यास तपशिल द्या. त्यास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७३.**

**आंतर ग्रंथालयीन सेवेचा तपशिल दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ ते ०५ वर्ष | ०६ ते १० वर्ष | ११ ते १५ वर्ष | एकूण / शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | एका ग्रंथालयाशी | १० | १० | ०३ | २३ |
| | | **४३%** | **४३%** | **१३%** | **१००%** |
| २ | दोन ग्रंथालयाशी | ०७ | ०५ | ०३ | १५ |
| | | **४७%** | **२३%** | **२०%** | **१००%** |

**आलेख क्र. ५.६७**
**आंतर ग्रंथालयीन सेवेचा तपशिल दर्शविणारा आलेख**




O-01. एकूण ग्रंथालयापैकी अनुक्रमे २६%(१०) ग्रंथालये ही ०१ ते ०५ व ०६ ते १० वर्षा दरम्यान आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ **एका ग्रंथालयामार्फत** वाचकांना देत असून ०८% (०३) ग्रंथालय सदर सेवा ११ ते १५ वर्षापासून देत आहे.

O-02. एकूण ग्रंथालयापैकी १८% (०७) ग्रंथालये ही ०१ ते ०५ वर्षा दरम्यान आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ **दोन ग्रंथालयामार्फत** वाचकांना देत असून १३% (०५) ग्रंथालये ही सेवा ०६ ते १० वर्षापासून देत आहेत तर ०८% (०३) ग्रंथालय सदर सेवा ११ ते १५ वर्षापासून आपल्या वाचकांना देत आहे.

थोडक्यात **एका ग्रंथालयामार्फत** आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ वाचकांना एकूण प्राप्त प्रतिसादापैकी ६१% (२३) ग्रंथालयामार्फत दिली जातो तर हीच सेवा ३९% (१५) ग्रंथालये **दोन ग्रंथालयांच्या** मार्फत वाचकांना देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मत नोंदविले आहे.

प्र. ३३वा. ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी चालविली जाते काय?

गरजू व आर्थिकदृष्या मागसवर्गीय वाचकांसाठी पुस्तक पेढी चालविली जाते का नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७४.**


**ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३२ | ०६ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ८४% | १६% | **१००%** |

८४% (३२) ग्रंथालये ही ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी योजनेला लाभ आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देतात तर १६% (०६) ग्रंथालये ही योजना राबवत नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**आलेख क्र. ५.६८**

**ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी बाबतचा प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




ह्यामध्ये अजून एक उपप्रश्न विचारण्यात आला होता की पुस्तक पेढी योजना चालविली जात असल्यास त्याबाबत लाभार्थी संख्या नोंदवावी. त्यास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.७५.**

**पुस्तक पेढी योजनेतील लाभार्थी दर्शविणारा आलेख.**


| **क्र.** | **तपशिल** | **०१ ते ५०** | **५१ ते १००** | **१०१ ते १५०** | **१५१ ते २००** | **२०१ ते २५०** | **२५१ ते ३००** | **एकूण / शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ०७ | ०७ | ०७ | ०३ | ०२ | ०६ | ३२ |
| २. | शेकडा प्रमाण | २२% | २२% | २२% | ०९% | ०६% | १९% | १००% |

एकूण ग्रंथालयापैकी ८४% (३२) ग्रंथालये ही पुस्तक पेढी योजनेला लाभ आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देतात त्यापैकी अनुक्रमे २२% (०७) ग्रंथालये ०१ ते ५०, ५१ ते १०० व १०१ ते १५० विद्यार्थी वाचकांना पुस्तक पेढी योजनेला लाभ देत असून त्याखाली १९% (०६) ग्रंथालये आपल्या विद्यार्थी वाचकांना २५१ ते ३०० दरम्यान लाभ देत आहेत

तर ०९% (०३) ग्रंथालये ही १५१ ते २०० व ०६% (०२) ग्रंथालये ही २०१ ते २५० च्या दरम्यान आहेत.

**आलेख क्र. ५.६९**

**पुस्तक पेढी योजनेतील लाभार्थी दर्शविणारा आलेख.**




प्र. ३४वा. ग्रंथालयामध्ये Digital Information Resources आहेत काय?

Digital Information Resources बाबत माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. होय किंवा नाही असे दोन पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.७६.**


**Digital Information Resources बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २८ | १० | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ८०% | २०% | **१००%** |

८०% (२८) ग्रंथालयात Digital Information Resources असून २०% (१०) ग्रंथालयात Digital Information Resources नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**आलेख क्र.५.७०.**

**Digital Information Resources बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**



सदर प्रश्नातच Digital Information Resources चे स्वरुप जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता.


**तक्ता क्र. ५.७७.**

**Digital Information Resources चे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Electronic Journals | २५ | **२६%** | ५. | CD Rom Databases | ०७ | **०७%** |
| २. | Electronic Books | २६ | **२७%** | ६. | Electronic Database | १४ | **१४%** |
| ३. | N-List Consortium | २० | **२०%** | ७. | इतर | ०० | **००%** |
| ४. | Electronic Reports | ०६ | **०६%** | | **एकूण** | ९८ | **१००%** |

**आलेख क्र. ५.७१**

**Digital Information Resources चे स्वरुप दर्शविणारा आलेख.**




**Digital Information Resources** बाबत प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे – एकूण ग्रंथालयापैकी २७% (२६) ग्रंथालयात Electronic Books, २६% (२५) ग्रंथालयात Electronic Journals, २०% (२०) ग्रंथालयात N-List Consortium, १४% (१४) ग्रंथालयातून Electronic Database तर CD Rom Databases ह्यास ०७% (०७) व Electronic Reports, ह्यास ०६% (०६) ग्रंथालयातून प्रतिसाद प्राप्त झाला असून इतर मध्ये एकाही ग्रंथालयाने मत नोंदविलेले नाही.

प्र. ३५वा. ग्रंथालयीन पुढील सेवांबाबत आपणास काय जाणवते?

ग्रंथालयातील सेवांबाबत अभिप्राय जाणून घेण्यासाठी पारंपारिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा असे प्रकार करण्यात आले आहेत. **पारंपरिक सेवांमध्ये** १. देवघेव सेवा, २. संदर्भ सेवा, ३. वाचनसाहित्य सूची सेवा, ४. वर्तमानपत्रे कात्रण सेवा, ५. बहिःशाल सेवा **आधुनिक सेवांमध्ये** ६. प्रचलित जागरुकता सेवा, ७. निवडक माहितीचे प्रसारण सेवा, ८. वाचकांना निर्देशन सेवा, ९. प्रतिलिपी सेवा, १०. सार सेवा **संगणक सेवांमध्ये** ११. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा १२. ओपेक सेवा, १३. ऑन लाईन डेटाबेस सेवा, १४. ऑफ लाईन डेटाबेस सेवा, १५. प्रलेख प्रदान सेवा. इ. सेवांचा समावेश करण्यात आला होता. त्या सेवा कशा वाटतात हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक सेवांमध्ये समाधानकारक, असमाधानकारक व सांगता येत नाही ह्या पर्यायांच्या आधारे अभिप्राय जाणून घेतला.

**तक्ता क्र. ५.७८**

**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

(समाधानकारक पर्यायानुसार)

| क्र. | तपशिल | **समाधानकारक** | | असमाधानकारक | | सांगता येत नाही | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| | **पारंपरिक सेवा** | | | | | | | | |
| १. | देवघेव सेवा | ३४ | **८९%** | ०४ | ११% | ०० | ००% | ३८ | १००% |
| २. | संदर्भ सेवा | ३२ | **८४%** | ०३ | ०८% | ०३ | ०८% | ३८ | १००% |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा | १६ | **४२%** | १५ | ३९% | ०७ | १८% | ३८ | १००% |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा | २६ | **६८%** | ०८ | २१% | ०४ | ११% | ३८ | १००% |
| ५. | बहिःशाल सेवा | २३ | **६१%** | ०९ | २४% | ०६ | १६% | ३८ | १००% |
| | **सरासरी** | **२६** | **६८%** | **०८** | **२१%** | **०४** | **११%** | **३८** | **१००%** |
| | **आधुनिक सेवा** | | | | | | | | |
| ६. | प्रचलित जागरुकता सेवा | २५ | **६६%** | ०९ | २४% | ०४ | ११% | ३८ | १००% |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा | १३ | **३४%** | २१ | ५५% | ०४ | ११% | ३८ | १००% |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा | ०८ | **२१%** | २३ | ६१% | ०७ | १८% | ३८ | १००% |
| ९. | प्रतिलिपी सेवा | १९ | **५०%** | १६ | ४२% | ०३ | ०८% | ३८ | १००% |
| १०. | सार सेवा | ०४ | **११%** | २२ | ५९% | ११ | ३०% | ३८ | १००% |
| | **सरासरी** | **१४** | **३६%** | **१८** | **४८%** | **०६** | **१६%** | **३८** | **१००%** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **संगणक सेवा** | | | | | | | | |
| ११. | इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा | २७ | **७१%** | ०७ | १८% | ०४ | ११% | ३८ | १००% |
| १२. | ओपेक सेवा | ३० | **७९%** | ०५ | १३% | ०३ | ०८% | ३८ | १००% |
| १३. | ऑन लाईन डेटाबेस सेवा | १४ | **३७%** | १७ | ४५% | ०७ | १८% | ३८ | १००% |
| १४. | ऑफ लाईन डेटाबेस सेवा | ०७ | **१८%** | २१ | ५५% | १० | २६% | ३८ | १००% |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा | ०९ | **२४%** | २१ | ५५% | ०८ | २१% | ३८ | १००% |
| | **सरासरी** | **१८** | **४६%** | **१४** | **३७%** | **०६** | **१७%** | **३८** | **१००%** |

**पारंपरिक सेवा :**

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, १. देवघेव सेवेबाबत (Lending) ८९% (३४), २. संदर्भ सेवेबाबत (Reference) ८४% (३२), ३. वर्तमानपत्रे कात्रण सेवेबाबत (Newspaper clippings Services) ६८% (२६) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ६८% (२६) पेक्षा जास्त असून ४. बहिःशाल सेवेबाबत (Extensive Services) ६१% (२३) ५. वाचनसाहित्य सूची सेवेबाबत (Bibliographical Services) ४२% (१६), ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ६८% (२६) पेक्षा कमी आहे. ग्रंथालयांनी वरील सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा ह्या अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आधुनिक सेवा :**


निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ६. प्रचलित जागरुकता सेवेबाबत (C.A. Services) ६६% (२५), ७. प्रतिलिपी सेवेबाबत (Indexing Services) ५०% (१९) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३६% (१४) पेक्षा जास्त असून, ८. निवडक माहितीचे प्रसारण सेवेबाबत (S.D.I. Services) ३४% (१३), ९. वाचकांना निर्देशन सेवेबाबत (Indexing Services) २१% (०८), १०. सार सेवेबाबत (Abstacting Services) ११% (०४) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ३६% (१४) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**संगणक सेवा :**

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ११. ओपेक सेवेबाबत (OPAC Search) ७९% (३०) १२. इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवेबाबत (Online Search) ७१% (२७), ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ४६% (१८) पेक्षा जास्त असून, १३. ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search) ३७% (१४), १४. प्रलेख प्रदान सेवेबाबत (DDS) २४% (०९), १५. ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search) १८% (०७), ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी ४६% (१८) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सेवांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.७२**

**ग्रंथालयीन सेवांबाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.** (समाधानकारक पर्यायानुसार)




प्र. ३६वा. वाचकांना ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना अडचणी येतात काय?

वाचकांना ग्रंथालयीन सेवा पुरविताना अडचणी येतात काय व असल्यास त्याचे स्वरुप जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

**तक्ता क्र. ५.७९.**


**ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना अडचणी बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३४ | ०४ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ८९% | ११% | **१००%** |

८९% (३४) ग्रंथालयात सेवा पुरविताना अडचणी येत असून ११% (०४) ग्रंथालयांना यात अडचणी येत नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

**आलेख क्र. ५.७३.**

**ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणी बाबत प्रतिसाद दर्शविणारा आलेख.**




उत्तर होय असल्यास त्याचे स्वरुप दर्शविणारा तक्ता


**तक्ता क्र. ५.८०.**

**ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणींचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|
| १ | अपूरा कर्मचारी वर्ग | ३४ | ३७% |
| २ | खंडित संगणक सेवा | २३ | २५% |
| ३ | अपुरा कालावधी | १८ | २०% |
| ४ | सुट्यांचे अधिक प्रमाण | १३ | १४% |
| ५ | इतर | ०४ | ०४% |
| | **एकूण** | **९२** | **१००%** |

**आलेख क्र. ५.७४.**

**ग्रंथालयामार्फत सेवा पुरवितांना अडचणींचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**



एकूण प्राप्त प्रतिसादांपैकी ८९% (३४) ग्रंथपालांना ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना अडचणी येत असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यामध्ये ३७% (३४) ग्रंथालयात अपूऱ्या कर्मचारी वर्गामुळे, २५% (२३) ग्रंथालयात खंडित संगणक सेवेमुळे, २०% (१८) ग्रंथालयात अपूऱ्या कालावधीमुळे, १४% (१३) ग्रंथालयात कर्मचारी वर्गांच्या सुट्यांचे अधिक प्रमाण असल्यामुळे तर ०४% (०४) ग्रंथालयात इतर कारणामुळे ग्रंथालयीन सेवा देतांना अडचणी जाणवतात. ग्रंथपालांनी वरील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

प्र३७वा. वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करुन घेण्यासाठी कोणते उपक्रम राबविले जातात?

ग्रंथालयामध्ये दर दिवशी नवनवीन ग्रंथांची भर पडत असते. ग्रंथालयामध्ये नव्याने जमा होणाऱ्या ग्रंथाची माहिती वाचकांना होणे गरजेचे असते. वाचनसाहित्यामध्ये सतत वाढ व त्याचा पुरेपूर वापर वाचकांकडून होणे गरजेचे आहे. त्यासाठी वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करुन घेण्यासाठी ग्रंथालयामार्फत नवनवीन उपक्रम राबविले जातात हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते.


**तक्ता क्र. ५.८१.**
**ग्रंथालयीन उपक्रम दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथप्रदर्शन | ३८ | १००% | ७. | निबंध लेखन | ०६ | १६% |
| २. | ग्रंथचर्चा | १२ | ३२% | ८. | विज्ञान वार्तापत्र | ०१ | ०३% |
| ३. | वक्तृत्व स्पर्धा | ०७ | १८% | ९. | वाचन स्पर्धा | ११ | २९% |
| ४. | वादविवाद स्पर्धा | ०३ | ०८% | १०. | ग्रंथालय तालिका | १३ | ३४% |
| ५. | दिनविशेष | १० | २६% | ११. | ग्रंथालय साक्षरता | २८ | ७४% |
| ६. | सामुहिक गायन स्पर्धा | ०१ | ०३% | १२. | इतर | ०६ | १६% |
| | | | | | **सरासरी** | **११** | **३०%** |

ग्रंथालय उपक्रमास मिळालेल्या प्रतिसादाप्रमाणे **उतरत्या क्रमाने** खालीलप्रमाणे ग्रंथालयांनी सर्वच ग्रंथालयीन उपक्रम प्रभावी राबविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत १. ग्रंथप्रदर्शन १००% (३८), २. ग्रंथालय साक्षरता ७४% (२८), ३. ग्रंथालय तालिका ३४% (१३), ९. ग्रंथचर्चा ३२% (१२) ह्या ग्रंथालयीन उपक्रमांची समाधानकारक पातळी सरासरी ३८% (११) पेक्षा जास्त आहे. ग्रंथालयांनी वरील उपक्रमांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा जास्त असलेले उपक्रम दर्जेदार राबविणे आवश्यक आहे तर ४. वाचन स्पर्धा २९% (११), ५. दिनविशेष २६% (१०), ६. वक्तृत्व स्पर्धा १८% (०७), अनुक्रमे ७. निबंध लेखन व, ८.

इतर १६% (०६), १०. वादविवाद स्पर्धा ०८% (०३), अनुक्रमे ११. सामुहीक गायन स्पर्धा व १२. विज्ञान वार्तापत्र ०३% (०१) ह्या ग्रंथालयीन उपक्रमांची समाधानकारक पातळी सरासरी ३०% (११) पेक्षा कमी आहे. ग्रंथालयांनी वरील उपक्रमांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेले उपक्रम अधिक प्रभावी राबविणे आवश्यक आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.७५.**
**ग्रंथालयीन उपक्रम दर्शविणारा आलेख.**




प्र. ३८वा. ग्रंथालयीन कार्यक्रमाबद्दल आपला अभिप्राय नोंदवा.

ग्रंथालयातील वाचकांसाठी कोणकोणते कार्यक्रम राबबिले जातात त्याबाबत अभिप्राय जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नात अत्यंत समाधानकारक, समाधानकारक, सांगता येत नाही, असमाधानकारक, अत्यंत असमाधानकारक असे एकूण पाच पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.८२.**
**ग्रंथालयीन कार्यक्रमांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**
(अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार)


| क्र. | तपशिल | **अत्यंत समाधानकारक** | | समाधानकारक | | सांगता येत नाही | | असमाधान कारक | | अत्यंत असमाधानकारक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | माहिती साक्षरतेचे वर्ग | ०९ | **२४%** | १७ | ४५% | ०० | ००% | ०६ | १६% | ०१ | ०३% |
| २. | संगणक साक्षरता उपक्रम | ०९ | **२४%** | १६ | ४२% | ०२ | ०५% | ०८ | २१% | ०० | ००% |
| ३. | स्मृतिदिन | ०८ | **२१%** | १४ | ३७% | ०२ | ०५% | ०६ | १६% | ०१ | ०३% |
| ४. | सामूहिक ग्रंथवाचन | ०३ | **०८%** | ०४ | ११% | ०५ | १३% | १५ | ३९% | ०० | ००% |
| ५. | गुणवंत वाचन पुरस्कार | ११ | **२९%** | १० | २६% | ०१ | ०३% | ०७ | १८% | ०१ | ०३% |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | आरोग्यविषयक कार्यक्रम | ०२ | **०५%** | ०८ | २१% | ०३ | ०८% | १५ | ३९% | ०० | ००% |
| ७. | **महिलांविषयी जनजागृती कार्यक्रम** | ०४ | **११%** | १४ | ३७% | ०५ | १३% | ०५ | १३% | ०० | ००% |
| ८. | स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन | १३ | **३४%** | १७ | ४५% | ०० | ००% | ०४ | ११% | ०१ | ०३% |
| ९. | मार्गदर्शन शिबीर | ११ | **२९%** | १० | २६% | ०२ | ०५% | ०७ | १८% | ०० | ००% |
| १०. | चित्रकला स्पर्धा | ०० | **००%** | ०४ | ११% | १२ | ३२% | ०९ | २४% | ०१ | ०३% |
| ११. | धार्मिक कार्यक्रम | ०० | **००%** | ०६ | १६% | १६ | ४२% | ०३ | ०८% | ०१ | ०३% |
| १२. | व्यवसाय मार्गदर्शन | ०८ | **२१%** | ०७ | १८% | ०९ | २४% | ०२ | ०५% | ०० | ००% |
| १३. | पर्यावरण जागृती शिबीरे | ०३ | **०८%** | ०७ | १८% | ०७ | १८% | ०८ | २१% | ०१ | ०३% |
| १४. | कृषीविषयक कार्यक्रम | ०० | **००%** | ०५ | १३% | १४ | ३७% | ०५ | १३% | ०१ | ०३% |

ग्रंथालयीन कार्यक्रमांबाबत प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **अत्यंत समाधानकारक** या निकषानुसार **उतरत्या क्रमाने** पाहणी केल्यास स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम ३४% (१३), गुणवंत वाचन पुरस्कार कार्यक्रम २९% (११), मार्गदर्शन शिबीर कार्यक्रमास २९% (११),माहिती साक्षरतेचे वर्ग २४% (०९), संगणक साक्षरता उपक्रम २४% (०९), स्मृतिदिन कार्यक्रम २१% (०८), व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम २१% (०८), महिलांविषयी जनजागृती कार्यक्रम ११% (०४), सामूहिक ग्रंथवाचन कार्यक्रम ०८% (०३), पर्यावरण जागृती शिबीर ०८% (०३), आरोग्यविषयक कार्यक्रमास ०५% (०२), ग्रंथालयात अत्यंत समाधानकारक पध्दतीने राबविले जात असल्याचे निर्दर्शनास येते.

**आलेख क्र. ५.७६**

**ग्रंथालयीन कार्यक्रमांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख.**



प्र. ३९वा. ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय?

ग्रंथालयामधील भौतिक सुविधेबाबतचे मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास दोन पर्याय देण्यात आले होते. १. होय, २. नाही.

**तक्ता क्र. ५.८३.**


**ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | तटस्थ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | १३ | २३ | ०२ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ३४% | ६१% | ०५% | **१००%** |

३४%(१३) ग्रंथपाल ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत समाधानी असून ६१% (२३) ग्रंथपाल ग्रंथालयातील समाधानी नाहीत तर ०५% (०२) ग्रंथपालांनी ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत तटस्थ असल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.७७.**

**ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबतचे मत दर्शविणारा आलेख.**




प्र. ४०वा. ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा?

ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबद्दल ग्रंथपालांना काय वाटते हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला असून सदर प्रश्नात एकूण १५ मूद्यांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्यात आला त्यामध्ये १. ग्रंथालयाची जागा, २. ग्रंथालयीन स्वच्छता, ३. फर्निचर – खुर्च्या, ४. फर्निचर – टेबलांबाबत, ५. फर्निचर – फूटरेस्टस, ६. प्रकाश योजना, ७. स्वछता गृह, ८. पिण्याचे पाणी, ९. वाचनकक्षाच्या क्षमता, १०. आवाज / ग्रंथालयाची शांतता, ११. खेळती हवा, १२. फ्लोरींग, १३. अंतर्गत मांडणी, १४. सूचना व मार्गदर्शक फलक, १५. अपंग वाचकांसाठी सुविधा इ. बाबत प्रत्येक मूद्यांमध्ये अत्यंत समाधानकारक,

समाधानकारक, सांगता येत नाही, असमाधानकारक, अत्यंत समाधानकारक या पर्यायांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

**तक्ता क्र. ५.८४.**

**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

(अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार)

| क्र. | तपशिल | **अत्यंत समाधानकारक** | | समाधानकारक | | सांगता येत नाही | | असमाधानकारक | | अत्यंत असमाधानकारक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण | ग्रंथपाल प्रतिसाद | शेकडा प्रमाण |
| १. | ग्रंथालयाची जागा | ०९ | **२४%** | ११ | २९% | ०० | ००% | १३ | ३४% | ०५ | १३% |
| २. | ग्रंथालयीन स्वच्छता | ०८ | **२१%** | २१ | ५५% | ०१ | ०३% | ०७ | १८% | ०१ | ०३% |
| ३. | फर्निचर – खुर्च्या | ०७ | **१८%** | १६ | ४२% | ०० | ००% | १४ | ३७% | ०१ | ०३% |
| ४. | फर्निचर – टेबल | ०७ | **१८%** | १७ | ४५% | ०० | ००% | १३ | ३४% | ०१ | ०३% |
| ५. | फर्निचर – फूटरेस्टस | ०४ | **११%** | १८ | ४७% | ०३ | ०८% | १० | २६% | ०३ | ०८% |
| ६. | प्रकाश योजना | १६ | **४२%** | २० | ५३% | ०० | ००% | ०२ | ०५% | ०० | ००% |
| ७. | स्वछता गृह | ०७ | **१८%** | ११ | २९% | ०० | ००% | १२ | ३२% | ०८ | २१% |
| ८. | पिण्याचे पाणी | ०८ | **२१%** | १० | २६% | ०० | ००% | १५ | ३९% | ०५ | १३% |
| ९. | वाचनकक्षाच्या क्षमता | ०५ | **१३%** | १२ | ३२% | ०० | ००% | १४ | ३७% | ०७ | १८% |
| १०. | आवाज/ ग्रंथालयीन शांतता | ०८ | **२१%** | २० | ५३% | ०० | ००% | ०६ | १६% | ०४ | ११% |
| ११. | खेळती हवा | १६ | **४२%** | १९ | ५०% | ०० | ००% | ०२ | ०५% | ०१ | ०३% |
| १२. | फ्लोरींग | १० | **२६%** | २१ | ५५% | ०१ | ०३% | ०४ | ११% | ०२ | ०५% |
| १३. | अंतर्गत मांडणी | १० | **२६%** | २३ | ६१% | ०२ | ०५% | ०२ | ०५% | ०१ | ०३% |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | १० | **२६%** | २२ | ५८% | ०० | ००% | ०४ | ११% | ०२ | ०५% |
| १५ | अपंग वाचकांसाठी सुविधा | ०६ | **१६%** | ०९ | २४% | ०० | ००% | १५ | ३९% | ०८ | २१% |
| | **सरासरी** | **०९** | **२४%** | **१७** | **४५%** | **००** | **००%** | **०९** | **२४%** | **०३** | **०८%** |

ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **अत्यंत समाधानकारक** या पर्यायानुसार **उतरत्या क्रमाने** केलेली आहे.


निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, १. प्रकाश योजनाबाबत ४२% (१६), २. खेळत्या हवेबाबत ४२% (१६), ३. फ्लोरींगबाबत २६% (१०), ४. अंतर्गत मांडणीबाबत २६% (१०), ५. सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत २६% (१०), ६. ग्रंथालयाच्या जागेबाबत

२४% (०९), ह्या भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २४% (०९) पेक्षा जास्त असून, ७. ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत २१% (०८), ८. पिण्याचे पाण्याबाबत २१% (०८), ९. आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत २१% (०८), १०. फर्निचर – खुर्च्याबाबत १८% (०७), ११. फर्निचर – टेबलांबाबत १८% (०७), १२. स्वछता गृहाबाबत १८% (०७), १३. फर्निचर – फूटरेस्टसबाबत ११% (०४) १४. अपंग वाचकांसाठी सुविधा १६% (०६), १५. वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत १३% (०५), ह्या भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी २४% (०९) पेक्षा कमी आहे. ग्रंथालयांनी भौतिक सुविधांचा प्राप्तांक सरासरी पेक्षा कमी असलेल्या भौतिक सुविधा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

**आलेख क्र. ५.७८.**

**ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल अभिप्राय दर्शविणारा आलेख.**

(अत्यंत समाधानकारक पर्यायानुसार)



प्र. ४१वा. ग्रंथालयास मिळणाऱ्या निधी / अनुदानाचे स्वरुप.

ग्रंथालयास वेगवेगळ्या स्वरुपात मिळणाऱ्या अनुदानाबाबत माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नास एकूण सात पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.८५.**


**ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ अनुदान आयोग | २३ | २९% | ५. | विद्यार्थी देणगी | ११ | १४% |
| २. | शासकीय अनुदान | १८ | २३% | ६. | देणगी | ०६ | ०८% |
| ३. | पालक संस्था | १३ | १६% | ७. | इतर | ०६ | ०८% |
| ४. | इतर संस्थेमार्फत | ०२ | ०३% | | **एकूण** | **७९** | **१००%** |

ग्रंथालयास वेगवेगळ्या स्वरुपात अनुदान प्राप्त होत असते त्यास मिळालेला प्रतिसाद **उतरत्या क्रमाने** पूढीलप्रमाणे २९% (२३) ग्रंथालयांना विद्यापीठ अनुदान आयोगमार्फत, २३% (१८) ग्रंथालयास शासकीय अनुदानतून, १६% (१३) ग्रंथालयास पालक संस्थेकडून आणि १४% (११) ग्रंथालयास विद्यार्थी देणगीच्या माध्यमातून तर अनुक्रमे ०८% (०६) ग्रंथालयास देणगी व इतर माध्यमातून निधी प्राप्त होते शिवाय ०३% (०२) ग्रंथालयास इतर संस्थेमार्फत निधी प्राप्त होते.

**आलेख क्र. ५.७९.**

**ग्रंथालयास मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**



प्र.४२वा. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत विशेष अनुदानांतर्गत ग्रंथालयास मिळत असलेले अनुदान.

ग्रंथालयास विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत विशेष अनुदानांतर्गत मिळत असलेल्या अनुदानाबाबत माहिती मिळविण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नास एकूण पाच पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.८६.**


**विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८वी योजना | ०२ | ०४% | ४. | ११वी योजना | २१ | ४६% |
| २. | ९वी योजना | ०२ | ०४% | ५. | १२वी योजना | १३ | २८% |
| ३. | १०वी योजना | ०८ | १७% | | **एकूण** | **४५** | **१००%** |

एकूण ग्रंथालयांपैकी २९% (२३) ग्रंथालयास विद्यापीठ अनुदान आयोगा मार्फत अनुदान प्राप्त होत असून त्यापैकी वेगवेगळ्या आयोगातर्फे मिळणाऱ्या अनुदानाच्या स्वरुपास मिळणारा प्रतिसाद **उतरत्या क्रमाने** पूढीलप्रमाणे ४६% (२१ ११व्या योजनेमार्फत, २८% (१३) १२व्यायोजने मार्फत, १७% (०८) १०व्यायोजने मार्फत तर अनुक्रमे ०४% (०२) ०८व्या व ०९व्या योजनेमार्फत अनुदान प्राप्त झाले आहे.

**आलेख क्र. ५.८०.**

**विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत मिळणाऱ्या अनुदानाचे स्वरुप दर्शविणारा आलेख.**




प्र. ४३वा. एकूण निधीतील किती टक्के भाग संदर्भसाधनांवर खर्च केला जातो.

एकूण निधीतील किती टक्के भाग विद्याशाखेतील संदर्भसाधनांवर केला जातो हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

सर्वच ग्रंथालयाने सर्वसाधारण १०% ते १५% भाग संदर्भसाधनांवर केला जात असल्याचे मत व्यक्त केले आहे.

प्र. ४४वा. मागील दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशिल.

ग्रंथालये वाचकांना वाचनसाहित्य इ. पुरवत असतांना प्रत्यक्ष त्यावर किती खर्च केला ह्याचे आकलन करुन घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.


**तक्ता क्र. ५.८७.**

**मागील दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशिल दर्शविणारा तक्ता.** **(सर्व आकडे हजारात)**

| | | वर्ष : २०१३ ते २०१४ | | | | | वर्ष : २०१४ ते २०१५ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | तपशिल | ०१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते १५० | १५१ ते २०० | २०० पेक्षा जास्त | ०१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते १५० | १५१ ते २०० | २०० पेक्षा जास्त |
| १. | ग्रंथखरेदी | १० | ०८ | १ | ० | १९ | ६ | १० | ४ | २ | १६ |
| २. | नियतकालिके | २६ | ०८ | ३ | १ | ० | १६ | १९ | २ | ० | १ |
| ३. | वृत्तपत्रे | ३४ | ०४ | ० | ० | ० | २९ | ८ | १ | ० | ० |
| ४. | बाईडींग | १७ | ०२ | ० | ० | ० | २२ | १ | १ | ० | ० |
| ५. | साधनसामग्री | ११ | ०० | ० | ० | ० | १६ | १ | ० | ० | ० |

**आलेख क्र. ५.८१.**

**मागील दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशिल दर्शविणारा आलेख.**



O-01. सन २०१३ ते २०१४ व सन २०१४ ते २०१५ ह्या कालावधीत सर्वच ग्रंथालयांनी आपल्या एकूण खर्चाच्या जास्तीत जास्त रक्कम ग्रंथखरेदीवर खर्च केली असून

सन २०१३ ते २०१४ ह्या कालावधीत ०१ ते ५० हजार रु. दरम्यान १० ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०८ ग्रंथालयांनी, तर २०० हजार रु. पेक्षा जास्त १९ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

सन २०१४ ते २०१५ मध्ये ह्याचे स्वरुप ०१ ते ५० हजार रु. दरम्यान ०६ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान १० ग्रंथालयांनी, १०१ ते १५० हजार रु. दरम्यान ०४ तर १५१ ते २०० दरम्यान ०२ आणि २०० हजार रु. पेक्षा जास्त १६ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

O-02. नियतकालिकांच्या बाबतीत सन २०१३ ते २०१४ च्या तूलनेत सन २०१४ ते २०१५ ह्या कालावधीत खर्चाचे प्रमाण कमी अधिक सारखेच असल्याचे आढळून येते.

सन २०१३ ते २०१४ ह्या कालावधीत ०१ ते ५० हजार रु. दरम्यान २६ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०८ ग्रंथालयांनी, तर १०१ ते १५० हजार रु. दरम्यान ०३ ग्रंथालयांने खर्च केल्याचे आढळून येते, १५१ ते २०० दरम्यान ०१ व २०० हजार पेक्षा जास्त ०० ग्रंथालय आहे.

सन २०१४ ते २०१५ मध्ये ०१ ते ५० हजार रु. दरम्यान १६ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान १९ ग्रंथालयांनी, १०१ ते १५० हजार रु. दरम्यान ०२ ग्रंथालयांने खर्च केल्याचे आढळून येते तर १५१ ते २०० दरम्यान ०० व २०० हजार पेक्षा जास्त ०१ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

O-03. वृत्तपत्रांच्याबाबतीत सन २०१३ ते २०१४ च्या तूलनेत सन २०१४ ते २०१५ ह्या कालावधीत खर्चाचे प्रमाण सारखेच असल्याचे आढळून आले.

सन २०१३ ते २०१४ ह्या कालावधीत ०१ ते ५० हजार रु. दरम्यान ३४ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०४ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

सन २०१४ ते २०१५ मध्ये ०१ ते ५० हजार रु. दरम्यान २९ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०८ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते तर १०१ ते १५० हजार रु. दरम्यान ०१ ग्रंथालयांने खर्च केल्याचे आढळून येते.

O-04. बाईंडींगबाबत सर्वच ग्रंथालयांच्या खर्चाचे प्रमाण कमी अधिक असल्याचे निदर्शनास येते. सन २०१३ ते २०१४ ह्या कालावधीत ०१ ते ५० हजार रु. दरम्यान १७ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०२ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते. तर सन २०१४ ते २०१५ मध्ये ०१ ते ५० हजार रु. दरम्यान २२ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०१ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

O-05. साधनसामग्रीबाबत सर्वच ग्रंथालयांच्या खर्चाचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास येते. सन २०१३ ते २०१४ ह्या कालावधीत ०१ ते ५० हजार रु. दरम्यान ११ ग्रंथालयांनी तर सन २०१४ ते २०१५ मध्ये ०१ ते ५० हजार रु. दरम्यान १६ ग्रंथालयांनी, ५१ ते १०० हजार रु. दरम्यान ०१ ग्रंथालयांनी खर्च केल्याचे आढळून येते.

प्र. ४५वा. नियतकालिकांची भाषावार संख्या.

ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची भाषा निहाय संख्या जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.८८.**

**नियतकालिकांची भाषा निहाय संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | १० ते २० | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ पेक्षा जास्त | एकूण / शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी नियतकालिके | ११ | ०३ | ०१ | ०० | ०० | ३८ |
| | | **७४%** | **१३%** | **१३%** | **00%** | **00%** | **१00%** |
| २. | हिंदी नियतकालिके | ३८ | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **१00%** | **00%** | **00%** | **00%** | **00%** | **१00%** |
| ३. | इंग्रजी नियतकालिके | २३ | ०२ | ०२ | ०२ | ०९ | ३८ |
| | | **६१%** | **0५%** | **0५%** | **0५%** | **२४%** | **१00%** |
| ४. | इतर भाषेची नियतकालिके | ०५ | ०० | ०० | ०० | ०० | ३८ |
| | | **३२%** | **00%** | **00%** | **00%** | **00%** | **१00%** |

O-01. मराठी नियतकालिके ७४% (११) ग्रंथालयात १० ते २० च्या दरम्यान असून अनुक्रमे १३% ग्रंथालयात २१ ते ३० व ३१ ते ४० च्या दरम्यान आहेत.


O-02. हिंदी नियतकालिके १००% (३८) ग्रंथालयात १० ते २० च्या दरम्यान आहेत.

O-03. इंग्रजी नियतकालिके ६१% (२३) ग्रंथालयात १० ते २० च्या दरम्यान असून ५१ पेक्षा जास्त २४% (०९) ग्रंथालयात आहेत तर अनुक्रमे ०५% (०२) ग्रंथालयात २१ ते ३०, ३१ ते ४०, ४१ ते ५० च्या दरम्यान आहे.

O-04. इतर भाषेची नियतकालिके ३२% (०५) ग्रंथालयात १० ते २० च्या दरम्यान आहेत.

**आलेख क्र. ५.८२.**

**नियतकालिकांची भाषा निहाय संख्या दर्शविणारा आलेख.**




ग्रंथालयात येणाऱ्या एकूण नियतकालिकांची संख्या खालील प्रमाणे :


**तक्ता क्र. ५.८९.**

**ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची एकूण संख्या दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | ०१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते १५० | १५१ ते २०० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल प्रतिसाद | १३ | १९ | ०५ | ०१ | **३८** |
| | शेकडा प्रमाण | ३४% | ५०% | १३% | ०३% | **१००%** |

**आलेख क्र. ५.८३.**

**ग्रंथालयात येणाऱ्या नियतकालिकांची एकूण संख्या दर्शविणारा आलेख.**



एकूण ग्रंथालयाच्या माध्यमातून एक गोष्ट निदर्शनास येते की, ५०% (१९) ग्रंथालयात ५१ ते १०० नियतकालिके, ३४% (१३) ग्रंथालयात ०१ ते ५० नियतकालिके आणि १३% (०५) ग्रंथालयात १०१ ते १५० नियतकालिके येत असून ०३% (०१) १५१ ते २०० च्या दरम्यान आहेत.


प्र. ४६वा. ग्रंथालयात येणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशिल :

ग्रंथालयात येणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांबाबत माहिती जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते. सदर प्रश्नास पुढील प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.९०.**
**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशिल दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | राष्ट्रीय | | | आंतरराष्ट्रीय | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०१ ते ५० | ५१ ते १०० | १०१ ते १५० | ०१ ते ०५ | ०६ ते १० | ११ ते १५ | |
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | २६ | ०७ | ०५ | १९ | ०४ | ०१ | **६२** |
| २. | शेकडा प्रमाण | ४२% | ११% | ०८% | ३१% | ०६% | ०२% | **१००%** |

**आलेख क्र. ५.८४.**
**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशिल दर्शविणारा आलेख.**




**राष्ट्रीय** ४२% (२६) ग्रंथालयात ०१ ते ५० दरम्यान राष्ट्रीय नियतकालिके येत असून ११% (०७) ग्रंथालयात ५१ ते १०० दरम्यान असून ०८% (०५) हेच प्रमाण १०१ ते १५० दरम्यान आहे.

**आतंरराष्ट्रीय** ३१% (१९) ग्रंथालयात ०१ ते ०५ दरम्यान आतंरराष्ट्रीय नियतकालिके येत असून ०६% (०४) ग्रंथालयात ०६ ते १० दरम्यान असून ०२% (०१) हेच प्रमाण ११ ते १५ दरम्यान आहे.

प्र.४७वा. आपल्या कोणत्या बलस्थानांची नॅक मूल्यांकनात आपल्या ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास मदत झाली असे आपणास वाटते.

नॅक मूल्यांकनात ग्रंथालयाची बलस्थाने तसेच ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास कोणत्या घटकांची मदत झाली हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.९१.**

**नॅक मूल्यांकनातील बलस्थाने तसेच ग्रंथालयांची प्रतिमा दर्शविणारा तक्ता.**


| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाचन साहित्य | ३३ | २०% | ६. | वाचनसाहित्य व्यवस्थापन | २५ | १५% |
| २. | प्रभावी मनुष्यबळ नियोजन निवड | १२ | ०७% | ७. | वाचकांना दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा | ३० | १८% |
| ३. | ग्रंथालय सेवा व विस्तारीत सेवा | ३५ | २१% | ८. | अंदाजपत्रक बनविण्याची पध्दत | ०८ | ०५% |
| ४. | शास्त्रीय संघटन | १२ | ०७% | ९. | इतर | ०४ | ०२% |
| ५. | संस्थेबाहेरील वाचकांना सेवांचे विपणन | ०९ | ०५% | | **सरासरी** | **१९** | **११%** |

एकूण प्राप्त प्रतिसादानुसार नॅक मूल्यांकनात ग्रंथालयांचे बलस्थाने तसेच ग्रंथालयांची प्रतिमा उंचावण्यास मदत झालेल्या घटकांचा **उतरत्या क्रमात** मांडणी खालीलप्रमाणे

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, १. ग्रंथालय सेवा व विस्तारीत सेवा २१% (३५), २. वाचन साहित्य २०% (३३), ३. वाचकांना दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा १८% (३०), ४. वाचनसाहित्य व्यवस्थापन १५% (२५), ह्या बलस्थानांची पातळी सरासरी ११% (१९) पेक्षा जास्त असून, ५. प्रभावी मनुष्यबळ नियोजन निवड ०७% (१२), ६. शास्त्रीय संघटन ०७% (१२), ७. संस्थेबाहेरील वाचकांना सेवांचे विपणन ०५% (०९), ८. अंदाजपत्रक बनविण्याची पध्दत ०५% (०८), ९. इतर ०२% (०४) ह्या बलस्थानांची पातळी सरासरी ११% (१९) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सदर बलस्थानांने अधिक प्रभावी केल्यास नॅक मूल्यांकनात तसेच ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास मदत होईल असे वाटते.

**आलेख क्र. ५.८५.**

**नॅक मूल्यांकनातील बलस्थाने तसेच ग्रंथालयांची प्रतिमा दर्शविणारा आलेख.**




प्र.४८वा. ग्रंथालयाच्या इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / साहाय्य केले जाते का?

ग्रंथालयात त्यांच्या वाचकांव्यतिरीक्त इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यांसाठी मार्गदर्शन केले जाते किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास पुढील प्रमाणे प्रतिसाद लाभला.

**तक्ता क्र. ५.९२.**


**इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / सहाय्य दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | होय | नाही | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथपाल प्रतिसाद | ३४ | ०४ | **३८** |
| २. | शेकडा प्रमाण | ८९% | ११% | **१००%** |

प्राप्त प्रतिसादापैकी ८९% (३४) ग्रंथालये इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / साहाय्य करतात तर ११% (०४) ग्रंथालये मार्गदर्शन / साहाय्य करीत नसल्याचे मत नोंदविले आहे.

**आलेख क्र. ५.८६.**

**इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / सहाय्य दर्शविणारा आलेख.**




प्र. ४९वा. ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी कोणत्या उपाय–योजना आहेत?

ग्रंथालयातील ग्रंथांचे संरक्षण, जतन व संवर्धनासाठी ग्रंथालयात कोणकोणत्या उपाययोजना आहेत हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्नाचे प्रयोजन करण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.९३.**


**ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी उपाय–योजना दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल | २७ | २१% | ४ | RFID यंत्रणा | ०२ | ०२% |
| २ | व्हॅक्यूम क्लिनिंग | १४ | ११% | ५ | डस्टिंग | १७ | १३% |
| ३ | CCTV यंत्रणा | ३१ | २४% | ६ | स्वच्छता व साफसफाई | ३७ | २९% |
| | | | | | **सरासरी** | **२१** | **१७%** |

निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, १. स्वच्छता व साफसफाई २९% (३७), २. CCTV यंत्रणा २४% (३१), ३. पेस्ट कंट्रोल २१% (२७), ह्या उपाय–योजनांची पातळी सरासरी १७% (२१) पेक्षा जास्त असून, ४. डस्टिंग १३% (१७), ५. व्हॅक्यूम क्लिनिंग ११% (१४), ६. RFID यंत्रणा ०२% (०२) ह्या उपाय–योजनांची पातळी सरासरी १७% (२१) पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी ह्या उपायांना झुकते माप दिले असल्याचे निदर्शनास येते.

**आलेख क्र. ५.८७.**

**ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी उपाय-योजना दर्शविणारा आलेख.**




प्र. ५०वा. ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) किती वर्षांनी करता?

ग्रंथालयात असलेल्या आणि नोंद केलेल्या प्रत्येक ग्रंथाशी, त्याच्या प्रतींची, नियतकालिकांच्या खंडांची तपासणी करुन तो ग्रंथ अथवा खंड ग्रंथालयात प्रत्यक्ष असल्याचे खात्री करणे म्हणजेच ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन करणे. हे अत्यंत महत्त्वाचे कार्य ग्रंथपालांना करावे लागते ते काम ग्रंथपाल किती वर्षांनी करतात हे जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास एकूण चार पर्याय देण्यात आले होते.

**तक्ता क्र. ५.९४.**


**ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक वर्ष | १६ | ४२% | ३ | पाच वर्ष | १० | २६% |
| २ | तीन वर्ष | ०८ | २१% | ४ | इतर | ०४ | ११% |
| | | | | | **एकूण** | **३८** | **१००%** |

४२% (१६) ग्रंथालये वर्षातून एकदा, २६% (१०) ग्रंथालये पाच वर्षाने, २१% (०८) ग्रंथालये तीन वर्षाने, इतर कालावधीत ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन करणारी प्रत्येकी ११% (०४) ग्रंथालये आहेत.

**आलेख क्र. ५.८८.**

**ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) दर्शविणारा आलेख.**




प्र. ५१वा. ग्रंथालयाच्या ग्रंथ परिगणन (Stock Verification) साठी कोणती पध्दत अवलंबितात?

ग्रंथ परिगणन करण्यासाठी ग्रंथालयात कोणती पध्दत अवलंबितात ते जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

**तक्ता क्र. ५.९५.**


**ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) पध्दत दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Shelf List | १९ | ४५% | ३. | Accession Register | १८ | ४३% |
| २. | Classified Part of the Catalogue | ०० | ००% | ४. | इतर पध्दत | ०५ | १२% |
| | | | | | **एकूण** | **४२** | **१००%** |

ग्रंथ परिगणन करण्यासाठी ४३% (१८) ग्रंथालये Accession Register नुसार तर ४५% (१९) ग्रंथालये Shelf List पध्दत, आणि १२% (०५) २७% ग्रंथालये Barcoding नुसार, Excel Sheet चा वापर करुन, संगणकीकृतव्दारे, इ. पध्दत अवलंबितात.

**आलेख क्र. ५.८९.**

**ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) पध्दत दर्शविणारा आलेख.**




प्र. ५२वा. वाचन साहित्य रद्दबातल करण्याची गरज भासते काय?

ग्रंथालयाची ग्रंथ संपदा कमी अधिक करण्याबाबतचे मत जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नास १००% म्हणजे सर्वच ग्रंथापालांनी रद्दबातल करण्याची गरज व्यक्त केली असून सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल ग्रंथपालांकडून खालील अभिप्राय नोंदविण्यात आले.

**तक्ता क्र. ५.९६.**


**वाचन साहित्य रद्दबातल बाबत अभिप्राय दर्शविणारा तक्ता.**

| क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण | क्र. | तपशिल | प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जागेची टंचाई | २८ | २५% | ४ | ग्रंथांचा शोध घेण्यात अडथळा | १४ | १३% |
| २ | उपयोगास अयोग्य | २९ | २६% | ५ | ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम | १८ | १६% |
| ३ | ग्रंथ सांभाळण्यावर होणारा खर्च | २२ | २०% | | **एकूण** | **१०७** | **१००%** |

वाचन साहित्य रद्दबातलबाबत २६% (२९) ग्रंथपालांना उपयोगास अयोग्य असलेले वाचन साहित्य, २५% (२८) ग्रंथपालांना जागेच्या टंचाईमुळे, २०% (२२) ग्रंथपालांना ग्रंथ सांभाळण्यावर होणाऱ्या खर्चामुळे. १६% (१८) ग्रंथपालांना ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने तर १३% (१४) ग्रंथपालांना ग्रंथांचा शोध घेण्यात अडथळा येत असल्यामुळे साहित्य रद्दबातल करण्याची गरज भासते.

**आलेख क्र. ५.९०.**

**वाचन साहित्य रद्दबातल बाबत अभिप्राय दर्शविणारा आलेख.**




प्र. ५३वा. ग्रंथालयीन विकासाबाबत भविष्यकालीन योजना.

ग्रंथपालांच्या मते ग्रंथालयाच्या विकासाबाबत योजना जाणून घेण्यासाठी सदर प्रश्न विचारण्यात आला होता.

प्राप्त सर्वेक्षणात मिळालेल्या प्रतिसादांची मांडणी **उतरत्या क्रमाने** पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र. ५.९७**

**ग्रंथपालांच्या दृष्टीने ग्रंथालयीन विकासाबाबत भविष्यकालीन योजना दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | प्रतिसाद | भविष्यकालीन योजना |
|---|---|---|
| ०१. | ४०% | ई–साधनसंपत्तीवर भर देण्याचा मानस आहे. |
| ०२. | ४०% | ग्रंथालयीन सेवेत Social Media चा प्रभावी वापर करणे. |
| ०३. | ३३% | ई–लर्निंग सुविधेत वाढ करणे. |
| ०४. | ३३% | ग्रंथालयाचे आधुनिकरण करणे व ग्रंथालयाच्या संपूर्ण कामकाजात संगणकाचा वापर करणे. |
| ०५. | ३३% | डिजिटल ग्रंथालयाकडे वाटचाल करणे. |
| ०६. | ३३% | वाचन साहित्याबाबतची माहीती Web OPAC व्दारे उपलब्ध करुन देणे. |
| ०७. | २७% | बारकोडचा अधिकाअधिक वापर करुन वेळेची बचत करणे. |
| ०८. | २०% | Instant Messsaging चा वापर करुन वाचकांना वेळोवेळी माहीती देणे. |
| ०९. | २०% | आंतर ग्रंथालयीन संबंध वृध्दिंगत करणे. |
| १०. | २०% | ग्रंथालयीन सूरक्षा, ग्रंथालयीन सांखिकीय अद्यावत माहीती प्राप्त होण्यासाठी Smart Card व्दारे ग्रंथालयात प्रवेश व ग्रंथालयीन वापरावर भर देणे. |
| ११. | १३% | ग्रंथांची मांडणी अधिक वाचकाभिमुख करण्याबाबत प्रयत्न करणे. |
| १२. | १३% | ग्रंथालयीन सेवा सुविधेचा वापर प्रभावी होण्यासाठी ग्रंथालयीन साक्षरता अभियान वेळोवेळी राबविणे आवश्यक वाटते. |
| १३. | १३% | ग्रंथालयीन संगणकीकरणावर विशेष भर देणे. |

| | | |
|---|---|---|
| १४. | १३% | संदर्भ साहित्यास RFID तंत्रज्ञाची जोड देणे. |
| १५. | ०७% | Web base Servicese सूरु करणे. |
| १६. | ०७% | Institutional Depositary संकल्पना राबविणे. |
| १७. | ०७% | Library Expanction ला प्राधान्य देणे. |
| १८. | ०७% | Compact Shelving वर भर देणे. |
| १९. | ०७% | इंटरनेट सेवा प्रभावी करणे. |
| २०. | ०७% | गुणवत्ता पूर्वक व दर्जेदार सेवा सुविधा देणे. |

## ५.६ सारांश :

सदर प्रकरणात संशोधन विषयासंदर्भातील माहिती प्रश्नावली या माहिती संकलन साधनाव्दारे संकलित केली आहे. माहिती संकलित करताना वाचक प्रश्नावली : विद्यार्थ्यांसाठी, वाचक प्रश्नावली : प्राध्यापकांसाठी व प्रश्नावली ग्रंथपालांसाठी अशा तीन स्वतंत्र प्रश्नावली तयार करुन भरुन घेण्यात आल्या. वाचकांच्या ग्रंथालयात भेटी बाबत, वाचना साहित्याबाबत, पुस्तकपेढीबाबत, ग्रंथालयीन सेवांबाबत (पारंपारीक, आधुनिक, संगणकीय सेवांबाबत) सेवा मिळवितांना येत असलेल्या अडचणी बाबत, वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वापरत असलेल्या साधनांबाबत, भौतिक सुविधांबाबत इ. पैलूंवरील मते जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केला असून त्याव्दारे प्राप्त झालेल्या माहितीचे सारणी स्वरुपात मांडणी केली. सारणीतील माहितीचे पृथ:करण करुन आलेखाव्दारे सादरीकरण केले व आलेखावरुन माहितीचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्यात आले.

तसेच सदर प्रकरणात ग्रंथपालांसाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नावलीचे स्वरुप हे ग्रंथालयाबाबत समग्र माहिती जाणून घेण्यासाठी मार्गदर्शक ठरली. सदर प्रश्नावलीत ग्रंथालय व ग्रंथालयीन कर्मचारी, त्यांसाठी प्रशिक्षणाची सोय, कामकाजाचे तास, ग्रंथालयाचे वर्गीकरण, तालिकीकरण, संगणकीकरण, ग्रंथालयाचे क्षेत्रफळ, ग्रंथालय समिती, ग्रंथसंपदा, ग्रंथालयीन साधनसामग्री, ग्रंथालयीन सेवा, ग्रंथालयीन उपक्रम, कार्यक्रम, भौतिक सुविधा, अनुदानाची आकडेवारी, विभागवार खर्च तपशिल, ग्रंथालयीन मूल्यमापन, वाचनसाहित्य रद्दबातल इ. बाबत सविस्तर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तिन्ही प्रश्नावलीच्या माध्यमातून ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबचा अभिप्राय जाणून घेऊन सारणीच्या स्वरुपातील माहितीचे शास्त्रीय पध्दतीने विश्लेषण करण्यात आले आहे.

=== XOX ===

## प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी.

## ६.१ प्रस्तावना :

**''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** सदर संशोधनासाठी जी उद्दिष्ट्ये ठरविली होती त्या उद्दिष्ट्यांच्या अनुषंगाने सर्व ग्रंथालयांचे तथ्य संकलनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर करुन प्रस्तुत संशोधनाच्या पाचव्या प्रकरणात सविस्तर विश्लेषण केले आहे. सदर विश्लेषणातून निर्धारीत केलेले निरीक्षण व निष्कर्ष तसेच या निरीक्षण व निष्कर्षांच्या आधारे केलेल्या शिफारशी प्रस्तुत प्रकरणात विषद केल्या आहेत शिवाय प्रस्तूत संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधकास जाणवणाऱ्या पुढील संशोधनाच्या दिशा विशद केल्या आहेत.

## ६.२ विश्लेषणाव्दारे काढलेले निष्कर्ष :

### ६.२.१ संशोधनाचे निष्कर्ष विद्यार्थी वाचक :

**विद्यार्थी वाचक प्रश्नावलीच्या** माध्यमातून संशोधक **उद्दिष्टनिहाय निष्कर्ष** खालीलप्रमाणे विशद करीत आहे.

**उद्दिष्ट क्र. ०१ :– संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.**

०१. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल विद्यार्थी प्रश्नावलीत विद्यार्थांपेक्षा विद्यार्थीनीचे प्रतिसाद देण्याचे प्रमाण जास्त असून विद्याशाखानिहाय पाहता वाणिज्य शाख़ेतील विद्यार्थी वाचक ग्रंथालयाचा उपयोग जास्त करीत असल्याचे लक्षात येते शिवाय वर्षनिहाय वाचकांचा विचार केल्यास प्रथम वर्षातील वाचक ग्रंथालयाचा वापर जास्त करीत आहेत.

०२. विद्यार्थी वाचकांपैकी दोन दिवसातून एकदा ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांची संख्या जास्त असून त्यांचा मूख्य उद्देश अभ्यासिकेत बसणे व ग्रंथ देवघेव करणे असा असून ग्रंथालयात एक ते दोन तासासाठी येत असल्याचे निष्कर्षास येते.

०३. वाचन साहित्यात सर्वसाधारण ग्रंथाबाबत विद्यार्थी वाचक समाधानी आहेत.

०४. ग्रंथालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तक पेढीचा लाभ विद्यार्थी वाचक घेत आहेत.

**उद्दिष्ट क्र. ०२ : सद्य:स्थितीतील ग्रंथालयीन सेवा–सुविधांची माहिती अभ्यासणे.**

०५. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा–सुविधांची माहिती अभ्यासता असे लक्षात येते की, ग्रंथालयात एकूण १५ सेवा दिल्या जात असून पारंपरिक सेवांमध्ये देवघेव सेवा (Lending), संदर्भ सेवा (Reference), वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper Clippings Services) आणि आधुनिक सेवांमध्ये वाचकांना निर्देशन सेवेबाबत (Indexing Services), निवडक माहितीचे प्रसारण सेवा (S.D.I. Services), प्रचलित जागरुकता सेवा (C.A. Services) तर संगणक सेवांमध्ये इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग (Online Search) सेवा, ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search), १३. ओपेक सेवा (OPAC Search) समाधानकारक दिल्या जातात.

०६. ग्रंथालयातील सुविधांबाबतची माहीती एकूण १४ मुद्यांच्या माध्यमातून जाणून घेण्यात आली. त्यामध्ये ग्रथालयीन स्वच्छतेबाबत, प्रकाश योजनेबाबत, खेळत्या हवेबाबत, फर्निचर – खुर्च्यांबाबत, फर्निचर – टेबलांबाबत, फर्निचर – फूटरेस्टसबाबत विद्यार्थी वाचक अत्यंत समाधानी आहेत.

**उद्दिष्ट क्र. ०३ :– ग्रंथालयीन सेवा–सुविधा देतांना आलेल्या अडचणींची नोंद घेणे.**

०७. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केल्यानंतर ६८% (१११८) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत असून ३७% (६६७) विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहीती नसल्याबाबतचे लक्षात येते.

०८. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांच्या बाबतीत ४७% (७७१) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा जाणवत नाहीत.

**उद्दिष्ट क्र. ०४ :–ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.**

०९. विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वर्तमानपत्र, इंटरनेटवरील माहिती, प्रिंटेड पुस्तकांचा वापर, प्रिंटेड नियतकालिके , ई–जर्नल्स, ई–बुक्स इ. साधनांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास येते.

१०. वाचन साहित्यात सर्वसाधारण ग्रंथाबाबत विद्यार्थी वाचक ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी आहेत.

**उद्दिष्ट क्र. ०५ :– महाविद्यालयीन लाभार्थींच्या ग्रंथालयीन सेवा–सुविधांबाबतची समाधानकारकता अभ्यासणे.**

११. ग्रंथालयामार्फत पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा दिल्या जातात. पारंपरिक सेवांमध्ये देवघेव सेवा (Lending), संदर्भ सेवा (Reference), वर्तमानपत्र कात्रण सेवा (Newspaper Clippings Services) आणि आधुनिक सेवांमध्ये निर्देशन सेवा (Indexing Services), निवडक माहितीचे प्रसारण सेवा (S.D.I. Services), प्रचलित जागरुकता सेवा (C.A. Services) तर संगणक सेवांमध्ये इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवेबाबत (Online Search), ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search), ओपेक सेवा (OPAC Search) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने विद्यार्थी वाचक सदर सेवांबाबत समाधानी असल्याचे निष्कर्षास येते.

१२. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा पुरेशा असून ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत, प्रकाश योजनाबाबत, खेळत्या हवेबाबत, फर्निचर – खुर्च्यांबाबत, फर्निचर – टेबलांबाबत, फर्निचर – फूटरेस्टस इ. भौतिक सुविधांची समाधानकारता पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने सदर सुविधांबाबत विद्यार्थी वाचक समाधानी असल्याचे निष्कर्षास येते.

**६.२.२ संशोधनाचे निष्कर्ष प्राध्यापक वाचक :**

प्राध्यापक वाचक प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधक उद्दिष्टनिहाय निष्कर्ष खालीलप्रमाणे विशद करीत आहे.

**उद्दिष्ट क्र. ०१ :– संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.**

१३. सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचक प्रश्नावलीत पुरुष प्राध्यापकांपेक्षा स्त्री प्राध्यापकांनी सदर प्रश्नावलीस जास्त प्रतिसाद दिला असून विद्याशाखा निहाय पाहता वाणिज्य शाखेतील प्राध्यापक वाचक ग्रंथालयाचा वापर जास्त

करीत असून सेवाकालनिहाय प्राध्यापक वाचकांमध्ये ०६ ते १० वर्ष सेवाकाल असणारे प्राध्यापक वाचक जास्त आहेत.

१४. प्राध्यापक वाचकांपैकी दोन दिवसातून एकदा ग्रंथालयात येणाऱ्या वाचकांची संख्या जास्त असून त्यांचा मूख्य उद्देश संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी व ग्रंथ देवघेवीसाठी असल्याचे निष्कर्षास येते.

१५. ग्रंथालयीन वाचनसाहित्यातील सर्वसाधारण ग्रंथाबाबत प्राध्यापक वाचक समाधानी आहेत.

१६. ग्रंथनिवडीमध्ये प्राध्यापक वाचकांचा सहभाग असून ६१% (४७६) प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालय समितीमध्ये भाग घेतला नाही.

१७. ग्रंथालयात प्राध्यापक वाचकांना स्वतंत्र संदर्भकक्ष असून सर्वेक्षणासाठी निवडलेल्या नमुन्यादाखल प्राध्यापक वाचकांपैकी ६६% (५१५) प्राध्यापक वाचकांनी संशोधन केले असून त्यापैकी ७३% (३७४) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग झाला असल्याचे निष्कर्षास येते.

**उद्दिष्ट क्र. ०२ :– सद्य:स्थितीतील ग्रंथालयीन सेवा–सुविधांची माहिती अभ्यासणे.**

१८. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांबाबत अभ्यासता असे लक्षात येते की ग्रंथालयात एकूण १५ सेवा दिल्या जात असून पारंपरिक सेवांमध्ये देवघेव सेवा (Lending) व संदर्भ सेवेबाबत (Reference) आधुनिक सेवांमध्ये निर्देशन सेवा (Indexing Services), प्रचलित जागरुकता सेवेबाबत (C.A. Services) व प्रतिलिपी सेवा (Indexing Services) संगणक सेवांमध्ये इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search), ओपेक सेवा (OPAC Search), ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search) ह्या सेवा समाधानकारक आहेत.

१९. ग्रंथालयीन सुविधांबाबतची माहीती एकूण १४ मुद्यांच्या माध्यमातून जाणून घेण्यात आली. त्यामध्ये खेळत्या हवेबाबत, प्रकाश योजनाबाबत, ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत, फर्निचर – टेबलांबाबत, फर्निचर – खुर्च्यांबाबत, अंतर्गत मांडणीबाबत, आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत, ग्रंथालयाच्या जागेबाबत प्राध्यापक वाचक अत्यंत समाधानी असल्याचे निदर्शनास येते.

**उद्दिष्ट क्र. ०३ :– ग्रंथालयीन सेवा–सुविधा देतांना आलेल्या अडचणींची नोंद घेणे.**

२०. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केल्यानंतर ५६% (४३८) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत असून ५५% (४३०) प्राध्यापक वाचकांना ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा जाणवत नाहीत.

**उद्दिष्ट क्र. ०४ :– ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.**

२१. ग्रंथालयीन ग्रंथसंग्रहाबाबत ४९% (३८१) प्राध्यापक वाचक समाधानी असून ग्रंथालयातील पूरक वाचन साहित्यात प्रिंटेड पुस्तकांबाबत, इंटरनेटवरील माहितीबाबत, वर्तमानपत्रांबाबत विद्यार्थांना शिफारस करीत असल्याचे लक्षात येत.

२२. प्राध्यापक वाचक आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी ग्रंथालयातील प्रिंटेड पुस्तके, इंटरनेटवरील माहिती, वर्तमानपत्रे, प्रिंटेड नियतकालिके, ई–बुक्स, ई–जर्नल्स इ. साधनांस प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास येते.

**उद्दिष्ट क्र. ०५ :– महाविद्यालयीन लाभार्थींच्या ग्रंथालयीन सेवा–सुविधांबाबतची समाधानकारकता अभ्यासणे.**

२३. निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, ग्रंथालयामार्फत पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा दिल्या जातात. पारंपारिक सेवांमध्ये देवघेव सेवा (Lending), संदर्भ सेवा (Reference), आधुनिक सेवांमध्ये वाचकांना निर्देशन सेवा (Indexing Services), प्रचलित जागरुकता सेवा (C.A. Services), व प्रतिलिपी सेवा (Indexing Services) तर संगणक सेवांमध्ये इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search), ओपेक सेवा (OPAC Search), ऑन लाईन डेटाबेस (Online Database Search) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने प्राध्यापक वाचक सदर सेवांबाबत समाधानी असल्याचे निष्कर्शास येते.

२४. प्राध्यापक वाचकांनी ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा पुरेशा नसून खेळत्या हवेबाबत, प्रकाश योजनाबाबत, ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत, फर्निचर – टेबलांबाबत, फर्निचर – खुर्च्याबाबत, अंतर्गत मांडणीबाबत, आवाज / ग्रंथालयाच्या

शांततेबाबत, ग्रंथालयाच्या जागेबाबत ह्या भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने सदर सुविधांबाबत समाधानी असल्याचे निष्कर्षास येते.

### ६.२.३ संशोधनाचे निष्कर्ष ग्रंथपाल :

संशोधनाचे निष्कर्श ग्रंथपाल प्रश्नावलीच्या माध्यमातून खालीलप्रमाणे विशद करीत आहे.

**उद्दिष्ट क्र. ०१ :– संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचा सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.**

२५. ठाणे व पालघर जिल्हायात संशोधनासाठी पात्र एकूण ३९ वरिष्ठ महाविद्यालये असून ७६% (२९) ग्रंथालयात शासनाच्या ग्रंथालयीन आकृतीबंधानुसार ग्रंथालयात कर्मचारी नियुक्ती केलेले आहेत. ६३% (२४) ग्रंथालयात ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय आहे. ह्यामध्ये ग्रंथपाल आपल्या कर्मचारी वृंदासाठी प्रत्येक कर्मचाऱ्यांस स्वतंत्र मार्गदर्शन स्वरुपात, अन्य संस्थाकडे पाठवून प्रशिक्षित करणे, कार्यशाळांच्या आयोजन व व्यावसायिक शिक्षणाकरीता इ. पध्दतीने प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न करतात.

२६. सर्वच ग्रंथालये एकाच विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येत असून विद्यापीठाच्या निकषांनुसार सर्वच ग्रंथालयांचे कामांचे तास सारखेच आहे. फक्त कामांच्या दिवसामध्ये थोड्या अधिक दिवसांचा फरक असल्याचे जाणवते.

२७. वाचन साहित्याच्या वर्गीकरण पध्दती बाबत सर्वच ग्रंथालयात DDC (Dewey Decimal Classification) दशांश वर्गीकरण पध्दतीचा वापर होत असून तालिकीकरण AACR-2 नुसार आहे.

२८. ग्रंथालयाच्या संगणकीकरणाबाबत ८७% (३३) ग्रंथालयांचे संगणकीकरण झाल्याचे निदर्शनास येत असून ४५% (१५) ग्रंथालयामध्ये SOUL आज्ञावलीचा तर त्या खाली इतर आज्ञावलीचा प्रभावी वापर होत असल्याचे लक्षात येते.

२९. स्वतंत्र इमारतीबाबत फक्त २६% (१०) ग्रंथालयांना स्वत:ची इमारत असल्याची बाब लक्षात येते.

३०. सर्वच ग्रंथालयात ग्रंथालय समिती असून समितीत कमीत कमी ३२% (१२) ग्रंथालयात पाच व १३% (०५) ग्रंथालयात जास्तीत जास्त अकरा सभासद असून ग्रंथालय समितीचा कालावधी एक वर्षाचा आहे. ग्रंथालय समितीच्या सभा नियमितपणे घेतल्या जातात. ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग ४७% (१८) समाधानकारक होत असल्याचे निदर्शनास येते.

**उद्दिष्ट क्र. ०२ :– सद्य:स्थितीतील ग्रंथालयीन सेवा–सुविधांची माहिती अभ्यासणे.**

३१. १६% (०६) ग्रंथालयातील अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असून ४७% (१८) ग्रंथालयामधील अभ्यासिकेतील आसनव्यवस्था विद्यार्थ्यांच्या एकूण क्षमतेच्या १०% इतकी आहे. ३२% (१२) ग्रंथालयात विद्यार्थी वाचकांना सरासरी ५१ ते १०० दरम्यान ग्रंथांची देवाण घेवाण दररोज केली जाते, १००% (३८) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० प्राध्यापक वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते, ६३% (२४) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० कर्मचारी वर्गास ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते तर २९% (११) ग्रंथालयात सरासरी ०१ ते ५० अभ्यागत (Visiters) वाचकांना ग्रंथांची देवाण घेवाण केली जाते. विद्यार्थी वाचकांना दिलेला ग्रंथ सात दिवस म्हणजे एक आठवडा देण्यात येतो सदर देय कालावधी नंतर येणाऱ्या ग्रंथास दर दिवशी रु एक विलंब शुल्क लावतात.

३२. सद्य:स्थितीतील ४७% (१८) ग्रंथालयामधील उपलब्ध असलेले फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा पुरविण्यासाठी पुरेसे असून १६% (०६) ग्रंथालयामध्ये दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग आहे. तर मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य ८४% (३२) ग्रंथालयात असल्याचे निदर्शनास येते आणि ८२% (३१) ग्रंथालयात अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे.

३३. ८०% (२८) ग्रंथालयामध्ये Digital Information Resources असून त्यामध्ये Electronic Books, Electronic Journals, N-List Consortium, Electronic Database CD Rom Databases Electronic Reports, इ. Resources ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

३४. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची माहिती अभ्यासता असे लक्षात येते की, ग्रंथालयात एकूण १५ सेवा दिल्या जात असून त्यांची वर्गवारी पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केली आहे. पारंपरिक सेवांमध्ये देवघेव सेवा (Lending), संदर्भ सेवा (Reference), वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings Services) आधुनिक सेवांमध्ये प्रचलित जागरुकता सेवा (C.A. Services), प्रतिलिपी सेवा (Indexing Services) संगणक सेवांमध्ये ओपेक सेवा (OPAC Search), इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search) ह्या सेवा समाधानकारक आहेत.

३५. वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करुन घेण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथालय साक्षरता हे उपक्रम प्रभावी राबविले जात असून ग्रंथालयीन कार्यक्रमात स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम, गुणवंत वाचन पुरस्कार कार्यक्रम, मार्गदर्शन शिबीर कार्यक्रमास, माहिती साक्षरतेचे वर्ग, संगणक साक्षरता उपक्रम, स्मृतिदिन कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम इ. कार्यक्रम ग्रंथालयात अत्यंत समाधानकारक पध्दतीने राबविले जात असल्याचे निदर्शनास येते.

३६. ग्रंथालयीन सुविधांबाबतची माहीती एकूण १५ मुद्यांच्या माध्यमातून जाणून घेण्यात आली त्यामध्ये प्रकाश योजनाबाबत, खेळत्या हवेबाबत, फ्लोरींगबाबत, अंतर्गत मांडणीबाबत, सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत, ग्रंथालयाच्या जागेबाबत, ग्रंथपाल अत्यंत समाधानी आहेत.

३७. ग्रंथालयास विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत, शासकीय अनुदान, पालक संस्थेकडून, ग्रंथालयास विद्यार्थी देणगीच्याच्या माध्यमातून, निधी प्राप्त होते. सन २०१३ ते २०१४ व सन २०१४ ते २०१५ ह्या कालावधीत सर्वच ग्रंथालयांची तुलना केली असता आपल्या एकूण खर्चाच्या जास्तीत जास्त रक्कम ग्रंथखरेदीवर खर्च केली असून नियतकालिकांच्या बाबतीत, वृत्तपत्रांच्या बाबतीत व बाईंडींग बाबत सन २०१३ ते २०१४ च्या तूलनेत सन २०१४ ते २०१५ ह्या कालावधीत खर्चाचे प्रमाण कमी अधिक सारखेच असल्याचे आढळून येते तर साधनसामग्री बाबत सर्वच ग्रंथालयांच्या खर्चाचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास येते.

३८. सर्वच ग्रंथालयामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी नियतकालिके येत असून नॅक मूल्यांकनात ग्रंथालयाचे बलस्थाने तसेच ग्रंथालयाचे प्रतिमा उंचावण्यास ग्रंथालय सेवा व विस्तारित सेवा, वाचन साहित्यामुळे, ग्रंथपालांनी ग्रंथालयातील वाचकांना दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा, वाचनसाहित्य व्यवस्थापन, प्रभावी मनुष्यबळ नियोजन निवड व ग्रंथालयातील शास्त्रीय संघटन, इ. घटकास नॅक मूल्यांकनात ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास मदत झाल्याचे निष्कर्षास येते.

३९. ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी अनुक्रमे ग्रंथालयांनी स्वच्छता व साफसफाई, CCTV यंत्रणा, ग्रंथालयांनी पेस्ट कंट्रोल, ग्रंथालयांनी डस्टिंग, ग्रंथालयांनी व्हॅक्यूम क्लिनिंग तर RFID ह्या उपायाव्दारे संरक्षण केले जात असल्याचे निष्कर्षास येते.

४०. ४२% (१६) ग्रंथालये वर्षातून एकदा, २६% (१०) ग्रंथालये पाच वर्षाने, २१% (०८) ग्रंथालये तीन वर्षाने, इतर कालावधीत ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन करणारी प्रत्येकी ११% (०४) ग्रंथालये आहेत. ग्रंथ परिगणन करण्यासाठी ४३% (१८) ग्रंथालये Accession Register नुसार तर ४५% (१९) ग्रंथालये Shelf List पध्दत, आणि १२% (०५) २७% ग्रंथालये Barcoding नुसार, Excel Sheet चा वापर करुन, संगणकीकृतव्दारे, इ. पध्दत अवलंबितात.

४१. वाचन साहित्य रद्दबातलबाबत अनुक्रमे ग्रंथपालांना उपयोगास अयोग्य असलेले वाचन साहित्य, जागेच्या टंचाईमुळे, ग्रंथ सांभाळण्यावर होणाऱ्या खर्चामुळे, ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने तर ग्रंथपालांना ग्रंथांचा शोध घेण्यात अडथळा येत असल्यामुळे साहित्य रद्दबातल करण्याची गरज भासते.

**उद्दिष्ट क्र. ०३ :- ग्रंथालयीन सेवा-सुविधा देतांना आलेल्या अडचणींची नोंद घेणे.**

४२. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपारीक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केल्यानंतर सदर सेवांबद्दल ८९% (३४) ग्रंथपालांना ग्रंथालयाच्या सेवा पुरवितांना अडचणी येतात ग्रंथपालांच्या मते अपुरा कर्मचारी वर्ग, खंडित संगणक सेवा, अपुरा कालावधी, ग्रंथालयीन कर्मचारी वर्गांच्या सुट्यांचे अधिक प्रमाण इ. अडचणी जाणवतात.

४३. ६१% (२३) ग्रंथपाल ग्रंथालयातील भौतिक सुविधेबाबत समाधानी नाहीत. एकूण १५ मुद्यांच्या माध्यमातून अभिप्राय जाणून घेण्यात आला.

**उद्दिष्ट क्र. ०४ :– ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.**

४४. वाचन साहित्याच्या वर्गीकरण पध्दतीबाबत असे निदर्शनास येते की, सर्वच ग्रंथालयात DDC (Dewey Decimal Classification) दशांश वर्गीकरण पध्दतीचा वापर होत आहे. ६८% (२६) ग्रंथालयाची तालिका अद्ययावत असून ८४% (३२) ग्रंथालयाये ही (AACR-2) नुसार तर १६% (०६) ग्रंथालयाये ही (इतर) नुसार म्हणजे (OPAC) स्वरुपात तालिकाकरण करत असल्याचे दिसून येते. ८७% (३३) ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले आहे. थोडक्यात वर्गीकरण, तालिकीकरण व ग्रंथालयाचे संगणकीकरण केलेल्या ग्रंथालयात वाचकांना ग्रंथालयीन सेवा अधिकाअधिक चांगल्या मिळण्यास मदत होते.

४५. २६% (१०) ग्रंथालयास स्वतःची इमारत असल्याने, १६% (०६) ग्रंथालयात अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असल्याने, ४७% (१८) ग्रंथालयामधील अभ्यासिकेतील आसनव्यवस्था विद्यार्थ्यांच्या एकूण क्षमतेच्या १०% इतकी असल्याने वाचकांना ग्रंथालयाचा वापर अधिकाअधिक करण्यास मिळत आहे.

४६. ४७% (१८) ग्रंथपालांच्या मते ग्रंथालय समितीचा ग्रंथालयाच्या विकासात समाधानकारक उपयोग होत असल्याने ग्रंथालयांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ प्रभावी होत आहे.

४७. ४७% (१८) ग्रंथालयामधील उपलब्ध असलेले फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा पूरविण्यास पुरेसे असून, १६% (०६) ग्रंथालयात दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग असल्याने, ८४% (३२) ग्रंथालयामध्ये मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध असल्याने, ८२% (३१) ग्रंथालयामध्ये अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध असल्याने ग्रंथालयीन सुविधांचा वाचकांवर प्रभाव पडत असल्याचे निर्देशनास येते.

४८. ६३% (२४) ग्रंथालये ही आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देत असून एकूण प्राप्त प्रतिसादापैकी **एका ग्रंथालयामार्फत** आंतर ग्रंथालयीन

सेवेचा लाभ वाचकांना ६१% (२३) ग्रंथालयामार्फत दिली जातो तर हीच सेवा ३९% (१५) ग्रंथालये **दोन ग्रंथालयांच्या** मार्फत वाचकांना देण्याचा प्रयत्न करीत असल्याचे लक्षात येते.

४९. ८४% (३२) ग्रंथालये ही ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी योजनेला लाभ आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देतात.

**उद्दिष्ट क्र. ०५ :– महाविद्यालयीन लाभार्थींच्या ग्रंथालयीन सेवा–सुविधांबाबतची समाधानकारकता अभ्यासणे.**

५०. ग्रंथालयामार्फत पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा दिल्या जातात. **पारंपरिक सेवांमध्ये** देवघेव सेवा (Lending), संदर्भ सेवा (Reference), वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings Services) आधुनिक सेवांमध्ये प्रचलित जागरुकता सेवा (C.A. Services), प्रतिलिपी सेवा (Indexing Services) संगणक सेवांमध्ये ओपेक सेवा (OPAC Search), इंटरनेट, ई मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने ग्रंथपाल सदर सेवांबाबत समाधानी असल्याचे निष्कर्शास येते.

५१. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबाबत ६१% (२३) ग्रंथपाल ग्रंथालयातील समाधानी नसून प्रकाश योजनाबाबत, खेळत्या हवेबाबत, फ्लोरींगबाबत, अंतर्गत मांडणीबाबत, सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत, ग्रंथालयाच्या जागेबाबत, ह्या भौतिक सुविधांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा जास्त असल्याने सदर सुविधांबाबत ग्रंथपाल समाधानी असल्याचे निष्कर्शास येते.

## ६.३ शिफारशी :

**संशोधनाचे उद्दिष्ट क्र. ०६ :– संशोधनावर आधारीत निष्कर्षंगाने शिफारशी देणे.**

### ६.३.१ संशोधनाच्या शिफारशी विद्यार्थी वाचक :

०१. विद्यार्थींनींचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण जास्त असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्र व प्रशस्त अभ्यासिका आवश्यक वाटते. अभ्यासिकेत जास्तीत जास्त ग्रंथालयीन सुविधांचा समावेश करणे गरजचे आहे. काही महाविद्यालयांत स्वतंत्र अभ्यासिका असून त्याची

क्षमता अधिक नसल्याने, विद्यार्थीनी वाचक अधिकाधिक सामावून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक वाटते.

०२. एकूण विद्यार्थी वाचकांपैकी कला व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनां ग्रंथालयात आकर्षित करण्यासाठी योग्य ते नियोजन करणे व त्या वाचकांना त्यांच्या गरजेनुसार वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे आवश्यक वाटते.

०३. वाचकांना ग्रंथालयाचा वापर अधिकाधिक करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माहिती साक्षरतेचे वर्ग, संगणक साक्षरता उपक्रम, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन इ. उपक्रम राबविणे व त्यांची परीणामकारता वाढविणे गरजेचे वाटते.

०४. वाचकांच्या ग्रंथालयात एकूण भेटी देण्याचे प्रमाण पाहता ग्रंथालयातील सद्यस्थितीत असणाऱ्या ग्रंथालयीन सेवा अधिक वाचकाभिमुख करणे आवश्यक वाटतात. तसेच ग्रंथालयीन भौतिक सुविधांचा उपयुक्तता अधिक वाढण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक वाटते.

०५. ग्रंथालयीन वाचनसाहित्यात ग्रंथालयांनी सर्वसाधारण ग्रंथ, क्रमिक ग्रंथ व संदर्भ ग्रंथांची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे आवश्यक आहे तसेच ग्रंथालयीन बहिःशाल सेवा, प्रचलित जागरुकता सेवा इ. सेवा व माहिती साक्षरतेचे वर्ग, मार्गदर्शन शिबीर, इ. कार्यक्रम प्रभावी करणे आवश्यक वाटते.

०६. ग्रंथालयामार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तक पेढीचा जास्तीत जास्त विद्यार्थी वाचकांनी लाभ घेणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथपालांनी मुंबई विद्यापीठ, विद्यार्थी कल्याण विभाग परीपत्रक क्र. वि. क. वि. / १५ /२०१६ च्या परीपत्रकत नमूद केलेल्या नियमांची अमंलबजावणी करुन योजना अधिकाधिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्रभावी राबविणे आवश्यक आहे.

०७. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केली असता पारंपरिक सेवांमध्ये वाचनसाहित्य सूची सेवेबाबत (Bibliographical Services), बहिःशाल सेवा (Extensive Services) आधुनिक सेवांमध्ये प्रतिलिपी सेवेबाबत (Indexing Services), सार सेवेबाबत

(Abstacting Services) तर संगणक सेवांमध्ये ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search), प्रलेख प्रदान सेवा ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सरासरी पेक्षा कमी असलेल्या सेवा, अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

०८. ६८% (१११८) विद्यार्थी वाचकांना ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना अडचणी येत असून विद्यार्थी वाचकांनी ग्रंथालयीन सेवांबाबत पुरेशी माहीती नाही, ग्रंथालयीन वेळा सोयीच्या नाहीत थोडक्यात ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयीन सेवांबाबत आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. तसेव ग्रंथालयातील सेवा अधिक वाचकाभिमुख होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम / कार्यक्रम ग्रंथालयत राबविणे आवश्यक आहे.

०९. विद्यार्थी वाचक ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी वेगवेगळया साधनांचा उपयोग करतांना ग्रंथालयांनी अनेक साधनांबाबत ग्रंथालयीन जागृती निर्माण करुन ते वापरण्याबाबतचे तंत्र वाचकांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. तसे झाल्यास ग्रंथालयीन साधनांचा वापर प्रभावी होऊन ग्रंथालयीन सेवा वृध्दींगत होतील.

१०. ग्रंथालयातील भौतिक सुविधांमध्ये फ्लोरींगबाबत, आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत, सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत, ग्रंथालयाच्या जागेबाबत, पिण्याचे पाण्याबाबत, अंतर्गत मांडणीबाबत, वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत, स्वछता गृहाबाबत ह्या सुविधा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

### ६.३.२ संशोधनाच्या शिफारशी प्राध्यापक वाचक :

११. स्त्री प्राध्यापकांचे ग्रंथालयात येण्याचे प्रमाण जास्त असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्र व प्रशस्त अभ्यासिका असणे आवश्यक वाटते. अभ्यासिकेत जास्तीत जास्त ग्रंथालयीन सुविधांचा समावेश करणे गरजचे आहे.

१२. कला व विज्ञान शाखेच्या प्राध्यापकांना ग्रंथालयात आकर्षित करण्यासाठी योग्य ते नियोजन करणे व त्या वाचकांना त्यांच्या गरजेनुसार वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे आवश्यक वाटते.

१३. ग्रंथालयातील सद्यस्थितीत असणारे ग्रंथालयीन भौतिक सुविधांचा वापर करीत आहेत त्याची उपयुक्तता अधिक वाढण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक वाटते.

१४. ग्रंथालयीन वाचनसाहित्यात सर्वसाधारण ग्रंथाबाबत २९% (२२३) प्राध्यापक वाचक, क्रमिक ग्रंथांबाबत ४१% (३१९) प्राध्यापक वाचक, संदर्भ ग्रंथाबाबत ३५% (२७०) प्राध्यापक वाचक **असमाधानी** असल्याने प्राध्यापक वाचकांना ग्रंथनिवडीच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिवाय अधिकाअधिक प्राध्यापक वाचकांना ग्रंथालय समितीमध्ये समावून घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर ग्रंथालयांनी बहि:शाल सेवा, प्रचलित जागरुकता सेवा इ. सेवा व माहिती साक्षरतेचे वर्ग, मार्गदर्शन शिबीर, इ. कार्यक्रम प्रभावी करणे आवश्यक वाटते. सर्वसाधारण ग्रंथ, क्रमिक ग्रंथ व संदर्भ ग्रंथांची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे आवश्यक आहे.

१५. संशोधन कार्यासाठी लागणारे वाचन साहित्य ग्रंथालयात उपलब्ध करुन संशोधनाचे कार्याक्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१६. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची वर्गवारी पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणक सेवा अशी एकूण तीन भागात केली असून पारंपरिक सेवांमध्ये वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services), वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings Services), बहिःशाल सेवा (Extensive Services) आधुनिक सेवांमध्ये निवडक माहितीचे प्रसारण सेवेबाबत (S.D.I. Services), सार सेवेबाबत (Abstact Services) संगणक सेवांमध्ये ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search), प्रलेख प्रदान सेवा (DDS) ह्या सेवा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

१७. ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबाबत प्राध्यापक वाचक समाधानी नसून ग्रंथालयांनी फ्लोरींगबाबत, सूचना व मार्गदर्शक फलकांबाबत, फर्निचर – फूटरेस्टसबाबत, स्वछता गृहाबाबत, वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत, पिण्याचे पाण्याबाबत इ. सुविधा अधिक प्रभावी देणे आवश्यक आहे.

### ६.३.३ संशोधनाच्या शिफारशी ग्रंथपाल :

संशोधकाने ग्रंथालयाच्या दृष्टीने प्रश्नावली या साधनाव्दारे प्राप्त झालेल्या संकलित माहितीच्या विश्लेषणावरुन काढलेले शिफारशी ह्या पुढीलप्रमाणे सूचविण्यात आल्या आहेत.

१८. ग्रंथालयीन कर्मचारी नियुक्ती :

१. ग्रंथालयात कर्मचारी वृंद आकृतीबंधाप्रमाणे असावा ह्यासाठी प्रयत्न करणे. ग्रंथालयातील वाचनसाहित्यांचा प्रभावी वापर होण्यासाठी ग्रंथालयातील सेवकवर्ग हा शैक्षणिक दृष्ट्या पात्रतासंपन्न असला पाहीजे. सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य शैक्षणिक पात्रता प्राप्त करण्यासाठी प्रवृत्त करावे. सर्वच ग्रंथालयांनी दरवर्षी वाढणारी विद्यार्थी संख्या व मर्यादित असलेला कर्मचारी वृंद प्रसंगानुरुप कर्मचाऱ्यांची कमतरता भासत असल्यास पर्यायी व्यवस्था करावी. त्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमा अंतर्गत कर्मचारी संख्या वाढविण्यासाठी लक्ष देणे गरजेचे आहे. उदा. कमवा आणि शिका योजना, ग्रंथालय क्षेत्रात नव्याने येणारे विद्यार्थी इ.

१९. ग्रंथालयाचे कामकाजाचे दिवस :

१. सर्वच ग्रंथालयांनी वाचकांसाठी कामकाजाचे दिवस अधिकाअधिक वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथालयातील अभ्यासिका, वाचन दालन साप्ताहिक सुट्टयांच्या दिवशी, सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी खुली ठेवण्यात यावी. तसेच परीक्षेच्या कालावधीमध्ये ग्रंथालयाच्या कामकाजाच्या वेळा वाचकांच्या सोयीनुसार वाढविण्यात याव्यात. सदर सेवा देत असतांना ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची उपलब्धी व त्यांना रोटेशन पध्दतीची रजा देऊन ग्रंथालयीन कामकाज चालविणे आवश्यक वाटते.

२०. ग्रंथालयीन कामकाजाच्या वेळा :

१. ग्रंथालयीन कामकाजाचे तास वाढविण्याच्या प्रयत्नात दररोज असणारा कर्मचारीवृंद दोन शिफ्टमध्ये वर्गवारी करुन ग्रंथालये सकाळी लवकर तर संध्याकाळी उशिरापर्यंत चालू राहिल याकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

२१. ग्रंथालय इमारत व पायाभूत सुविधा :

१. ७४% (२८) महाविद्यालयीन ग्रंथालयाचे स्थान मुख्य इमारतीत असून ग्रंथपालांनी आपल्या प्रत्यक्ष व संभाव्य वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन ग्रंथालयाचे एकूण विभागवार विभागणी करुन ग्रंथालय विकसित करणे आवश्यक आहे.

२. सर्वच ग्रंथालयांनी आपल्याकडे सद्य:स्थितीत असलेल्या ग्रंथालयींन क्षेत्रफळाचे योग्य व्यवस्थापन करुन अधिकाअधीक क्षेत्रफळ हे स्वागतकक्ष, बैठक व्यवस्था, वाचन कक्ष,

नियतकालिक विभाग, देवघेवविभाग, संदर्भ विभाग, प्राध्यापक वाचन कक्ष तसेच स्वतंत्र अभ्यासिका ह्या देणे आवश्यक आहे.

३. सर्वच ग्रंथालयांनी सद्य:स्थितीत असलेल्या इमारतीचे चटई क्षेत्राचा विचार करुन त्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. शक्य झाल्यास ग्रंथालयाचे क्षेत्र अधिकाधीक वाढविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे व ग्रंथालयाचे विस्तारीकरण कार्य सातत्याने करत राहणे आवश्यक आहे.

२२. ग्रंथालय समिती :

१. सर्वच ग्रंथालयात ग्रंथालय समिती असून ग्रंथालयांनी ग्रंथालयीन समितीच्या सभासदांची व वर्षभरात होणाऱ्या सभांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथालयीन समितीचा उपयोग ग्रंथालयाच्या विकासासाठी करणे संयुक्तिक ठरेल.

२३. ग्रंथालयाची ग्रंथसंपदा :

१. ग्रंथालयाच्या उद्दिष्टानुसार व वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथालयात विभिन्न, विश्वासार्ह आणि अद्ययावत ग्रंथसंग्रहाची वाढ करणे आवश्यक आहे. छापील, ऑनलाईन, ऑफलाईन स्वरुपातील वाचन साहित्य व त्या साहित्यासाठी लागणारी साधने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. सर्व माहिती साधने शासन, विद्यापीठ अनुदान मंडळ आणि तत्सम मंडळाच्या निकषानुसार असावीत. ग्रंथालयात ग्रंथ, पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धात्मक परिक्षेसाठीचे वाचन साहित्य, मानके, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रचलित नियतकालीके, बॅक व्हॉल्यूम, सीडी / डिव्हीडी, दृकश्राव्य इ. स्वरुपात ग्रंथसंग्रह असणे अपेक्षित आहे.

२. ग्रंथालयांनी ग्रंथसंपदेतील संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला प्राधान्य देणे अत्यंत गरजेचे आहे.

२४. ग्रंथसंपदेचा एकूण वापर (Extent of the Use of Services)

१. ग्रंथालयीन कार्याची गुणवत्ता टिकविण्यासाठी ग्रंथालयीन कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे हा आढावा ग्रंथालयीन सेवेच्या वापरावरील आकडेवारीवरुन घेणे गरजेचे आहे.

२. ग्रंथालया मार्फत विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग, अभ्यागतांना जास्तीत जास्त वाचनसाहीत्याची देवाण घेवाण करणे आवश्यक आहे. देवाण घेवाण केलेल्या वाचन साहित्याची नोंदी घेणे आवश्यक आहे.

२५. ग्रंथालयीन साधनसामग्री :

१. ५३% (२०) ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा याकरीता पुरेसे नसून ८४% (३२) ग्रंथालयामध्ये दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग नाही तर १६% (०६) ग्रंथालयामध्ये मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध नाही. १८% (०७) ग्रंथालयामध्ये अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध नाही. थोडक्यात सर्वच ग्रंथालयींनी ग्रंथालयात उपलब्ध फर्निचर, दृकःश्राव्य साधने, मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य, अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्य ह्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

२. सर्वच ग्रंथालयांनी मुद्रीत व अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्याची संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढ करावी.

३. ग्रंथालयातील मूद्रीत वाचनसाहित्याचे वर्गीकरण व तालिकीकरण योग्य प्रकारे होत असून दरवर्षी नव्याने ग्रंथालयात दाखल होणाऱ्या वाचन साहित्याचे वर्गीकरण व तालिकीकरण केले जात आहे. सर्वच ग्रंथालयांनी त्यासंबंधी दाखलनोंदवहीत नियमित नोंद करणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथालयांनी अद्यावत तालिका वाचकांना पुरविण्यासाठी संगणकीय आज्ञावली योग्य वापर व उपयोग करण्यासंबंधी प्रयत्न करावा.

२६. ग्रंथालयीन सेवा :

१. संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संस्थेने ग्रंथालयामार्फत प्रमाण बध्द गुणवत्ता पूर्ण सेवांची सोय करणे आवश्यक आहे. ग्रंथालयातर्फे संख़्यात्मक व गूणात्मक सेवा देणे क्रमप्राप्त आहे. ह्यामध्ये ग्रंथालयीन सेवांना पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा, संगणकीय सेवांमध्ये वर्गवारी करुन सेवा देणे गरजेचे आहे.

२. निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, **पारंपरिक सेवांमध्ये** बहिःशाल सेवा (Extensive Services), वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services), तर **आधुनिक सेवांमध्ये** निवडक माहितीचे प्रसारण सेवेबाबत (S.D.I. Services), वाचकांना निर्देशन सेवेबाबत (Indexing Services), सार सेवेबाबत (Abstacting Services) आणि

**संगणक सेवांमध्ये** ऑन लाईन डेटाबेसबाबत (Online Database Search), प्रलेख प्रदान सेवेबाबत (DDS), ऑफ लाईन डेटाबेसबाबत (Offline Database Search) ह्या सेवांची समाधानकारक पातळी सरासरी पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी वरील सेवा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

३. ग्रंथपालांना ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना ग्रंथालयात अपूऱ्या कर्मचारी वर्ग, ग्रंथालयात खंडित संगणक सेवा, ग्रंथालयात अपूऱ्या कालावधीमुळे, ग्रंथालयात कर्मचारी वर्गांच्या सुट्यांचे अधिक प्रमाण तर इतर कारणामुळे ग्रंथालयीन सेवा देतांना अडचणी जाणवतात. ग्रंथपालांनी वरील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

४. ग्रंथालयांनी वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षीत करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे आवश्यक आहे. प्रामुख्याने ग्रंथालय साक्षरता, संगणक साक्षरता, ग्रंथप्रदर्शन, दिनविशेष, वाचन स्पर्धा इ.

५. ग्रंथालयीन कार्यक्रमांत माहिती साक्षरतेचे वर्ग, संगणक साक्षरता उपक्रम, स्मृतिदिन कार्यक्रम, सामूहिक ग्रंथवाचन कार्यक्रम, गुणवंत वाचन पुरस्कार कार्यक्रम, आरोग्यविषयक कार्यक्रम, महिलांविषयी जनजागृती कार्यक्रम, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम इ. कार्यक्रम प्रभावी राबविणे आवश्यक आहे.

६. ग्रंथालयांनी ग्रंथालयात संगणकाचा वापर फक्त दैनंदिन कामासाठी न करता ग्रंथालयीन सेवा–सुविधा पूरविण्यासाठी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संगणकावर आधारीत सर्वच सेवा व **Digital Information Resources** यामध्ये Electronic Books, Electronic Journals, N-List Consortium, Electronic Database ह्यांचा प्रभावी वापर करण्यासंदर्भात विस्तृत मार्गदर्शन वेगवेगळ्या कार्यक्रमा अंतर्गत करणे आवश्यक आहे.

७. १६% (०६) ग्रंथालये ही ग्रंथालया मार्फत पुस्तक पेढी योजना आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देत नाहीत. ग्रंथालयांनी ह्याबाबत प्रभावी कार्य करणे आवश्यक आहे.

८. सर्वच ग्रंथालयात ग्रंथालयीन सेवा–सुविधा कमी अधिक प्रमाणात समाधानकारक असल्याने ग्रंथालयीन सेवा–सुविधांव्दारे वाचकांना प्रभावी करणे आवश्यक आहे.

त्यासाठी प्रत्येक ग्रंथालयांनी दर पाच वर्षात एक नवीन सेवा तर दरवर्षी एक नवीन सुविधा या प्रमाणात ग्रंथालयाची प्रगती करणे गरजेचे आहे.

२७. ग्रंथालयीन सुविधा :

१. ६१% (२३) ग्रंथपालांच्या मतानुसार ग्रंथालयात सध्या असलेल्या भौतिक सुविधा पुरेशा नाहीत. परिणामी ग्रंथालयाच्या सेवा–सुविधांवर अधिक ताण पडत असल्यामुळे ग्रंथालयाचा दर्जा ढासळण्याची दाट शक्यता नकारता येत नाही.

२. ग्रंथालयीन स्वच्छतेबाबत, पिण्याचे पाण्याबाबत, आवाज / ग्रंथालयाच्या शांततेबाबत, फर्निचर – खुर्च्याबाबत, फर्निचर – टेबलांबाबत, स्वछता गृहाबाबत, फर्निचर – फूटरेस्टसबाबत, अपंग वाचकांसाठी सुविधांबाबत, वाचनकक्षाच्या क्षमतेबाबत इ. भौतिक सुविधा अधिक दर्जेदार देणे आवश्यक आहे.

३. ग्रंथालयाच्या पायाभूत सूविधांवर जास्त लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाच्या पायाभूत सूविधांमध्ये, ग्रंथालयीन शांतता, वाचकांसाठी आसन व्यवस्था, नियतकालिकांचे डिसप्ले रॅक, प्रकाश योजना, ग्रंथालयात पुरेसे व सूयोग्य फर्निचर, टेबल्स इ. ग्रंथालयीन सुविधेत खेळती हवा, पिण्याचे शुध्द पाणी, स्वच्छता गृह, ग्रंथालयात सूचना व मार्गदर्शक फलक इ. सोयी ग्रंथालयात उपलब्ध करुन देणे आवश्यक असून अभ्यासिकेतील आसन व्यवस्था विद्यार्थी व शिक्षक यांच्या एकूण क्षमतेच्या १०% असणे आवश्यक आहे.

२८. अर्थव्यवस्था व ग्रंथालयास मिळणारे अनुदान :

१. ग्रंथालयाच्या अर्थव्यवस्थेमध्ये प्रमाण बध्द् वाढ होणे आवश्यक आहे. संस्थेची व्याप्ती, विविध वाचन साहित्यावरील खर्च, माहिती तंत्रज्ञान उपलब्धते वरील खर्च अधोरेखित केला पाहिजे. राज्य, केंद्र, व विद्यापीठ अनुदान मंडळा खेरीज मिळणारे अनुदान वाचन साहित्य, ग्रंथखरेदी व ग्रंथालयीन सेवांच्या विकासासाठी वापरला जाणे आवश्यक आहे.

२. ग्रंथालयास वेगवेगळ्या स्वरुपात अनुदान प्राप्त होत असते त्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, शासकीय अनुदान, पालक संस्थेकडून आणि विद्यार्थी देणगीच्या माध्यमातून तर ग्रंथालयास देणगी व इतर माध्यमातून निधी प्राप्त होते यामध्ये यु.जी.सी. विशेष

अनुदानाअंतर्गत अधिका अधिक अनुदान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

३. ग्रंथालयीन सेवा अधिक प्रभावी देण्यासाठी दर्जेदार साधनसामुग्रीची आवश्यकता असते त्यासाठी ग्रंथालयांनी विद्यापीठ अनुदान आयोगा अंतर्गत वेगवेगळ्या योजनेची माहीती घेऊन योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करुन ग्रंथालयास अधिक निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

४. ग्रंथालयाने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर उपलब्ध नियतकालिकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यामध्ये OPAC सेवा, इंटरनेटव्दारे उपलब्ध माहितीस्त्रोत, Online Database व Offline Database, N-List Consortium आदी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२९. ग्रंथालयीन मूल्यमापन :

१. एकूण प्राप्त प्रतिसादानुसार नॅक मूल्यांकनात प्रभावी मनुष्यबळ नियोजन निवड, शास्त्रीय संघटन, संस्थेबाहेरील वाचकांना सेवांचे विपणन, अंदाजपत्रक बनविण्याची पध्दत, ह्या बलस्थानांची पातळी सरासरी पेक्षा कमी असल्याने ग्रंथालयांनी सदर बलस्थाने अधिक प्रभावी केल्यास नॅक मूल्यांकनात तसेच ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास मदत होईल असे वाटते.

३०. ग्रंथालय संरक्षण, ग्रंथ परिगणन, वाचन साहित्य रद्दबातल :

१. ग्रंथालय संरक्षणाबाबत निरीक्षणावरुन असे लक्षात येते की, स्वच्छता व साफसफाई, CCTV यंत्रणा, पेस्ट कंट्रोल, डस्टिंग, व्हॅक्यूम क्लिनिंग ह्या उपाय–योजनांचा वापर ग्रंथालयांनी अधिक प्रमाणात करणे आवश्यक आहे.

२. ग्रंथालयांनी त्यांचे ग्रंथ परिगणना वेळोवेळी करणे आवश्यक आहे त्यासाठी ग्रंथालयांनी Accession Register, Shelf List पध्दत, Barcoding चा वापर, Excel Sheet चा वापर तसेच संगणकीकृतव्दारे, इ. पध्दत अवलंबिणे आवश्यक आहे.

३. वाचन साहित्य रद्दबातलबाबत उपयोगास अयोग्य असलेले वाचन साहित्य, जागेच्या टंचाईमुळे, ग्रंथ सांभाळण्यावर होणाऱ्या खर्चामुळे आणि ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम

होत असल्याने तर ग्रंथपालांना ग्रंथांचा शोध घेण्यात अडथळा येत असल्यामुळे साहित्य वेळेवेळी रद्दबातल करणे आवश्यक आहे.

३१. ग्रंथालयीन संगणक व इंटरनेट सेवा :

१ ग्रंथालयात संगणक व इंटरनेट सेवा वाचकांना पूरविली जाणे आवश्यक असून ई–ग्रंथालय सुविधा पुरविण्यासाठी पुरेसे संगणक ग्रंथालयात असावेत. आवश्यक इंटरनेट सेवा व त्या व्दारे ई–साधने, डिजीटल माहितीसेवा ग्रंथालयातून देण्यात यावी.

३२. ग्रंथालयीन संगणकीकरण :

१. ८७% (३३) ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असून १३% (०५) ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले नसून ग्रंथालयीन कामकाजासाठी ग्रंथालयीन आज्ञावलीचा वापर करुन ग्रंथालयातील उपलब्ध वाचन साहित्याच्या व वाचकांच्या नोंदीं आज्ञावलीत करणे आवश्यक आहे.

२. ग्रंथालय / महाविद्यालयांनी स्वत:ची वेबसाईट तयार करुन वाचकांसाठी खास विशेष दालन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथालयांनी आधुनिक संपर्क माध्यमांचा क्षेत्रात पाय रोवले पाहिजेत.

३. माहितीच्या मायाजालात, माहिती तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेसाठी दूरध्वनी, ई–मेल, फेसबुक, वॅट्सेफ, ट्विटर, इ. साधनांचा पुरेपुर वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथालयांनी इंटरनेटच्या माध्यमाने ग्रंथालयीन सेवा २४/७ पध्दतीने सुरु केल्यास वाचकांची मोठी सोय होईल.

३३. ग्रंथालयाच्या भविष्यकालीन योजना :

१. ग्रंथालयाच्या भविष्यकालीन योजनेत प्रामुख्याने सर्वच ग्रंथालयांनी ग्रंथांची देवाण घेवाण करण्यासाठी बारकोड तंत्रज्ञानाचा वापर केल्यास वेळेची बचत होईल तसेच OPAC, WEB OPAC च्या माध्यमातून वाचनसाहित्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

२. ग्रंथालयात शिस्तीसंबंधी, ग्रंथालय नियमाबाबत सूचना लिहलेले फलक कायम वाचकांच्या ये–जा करण्याच्या ठिकाणी असणे आवश्यक आहे तसेच ग्रंथालयत प्रवेश मार्गापासून ते ग्रंथालयात जाण्यासाठी ठिकठिकाणी दिशादर्शक फलक आणि वाचकांना

सूचना व मार्गदर्शक फलक लावणे आवश्यक आहे. त्यामूळे नवीन वाचकांना, पाहुण्यांना ग्रंथालयात येणे सहज सोपे होईल.

३. ग्रंथालयात स्वतंत्र सूचनाफलक असावा. ग्रंथालयात नव्याने दाखल होणाऱ्या वाचनसाहित्याची यादी सूचनाफलकावर वेळोवेळी प्रकाशित करणे.

४. ग्रंथालयांनी ग्रंथ गहाळ होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रवेश आणि निर्गम व्दारावर कडक दक्षता ठेवणे, ग्रंथांच्या प्रतिलिपी (झेरॉक्स प्रती) उपलब्ध करुन देण्याच्या सोयी वाढविणे आणि परीक्षेच्या कालावधीत ग्रंथालये जास्त वेळ उघडी ठेवणे इ. उपाय योजना करणे आवश्यक आहे.

५. धूळ, कचरा आणि जंतूंपासून ग्रंथांचे रक्षण करण्यासाठी ग्रंथालये, ग्रंथ कपाटे इ. नियमितपणे स्वच्छ करणे ही एक ग्रंथ संरक्षणाची महत्वाची बाब आहे. ग्रंथालयांनी ग्रंथ संरक्षणासाठी नियमित पेस्टीसाईट करणे, दररोज ग्रंथालय साफ करणे, Vacuum Cleaner च्या साहाय्याने साफ सफाई करणे इ. मार्ग अवलंबिले जात असून ग्रंथालयीन इमारत, यंत्रसामग्री, मालमत्ता यांची नासाडी होऊ नये यासाठी रासायनिक फवारणी करणे, इमारतीचे वेळोवेळी आवश्यक ती दुरुस्ती करणे, शक्य झाल्यास यांत्रिक सामुग्रीचा वापर करणे व नैसर्गिक उपयोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

६. वाचकांच्या सूचना व तक्रारी स्वीकारण्यासाठी सूचना वजा तक्रार पेटी वेळोवेळी उघडून त्या संबंधी आवश्यक कार्यवाही केली जावी.

७. ग्रंथालय माहिती पुस्तिका / विशेष अहवाल / ग्रंथालय सांखिकी वेळोवेळी तयार करुन ग्रंथालयाचे स्व मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

## ६.४ उद्दिष्टांची पुर्तता व गृहितकांची पडताळणी :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी पुढील गृहीतके निर्धारीत करण्यात आली आहेत.

**१. संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचे कार्य समाधानकारक आहे.**

विद्यार्थी वाचकांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.१४ व आलेख क्र. ५.१३, प्राध्यापक वाचकांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.३० व आलेख क्र. ५.२७, व ग्रंथपालांच्या मते ग्रंथालयातील सेवा सुविधा तक्ता क्र. ५.८३ व आलेख क्र. ५.७७ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे

लक्षात येते की संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांचे कार्य समाधानकारक आहे. या वरुन गृहीतकक्र १ सिध्द होते.

**२. ग्रंथालयीन सेवा–सुविधांमधील बदलांमुळे सेवा–सुविधा वृध्दिंगत होत आहेत.**

ग्रंथालयातील सेवांबाबत गृहीतकृत्यांची पडताळणी करण्यासाठी ग्रंथालयीन सेवांचे पारंपरिक सेवा, आधुनिक सेवा व संगणक सेवा असे तीन प्रकार करण्यात आले होते. तर ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या भौतिक सुविधांबद्दल वाचकांना काय वाटते ह्या बाबत अभिप्राय जाणून घेण्यात आला.

विद्यार्थी वाचकांच्या ग्रंथालयीन सेवांबाबत तक्ता क्र. ५.१० व आलेख क्र. ५.०९ आणि ग्रंथालयीन सुविधांबाबत तक्ता क्र. ५.१६ व आलेख क्र. ५.१५ व्दारे तर प्राध्यापक वाचकांच्या बाबतीत ग्रंथालयीन सेवांबाबत तक्ता क्र. ५.३१ व आलेख क्र. ५.२८ आणि ग्रंथालयीन सुविधांबाबत तक्ता क्र. ५.३७ व आलेख क्र. ५.३४ व्दारे, व ग्रंथपालांच्या मते ग्रंथालयातील सेवांबाबत तक्ता क्र. ५.७८ व आलेख क्र. ५.७२ आणि ग्रंथालयीन सुविधांबाबत तक्ता क्र. ५.८४ व आलेख क्र. ५.७८ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे लक्षात येते की संशोधनासाठी निवडलेल्या ग्रंथालयांतील ग्रंथालयीन सेवा–सुविधांमधील बदलांमुळे सेवा–सुविधा वृध्दिंगत होत आहेत. या वरुन गृहीतकक्र २ सिध्द होते.

**३. दर्जेदार व प्रभावी सेवांमुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा गुणात्मक व संख्यात्मक असा दोन्ही तऱ्हेने लाभ होत आहे.**

ग्रंथालयीन सेवा–सुविधां बरोबरच विद्यार्थी वाचक ग्रंथालयीन साधनांचा प्रभावी वापर करीत असून विद्यार्थी वाचकांच्या बाबततीत तक्ता क्र. ५.१४ व आलेख क्र. ५.१३ तर प्राध्यापक वाचकांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.३५ व आलेख क्र. ५.३२ आणि ग्रंथपालांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.६३ व आलेख क्र. ५.५७ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे लक्षात येते की दर्जेदार व प्रभावी सेवांमुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवा–सुविधांचा गुणात्मक व संख्यात्मक  असा दोन्ही तऱ्हेने लाभ होत आहे. या वरुन गृहीतकक्र ३ सिध्द होते.

**४. बदललेल्या ग्रंथालयीन सेवांमुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.**

ग्रंथालयामार्फत योग्य ती माहिती गोळा करणे तिचे मूल्यमापन करणे व योग्य त्या स्वरुपात वाचकांना पुरविणे व त्यांच्या गरजा भागविणे हे ग्रंथपालांचे प्रमुख कर्तव्य आहे. ह्या प्रयत्नांत आधुनिक तंत्रज्ञान हे एक मौल्यवान साधन आहे. या आधुनिक तंत्रांचा वापर काहीही झाले तरी ग्रंथालयाची मूलभूत उद्दिष्टे बदलू शकत नाही. ग्रंथालय सेवेची परंपरा आणि सतत बदलणारे तंत्रज्ञान यांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. तक्ता क्र. ४.१ व ग्रंथालयामार्फत देत असलेल्या सेवा–सुविधांबाबत ग्रंथालयात उपलब्ध असलेले ग्रंथालयीन फर्निचर तक्ता क्र. ५.६४ व आलेख क्र. ५.५८, ग्रंथालयीन साधने तक्ता क्र. ५.६५ व आलेख क्र. ५.५९, ग्रंथालयीन दृकःश्राव्य साधनांसाठी तक्ता क्र. ५.६७ व आलेख क्र. ५.६१, मुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्याबाबत तक्ता क्र. ५.६९ व आलेख क्र. ५.६३ तर अमुद्रीत ग्रंथेतर वाचन साहित्याबाबत तक्ता क्र. ५.७१ व आलेख क्र. ५.६५ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे लक्षात येते की बदललेल्या ग्रंथालयीन सेवांमुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. या वरुन गृहीतकक्र ४ सिध्द होते.

**५. ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकडे वेळोवेळी लक्ष पुरविले जाते.**

वाचकांमार्फत व्यक्त करण्यात आलेले ग्रंथालयातील उणीवा/दोष ह्याबाबत विद्यार्थी वाचकांच्या बाबत तक्ता क्र. ५.१७ तर प्राध्यापक वाचकांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.३८ आणि ग्रंथपालांच्या मते तक्ता क्र. ५.९७ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे लक्षात येते की ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकडे वेळोवेळी लक्ष पुरविले जाते. या वरुन गृहीतकक्र ५ सिध्द होते.

**६. ग्रंथालयीन बदलांमुळे वाचकांवर इष्ट परिणाम झाला आहे.**

वाचकांमार्फत व्यक्त करण्यात आलेले ग्रंथालयातील आवश्यक सुधारणा ह्याबाबत विद्यार्थी वाचकांच्या मते तक्ता क्र. ५.१८ तर प्राध्यापक वाचकांच्या बाबतीत तक्ता क्र. ५.३९ आणि ग्रंथपालांच्या मते तक्ता क्र. ५.९७ मधील तथ्यांच्या विश्लेषणाव्दारे असे लक्षात येते की ग्रंथालयीन बदलांमुळे वाचकांवर इष्ट परिणाम झाला आहे. या वरुन गृहीतकक्र ६ सिध्द होते.

थोडक्यात प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधक उद्दिष्टनिहाय निरीक्षण, निष्कर्ष व शिफारस ह्यावरुन असे सिध्द होते की, संशोधकाने मांडलेल्या उद्दिष्टयांची पूर्तता व गृहितकांची पडताळणी झाली आहे.

## ६.५ पुढील संशोधनासाठी दिशा :

संशोधकांस पुढील विषयांवर संशोधन करण्यासाठी मार्गदर्शक दिशा खालीलप्रमाणे.

१) महाविद्यालयीन ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या कार्य समाधानांचा अभ्यास करणे.

२) महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचकांच्या वाचन सवयींचा अभ्यास.

३) महाविद्यालयीन ग्रंथालयांचा रचनात्मक बदलांचा ग्रंथालयीन लाभार्थींवर झालेल्या परिणामांचा अभ्यास.

४) INFLIBNET सारख्या ग्रंथालयीन जाळ्यांमार्फत उपलब्ध माहितीस्त्रोतांची ग्रंथालयाच्या विकासात योगदान.

५) महाविद्यालय ग्रंथालयांतील ग्रंथसंग्रहाचे मूल्यमापन करणे.

## ६.६. समारोप :

**''मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास.''** सदर संशोधनात संशोधकाने एकूण ५१ निष्कर्ष काढले असून ३३ शिफारशी दिलेल्या आहेत व त्यातून संशोधन उद्दिष्टे व गृहीतके यांची पडताळणी करुन घेण्यात आली असून संशोधन समस्येच्या संदर्भात मांडलेल्या उद्दिष्ट्यानुसार सदर संशोधन कार्य पूर्ण केले.

सदर संशोधनातील निष्कर्षांचा, शिफारशींचा आणि पुढील संशोधनाच्या दिशांचा सर्व महाविद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथालयीन कर्मचारी, वाचकांबरोबर या क्षेत्रात संशोधन कार्य करु इच्छिणाऱ्या संशोधकांना, अभ्यासकांना उपयोग होणार आहे. सदर संशोधन कार्यामूळे ग्रंथालयांचा अभ्यास करण्यात आला असून सद्याच्या माहिता तंत्रज्ञानाच्या युगात त्याला अनुसरुन ग्रंथालयातून वाचकांना सेवा देताना निर्माण होणाऱ्या अडचणींचा समस्यांचा अभ्यास केला आहे. सदर संशोधन अहवालाचा एक दर्जेदार ग्रंथ प्रसिध्द केला जाणार आहे त्यामूळे सर्व स्तरावरील महाविद्यालयीन ग्रंथपालांना ग्रंथालयाचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

=== XOX ===

## –: संदर्भसूची :–

**प्रस्तावना :**

**"मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्ह्यांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवासुविधांचा चिकित्सक अभ्यास."** प्रस्तुत संशोधन प्रक्रियेच्या वेळी प्रकरणांचे लिखाण करत असताना विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहातील ग्रंथांचा उपयोग संशोधनासाठी झाला तसेच विविध प्रकारच्या नियतकालिकातून प्रसिध्द झालेले लेख, इंटरनेटवरील लेख, संशोधनपर लेख, शासकीय प्रकाशने, गौरवग्रंथ, ग्रंथालयांचे वार्षिक अहवाल, शोध निबंध, प्रकल्प, नियतकालीके, सीडीज, ई–मेल, वेबसाईट इत्यादी वाचनसाहित्याचा अभ्यास सदर संशोधनासाठी संशोधकाने केला असून या शिवाय यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ : नाशिक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ : पुणे, मुंबई विद्यापीठः मुंबई या विद्यापीठांत तसेच या विषयावर विविध संकेत स्थळांवर सादर केलेल्या संबंधीत विषयावरील प्रबंधांचा अभ्यास केला आहे. संदर्भसूचीसाठी अमेरीकन सायकोलॉजिकल असोसिएशन (A.P.A.) स्टाईलचा वापर केला आहे ही पध्दत वैज्ञानिक व स्पष्टीकरणात्मक आहे.

**अ. मराठी संदर्भ ग्रंथ सूची :**

**ब. इंग्रजी संदर्भ ग्रंथ सूची :**

**क. पी. एच डी शोध प्रबंध सूची :**

**ड. एम. फील लघुशोध प्रबंध सूची :**

**ई. इंटनेट वेब साईटस सूची :**

## अ. मराठी संदर्भ ग्रंथ सूची :


०१. आगलावे, प्रदीप. (२०००). संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन. पृष्ठ क्र. ११–४७

०२. आगावणे, राजेश. (२००८). ग्रंथालय समिती. ग्रंथपरीवार, मे–जुन, पृष्ठ क्र. १६–१९.

०३. आचार्य, बाळकृष्ण बापु व शिंगणे मोरो विनायक, नाईक बापुराव – संपा. (१९८०). मुंबईचा वृतांत. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

०४. आढाव, उध्दव. (२००१). महाविद्यालयीन ग्रंथालयांचा समन्वय. मैत्रीच्या पलीकडे, जुलै, पृष्ठ क्र. ४२ ते ४४.

०५. कणेर, अरुण. (२०१५). संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हे. नागपूर : पाचघरे प्रकाशन. पृ.क्र. १०१–१०१.

०६. कदम, रुपाली. (२००४). विद्यापीठ अनुदान आयोगाचे उच्च शैक्षणिक ग्रंथालयाच्या विकासातील योगदान. ज्ञानगंगोत्री, मार्च–मे, पृष्ठ क्र. १६.

०७. कऱ्हाडे, स. दा. (१९९७). संशोधन सिध्दांत आणि पध्दती. मुंबई : लोकवाङ्मय गृह. पृष्ठ क्र. २७.

०८. कर्णिक, प्रदीप. (२००५). ग्रंथ ग्रंथालय ग्रंथसंस्कृती. मुंबईः नवचैतन्य प्रकाशन.

०९. कुरुप, एम आर., (२००१). नॅशनल अॅसेसमेंट अॅक्रिडिटेशन कौन्सिलची (NAAC) मूल्यमापन कसोटी (शब्दांकन) करमरकर प्रकाश गणेश, ज्ञानगंगोत्री, वर्ष २ रे, अंक २रा, सप्टें.– नोंव्हें. पृष्ठ क्र. ५–१२.

१०. कुलकर्णी, मिलिंद. (२०११,एप्रिल ४). ग्रंथालयातल्या कपाटात गुदमरलेल्या पूस्तकांना मिळेल चिमुटभर प्रकाश, थोडा वारा आणि वाचकांचा स्पर्श. दैनिक लोकमत, सोलापूर आवृती, पृष्ठ क्र. १४.

११. कुलकर्णी, विजय., (२००६). शहापूर दर्शन. डोंबिवली : आरती प्रकाशन, पृ.क्र. ११–२९.

१२. कुंटूरकर, वि. ना. (१९८४). महाविद्यालयीन ग्रंथालयांचे प्रश्न आणि उपाय. ग्रंथपरीवार, नोव्हें.–डिसें., पृष्ठ क्र. १७ ते १९.

१३. कुंभार, राजेंद्र. (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ. क्र.१–६,२१–२६.

१४. कुंभार, राजेंद्र. (२०१३). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन : पध्दती आणि तंत्रे. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र. ८, ४१

१५. कुंभोजकर, ग. दि. (१९८९). संशोधन पध्दती व संख्याशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

१६. कोण्णूर, एम. बी. व कोण्णूर, सूजाता. (२००८). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र कोश. पूणे : डायमंड पब्लिकेशन, पृष्ठ क्र. ९५, ९६, २०१, २७१, ३१४, ३१५.

१७. गगराणी, भूषण., (२००२). विविधतेने नटलेला ठाणे जिल्हा. *लोकराज्य*, ५४, पृ.क्र. ३४–३८.

१८. गणपुले, श. रा. (२००४). ग्रंथालयीन साधन सामग्री व सेवा यांचे व्यवस्थापन. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन, पृष्ठ. क्र. १०.

१९. गवळी, नारायण. (२००४). उच्चशिक्षणातील गुणवत्ता नियंत्रणासाठी नॅक मूल्यमापन. भारतीय शिक्षण, ऑक्टो. पृष्ठ क्र. ४२–४८.

२०. गालफाडे, दिपक रामराव. (२००५). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये संशोधनाची केंद्रे. शिक्षण आणि समाज, वर्ष २९ (०१), ऑक्टो.–डिसेंबर, पृष्ठ क्र. ४८–५१.

२१. घाटोळे, रा. ना. (२००३). समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन. पृष्ठ क्र. ५,६,१२,१३,१४५.

२२. चव्हाण, सुभाष. (२००७). महाविद्यालयीन ग्रंथालयाची वाचन संस्कृती विषयक भूमिका. ग्रंथपरीवार, मे–जून, पृष्ठ क्र. १२.

२३. जाधव, एम. एस. (२००७). माहिती साक्षरतेचे विविध पैलू. गंथपरीवार, नोव्हेंबर – डिसेंबर, पृष्ठ क्र. १६ ते १८.

२४. जाधव, तुकाराम., (२०१५). महाराष्ट्र वार्षिकी २०१५. पूणे : द युनिक ॲकॅडमी, पृ.क्र. ३–३७.

२५. जाधव, देवा., (२०१५). चालू घडामोडी. पूणे : द युनिक ॲकॅडमी. पृ.क्र. ११.

२६. जोशी, अनंत. (२००२). ग्रंथालयातील संदर्भसेवा. पूणे : कॉन्टिनेटल प्रकाशन.

२७. जोशी, अनंत व जोशी, वसंत. (१९८०). ग्रंथालयीन संदर्भसेवा. पूणे : कॉन्टिनेटल प्रकाशन.

२८. जोशी, बी. (२००७). डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड – ३. पुणे : डायमंड प्रकाशन.

२९. जोशी, महादेवशास्त्री. (१९७८). भारतीय सांस्कृतीकोश खंड – ३. पुणे : भारतीय संस्कृतीकोश मंडळ.

३०. जोशी, लक्ष्मणशास्त्री. (१९७२). मराठी विश्वकोश खंड–६. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ. पृष्ठ क्र. ९३७.

३१. ढवळे, के. (२००२). स्टुडंटस मॉडर्न डिक्शनरी. मुंबई : ढवळे प्रकाशन.

३२. थोरात, लक्ष्मण. (२००७). ग्रंथालय माहितीशास्त्र. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स पृ. क्र. १६७–१८५.

३३. दळवी, दाऊद. (२०१०). असे घडले ठाणे. नवी मुंबई : श्री कृपा प्रकाशन. पृ. २५०.

३४. दांडेकर, विष्णू वामन. (संपा) (१९६१). पालघर तालूका चित्रमय दर्शन १८१८ – १९६०. पालघर : भाईलाल पटेल, अध्यक्ष, महात्मा गांधी सेवा संघ पालघर. पृ.क्र. २७ ते ३२.

३५. दास्ताने, संतोष. (२०११). महाराष्ट्र २०११. पूणे : दास्ताने आणि कं. पृष्ठ क्र.१– ५१,२४० ते २४७.

३६. देशपांडे, एच. व्ही. (२००५). नॅक पुनर्मूल्यांकन आणि महाविद्यालयांचे प्रशासन. सातारा : सुखदा सौरभ प्रकाशन.

३७. देशपांडे, दत्तात्रय, आणि भोईर, अनिल. (२००७). ग्रंथालय व्यवस्थापनात सांख्यिकीचे महत्व. ग्रंथपरीवार, जानेवारी–फेब्रुवारी, पृष्ठ क्र. १६ ते २२.

३८. देशपांडे, दत्तात्रय., व चांदेकर, उज्वला. (२००८). महाविद्यालयीन ग्रंथालयात ग्रंथसाहित्याचा विकास. माहितीयुग, एप्रिल, पृष्ठ क्र. ०९–१०.

३९. देशपांडे, व सी. (२००४) नॅक गुणवत्ता श्रेणी प्राप्त संस्था आणि अनुसंधावन कार्यक्रम. शिक्षणसमीक्षा, वर्ष–३८, अंक–०४, ऑक्टो.–नोव्हें., पृष्ठ क्र. १२८–१३२.

४०. देशमूख, पी. आर. (१९७२). ग्रंथालय माहितीसेवा भाग–१. अमरावती : मंगेश प्रकाशन.

४१. धाकस, पूरुषोत्तम. (अनु.) (१९९३). ऐक मुंबई तुझी कहाणी. ठाणे : प्रियंका प्रकाशन.

४२. नखणे, मिनल. (२००६).भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या. पुणे : नित्यनुतन प्रकाशन. पृ. क्र. २०२ ते २२८.

४३. नरगुंदे, रेवती. (२००५). ग्रंथालय आणि सामाजिक विकास. पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र. १–५, १११–११८.

४४. नरगुंदे, रेवती. (२००५). प्रलेखन आणि माहितीशास्त्र (तत्वे, तत्रे, पध्दती आणि प्रणाली). पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

४५. निकोसे, एस.(२००७). ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधन पध्दती. नागपूर : प्रज्ञा प्रकाशन. पृष्ठ क्र. २१–३८, ५८–६८.

४६. पडोळे, ल. वा. (संपा.)(१९५१). मराठी ग्रंथालयाचा इतिहास. नागपूर : पूजा प्रकाशन. पृष्ठ क्र. १२७–१३३.

४७. पवार, एस. पी. (२००२). ग्रंथालय व माहिती शास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

४८. पवार, एस. पी., बडकते, सविता., पवार. आर. जी. आणि जाधव सुनंदा. (२००५). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन. पृ.क्र. २५०–२७०.

४९. पवार, गणपतराव. (१९८४). सर्वांसाठी ग्रंथालये, गौरव ग्रंथ, पुणे : बापू विठ्ठल गामला विश्वस्त व अध्यक्ष, सिध्दार्थ मोफत वाचनालय व ग्रंथालय

५०. पवार, परितोष. (२००१). संदर्भसेवा अधिक क्षमतेने देण्यास इंटरनेटचा उपयोग. ज्ञानगंगोत्री. पृ.क्र. ९६.

५१. पाटील, राहूल. व हांडे, कपील. (२०१३). अत्यावश्यक इतिहास व भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह). पूणे : द युनिक अॅकॅडमी, पृ.क्र. ९–२३.

५२. पिंपळखरे, मो. ह., जोशी, न. म व भावे, श. द.(१९७९). टिळक शिक्षण महाविद्यालय (ग्रंथालय – वास्तू – स्मरणिका), ग्रंथ आपली गूरु. पूणे : टिळक शिक्षण महाविद्यालय, पूणे

५३. पोतदार, पा. मा. (मे–जून २००८). शैक्षणिक प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका. ग्रंथपरीवार, पृ.२

५४. पोळ, दिनेश. (२००४). ग्रामीण भागातील महाविद्यालयांची जटिल समस्या : नॅक. योजना वर्ष–३०, अंक–०२, सप्टें., पृष्ठ क्र. ८–१०.

५५. प्रभुखानोलकर, राखी. (२००४). राष्टीय मूल्यमापन आणि अधिस्वीकृती परिषद, ज्ञानगंगोत्री, अंक – ०४, मार्च–एप्रिल–मे, पृष्ठ क्र. ३६–५३.

५६. बालवाड, रमेश., (२०१५). आपला पालघर जिल्हा. लातूर : विद्याभारती प्रकाशन, पृ. क्र. १–३१.

५७. बाहेती, एस. आर. (सप्टेंबर २००३). बदलत्या काळात डिजीटल ग्रंथालयाचे स्वरुप आणि महत्व. ग्रंथपरिवार.

५८. बुवा. जी. (२००७). ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह. सावंतवाडी : श्री साई प्रकाशन.

५९. बोधनकर, सुधीर. (१९९७). सामाजिक संशोधन पध्दती. नागपूर : श्री साई प्रकाशन, पृष्ठ क्र. ६–७.

६०. बोधनकर, सुधीर आणि अलोनी विविक. (१९९९). सामाजिक संशोधन पध्दती. नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन. पृष्ठ क्र. ६–७.

६१. ब्रबेकर, जॉन. एस. (१९७८). शैक्षणिक समस्यांचा इतिहास. पूणे : श्री विद्या प्रकाशन.

६२. ब्रिजमोहन, दायमा. (२००३). नॅकला सामोरे जाताना. लातूर : विद्याभारती प्रकाशन.

६३. भट, सुधा. (१९९३). मुंबई विद्यापीठाची वाटचाल (१८८५–१९९२). मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

६४. भावसार, रामदास. (२००४). NAAC : A Self Improvement. शिक्षणसमीक्षा, अंक–०५, डिसें.०३ ते जाने.०४, पृष्ठ क्र. १८२–१८८.

६५. भांडारकर, पु. ल. (१९८७). सामाजिक संशोधन पध्दती. (३री आवृती). नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ. पृ.४.

६६. भितांडे, द. ना., आणि जोगळेकर, गो. के. (१९९४) शैक्षणिक संशोधन पध्दती. पूणे : नुतन प्रकाशन.

६७. भोईर, चंद्रकांत., (२०१५). अस्तित्वातील ठाणे व पालघर जिल्हा २०१५–२०१६. ठाणे : भोईटे प्रकाशन, पृ.क्र. ६–१५.

६८. महाजन, शांताराम गजानन. (२०१३). विद्यापीठ आणि महाविद्यालयीन ग्रंथालयांचे व्यवस्थापन. पूणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ठ क्र. १०–१४, ३९–४३.

६९. महाराष्ट्र शासन, (२००६). आदिवासी विकास पुस्तिका. मुंबई : महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग.

७० महाराष्ट्र शासन, (२००७). जिल्हा परीषद ठाणे दैनंदिनी. ठाणे : सामान्य प्रशासन विभाग. पृ.क्र. १–५.

७१. मालशे, स. गं. (१९७५). शोधनिबंधाची लेखनपध्दती. नागपूर : सूविचार प्रकाशन मंडळ.

७२. मुळे, रा. श. व उमाढे, वि. तु.(१८८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. मुंबई : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ. पृष्ठ क्र. ९८.

७३. मुंबई विद्यापीठ वर्षवृत्ते : १९८२–८३ ते १९९०–९१. मुंबई : पॅाप्युलर प्रकाशन.

७४. रिसवडकर, म. रा. (२०००). माहिती संकलन विश्लेषण आणि सादरीकरण. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृष्ठ क्र. १, ३–५, ७, १७, ३८.

७५. लोहकरे, रोहिदास सदाशिव. (२००५). महाविद्यालय ग्रंथालयाचे महत्व व कार्य. शिक्षण आणि समाज, जानेवारी, पृष्ठ क्र. ५७–६०.

७६. वाकनिस. त्र्यं. दि. (१९७३). ग्रंथालय संघटन. पुणे : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

७७. वानकर, एम. एम. (२००५). वाचनसंस्कृती. ग्रंथपरीवार, जानेवारी, पृष्ठ क्र. १०–१२.

७८. वाळिंबे, मो. (२००२). मराठी शुध्दलेखन प्रदीप. पूणे : नितीन प्रकाशन.

७९. वाळिंबे, मो. रा. (१९७५). महाराष्ट्रातील ग्रंथालयांच्या समस्या. सहित्य सहकार, जानेवारी, पृष्ठ क्र. ३७.

८०. विर, धर्मराज. (२००४). ग्रंथालयाच्या विकासात यु.जी.सी. ची भूमिका : प्रश्नोत्तरे. ग्रंथपरीवार, जुलै– ऑगस्ट, पृष्ठ क्र. १८ ते २०.

८१. विर. डी. के. (२००६). ग्रंथालय संघटन. औरंगाबाद : मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ. पृ.२

८२. शर्मा, अजयकुमार. (१९९१). पुस्तकालय विज्ञान खंड–१. दिल्ली : वर्ल्ड बुक हाऊस.

८३. शर्मा, के. के. (२००५). इंटेलेक्चूअल्स संदर्भ महाराष्ट्र : राज्य व जिल्हे एक दृष्टिकोन खंड–०५. भोपाळ : इंटेलेक्चुअल बुक पृ.क्र. १६६५–१७०८.

८४. शाह, अ. भि. (१९८१). महाराष्ट्रातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रश्न करंदीकर, सुमन(संपा.). पूणे : विद्यार्थी सहाय्यक समिती.

८५. शिक्षण मंत्रालय, सर्वपल्ली राधाकृष्णन. (१९४९). सर्वपल्ली राधाकृष्णन अहवाल. दिल्ली : भारत सरकार प्रकाशन विभाग. पृ.१९६.

८६. शुक्ल, भरतकुमार र. (२००६). महाविद्यालयीन ग्रंथालय विकासाठी अर्थसाधनांची निर्मीती. ज्ञानगंगोत्री, मार्च–मे, पृष्ठ क्र. ९१.

८७. शेजवळ, हरीभाऊ. (२०१२). श्री स्थानक ठाणे. मुंबई : नवता बुक वर्ल्ड.

८८. सातारकर, सु. प्र. (२००२). विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालये : परस्परसंबंध. ज्ञानगंगोत्री, सप्टें.–नोव्हेंबर, पृष्ठ क्र. ३०–३६.

८९. सातारकर सु. प्र. (२००१). ग्रंथालय व्यवस्थापन. औरंगाबाद : मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ.

९०. सावे, वसंत. (२००१). ग्रंथालयीन परिवर्तनाचा मागोवा. ज्ञानगंगोत्री, डिसें.–फेब्रु., पृष्ठ. क्र. ३७ ते ४३.

९१. साळूंके, एम. एस. (२००८). महाविद्यालयीन ग्रंथालयात राबविली जाणारे उपक्रम. ग्रंथपरीवार, सप्टेंबर–ऑक्टोबर, पृष्ठ क्र. ०५ ते ०७.

९२. सुतार, धनंजय भगवान.(२०११). ग्रंथालय आणि माहितीशास्त्र. वाराणशी : ए. बी. एस. पब्लिकेशन. पृ. क्र. ७९–१०९.

९३. संत, दु. का. (१९८८). संशोधन : पध्दती, प्रक्रिया, व अंतरंग. पूणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

९४. हांडे, राजपाल. (२०१३). वर्षवृत्त मुंबई विद्यापीठ २०१२–१३. मुंबई : मुंबई प्रकाशन विभाग मुंबई विद्यापीठ.

९५. हेरोळे, पुनम. (२०१७). एन–लिस्ट कन्सोर्शिया – महाविद्यालयान ग्रंथालयांसाठी वददान. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. पृ. क्र.२३–३३.

## ब. इंग्रजी संदर्भ ग्रंथ सूची :


०१. Akhter, M. (2008). Library services and user satisfaction : Department of LIS, Punjab University, Lahore. Library Promotion Bureau,39 (2), June 2008, पृष्ठ क्र. २५–३४.

०२. Aswath, Lalitha. (1999). Quality circles in a university library enhancement in Navalani, (ed. K. & Trikha) Library and information services. Jaipur : Rawat Publications.

०३. Busha, C., & Harter, S. (1980). Research methods in librarianship techniques and interpretation. New York : Academic. पृष्ठ क्र. १५.

०४. Chaudhari, K. K. (1982). Gazetteer of India, Maharashtra State, Thane District Bombay : Government Central Press.

०५. Cole, A., & Bigelow, K. (1956). A manual of thesis — writing. London : John wiley and Son's. पृष्ठ क्र. ५, ९, २९ ते ३५.

०६. Esperanza M. (2008). Public and Academic Libries Jaipur. Jaipur : Bintwell Publication, Page No 144.

०७. Gopal, M. H. (1970). An introduction to research procedure in social scienses. Bombay : Asia publication house. पृष्ठ क्र. १६, ५३.

०८. Gorman, Michael. (2003). Enduring library : technology, tradition and the quest for balance. Chicago : American Library Association, 157pp. ISBN : 0-8389-0846-2 £

०९. Good, William J. and Hatt, Paal K. (1981) Methods in Social Research. New Delhi : McGraw-Hill International Book Company. pp 186.

१०. Gupta, O. P. (1998). Library and Information Services in University and College Libraries in India. New Delhi : Reliance Publications House, पृष्ठ क्र. ६७–७०.

११. John, Feather. ed. (2004). Managing preservation for libraries & archives : current practice & future developements. Oxan (U.K.): Ashgate, PP 194, (ISBN - 0754607054)

१२. Kent, Allen & Others, (1971). Encyclopadia of Library & Information Science. (Vol. -05, pp. 226-281), New Your : Marcel Dekker.

१३. Khan, Ratankumar., Chakrabarti, Bhubaneshwar., & Banerjee Swapna (2004). Reforming reference : guidelines for librarian. New Delhi : Mittal Publications, पृष्ठ १३८.

१४. Kothari, C. R. (1989). Research methodology : methods and techniques, New Dehil : Wiley Eastern Ltd.

१५. Kumar, H., & Mishra B., & Kulshrestha S.B. (2010). Using Blogs for Extending Library Services. University News, Vol.48, (12), p16-17.

१६. Kurup, M. R., (2002). Quality education : naac prespective : a manual for assessment and accredttion of college. Mumbai : Kelkar Education Trust

१७. Luhn, H. P. (1961). Selective dissemination of new scientific information with the aid of electronic processing equipment. American Documentation Vol.12, 1961, P. 131.

१८. Mohanrao, K. Rama. (2004). User Education Programme as implemented in the IIAM Library : A Profile. ILA Bulletin, Jan.-Mar. पृष्ठ क्र. २९.

१९. Oshea, M. V. (1991). World Book Encyclopedia. (Vol.-12). USA : World Book

२०. Pathan, S. N. (2005). Quality Improvement programme in Higher Education through NAAC : A success story of Maharashtra. Bhopal : Intellectual Book, pp. 43-115.

२१. Ranganathan S. R.(2006). Reference services. New Delhi : Ess Ess Publication

२२. Wilson, T. D. (1977). Evaluation & scientific management of library & information centers (ed. Lankester, F. W. Cleverdon, C. W.) London:Noorrdhoff, पृष्ठ क्र. २७–४०.

## क. पी. एच डी. शोध प्रबंध सूची :

०१. गोहाड, जयश्री संजय. (२०१५). पश्चिम महाराष्ट्रातील शिक्षणशास्त्र महाविद्यालय ग्रंथालयांचा सर्वांगिण अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

०१. मोरे, वैशाली. (२०१२). पूणे विभागातील अ वर्ग सार्वजनिक ग्रंथालयातील व्यवस्थापन, अनुदान आणि सेवांचा अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

०२. मंडले, सुनिल राजाराम. (२०१५). महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांचा अभ्यास (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

०३. Nasir, Mohammad. (2011). An evaluation study of E-journals consortia and user`s services in technical college libraries of Western Uttar Pradesh (Doctoral dissertation). Submitted To Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

०४. Shrivastava, Deepak Kumar. (2012). Evaluation of library services of engineering colleges in kota region (Doctoral dissertation). Submitted to Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

०५. Singh, Kirti. (2011). An Evaluative Study of Information Sources and Services in University Libraries of Punjab (Doctoral dissertation). Submitted To Shri J. P. J. T. University, Rajasthan. Retrived from Shodhahgangotri.

०६. Singh, Nirmal. (March-2010). A study of the use of libraries of colleges of education in punjab (Doctoral dissertation). Submitted to Punjabi University, Patiala. Retrived from Shodhahgangotri.

०७. Sudge, Suresh. (2012). Modernization of Libraries attached to the defence training adn education Institutes in India with reference to Services adn sources (Doctoral dissertation). Submitted to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.

०८. Surve, Swati Sanjay. (2012). A critical study of education college libraries affiliated to university of pune (Doctoral dissertation). Submitted to the Shri jhabarmal tibrewala university. Retrived from Shodhahgangotri.

## ड. एम. फील लघुशोध प्रबंध सूची :

०१. औटे, गोवर्धन प्रल्हादराव. (२००९). डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित नॅक मानांकित महाविद्यालयीन ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचे उपयोजन. Submitted to YCMOU.

०२. तिडके, वर्षा अनिल. (२००६–०७). गडचिरीली जिल्ह्यांतील स्वयंसेवी संस्थांच्या ग्रंथालयाचा चिकित्सक अभ्यास. Submitted to YCMOU.

०३. दिनकर, अतुलकुमार अण्णा. (२००७). ठाणे जिल्ह्यातील विनाअनुदानीत महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचा ग्रंथालयासंदर्भातील योगदानाचा अभ्यास. Submitted to YCMOU.

०४. पसारकर, अपर्णा श्रीकांत. (२००९). विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथालय आंतरसंबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ. Submitted to YCMOU.

०५. बरडे, विरेंद्रकुमार लक्ष्मणराव. (२००८). रा. तु. म. नागपूर विद्यापीठाशी संलग्न ग्रंथालय व माहितीशास्त्रे महाविद्यालयांचे टिकात्मक अध्ययन. Submitted to YCMOU.

०६. मांद्रेकर, सिध्दी अरुण. (2006-07). मुंबई विभागातील AICTE प्रमाणित महाविद्यालयात वापरल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन आज्ञावली : एक अभ्यास Submitted to YCMOU.

०७. Sabale, Ashok Rambhav. (2009). The Study of Library Services and Problem of Pune City Medical Colleges. Submitted to YCMOU.

## ई. इंटनेट वेब साईटस सूची :

०१. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई., (२०१४). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४–१५ Retrieved on April 17, 2015., from https://www.maharashtra.gov.in/PDF/EcoSurvey_2015_Mar.pdf.

०२. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई., (२०१५). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५–१६ Retrieved on April 17, 2015., from https://www.maharashtra.gov.in/PDF/EcoSurvey _2016_Mar.pdf.

०३. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, ठाणे., (२०१३). जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१३ (ठाणे जिल्हा). Retrieved from https://mahades.maharashtra.gov.in/files/ publication/dsa_thane_2013.pdf पृ.क्र. १–५.

०४. जिल्हाधिकारी कार्यालय, (२०१५). ठाणे जिल्हा. Retrieved on April 11, 2015., from http://www.thane.nic.in/index.html

०५. जिल्हाधिकारी कार्यालय, (२०१५). पालघर जिल्हा. Retrieved April 11, 2015., from http://collectorpalghar.in/about.php?english=null.

०६. Directorate of census of operations, Maharashtra. (2011). District Census Handbook : Village and Town wise Primary Censes Abstract (PCA) 2011, Thane, (Report No. Series – 28, Part XII-B) Retrieved on November 16, 2016 from http://www.censusindia.gov.in/2011census/dchb / 2721_PART_B_DCHB_%20THANE.pdf

०७. http://www.inflibnet.ac.in Retrieved on December 16, 2016.

०८. http://www.mu.ac.in Retrieved on December 16, 2016.

०९. http://www.sciencedirect.com Retrieved on October 10, 2016.

१०. http://www.ugc.ac.in Retrieved on December 02, 2016.

=== XOX ===

# मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्हयांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा सुविधांचा चिकित्सक अभ्यास

**(टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणेच्या विद्यावाचस्पती संशोधनासाठी अभ्यासपूरक प्रश्नावली)**

## वाचक प्रश्नावली ः वाचक विद्यार्थ्यांसाठी

(कृपया योग्य पर्यायासामोर √ अशी खूण करा.)

महाविद्यालयाचे नाव ः ______________________________ हजेरी क्रमांक ः______

वाचक विद्यार्थ्याचे नाव ः ______________________________ स्त्री ☐ पुरूष ☐

शाखा ः Science / Commerce / Arts वर्ष ः प्रथम / द्वितीय / तृतीय

---

१) तुम्ही ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे?

१. दररोज ☐ २. दोन दिवसातून एकदा ☐
३. याहून अधिक ☐ ४. कधीच नाही ☐

– कधीच नसल्यास कारण ______________________________

२) ग्रंथालयाला भेट देण्याचे कारण

१. ग्रंथ देवघेवीसाठी ☐ २. संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी ☐
३. नियतकालिक पाहण्यासाठी ☐ ४. अभ्यासिकेत बसण्यासाठी ☐
५. इतर कारणासाठी ☐

३) आपण ग्रंथालयात सर्व साधारण किती वेळ असता?

१. एक तासापेक्षा कमी ☐ २. एक ते दोन तास ☐
३. दोन तासापेक्षा जास्त ☐ ४. इतर __________.

४) ग्रंथालयात आपल्या विषयाच्या वाचन साहित्याबाबत आपला अभिप्राय नोंदवा.

| अ.क्र. | वाचन साहित्य | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | क्रमिक ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | संदर्भ ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |

५) ग्रंथालया मार्फत चालविल्या जाणाऱ्या पुस्तकपेढी योजनेचा लाभ घेतला आहे काय?

होय ☐ नाही ☐

६) ग्रंथालयीन पुढील सेवांबाबत अभिप्राय नोंदवा.

| अ.क्र. | सेवा—सुविधा | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| | पारंपरिक सेवा | | | |
| १. | देव–घेव सेवा (Lending) | ☐ | ☐ | ☐ |
| २. | संदर्भसेवा (Reference) | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services) | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings) | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | बहिःशाल सेवा (Extensive Services) | ☐ | ☐ | ☐ |
| | आधुनिक सेवा | | | |
| ६. | प्रचलित जागरूकता सेवा (CAS) | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा (SDI) | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा (Indexing) | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | प्रतिलिपी सेवा (Photocopy) | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | सार सेवा (Abstact) | ☐ | ☐ | ☐ |
| | संगणक सेवा | | | |
| ११. | इंटरनेट, ई–मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search) | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | ओपॅक सेवा (OPAC) | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | ऑनलाईन डेटाबेस सेवा (Online Database) | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | ऑफलाईन डेटाबेस सेवा (Offline Databas) | ☐ | ☐ | ☐ |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा (DDS) | ☐ | ☐ | ☐ |

७) आपणांस ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना काही अडचणी येतात काय?

१. होय ☐ २. नाही ☐

– उत्तर **"होय"** असल्यास (कृपया अडचणी नमूद करावे)

१. ग्रंथालयीन वेळा सोयीचा नाहीत ☐ २. ग्रंथालयीन सेवांबाबत पूरेशी माहीती नाही ☐

३. पूरेशी गरज वाटत नाही ☐ ४. इतर ———————— (कृपया नमूद करावे)

८) आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग करता?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | इंटरनेटवरील माहिति | ☐ | ब. | प्रिंटेड पुस्तके | ☐ |
| क. | प्रिंटेड नियतकालिके | ☐ | ड. | ई–बुक्स | ☐ |
| ई. | ई– जर्नल्स | ☐ | फ. | वर्तमानपत्रे | ☐ |
| ग. | इतर ——— | ☐ | | | |

९) आपण ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी आहात काय?

१. होय ☐ २. नाही ☐ ३. सांगता येत नाही ☐

१०) ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय ? होय ☐ नाही ☐

११) ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा.

| अ. क्र. | भौतिक सुविधा | अत्यंत समाधानकारक | समाधानकारक | सांगता येत नाही | असमाधान कारक | अत्यंत असमाधान कारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जागा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | ग्रंथालयीन स्वच्छता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | फर्निचर — खुर्च्या | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | फर्निचर — टेबल | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | फर्निचर — फूटरेस्टस् | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ६. | प्रकाश योजना | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | स्वच्छता गृह | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | पिण्याचे पाणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | वाचनकक्षाची क्षमता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | आवाज / ग्रंथालयीन शांतता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ११. | खेळती हवा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | फ्लोरींग | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | अंतर्गत मांडणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |

१२) ग्रंथालयात कोणत्या उणीवा/दोष जाणवतात ते सांगा?

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

१३) ग्रंथालयात कोणत्या सुधारणा व्हाव्यात असे वाटते? आपले मत नोंदवा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

दिनांक ः विद्यार्थी वाचक सही ः ______________

ठिकाण ः भ्रमणध्वनी ः ______________

# मुंबई विद्यापीठ अंतर्गत ठाणे जिल्हयांतील महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा सुविधांचा चिकित्सक अभ्यास

(टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पूणेच्या विद्यावाचस्पती संशोधनासाठी अभ्यासपूरक प्रश्नावली)

## वाचक प्रश्नावली ः प्राध्यापकांसाठी

(कृपया योग्य पर्यायासमोर √ अशी खूण करा.)

महाविद्यालयाचे नाव ः ______________________________

प्राध्यापकांचे नाव ः ______________________ स्त्री ☐ पुरूष ☐

शाखा ः विज्ञान / वाणिज्य / कला विषय ः सेवाकाल ः

१) तुम्ही ग्रंथालयाला भेटी देण्याचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे?

१. दररोज ☐ २. दोन दिवसातून एकदा ☐
३. याहुन अधिक ☐ ४. कधीच नाही ☐
—कधीच नसल्यास कारण ______________________

२) ग्रंथालयाला भेट देण्याचे कारण

१. ग्रंथ देवघेवीसाठी ☐ २. संदर्भ ग्रंथ पाहण्यासाठी ☐
३. नियतकालिक पाहण्यासाठी ☐ ४. अभ्यासिकेत बसण्यासाठी ☐
५. इतर कारणासाठी ☐

३) ग्रंथालयात आपल्या विषयाच्या वाचन साहित्याबाबत आपला अभिप्राय नोंदवा.

| अ.क्र. | वाचन साहित्य | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | क्रमिक ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | संदर्भ ग्रंथ | ☐ | ☐ | ☐ |

४) ग्रंथनिवडीमध्ये आपला सहभाग असतो काय?

१. होय ☐ २. नाही ☐

५) ग्रंथालय समितीमध्ये आपण काम केले आहे काय?

१. होय ☐ २. नाही ☐

६) शिक्षकांसाठी स्वतंत्र संदर्भकक्ष आहे काय?

१. होय ☐ २. नाही ☐

७) आपण एखादया विषयामध्ये संशोधन केले आहे काय?

१. होय ☐ २. नाही ☐

— प्रस्तूत लेखन करत असताना आपणास या ग्रंथालयातील वाचन साहित्य उपयुक्त ठरले आहे का? होय ☐ नाही ☐ थोडयाफार प्रमाणात ☐

८) आपण ग्रंथसंग्रहाबाबत समाधानी आहात काय?

१. होय ☐ २. नाही ☐ ३. सांगता येत नाही ☐

९) ग्रंथालयीन पुढील सेवांबाबत अभिप्राय नोंदवा.

| अ.क्र. | सेवा—सुविधा | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| | पारंपरिक सेवा | | | |
| १. | देव–घेव सेवा (Lending) | ☐ | ☐ | ☐ |
| २. | संदर्भसेवा (Reference) | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services) | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings) | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | बहिःशाल सेवा (Extensive Services) | ☐ | ☐ | ☐ |
| | आधुनिक सेवा | | | |
| ६. | प्रचलित जागरूकता सेवा (CAS) | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा (SDI) | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा (Indexing) | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | प्रतिलिपी सेवा (Photocopy) | ☐ | ☐ | ☐ |
| १0. | सार सेवा (Abstact) | ☐ | ☐ | ☐ |
| | संगणक सेवा | | | |
| ११. | इंटरनेट, ई–मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search) | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | ओपॅक सेवा (OPAC) | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | ऑनलाईन डेटाबेस सेवा (Online Database) | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | ऑफलाईन डेटाबेस सेवा (Offline Databas) | ☐ | ☐ | ☐ |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा (DDS) | ☐ | ☐ | ☐ |

१0) आपणांस ग्रंथालयाच्या सेवा मिळवताना काही अडचणी येतात काय?

१. होय ☐ २. नाही ☐

११) पूरक वाचन करण्यासाठी आपण वर्गात विद्यार्थ्यांना सूचना करता का?

१. होय ☐ २. नाही ☐

– उत्तर **“होय”** असल्यास कोणत्या प्रकारच्या वाचनसाहित्यासाठी शिफारस करता?

१. इंटरनेटवरील माहिती ☐ २. प्रिंटेड पुस्तके ☐

३. प्रिंटेड नियतकालिके ☐ ४. ई–बुक्स ☐

५. ई– जर्नल्स ☐ ६. वर्तमानपत्रे ☐

७. इतर ———————————————— (कृपया नमूद करावे)

१२) आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी कोणत्या साधनांचा उपयोग करता?

**टीप ः सर्वात महत्वाच्या साधनास प्राधान्य क्रमांक १ द्यावा व उर्वरित साधनास त्याच्या महत्वानुसार २,३,४ या क्रमाने क्रम द्यावा. (एकूण क्रम ७ आहेत)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. | इंटरनेटवरील माहिती | | ब. | प्रिंटेड पुस्तके | |
| क. | प्रिंटेड नियतकालिके | | ड. | ई-बुक्स | |
| ई. | ई- जर्नल्स | | फ. | वर्तमानपत्रे | |
| ग. | इतर ——— | | | | |

१३) ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय ? होय ☐ नाही ☐

१४) ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा?

| अ. क्र. | भौतिक सुविधा | अत्यंत समाधानकारक | समाधानकारक | सांगता येत नाही | असमाधान कारक | अत्यंत असमाधान कारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जागा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | ग्रंथालयीन स्वच्छता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | फर्निचर — खुर्च्या | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | फर्निचर — टेबल | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | फर्निचर — फूटरेस्टस | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ६. | प्रकाश योजना | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | स्वच्छता गृह | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | पिण्याचे पाणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | वाचनकक्षाची क्षमता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | आवाज / ग्रंथालयीन शांतता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ११. | खेळती हवा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | फ्लोरींग | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | अंतर्गत मांडणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |

१५) ग्रंथालयात कोणत्या उणीवा/दोष जाणवतात ते सांगा?

______________________________________________

______________________________________________

१६) ग्रंथालयात कोणत्या सुधारणा व्हाव्यात असे वाटते? आपले मत नोंदवा.

______________________________________________

______________________________________________

दिनांक ः प्राध्यापकाची सही ः ______________

ठिकाण ः भ्रमणध्वनी ः ______________

# ग्रंथपालांकरीता प्रश्नावली

(कृपया योग्य पर्यायासामोर √ अशी खूण करा.)

## — ः महाविद्यालयाबाबत ः—

१) पालकसंस्थेचे नांव ः ____________________

____________________

२) महाविद्यालयाचे नांव ः ____________________

____________________

स्थापना वर्ष ः ____________

३) महाविद्यालयाचा पत्ता ः ____________________

४) दूरध्वनी क्रमांक ः ____________ ५) फॅक्स ः ____________

६) ई-मेल ः ____________ ७) वेबसाईट ः ____________

८) प्राचार्यांचे नाव ः ____________________

९) महाविद्यालयाची स्वतःची इमारत आहे का? होय ☐ नाही ☐

१०) नॅक मूल्यांकन प्रक्रियेत आपले महाविद्यालय सहभागी झाले होते ते वर्ष ः

| अ.क्र. | सहभागाचे वर्ष | मिळालेली श्रेणी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

११) गेल्या ३ वर्षातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संख्या —

| वर्ष | वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी संख्या | वरिष्ठ महाविद्यालय शिक्षक संख्या | शिक्षकेतर कर्मचारी |
|---|---|---|---|
| २० -२० | | | |
| २० -२० | | | |
| २० -२० | | | |

## — ः ग्रंथालयाबाबत समग्र माहिती ः—

१) ग्रंथालयाचे नांव ः ——————————————————————

२) दूरध्वनी क्रमांक ः —————————— ३) फॅक्स ः ——————————

४) ई–मेल ः ——————————————

५) ग्रंथपालांचे नाव ः——————————————————————

— शैक्षणिक पात्रता ः —————————— सेवेतील कार्यकाल ः ————————

६) शासनाच्या ग्रंथालयीन आकृतीबंधानुसार आपल्या ग्रंथालयात कर्मचारी नियुक्ती झाली आहे का? होय ☐ नाही ☐

७) महाराष्ट्र शासनाच्या स्टाफ फॉर्म्युल्यानुसार सेवकांची संख्या व प्रत्यक्ष उपलब्ध सेवकांची संख्या .

| अ. क्र. | पदे | विद्यार्थी संख्या | | स्टाफ फॉर्म्युल्या नुसार सेवक | प्रत्यक्ष सेवक | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुदानित | विनाअनुदान | | | | |
| १) | ग्रंथपाल | | | | | | |
| २) | साहाय्यक ग्रंथपाल | | | | | | |
| ३) | ग्रंथालय लेखनिक | | | | | | |
| ४) | ग्रंथालय परिचर | | | | | | |
| ५) | इतर | | | | | | |

८) ग्रंथालयीन कर्मचारी वर्गासाठी प्रशिक्षणाची सोय आहे का? होय ☐ नाही ☐

— असल्यास प्रशिक्षणाचे स्वरूप सांगा .

१) कार्यशाळांचे आयोजन ☐ २) प्रत्येक कर्मचाऱ्यांस स्वतंत्र मार्गदर्शन ☐

३) अन्य संस्थाकडे पाठवून प्रशिक्षित करतो ☐ ४) व्यावसायिक शिक्षणाकरीता पाठवतो ☐

५) इतर # ————————————

९) ग्रंथालयाचे एका वर्षातील कामकाजाचे दिवस ः ————————————

१0) ग्रंथालयाचे एका दिवसातील कामकाजाचे तास ः ————————————

११) ग्रंथालयातील ग्रंथांचे वर्गीकरण कोणत्या पध्दतीने केले जाते?

१) दशांश (डयूई)**DDC** ☐ २) द्विबिंदू (डयूई)**CC** ☐

३) यूडीसी **UDC** ☐ ४) इतर ———— ☐

— कृपया वर्गीकरण आवृत्ती नोंदवा ————

१२) ग्रंथालयाची तालिका अद्ययावत आहे का? होय ☐ नाही ☐

— उत्तर **“होय”** असल्यास तालिका प्रकार नमूद करा .

१) **AACR-2** ☐ २) **AACR- 2R** ☐

३) **CCC** ☐ ४) इतर ———— ☐

१३) आपल्या ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे काय? होय ☐ नाही ☐

१४) संगणकीकरणासाठी कोणती आज्ञावली **(Software)** वापरण्यात येते?

१) **SOUL** ☐ २) **SLIM** ☐

३) **LIBSYS** ☐ ४) **LIBSUITE** ☐

५) **LIBRARIAN** ☐ ६) **LIBRA** ☐

७. इतर # ———————————— (कृपया नमूद करावे)

१५) ग्रंथालयाला स्वतंत्र इमारत आहे का? होय ☐ नाही ☐

१६) विभागवार क्षेत्रफळ व बैठक व्यवस्था ः

| अ. क्र. | विभागवार क्षेत्रफळ | अंदाजे चौ. फूट. | |
|---|---|---|---|
| १. | तालिका कक्ष | | |
| २. | ग्रंथपाल कक्ष | | |
| ३. | देवघेव विभाग | | |
| ४. | संदर्भ विभाग | | |
| ५. | संगणक विभाग | | |
| ६. | ऑडिओ—व्हिडीओ विभाग | | |
| ७. | प्रतिलिपी विभाग | | |
| ८. | नियतकालिके विभाग | | |
| ९. | प्राध्यापक वाचन कक्ष | | |
| १०. | विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासिका | | |
| ११. | विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका | | |
| १२. | ग्रंथसंग्रह विभाग **Stack Room** | | |
| | **ग्रंथालयाचे एकूण क्षेत्रफळ** | | |

— अभ्यासिका सुट्टीच्या दिवशी व रविवारी चालू असतात काय? होय ☐ नाही ☐

— अभ्यासिका आसनव्यवस्था विद्यार्थी व शिक्षक यांच्या एकूण क्षमतेच्या १०%
इतकी आहे काय? होय ☐ नाही ☐

## ःः ग्रंथालय समिती ःः

१७) ग्रंथालय समिती आहे का? होय ☐ नाही ☐

१८) ग्रंथालय समिती सभासद संख्या ः ——————————.

१९) ग्रंथालय समितीच्या वर्षातून किती सभा होतात? ः ——————————.

२०) ग्रंथालयाच्या विकासात ग्रंथालय समितीचा उपयोग किती प्रमाणात होतो?

१) अत्यंत चांगला ☐ २) बरा ☐

३) समाधानकारक ☐ ४) असमाधानकारक ☐

५) सांगता येत नाही ☐

## ः ग्रंथालयाची ग्रंथसंपदा ः

२१) ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा ः ——————

| क्रमिक पूस्तके | संदर्भ ग्रंथ | सर्वसाधारण ग्रंथ | इतर ग्रंथ | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

२२) दररोज किती ग्रंथांची सरासरी देवाण घेवाण होते?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्याथी | | २. | प्राध्यापक | |
| ३. | कर्मचारी वर्ग | | ४. | अभ्यागत **(Visiters)** | |

— विद्यार्थी वाचकांना ग्रंथ किती दिवसांकरीता देतात ____________________

— ग्रंथ उशीरा आल्यास विलंब शुल्क किती लावता ____________________

## ः ग्रंथालयीन साधनसामग्री ः

२३) ग्रंथालयातील उपलब्ध फर्निचर ग्रंथालय व ग्रंथालयीन सेवा याकरीता पुरेसे आहे का?

होय ☐ नाही ☐

२४) ग्रंथालयीन उपलब्ध फर्निचर तपशील ः

| अ.क्र. | फर्निचर | संख्या | अ.क्र. | फर्निचर | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | कपाटे | | २. | खुर्च्या | |
| ३. | रॅक | | ४. | टेबल्स | |
| ५. | पेपर स्टॅण्ड | | ६. | सूचना फलक | |
| ७. | काच फलक **(Display Board)** | | ८. | तालिका पत्रे ठेवण्याची केबिन्स | |
| ९. | ग्रंथ प्रदर्शनी कपाट | | १०. | इतर # | |

२५) ग्रंथालयीन साधनांचा तपशील ः

| अ.क्र. | साधने | संख्या | अ.क्र. | साधने | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | **Typewriter** | | २. | **Computer** | |
| ३. | **Printer** | | ४. | **Scanner** | |
| ५. | **Photocopy Machines** | | ६. | **Bar Code Printers** | |
| ७. | **Digital Cameras** | | ८. | **Fax** | |
| ९. | **UPS Back- up Facility** | | १० | **Others** # | |

२६) ग्रंथालयात दृकःश्राव्य साधनांसाठी स्वतंत्र विभाग आहे काय? होय ☐ नाही ☐

२७) ग्रंथालयात खालीलपैकी कोणती दृकःश्राव्य साधने उपलब्ध आहेत?

| क्र. | प्रकार | संख्या | क्र. | प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | टेलिव्हिजन | | ४. | डिव्हीडी प्लेअर | |
| २. | व्हिसीआर | | ५. | एल. सी.डी. | |
| ३. | केबल नेटवर्क | | ६. | इतर # ____________. | |

२८) मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे का? होय ☐ नाही ☐

२९) ग्रंथालयात खालीलपैकी कोणते मुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे?

| क्र. | प्रकार | संख्या | क्र. | प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | मॅप्स/नकाशा Maps | | ८. | ॲटलास | |
| २. | हस्तलिखिते Manuscripts | | ९. | तक्ते Charts | |
| ३. | अहवाल Reports | | १०. | मानके Standards | |
| ४. | प्रबंध Thesis | | ११. | प्रि-प्रिंट Preprint | |
| ५. | प्रोजेक्ट रिपोर्टस् Project Reports | | १२. | समिती अहवाल Commission Report | |
| ६. | हस्तपुस्तिका Mannuals | | १३. | पुस्तिका Pamphlets | |
| ७. | प्रतिलिपी Photocopies | | १४. | इतर # | |

३०) अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहे का? होय ☐ नाही ☐

३१) ग्रंथालयात खालीलपैकी कोणते अमुद्रित ग्रंथेतर वाचन साहित्य उपलब्ध आहेत?

| क्र. | प्रकार | संख्या | क्र. | प्रकार | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | डिजिटल नकाशे | | ४. | सी. डी. | |
| २. | मायक्रोफिल्म | | ५. | डि. व्ही. डी. | |
| ३. | ऑडियो कॅसेट्स | | ६. | इतर # | |

## ः ग्रंथालयीन सेवा ः

३२) आंतर ग्रंथालयीन सेवेचा लाभ वाचकांना दिला जातो का? होय ☐ नाही ☐

— असल्यास तपशील

| अ.क्र. | ग्रंथालयाचे नाव | केव्हापासून |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |

३३) ग्रंथालया मार्फत पुस्तकपेढी चालविली जाते काय? होय ☐ नाही ☐

— असल्यास लाभार्थी नोंदवावेत.

| अ.क्र | वर्ष | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | २० - २० | |

३४) ग्रंथालयामध्ये Digital Information Resources आहेत काय? होय ☐ नाही ☐

—असल्यास

१. Electronic Journals ☐ २. Electronic Books ☐

३. N-List Consortium ☐ ४. Electronic Reports ☐

५. CD Rom Databases ☐ ६. Electronic Databases ☐

६. इतर —————— कृपया नमूद करावे.

३५) ग्रंथालयीन सेवांबद्दल आपणास काय जाणवते?

| अ.क्र. | सेवा—सुविधा | समाधानकारक | असमाधानकारक | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|
| | पारंपरिक सेवा | | | |
| १. | देव–घेव सेवा (Lending) | ☐ | ☐ | ☐ |
| २. | संदर्भसेवा (Reference) | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | वाचनसाहित्य सूची सेवा (Bibliographical Services) | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | वर्तमानपत्रे कात्रण सेवा (Newspaper clippings) | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | बहिःशाल सेवा (Extensive Services) | ☐ | ☐ | ☐ |
| | आधुनिक सेवा | | | |
| ६. | प्रचलित जागरूकता सेवा (CAS) | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा (SDI) | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | वाचकांना निर्देशन सेवा (Indexing) | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | प्रतिलिपी सेवा (Photocopy) | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | सार सेवा (Abstact) | ☐ | ☐ | ☐ |
| | संगणक सेवा | | | |
| ११. | इंटरनेट, ई–मेल ब्राऊझिंग सेवा (Online Search) | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | ओपॅक सेवा (OPAC) | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | ऑनलाईन डेटाबेस सेवा (Online Database) | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | ऑफलाईन डेटाबेस सेवा (Offline Databas) | ☐ | ☐ | ☐ |
| १५. | प्रलेख प्रदान सेवा (DDS) | ☐ | ☐ | ☐ |

३६) वाचकांना ग्रंथालयामार्फत सेवा पुरविताना अडचणी येतात काय? होय ☐ नाही ☐

— उत्तर **"होय"** असल्यास (कृपया अडचणी नमूद करा)

१. अपुरा कर्मचारी वर्ग ☐ २. खंडित संगणक सेवा ☐

३. अपुरा कालावधी ☐ ४. सुट्टयांचे अधिक प्रमाण ☐

५. इतर —————— कृपया नमूद करावे.

३७) वाचकांना ग्रंथालयाकडे आकर्षित करून घेण्यासाठी कोणते उपक्रम राबविले जातात?

१. ग्रंथप्रदर्शन ☐ २. ग्रंथचर्चा ☐

३. वक्तृत्व स्पर्धा ☐ ४. वादविवाद स्पर्धा ☐

५. दिनविशेष ☐ ६. सामुहिक गायन स्पर्धा ☐

७. निबंध लेखन ☐ ८. विज्ञान वार्तापत्र ☐

९. वाचन स्पर्धा ☐ १०. ग्रंथालय तासिका ☐

११. ग्रंथालय साक्षरता ☐ १२. इतर ——————

३८) ग्रंथालयीन कार्यक्रमाबद्दल आपला अभिप्राय नोंदवा.

| अ. क्र. | ग्रंथालयीन कार्यक्रम | अत्यंत समाधान कारक | समाधान कारक | सांगता येत नाही | असमाधान कारक | अत्यंत असमाधान कारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | माहिती साक्षरतेचे वर्ग | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | संगणक साक्षरता उपक्रम<br>**E-Literacy Programmes** | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | स्मृतिदिन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | सामूहिक ग्रंथवाचन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | गुणवंत वाचक पुरस्कार | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ६. | आरोग्यविषयक कार्यक्रम | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | महिलांविषयी जनजागृती कार्यक्रम | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | मार्गदर्शन शिबीर | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | चित्रकला स्पर्धा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ११. | धार्मिक कार्यक्रम | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | व्यवसाय मार्गदर्शन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | पर्यावरण जागृती शिबीरे | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | कृषिविषयक कार्यक्रम | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |

## ःः ग्रंथालयीन सुविधा ःः

३९) ग्रंथालयातील भौतिक सुविधा पुरेशा आहेत काय ? होय ☐ नाही ☐ तटस्थ ☐

४०) ग्रंथालयीन भौतिक सुविधांबद्दल आपला अभिप्राय नोंदवा.

| अ. क्र. | भौतिक सुविधा | अत्यंत समाधानकारक | समाधानकारक | सांगता येत नाही | असमाधान कारक | अत्यंत असमाधान कारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जागा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| २. | ग्रथांलयीन स्वच्छता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ३. | फर्निचर — खुर्च्या | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ४. | फर्निचर — टेबल | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ५. | फर्निचर — फूटरेस्टस | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ६. | प्रकाश योजना | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ७. | स्वच्छता गृह | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ८. | पिण्याचे पाणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ९. | वाचनकक्षाची क्षमता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १०. | आवाज / ग्रंथालयीन शांतता | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| ११. | खेळती हवा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १२. | फ्लोरींग | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १३. | अंतर्गत मांडणी | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १४. | सूचना व मार्गदर्शक फलक | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| १५. | अपंग वाचकांसाठी सुविधा | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |

## ःः ग्रंथालयास मिळणारे अनुदान ःः

४१) ग्रंथालयास मिळणाऱ्या निधी/अनुदानाचे स्वरूप.

१. विद्यापीठ अनुदान आयोग ☐ २. शासकीय अनुदान ☐

३. पालक संस्था ☐ ४. इतर संस्थेमार्फत ☐

५. विद्यार्थी देणगी ☐ ६. देणगी ☐

७. इतर ____________.

४२) यु.जी.सी. विशेष अनुदानाअंतर्गत ग्रंथालयास मिळत असलेले अनुदान.

(# असल्यास त्याचा तपशील नोंदवा)

१. ८वी योजना ☐ २. ९वी योजना ☐ ३. १०वी योजना ☐

४. ११वी योजना ☐ ५. १२वी योजना ☐

४३) एकूण निधीतील किती टक्के भाग संदर्भसाधनांवर खर्च केला जातो. ____________

४४) गेल्या दोन वर्षातील विभागवार खर्चाचा तपशील ः —

| अ.क्र. | विभाग | वर्ष २० –२० | वर्ष २० –२० | |
|---|---|---|---|---|
| १. | ग्रंथखरेदी | | | |
| २. | नियतकालिके | | | |
| ३. | वृत्तपत्रे | | | |
| ४. | बाईडींग | | | |
| ५. | साधनसामग्री | | | |
| ६. | | | | |

४५) नियतकालिकांची भाषावार संख्या ः

| मराठी | हिंदी | इंग्रजी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

४६) ग्रंथालयात येणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांचा तपशील ः

| अ.क्र. | भाषा | राष्ट्रीय संख्या | आंतरराष्ट्रीय संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | | | |
| | | | | |

## ःः ग्रंथालयीन मूल्यमापन ःः

४७) आपल्या कोणत्या बलस्थानांची नॅक मूल्यांकनात आपल्या ग्रंथालयाची प्रतिमा उंचावण्यास मदत झाली असे आपणास वाटते.

१) वाचन साहित्य ☐ २) प्रभावी मनुष्यबळ नियोजन निवड ☐
३) ग्रंथालय सेवा व विस्तारित सेवा ☐ ४) शास्त्रीय संघटन ☐
५) संस्थेबाहेरील वाचकांना सेवांचे विपणन ☐ ६) वाचनसाहित्य व्यवस्थापन ☐
७) वाचकांना दिल्या जाणाऱ्या सोयीसुविधा ☐ ८) अंदाजपत्रक बनविण्याची पध्दत ☐
९) इतर # ———————————— (कृपया नमूद करा)

४८) ग्रंथालयाच्या इतर सभासदांना किंवा अभ्यागतांना उच्च शिक्षणाचे प्रबंध आदी कार्यासाठी मार्गदर्शन / साहाय्य केले जाते का? होय ☐ नाही ☐

४९) ग्रंथालयाच्या संरक्षणासाठी कोणत्या उपाययोजना आहेत?

१) पेस्ट कंट्रोल ☐ २) व्हॅक्यूम क्लिनिंग ☐ ३) **CCTV** यंत्रणा ☐
४) **RFID** यंत्रणा ☐ ५) डस्टिंग ☐ ६) स्वच्छाता व साफसफाई ☐

५०) ग्रंथालयाचे ग्रंथ परिगणन (Stock Verification) किती वर्षांनी करता?

१) एक वर्ष ☐ २) तीन वर्ष ☐
३) पाच वर्ष ☐ ४) इतर ———— ☐

५१) ग्रंथालयाच्या ग्रंथ परिगणन (Stock Verification) साठी कोणती पध्दत अवलंबितात?

१) **Shelf List** ☐ २) **Classified Part of the Catalogue** ☐
३) **Aceession Register** ☐ ४) इतर पध्दत # ———— ☐

५२) वाचन साहित्य रद्दबातल करण्याची गरज भासते काय? होय ☐ नाही ☐

— जर होय असल्यास,
१) जागेची टंचाई ☐ २) उपयोगास अयोग्य ☐
३) ग्रंथ सांभाळण्यावर होणारा खर्च ☐ ४) ग्रंथांचा शोध घेण्यात अडथळा ☐
५) ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेवर परिणाम ☐


५३) ग्रंथालयीन विकासाबाबत भविष्यकालीन भावी योजना ः—

______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________
______________________________________________

दिनांक ः ग्रंथपालांची सही ः ______________

ठिकाण ः भ्रमणध्वनी ः ______________

**— XOX —**




ड. ठाणे जिल्हयाचा नकाशा

ई. पालघर जिल्हाचा नकाशा

